म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. ७५५८
९८८७



# श्री कबीर वचनावली

REFBK-0011994

भवानीशंकर श्रीधर पंडित

सन १८६१

अभिजात सारस्वत : ५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32823 वि:
क्रमांक १५५८ नों. दि. 8-3-82
११८८५

# श्रीकबीरवचनावलि

[श्री संत कबीरांच्या काव्याचा
समवृत्त पद्यानुवाद.]

REFBK-0011994

भवानीशंकर श्रीधर पंडित

सुविचार प्रकाशन मंडळ
नागपूर आणि पुणें.

प्रकाशक :
श्यामकान्त बनहट्टी, बी. ए.
सुविचार प्रकाशन मंडळ,
४६१/४, सदाशिव, पुणें २.
धनतोली, नागपूर १.

प्रथमावृत्तीचे सर्व हक्क
प्रकाशकाधीन
प्रथमावृत्ति, डिसेंबर १९६१
किंमत सात रुपये

अभिजात सारस्वत :
संपादक : श्री. ना. बनहट्टी
५ : श्रीकबीरवचनावलि.

मुद्रक :
मोहनलाल भट्ट
राष्ट्रभाषा प्रेस,
हिन्दीनगर, वर्धा.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32823 विः ०१०५
क्रमांक ९४५८ नोंः दिः 8/3/62

# भूमिका

महात्मा कवीरदासांच्या ८४३ निवडक दोह्यांचा आणि १०१ वेंचक पदांचा 'श्रीकवीरवचनावलि' हा प्रस्तुत संग्रह महाराष्ट्रीय रसिकांच्या हातीं देतांना मला अत्यन्त आनंद होत आहे. कवीरदासांची निर्भीड आणि सडेतोड वाणी अगदीं लहान वयांत माझ्या कानांवर पडली. आज त्या गोष्टीला चार दशकांहून अधिक काळ लोटून गेला. आम्ही त्यावेळीं अजमेरास दक्षिणी वाड्यांत राहात होतों. या वाड्यांत वल्लभ, दादू, कबीर इत्यादिकांच्या पंथांतील भिक्षेकरी भिक्षेच्या निमित्ताने येत, आणि भक्तिगीतें आळवून भिक्षांदेहि करीत. या भिक्षेकऱ्यांत काळी दाढी वाढविलेला, नाथद्वार येथे राहणारा, एक पुष्टिमार्गी भिक्षेकरी असे. तो मला अजून आठवतो. एका हातानें गळ्यांत अडकविलेला भला मोठा तंबोरा छेडीत, दुसऱ्या हातानें चिपळ्या वाजवून तो जेव्हां ताल देऊं लागे; आणि आपल्या गोड गळ्यानें

**मुझे क्या काम दुनियासे ? मेरा श्रीकृष्ण प्यारा है !**
**जसोदानंदका नंदन मेरी आंखोंका तारा है !**

हा गज्जल आलापूं लागे, तेव्हां त्याच्याभोंवती गराडा घातलेले आम्ही बाल-गोपाल मंत्रमुग्ध होत असूं. दुसरा एक भिक्षेकरी

**दिननोंके बीते जाते हैं**
**फिर नर मन पछताते हैं**

हें पद मालकस रागांत गाऊन आबालवृद्धांना एका जागीं खिळून टाकी. कबीरपंथीयांत दोन प्रकारचे भिक्षेकरी होते. त्यांत जे फकीर होते, ते हिरव्या लुंग्या नेसत. त्यांचा मुखंड हातांतील तबकांत धुपाटणे घेऊन त्यांत ऊद जाळी. त्याच्यामागें त्याच्यापासून दोन पावलें दूर त्याचे दोन अनुगामी असत; आणि त्यांच्यामागें पुन्हा तितक्याच अंतरावर आणखी दोन अनुगामी असत. हे रस्त्यावर सडकेवरील दुकानांजवळन कबीरांच्या 'साख्या' म्हणत भिक्षा मागत. मुखंडाने '**कौडी रे ! कौडी**' असें म्हणतांच मागील दोघे

**'माया रे ! जोडी '** असें म्हणत; आणि त्यांच्या मुखांतून तेवढें पद बाहेर पडतांच शेवटचे दोघे **'जोडी रे ! लाख करोड'** या पदानें ' साखी'चा पहिला चरण पूर्ण करीत. आणि मग

**खालिकघरकी चिट्ठी आई चला लंगोटी छोड**

हा दुसरा चरण ते पांचहि फकीर एकदम म्हणत. त्यांचें म्हणणें मोठें प्रभावी असे. कबीरपंथीयांत कांहीं साधु होते. अशांपैकी एक साधु शिवबागेच्या समोरील सडकेवर गळयांत ढोलकें अडकावून बसलेला असे. त्याच्या ढोलक्यास घुंगरू बांधलेले असत.

**पंडित ! छोड पुरानी बानी**
**पुन्य गए पाताललोकमें, पाप बडे बलवानी**

हें पद त्याच्या तोंडून ऐकण्यासाठी मार्गस्थांची ही थाप त्याच्याभोंवती उभी राही ! हा साधु

**मिट्टी बोले कुम्हारकूं**
**तूं क्या रोंधे मुझकूं ?**
**एक दिन ऐसा आयगा कीं**
**मिट्टि बनाउंगि तुझकूं !**

हे कबीरांचे ' खडे बोल 'हि मोठया परिणामकारक रीतीनें म्हणत असे.

हीं पदें कानीं पडत असतांनाच इंग्रजी शिक्षणासाठी मी अजमेर येथील रेलवे मराठी शाळेंतून गवर्नमेंट हायस्कूलमध्यें प्रवेश केला. हायस्कूलच्या शिक्षणांत ' हिन्दी ' हा एक विषय होता. त्यावेळच्या आमच्या पाठ्य-पुस्तकांत गोस्वामी तुलसीदासजी, कबीरदास, रहीम, गिरिधर, वृन्द इत्यादि-कांच्या काव्यांतले निवडक वेंचे असत. हे शिकवायला मला जे गुरु लाभले, तेहि सहृदय होते. त्यांनी आपल्या आकर्षक शिक्षणशैलीनें माझ्या मनांत हिन्दी कवितेविषयीं आपुलकी निर्माण केली. आमच्या पाठ्यपुस्तकांत वरील कवींच्या काव्यांतले जे वेंचे होते, ते त्यांतील सत्यदर्शनामुळें मला शिकतां शिकतांच मुखोद्गत झाले. त्यांतील कांहीं सुंदर व हितकर सूक्ति आजहि माझ्या जिभेवर आहेत.

इंग्रजी शाळेंत शिकत असतांनाच मला यमकें जुळवण्याचा छंद लागला. हा छंद चालू असतांना एक दिवस मी कबीरदासांच्या 'सवाला'ला मराठी रूप देण्याचा प्रयत्न केला.

**वदे कुंभारा माति नम्रतेनें**
**"नको मर्दू मज कुटूं पहारीनें,**
**एक दिन तो येईल असा, जेव्हां–**
**माति बनुनी मद्रूप होसि तेव्हां !"**

'एक दिन तो येईल' या मथळ्याची 'दिंडी' छंदांतील माझी ही कविता मी 'श्रीधरात्मज' या टोपणनांवानें पुण्याच्या चित्रशाळेमार्फत प्रसिद्ध होणाऱ्या 'मराठी शालापत्रका'कडे पाठविली. आणि कांहीं महिने लोटल्यावर ती अगदीं अनपेक्षितपणें माझें नांव गळून एका अंकांत प्रसिद्ध झाली. ही गोष्ट १९२१ सालची आहे. आपल्या नांवाला प्रसिद्धि मिळाली नाहीं याबद्दल माझें बालमन त्यावेळीं खट्टू झालें हें खरें; परंतु आपली कविता छापून आली या अभिमानानें तें आनंदित झालें हेंहि तितकेंच खरें आहे. कबीरांची वाणी मी मराठींत आणण्याचा खटाटोप चाळीस वर्षांपूर्वी केला होता. कबीरांच्या वाणीचा अनुवाद करण्याचा आजचा जाणता प्रयत्न आणि पूर्वीचा नेणता प्रयत्न यांच्यांतलें अन्तर लक्षांत यावें म्हणून पूर्वीच्या घटनेचा आज येथें मुद्दाम निर्देश केला आहे. त्यावेळीं पुढें आपण कबीरदासांच्या वाणीचा अनुवाद करण्याचा यथाशक्ति यथामति प्रयत्न करूं अशी कल्पना माझ्या ध्यानींमनींहि नव्हती. आज तो अनुवाद माझ्या हातून सिद्ध झाला हा केवळ योगायोग !

१९५७ च्या मे महिन्यांतील गोष्ट आहे. उन्हाळ्याच्या सुट्टींत अजमेरहून माझ्या वडिलांचे मामेभाऊ ती. जनूकाका खांडेकर नागपुरास माझ्याकडे आले होते. त्यांचेंहि शिक्षण अजमेरास झालें आहे. त्यांच्याशीं बोलतांना कित्येकदां हिन्दी साहित्यांतील सूक्तिकाव्याचा विषय निघे. आमच्या पाठ्यपुस्तकांत कबीरदासांचा एक दोहा होता.

**जिन खोजा तिन पाइया गहिरे पानी पैठ**
**हौं बौरी ढूंढन गई रही किनारे बैठ !**

ह्या दोह्याचा आशय लहान वयांत लक्षांत येत नसे. त्या वयांत केवळ शब्दार्थावर काम भागत असे. परंतु आतां या दोह्यांतील गूढार्थ लक्षांत आला म्हणजे त्याच्या कर्त्याच्या 'अधिकारा' पुढें शिर आपोआप नम्र होतें. 'ज्यांनीं अथांग अशा समुद्राच्या तळाशीं जाऊन शोध घेतला, त्या जिवावर उदार झालेल्या पाणवुड्यांना मोत्यें सांपडलीं. परंतु मी वेडी शोध घ्यावयास म्हणून गेलें, आणि किनाऱ्यावरच बसून राहिलें! म्हणजे ज्यांनी सर्वस्वावर पाणी सोडून त्या परमेश्वराचा शोध घेतला, त्यांना तो प्राप्त झाला. परंतु ज्यांची मति वेडी होती, ते शोध घ्यावयास गेले, आणि किनाऱ्यावर बसून राहिले. अर्थात् परमेश्वराची प्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल, तर त्याकरितां प्रयत्न व त्याग हवा.' आतां मी कबीरदासांच्या वाणीचा या प्रगल्भ दृष्टीनें अभ्यास करूं लागलों.

या अभ्यासाच्या पंधरासोळा वर्षें पूर्वीं मी हिंदींत कबीरदासांसंबंधीं जेवढें साहित्य आहे, तें वाचण्याचा प्रयत्न केला होता. तें साहित्य वाचतांना मला कबीरांच्या कांहीं दोह्यांत आणि तुकारामांच्या कांहीं अभंगांत विलक्षण साम्य आढळलें. तेव्हां त्यावर मी एक लहान निबंध लिहिला. तो एप्रिल १९४१ च्या 'मनोहरां'त 'तुकाराम व कबीर' या शीर्षकानें प्रसिद्ध झाला होता. १९४९ च्या सुमारास नागपुरास प्राच्यविद्या परिषदेचें अधिवेशन महामहोपाध्याय काणे यांच्या अध्यक्षतेखाली भरलें होतें. तेव्हां प्रा. कृ. पां. कुळकर्णी हे मराठी विभागाचे अध्यक्ष होते. त्या विभागाच्या सभेंत मी वरील निबंध सुधारून व वाढवून वाचला होता. तो प्रा. कुळकर्णी यांना फार आवडला होता. परिषदेचे स्थानिक कार्यवाह डॉ. हीरालाल जैन यांनीहि त्याची प्रशंसा केली होती. हा माझा निबन्ध ऑगष्ट १९४९ च्या 'नवभारतां'त आला होता. यंदा 'सन्तसमागम' हें माझें संतसाहित्यविषयक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. त्यांत त्याचा समावेश केला आहे. या निबंधाचें मी हिन्दींत भाषांतर केलें होतें. तें जानेवारी १९६१ च्या 'आजकल'मध्यें प्रसिद्ध झालें आहे.

सारांश, कबीरदासांवरील माझा व्यासंग पुष्कळ दिवसांपासून चालू होता. मात्र तो अखंडित नव्हता. १९५७ च्या उन्हाळ्याच्या सुट्टींत मी कबीरदासांच्या दोह्यांचें समवृत्त भाषान्तर करण्याचा निश्चय केला. हा

निश्चय करतांना माझ्यापुढें जुन्या मध्यप्रदेशांतील तिघा विद्वान साहित्यिकांचा आदर्श होता. कै. माधवराव सप्रे यांनी 'दासबोधा'चें आणि कै. भय्यासाहेब भगाडे यांनी 'ज्ञानेश्वरी'चें 'हिन्दीं'त भाषान्तर केलें आहे. कै. यादवराव जामदार यांनीं 'तुलसीरामायणा'चें मराठींत भाषांतर केलें आहे. या निश्चया-प्रमाणें मी नित्य दोनचार दोहे मराठींत आणूं लागलों. कबीरदासांच्या कृपादृष्टीमुळें हळुहळू बरेंच दोहे मराठींत भाषांतरित झाले. मात्र हें कार्य माझ्या सवडीनें चाललें होतें. याच सालीं कोल्हापूरचे सुप्रसिद्ध कवि डॉ. रामचंद्र चिंतामण श्रीखंडे हे नागपुरास आले होते. त्यांनी गोस्वामी श्री तुलसीदासजी यांच्या 'रामचरितमानस' आणि 'दोहावलि' या दोन ग्रंथांना अनुक्रमें 'सुश्लोकमानस' आणि 'सुश्लोक दोहावलि' हे मनोहर मराठी वेष चढविले आहेत. नागपूरच्या मुक्कामांत डॉक्टरसाहेबांना मी कबीर-दासांच्या कांहीं दोह्यांचा माझा मराठी अनुवाद वाचून दाखविला होता. या संबंधीं आपल्या 'सुश्लोक दोहावलि'च्या प्रस्तावनेंत ते लिहितात--'श्री रामानन्द सम्प्रदायी हिन्दी सन्त श्री कबीरदासजी यांची दोहावलीहि हिन्दींत सुप्रसिद्ध आहे. तिचा अनुवाद समवृत्तांत नागपूरचे आमचे विद्वान् मित्र प्रा. भवानीशंकर श्रीधर पंडित या कवींनीं चालविला असून त्यांतील कांहीं नमुने वर्षापूर्वी नागपुरास त्यांनीं मला प्रेमानें म्हणून दाखविले.' डॉक्टर-साहेबांच्या या सुहृद्भावाबद्दल मी त्यांचा आभारी आहे. अत्यंत दुःखाची गोष्ट आहे कीं माझा हा अनुवाद पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेला पाहण्यास आज डॉक्टरसाहेब विद्यमान नाहींत. दिनांक १ आक्टोबर १९६१ ला कोल्हापूर येथें त्यांचें निधन झालें.

एप्रिल १९६० मध्यें मी दोह्यांचा अनुवाद पूर्ण करून त्याची मुद्रणप्रत घेऊन पुण्यास गेलों. पुण्यांत माझे विद्यालयीन आचार्य प्राध्यापक श्रीनिवास नारायण बनहट्टी यांच्याशीं माझी गांठ पडली. त्यांच्याजवळ मी कबीरांच्या दोह्यांच्या प्रकाशनाची गोष्ट काढली असतांना माझ्यावरील लोभामुळें त्यांनीं सुविचार प्रकाशन मंडळामार्फत हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें आश्वासन दिलें. त्यामुळें मी निश्चिन्त झालों. त्यांचा लोभ असाच वृद्धिंगत होवो येवढीच परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

प्रारंभीं मी केवळ कांहीं निवडक दोह्यांचें व फक्त तीन पदांचें भाषान्तर केलें होतें. हीं तीन्हीं पदें नोव्हेंबर १९५९ च्या 'धारें'त आलीं होतीं. सुविचार प्रकाशन मंडळमार्फत कबीरदासांची वाणी प्रसिद्ध करण्याचें ठरल्यावर निवडक दोह्यांबरोबर वेंचक पदेंहि द्यावीं अशी कल्पना स्फुरली. कबीरदासांचा साहित्यसमुद्र जसा अथांग तसाच असीम आहे. तो उपसतां येणें अशक्य आहे. त्यांच्या साहित्यांत साखी, शब्द, रमैनी, कहरा, बसंत, चांचर, बेलि, बिरहुलि, हिंडोला इत्यादि भिन्न भिन्न प्रकार आहेत. त्यांत ग्यान चौंतीसा आणि विप्रमतीसी हे दोन भाग मुख्य आहेत. कबीरदासांचें संपूर्ण साहित्य 'बीजक' या ग्रंथांत समाविष्ट झालें आहे. हा ग्रंथ हंसदास शास्त्री व महावीरप्रसाद यांनीं मोठ्या तत्परतेनें व मेहेनतीनें संपादन केला आहे. परंतु हा सर्वच्या सर्वच ग्रंथ मराठींत आणतां येणें शक्य नाहीं. शिवाय कबीरदासांच्या नांवांवरील बरेंच साहित्य प्रक्षिप्त आहे. त्यांच्या एकाच पदाचे अनेक पाठ आढळतात. दोह्यांचेहि अनेक पाठभेद आहेत व त्यांची संख्या कमी अधिक आहे. हें सर्व साहित्य प्रमाणित आहे किंवा नाहीं याविषयीं हिन्दी समालोचकांत व संशोधकांत तीव्र मतभेद आहेत. तेव्हां प्रस्तुत अनुवाद सादर करतांना मी मुख्यत: पुढील धोरण स्वीकारलें आहे:—

या अनुवादांत मी प्रामुख्यानें कै. बाबू श्यामसुंदरदास यांची 'कबीर-ग्रंथावलि', कै. अयोध्यासिंह उपाध्याय यांची 'कबीरवचनावलि' आणि डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांचा 'कबीर' या तीन ग्रंथांचा आधार घेतला आहे. यांपैकीं पहिले दोन ग्रंथ काशीच्या नागरी प्रचारिणी सभेनें प्रमाणित म्हणून प्रसिद्ध केले आहेत; आणि तिसरा ग्रंथ कबीरांचें व्यक्तित्व, साहित्य व तत्त्वविचार यांचें सम्यक् आलोचन म्हणून हिन्दी साहित्यांत सर्वमान्य आहे. दोह्यांची निवड मी बहुधा अयोध्यासिंह उपाध्याय यांच्या 'कबीरवचनावलीं'तून केली आहे. त्या ग्रंथाव्यतिरिक्त फारच थोडे दोहे इतर पुस्तकांतून घेतले आहेत. त्या पुस्तकांचीं नांवें या संग्रहाच्या शेवटीं जोडलीं आहेत. दोह्यांचें वर्गीकरण व मथळे हे शक्यतोंवर 'कबीरवचनावली'प्रमाणें ठेवले आहेत. क्वचित् मूळ हिन्दी ग्रंथांतील 'विविध' या वर्गातील भिन्न भिन्न दोह्यांना यथोचित वर्गांत समाविष्ट केलें आहे व 'जिज्ञासु', 'मृत्यु', 'क्षणभंगुरता' असे कांहीं मथळे नवीन योजले आहेत. क्वचित् हिन्दी आणि मराठी या भाषांतील मूलभूत भेद लक्षांत घेऊन मथळ्यांचें नामकरण मराठीच्या रूढ स्वभावास साजसें केलें आहे.

पदांचे वेंचे 'कबीरवचनावलि' आणि 'कबीर' या दोन ग्रंथांतून वेंचले आहेत. यांपैकीं पहिल्या ग्रंथांत एकाच मथळ्याखालीं एकाच विषयावरील अनेक पदें आहेत. दुसऱ्या ग्रंथांत पदांना मथळे नाहींत. प्रस्तुत संग्रहांत मी मराठी अनुवादांतील सर्व पदांना सर्वस्वी नवीन मथळे दिले आहेत. त्यावरून पदांतील विषयाचा बोध होईल अशी माझी अपेक्षा आहे. पदांच्या चाली शक्यतोंवर मूळ चालींच्या बरहुकूम ठेवण्याचा यत्न केला आहे. क्वचित् कांहीं फेरफार केले आहेत.

डॉ.हजारीप्रसाद द्विवेदी यांनीं आपल्या 'कबीर' या ग्रंथांतील सुरवातीचीं शंभर पदें कै. आचार्य क्षितिमोहन सेन यांच्या संग्रहांतून घेतलीं आहेत. आचार्य सेन यांनीं या पदांचा संग्रह कबीरपंथी साधूंच्या मुखांनीं निरनिराळीं भजनें ऐकून केला होता. हीं पदें महाकवि कै. रवीन्द्रनाथ ठाकूर यांना फार आवडलीं होतीं. त्यांनीं या पदांचें इंग्रजी भाषांतर केलें आहे तें 'ONE THOUSAND POEMS FROM KABIR' या नांवानें विख्यात आहे. रविबाबूंचीं हीं भाषान्तरित पदें पाश्चात्य जगांत अतिशय लोकप्रियता पावलीं होतीं. खुद्द रविबाबूंच्या 'गीतांजलि', 'नैवेद्य', 'खेया' इत्यादि चिन्तनात्मक कवितासंग्रहांवर कबीरांच्या विचारांची दाट छाया आहे. हे विचार पाश्चात्यांना अनोखे व नवखे होते. त्यामुळें तिकडे त्यांचें बरेंच कौतुक झालें. शिवाय त्या विचारांना रवीन्द्रांच्या काव्यात्म वाणीची जोड मिळाली होती. आपल्याकडे ते विचार परंपरागत, प्राचीन आणि पूर्वपरिचित असल्यामुळें मी तीं सर्वच पदें भाषान्तरित केलीं नाहींत. त्यांतली कांहीं विशेष प्रभावी पदें मी वेंचलीं आहेत, आणि त्यांचा भावानुवाद केला आहे. दोह्यांचे आणि पदांचे पाठ निश्चित करतांना मला जे पाठ अर्थाच्या दृष्टीनें योग्य वाटले, त्यांची मी निवड केली आहे.

आपल्या महाराष्ट्रांत सर्वत्र 'कमलमुख रामभजनकूं दिया', 'भजो रे भय्या राम गोविंद हरि', 'गुरूकृपा अंजन पायो मेरे भाओ', आणि 'तूं तो राम सुमर जग लढवा दे' हीं कबीरांचीं तथाकथित पदें प्रचलित आहेत. कै. लक्ष्मण रामचन्द्र पांगारकर यांनीं आपल्या 'भक्तिमार्गप्रदीपां'त या पदांचा समावेश केला आहे. यांपैकीं शेवटचें पद सुप्रसिद्ध गायनाचार्य कै. विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या सुरेल संगीतामुळें गांधर्व महाविद्यालयाच्या द्वारें सर्वत्र प्रसार पावलें होतें. संगीतास अनुकूल अशी त्या गीताची पदरचना आहे.

तूं तो राम सुमर जग लढवा दे
चंडी, भैरव, सितलामाता–पथर पुजत वाको पुजवा दे
कोरा कागज, काली स्याही–पलर लिखत वाको लिखवा दे
हाथी चालत अपने गतमां–कुतर भुकत बाको भुकवा दे
कहत कबीर सुनो भाइ साधो नरक पचत वाको पचवा दे

या पदांशिवाय '**इस तन, धनकी कौन बडाई**' आणि '**सबसे राम भजन कर लेना एक दिन जाना रे भाई**' हीं देखील तथाकथित पदें कबीरांचीं म्हणून महाराष्ट्रांत ओळखलीं जातात. परंतु हीं पदें वरील प्रमाणित ग्रंथांत आढळत नाहींत. वरील दोन पदांतील '**हाथी चालत अपने गतमों कुतर भुकत वाको भुकवा दे**' आणि '**आप मुए पीछे डुब गई दुनिया**' हे दोन चरण तर महाराष्ट्रांत सर्वत्र म्हणीप्रमाणे प्रसिद्ध आहेत. कदाचित् वरील प्रमाणित ग्रंथांत कबीरांच्या सर्व पदांचा समावेश झाला नसावा; किंवा हीं पदें त्यांच्या पश्चात् त्यांच्या पंथांत निर्माण झालीं असावींत.

या संग्रहाच्या आरंभीं मी कबीरांचें लहानसें जीवनचरित्र जोडलें आहे. त्यांत हठयोगाची किंवा परवर्ती कबीरपंथी सिद्धांतांची माहिती मुद्दाम दिली नाहीं. कारण हा संग्रह तयार करण्यांत माझा हेतु केवळ कबीरांच्या प्रभावशाली वाणीचें दर्शन घडविण्याचा आहे. कबीरपंथाच्या बाहेर कबीरांचा जो प्रभाव आहे, तो त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्वाचा आणि निर्भीड व ओजस्वी वाणीचा आहे. तेव्हां त्या दृष्टीनें रसिकांनीं या संग्रहाकडे पाहावें अशी प्रार्थना आहे.

हा संग्रह छापतांना डाव्या बाजूस मूळ हिंदी दोहे व पदें आणि उजव्या बाजूस त्यांचा मराठी अनुवाद छापला आहे. मराठी अनुवाद सर्वत्र तंतोतंत साधला आहे असें नाहीं. क्वचित् त्यांत 'अधिक तें सरतें व न्यून तें पुरतें' करून घेण्याचा प्रसंग वाचकांवर येण्याची शक्यता आहे. परंतु अनुवाद शक्यतोंवर मूलानुसार व भावानुगामी असावा याविषयीं मी दक्षता बाळगली आहे व परिश्रमांची पराकाष्ठा केली आहे. हिन्दी व मराठी या भाषा एकमेकींना अतिशय जवळच्या असल्यामुळें मी शक्य तोंवर मूळ शब्द अनुवादांत योजण्याचा प्रयत्न केला आहे. आजकाल राष्ट्रभाषा म्हणून हिन्दीचा सर्वत्र प्रचार व प्रसार होत आहे. अशा वेळीं हिन्दीचा अभ्यास करणाऱ्या मराठी

अभ्यासकांना आणि मराठीचा अभ्यास करणाऱ्या हिन्दी अभ्यासकांना या संग्रहाचा थोडाफार तरी उपयोग होईल असा माझा विश्वास आहे. तसा त्यांना लाभ झाल्यास मी माझ्या श्रमांचें सार्थक झालें असें मानीन.

या संग्रहांतील हिन्दी दोह्यांचें आणि पदांचें लेखन मी मुळाप्रमाणें कायम ठेवलें आहे. त्या लेखनांत 'करै', 'करे' अशी दोन्हीं रूपें आढळतात. हिंदींत शब्दांचें लेखन उच्चारानुसारी दिसत नाहीं. उदाहरणार्थ, '**कहत कबीरा सुन भाई साधो**' यांतील '**भाई**' हा शब्द '**भै**' असा द्विमात्रिक उच्चारला जातो. परंतु त्याचें लेखन त्याप्रमाणें करण्यांत येत नाहीं. त्याचप्रमाणें 'हि' व 'इ' यांच्या उच्चारांत सारखेपणा असल्यामुळें त्यांच्या लेखनांत कांहीं निर्बंध दिसत नाहीं. तेव्हां मी त्यांत कोणतीहि ढवळाढवळ केली नाहीं. हिन्दींत किंचित् उच्चारित अनुस्वार अर्धचंद्रावर टिंब देऊन दाखवतात. उदाहरणार्थ—जहँ, तहँ. परंतु अशा चिन्हाच्या खिळयांची छापखान्यांत उणीव असल्यामुळें मी या प्रकारचे अनुस्वार केवळ टिंवानें दाखविले आहेत. मराठी शुद्धलेखन प्रचलित पद्धतीप्रमाणें ठेवलें आहे.

या पुस्तकाचीं मुद्रितें तपासतांना अनवधानाने क्वचित् कांहीं अशुद्धें राहिलीं आहेत. तीं अर्थबोधाला बाधक नाहींत. शिवाय तीं वाचकांच्या लक्षांत सहज येण्याजोगीं असल्यामुळें या पुस्तकाच्या शेवटीं शुद्धिपत्र जोडण्याचें टाळलें आहे. पृष्ठ १०८ वर ३८७ व ३८८ या क्रमांकांचे एकाच अर्थाचे दोन हिन्दी दोहे आहेत. त्यांपैकी ३८७ क्रमांकाच्या हिंदी दोह्याचा मराठी अनुवाद पृष्ठ १०९ वर ३८८ क्रमांकांत आला आहे. ३८८ क्रमांकाच्या हिंदी दोह्याचा मराठी अनुवाद चुकून गळला आहे. तो असा :—

**कच्च्या मडक्याला जपे प्रेमभरें कुंभार—**
**आंतुन; पण हळुवारपणि दे वरपांगीं मार.**

उपर्युक्त दोन्ही दोहे 'गुरुशिष्यसंबंधा'संबंधीं आहेत. या चुकून गळलेल्या दोह्यांत दुसऱ्या दोह्यापेक्षां अधिक खुबीदार अर्थ आहे. 'मडकें कच्चें असेल तर कुंभार त्याला आंतून अतिशय जपतो आणि बाहेरून थापटतो. त्याचप्रमाणें गुरु हे शिष्य हळुवार असेल तर त्याला वरकरणी बोलतात; परंतु आंतून त्याचा मायेनें सांभाळ करतात.'

हा संग्रह सिद्ध झाल्यावर येथील विदर्भ हिन्दी प्रचार समितीनें दिनांक १५-९-६१ रोजीं हिंदी साहित्याचे वयोवृद्ध सेवक पं. प्रयागदत्त शुक्ल, संस्कृतचे प्राध्यापक डॉ. करंबेळकर, 'पांचाली' या तामीळ नाटकाचें हिंदीत भाषांतर करणारे श्री. सुब्रह्मण्यम् यांच्याबरोबर बहुमानाची शाल देऊन माझाहि गौरव केला. या सहानुभूतिपूर्ण सत्काराबद्दल मी वरील संस्थेचे यशस्वी संचालक पं. हृषीकेश शर्मा आणि त्यांच्या पत्नी सौ. शारदादेवी यांचा ऋणी आहे. या संग्रहासाठीं ज्या ग्रंथांचा मला उपयोग झाला, त्यांपैकीं 'कबीरग्रंथावलि'चे संपादक कै. बाबू श्यामसुंदरदास आणि 'कबीरवचनावली'चे संपादक कै. पं. अयोध्यासिंह उपाध्याय हे आतां विद्यमान नाहींत. त्यांच्या ग्रंथाचें मला साहाय्य झालें, याबद्दल त्यांच्या आत्म्यांना मी आज सश्रद्ध हा स्मृतींचा अंजलि अर्पण करीत आहे. डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांच्या 'कबीर' या ग्रंथाचें साहाय्य अनमोल आहे. त्या ग्रंथाबद्दल मी डॉक्टरसाहेबांना साभिनंदन अभिवंदन करतों. इतर अनेक हिंदी ग्रंथांची मला मोठी मदत मिळाली आहे. त्या ग्रंथांच्या कर्त्यांचा मी कृतज्ञ आहे. हा संग्रह तयार करतांना कित्येकदां अर्थ लागण्याची अडचण पडली. ती दूर करण्यास नागपूर विद्यापीठांतील स्नातकोत्तर हिंदी वर्गांच्या विभागाचे प्राध्यापक व माझे सहकारी डॉ. कमलाकान्त पाठक आणि पं. रामेश्वर शर्मा यांचा सहकार मला लाभला. त्याबद्दल मी उभयतांना हार्दिक धन्यवाद देतों. हा संग्रह प्रकाशित करण्याची जबाबदारी स्वीकारून ती आपलेपणानें पार पाडली याबद्दल सुविचार प्रकाशन मंडळाचे संचालक व व्यवस्थापक, माझे तरुण मित्र श्री. श्यामकांत बनहट्टी यांचा मी अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें या संग्रहाचें मुद्रण मोहक व सुबक केलें आणि सहकार्य दिलें याबद्दल मी राष्ट्रभाषा प्रेस, हिन्दीनगर, वर्धा या संस्थेचे व्यवस्थापक श्री. रा. तु. देशपांडे यांचा आभारी आहे.

**भवानीशंकर श्रीधर पंडित**

**श्रीधरसदन–श्रद्धानंदनगर,**
**दक्षिणअंबाझरीमार्ग,**
**नागपूर–अजनी.**
२८–१२–६१.

माझे मेहुणे

कै० कॅप्टन सदाशिव गोपाळ पावणस्कर

यांच्या

पुण्यस्मृतीस

# अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| भूमिका | (१) ते (१०) |
| मोरोपंतकृत श्रीकबीरनामस्मरण | (१९) |
| ,, कबीरस्तवन | (२०) |
| श्री संत कबीर : व्यक्तिमत्व व साहित्य | १ ते १४ |
| **विभाग पहिला : दोहावलि** | **१८ ते २०५** |


## दोह्यांची विषयानुक्रमणिका


| क्र. | विषय | पृष्ठ | क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रार्थना | १८ | २० | उच्चार आणि आचार | ८४ |
| २ | विश्वकर्ता | २४ | २१ | सहजभाव | ८८ |
| ३ | शक्तिशालित्त्व | २६ | २२ | मौनभाव | ८८ |
| ४ | सर्वव्यापकत्त्व | २८ | २३ | जीवन्मृत | ९० |
| ५ | शब्द | ३० | २४ | मध्यपथ | ९२ |
| ६ | नाम | ३४ | २५ | शूर | ९४ |
| ७ | ओळख | ३८ | २६ | पतिव्रता | ९८ |
| ८ | अनुभव | ४४ | २७ | गुरु | १०४ |
| ९ | सारग्रहण | ४६ | २८ | असत्गुरु | ११२ |
| १० | समदृष्टि | ४८ | २९ | साधुसंत | ११५ |
| ११ | भक्ति | ५० | ३० | दुर्जन | १२० |
| १२ | प्रेम | ५४ | ३१ | सत्संग | १२३ |
| १३ | स्मरण | ६० | ३२ | कुसंग | १२४ |
| १४ | विश्वास | ६४ | ३३ | सोंगढोंग | १२६ |
| १५ | विराणी (विरहिणी) | ६६ | ३४ | वेष | १२८ |
| १६ | सूक्ष्ममार्ग | ७४ | ३५ | चेतावणी | १३० |
| १७ | पारखी | ७६ | ३६ | उपदेश | १३४ |
| १८ | जिज्ञासु | ८० | ३७ | काम | १४० |
| १९ | द्विधा स्थिति | ८२ | ३८ | क्रोध | १४२ |

| क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ३९ | लोभ | १४२ |
| ४० | मोह | १४४ |
| ४१ | अहंकार | १४४ |
| ४२ | कपट | १४६ |
| ४३ | आशा | १४६ |
| ४४ | तृष्णा | १४८ |
| ४५ | निद्रा | ” |
| ४६ | निंदा | ” |
| ४७ | माया | १५० |
| ४८ | कनक आणि कामिनी | १५४ |
| ४९ | कुल-शील | १५६ |
| ५० | क्षमा | १५८ |
| ५१ | औदार्य | १५८ |
| ५२ | संतोष | १६० |
| ५३ | धैर्य | १६० |
| ५४ | लीनता | १६२ |

| क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| ५५ | दया | १६२ |
| ५६ | सत्य | १६४ |
| ५७ | पढिक ज्ञान | १६६ |
| ५८ | विचार | १६६ |
| ५९ | विवेक | १६८ |
| ६० | बुद्धि आणि कुबुद्धि | १७० |
| ६१ | आहार | १७२ |
| ६२ | भ्रमनिरास | १७४ |
| ६३ | रस | १७६ |
| ६४ | विरक्ति | १७६ |
| ६५ | चातुरी | १७८ |
| ६६ | संजीवनी | १७८ |
| ६७ | क्षणभंगुरता | १८० |
| ६८ | काळ | १८४ |
| ६९ | मन | १९० |
| ७० | विविध | १९६ |
| ७१ | आत्मनिवेदन | २०४ |


**विभाग दुसरा : पदावलि** २०८ ते ३२३


| क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | विरहनिवेदन | २०९ |
| २ | उत्कंठिता | २०९ |
| ३ | प्रबोधन | २११ |
| ४ | ? | २५३ |
| ५ | पूर्ण | २१३ |
| ६ | अढळपदस्थ | २१५ |
| ७ | अमृतत्व | २१५ |
| ८ | माया | २१७ |
| ९ | नामरसायन | २१७ |

| क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १० | अज्ञान | २१९ |
| ११ | नश्वर शरीर | २१९ |
| १२ | गुरु | २२१ |
| १३ | जीवात्मा | २२१ |
| १४ | ब्रह्मानंद | २२१ |
| १५ | दर्शनोत्कंठा | २२३ |
| १६ | प्राप्ति | २२५ |
| १७ | समाधिसमय | २२५ |
| १८ | तन्मयता | २२७ |

| क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १९ | चेतावणी | २२७ |
| २० | संकोच | २२९ |
| २१ | अहंभाव | २२९ |
| २२ | प्रयाण | २३१ |
| २३ | मिथ्याचार | २३१ |
| २४ | प्रतिपालक | २३३ |
| २५ | हुरहूर | २३३ |
| २६ | वरप्राप्ति | २३५ |
| २७ | विरहव्यथा | २३५ |
| २८ | सर्वव्यापक | २३७ |
| २९ | सोंगढोंग | २३७ |
| ३० | ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या | २३९ |
| ३१ | कर्तास्थान | २४१ |
| ३२ | नाममहिमा | २४१ |
| ३३ | शब्द | २४३ |
| ३४ | सासर | २४३ |
| ३५ | प्रेममार्ग | २४५ |
| ३६ | प्रेमब्रह्माण्ड | २४५ |
| ३७ | साक्षात्कार | २४७ |
| ३८ | प्रेम | २४७ |
| ३९ | लागी | २४९ |
| ४० | नामस्मरण | २४९ |
| ४१ | सद्गुरु | २५१ |
| ४२ | प्रियसमागम | २५१ |
| ४३ | नि:संग | २५३ |
| ४४ | भक्तिउद्रेक | २५३ |
| ४५ | अन्तिम दृश्य | २५५ |
| ४६ | नि:सार संसार | २५५ |
| ४७ | विरहार्तता | २५७ |
| ४८ | बंधमुक्त | २५७ |
| ४९ | मोहमोहिनी | २५९ |
| ५० | एकत्व | २५९ |
| ५१ | तो दिवस | २६१ |
| ५२ | साधुसंग | २६३ |
| ५३ | चुटपुट | २६३ |
| ५४ | मीलन मार्ग | २६५ |
| ५५ | अनुताप | २६५ |
| ५६ | अखेर | २६७ |
| ५७ | असारता | २६७ |
| ५८ | अहंभाव | २६९ |
| ५९ | भंगुरता | २६९ |
| ६० | प्रतीक्षा | २७१ |
| ६१ | सर्वस्वं मे | २७१ |
| ६२ | योगी | २७३ |
| ६३ | रामनिरंजन | २७५ |
| ६४ | मायाविनी | २७७ |
| ६५ | स्मरण | २७७ |
| ६६ | व्यापार-व्यवहार | २७९ |
| ६७ | विनिमय | २७९ |
| ६८ | नेति नेति | २८१ |
| ६९ | निर्गुण ब्रह्म | २८१ |
| ७० | अविनाशी राम | २८३ |
| ७१ | सौन्दर्यसंगीत | २८३ |
| ७२ | गुणातीत | २८५ |

| क्र. | विषय | पृष्ठ | क्र. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|
| ७३ | आतुर आर्तता | २८७ | ८७ | अविद्याविनाश | ३०५ |
| ७४ | मध्यस्थी | २८९ | ८८ | स्पर्शास्पर्श | ३०५ |
| ७५ | विरहताप | २८९ | ८९ | अनुभूति | ३०७ |
| ७६ | कबीरांचा राम | २९१ | ९० | चुनडी | ३०७ |
| ७७ | आत्मतत्त्व | २९३ | ९१ | मुक्ति | ३०९ |
| ७८ | नि:पक्षपातित्व | २९३ | ९२ | सारहीन संसार | ३०९ |
| ७९ | विवाहमंगल | २९५ | ९३ | सर्वं क्षणिकम् | ३११ |
| ८० | मातींचें घर | २९५ | ९४ | सर्वं दु:खम् | ३११ |
| ८१ | आपुल्यासारखें करिती तत्काळ | २९७ | ९५ | उपहास | ३१३ |
| | | | ९६ | ज्ञानखड्ग | ३१५ |
| ८२ | भजनरहस्य | २९९ | ९७ | सहज समाधि | ३१७ |
| ८३ | सृष्टयाचें सामर्थ्य | ३०१ | ९८ | एक निरंजन | ३१७ |
| ८४ | आदिकुमारी | ३०१ | ९९ | मनमहिमा | ३१९ |
| ८५ | विरोध | ३०३ | १०० | ऊठ ! जागा हो ! | ३२१ |
| ८६ | प्रियदर्शन | ३०३ | १०१ | अनन्ताचें गीत | ३२३ |

### मोरोपंतकृत

# श्री कबीर नाम स्मरण

### भाषा

हिन्दुस्थानी भाषा, ग्वालेरी, गोड तीहि पंजाबी
सुरसिक कवि म्हणति इची तूंचि श्रीकृष्णपादकंजा वी
श्रीसूरदास, तुलसीदास, कबीरादि सुकवि कवनांतें
सोडुनि लावील कवण रसिक दुजासी रिझोनि नव नातें.

### सन्मणिमाला

माया हे संसृतिची जाळूनि सशोक तो कवी रमला
राम पदाब्जीं अलिसा; बहुमत सुमुदोक तो कबीर मला
कष्टें जोडुनि, देतो जेंवि सुता वल्लभा जनक माला
भजना करी कवीर, न करुनि उणा वल्ल, भाजन कमाला.

### गंगावकिली

काय महत्त्व कबीरीं हरिभक्ति नदे सुरापगे! यवनीं?
त्वत्सेवनेंचि पावो स्थिति शक्राच्या सुराप गेय वनीं.

### विठ्ठलविज्ञापना

(अनुष्टुप) विणिले त्वां, कबीराच्या मागीं बैसोनियां, पट
भक्ताधीन असावें हे बा! तुला लागली चट.

### महद्विज्ञापना

भागवत ज्ञानि सभामान्य सुकवि, जरि कबीर हा यवन
हरिचें म्हणे, न पाहुनि यासि, न वाहुनि अबीर 'हाय!' वन

### पांडुरंग स्तोत्रम् (तृतीयम्)

### (द्रुतविलंबितवृत्तम्)

बत कबीरमुखा यवनाः कृताः शुचितमा निजनामपरास्त्वया
भवति पात्रमपि प्रजडः सतां द्युनग! ते नगतेरिह को हरे!

---

मोरोपंतकृत

# कबीर स्तव

(गीतिवृत्त)

श्रीराम याचि नामीं, न म्हणुनि अल्ला, खुदा, नबी, रमला।
झाला पुष्पें तुळसी; स्तवितां तारील तो कबीर मला ।। १ ।।
जी विषयवासना ती ज्याच्या ज्ञानानळें न बी राहे; ।
स्तविन, यथामति, मीही; संत स्तविती सदा कबीरा हे ।। २ ।।
श्रीरामभक्त मोठा ज्ञानी वाटे कबीर हित मातें; ।
दोहा तो रविच गमे, हरिल तयाचा अबीरहि तमातें. ।। ३ ।।
शक्राचें औदार्यें करि, चिंतुनि ज्यास, हाय हा यवन. ।
रामानंदानुग्रह रामप्रभु ज्या सहाय, हाय वन ।। ४ ।।
परमचमत्कारवती, साधुमता, श्रुति जशा, तशा उक्ती।
ज्याच्या, ब्रह्मज्ञाना मळमौक्तिक रत्नगर्भिता शुक्ती ।। ५ ।।
ज्याची 'निमिषहि राम न विसरे न' अशी अजी प्रतिज्ञा ते ।
शकति कराया, होउनि रोमांचित तनु, न जीप्रति ज्ञाते. ।। ६ ।।
भंडारा करणें, हें व्यसन, गळां घालिति बळेंचि खल. ।
वात्सल्यें अपवाद प्रभु हरि आपण, जसा जळें चिखल. ।। ७ ।।
जें तत्काळ निरसितें ज्ञान महातेज भवतमाला, तें, ।
तातधन तसें, झालें संप्राप्त कबीरसुत कमाला तें. ।। ८ ।।
धन्या सुमति कमाली, उपजत हरिभक्तिमाधुरी तिस, ती. ।
कवि म्हणति कबीराची मूर्तिमती होय साधुरीति सती. ।। ९ ।।
श्रीज्ञाननामदेवांहि मानवले त्याहि बहु कमालीला; ।
गाइल मयूर जड किति साधूंच्या, विष्णुच्या समा, लीला ? ।।१०।।

काव्यसंग्रह २९ : महाराष्ट्र कविवर्य मोरोपंतकृत
स्फुट काव्यें : भाग पहिला
सपादक–वामन दाजी ओक, १८९६.

... ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..32823 वि: ...८।८५...
स्थांक ....९४५९..... नों दि ....६/३/५२

# श्री संत कबीर :
# व्यक्तिमत्व आणि साहित्य

★

## जीवन-चरित्र

श्री संत कबीरांची भूमिका चतुर्विध आहे. ते प्रथम एक उच्च कोटीचे प्रेषित होते; आणि मग, हिंदू व मुसलमान यांच्या एकतेचे पुरस्कर्ते होते, एका विशिष्ट पंथाचे प्रवर्तक होते आणि अध्यात्मपर साहित्याचे स्रष्टे होते. त्यांची वाणी 'पूर्वे'कडली असली, आणि उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश यांत तिचा प्रचार व प्रसार अधिक असला, तरी ती इतर प्रांतांतील कुणाहि व्यक्तीला सहज समजेल अशी साधी, सोपी व सरळ आहे. तिच्या मागील उत्कट भावना सामान्य ( Common ) आहे. आणि म्हणूनच ती सर्वत्र प्रिय आहे. तिची ही सर्वगामिता व लोकप्रियता लक्षांत घेऊनच आपल्या महाराष्ट्रांतील संतकवि महीपति यांनीं दोनशें वर्षांपूर्वी त्यांच्या भक्तविजयांत

**कबीर बोलले हिंदुस्थानी । देशभाषा आपुली**

असे उद्गार काढले असावेत. आपल्या प्रभावी वाणीच्या या सार्वत्रिक संचारामुळें कबीरांना आणि त्यांच्या बोधवचनांना अखिल भारतीय कीर्ति प्राप्त झाली आहे.

कबीरांची जन्मतिथि आणि मृत्युतिथि यांच्यासंबंधीं अनेक मतें प्रचलित आहेत. 'भक्तिसुधाबिंदुस्वादां'त संवत् १४५१ ते संवत् १५५२ हा कबीरांचा आविर्भाव काल मानण्यांत आला आहे, तर कबीर संप्रदायांत तो संवत् १२०५ ते संवत् १५०५ असा गृहित धरण्यात आला आहे. डॉक्टर हंटर, मिस्टर विल्सन आणि रेव्हरंड वेसकट् या पाश्चात्यांनीं कबीर आणि त्यांचें साहित्य यासंबंधीं लेखन केलें आहे. डॉक्टर हंटर हे संवत् १४३७

हा कबीरांचा जन्मकाल मानतात आणि मिस्टर विल्सन हे संवत् १५०५ हा मृत्युकाल समजतात. रेव्हरंड वेसकट् यांनी 'कबीर एँड दी कबीर पंथ' या आपल्या अभ्यसनीय ग्रंथांत संवत् १४५७ ते संवत् १५७५ हा कबीरांचा आविर्भाव काल दिला आहे. कबीर हे सुलतान शिकंदर लोदी याचे समकालीन होते. त्यानें कबीरांचा अमानुष छळ केला. त्यासंबंधीं कबीरांच्या काव्यांत उल्लेख आहेत. शिवाय कबीर हे १२० वर्षांचे होऊन दिवंगत झाले अशी त्यांच्या असंख्य सांप्रदायिकांची धारणा आहे. या दोन्ही घटना ध्यानांत घेऊन विचार केला, तर 'कबीर कसौटीं'त ज्येष्ठ शु. १५ संवत् १४५५ ते संवत् १५७५ हा जो कबीरांच्या विद्यमानतेचा काल दिला आहे, तो सर्वमान्य होण्यास हरकत नसावी.

कबीरांच्या मातेचें नांव नीमा आणि पित्याचें नांव नीरू होतें. हे काशीचे रहिवाशी असून जातीनें मुसलमान कोष्टी होते. मुसलमान कोष्ट्याला 'मोमीन' म्हणतात. म्हणूनच तुकारामांनी आपल्या अभंगांतून अनेकदा कबीरांचा 'मोमीन' असा निर्देश केला आहे. क्वचित् असाहि अपसमज आढळतो कीं, नीमा आणि नीरू हे प्रत्यक्ष कबीरांचे जन्मदाते नव्हते. त्यांचा जन्म एका ब्राह्मण विधवेच्या उदरीं झाला होता. तिनें समाजाच्या धाकामुळें आपलें लहान अर्भक लहरतारा तलावांत टाकून दिलें. सुदैवानें तें नीमा आणि नीरू यांना सांपडलें. आणि त्यांनीं तें अपत्यवत् मानून लहानाचें मोठें केलें. वस्तुतः या समजुतींत कांहीं तथ्य नाहीं. कारण कबीरांच्या काव्यांत अनेक ठिकाणीं आपण 'जुलाहे' म्हणजे 'कोष्टी' असल्याचा उल्लेख आहे, पण आपण विधवा ब्राह्मणीचे पुत्र असल्याचा कोठेंहि उल्लेख नाहीं. ते स्वतःचा उल्लेख हिंदु अथवा मुसलमान असा न करतां 'जुलाहा' असा करतात हें लक्षणीय आहे. कबीर हे कोणाचीहि भीड मुर्वत न ठेवतां सत्य हें 'कटु' व 'अप्रिय' असल, तरी तें बोलून दाखविणारे होते. तेव्हां या समजुतीला दंतकथेपलिकडे महत्त्व नाहीं.

कबीर मुसलमान असूनहि त्यांच्या काव्यावर हिंदुत्वाचा प्रभाव दिसतो. याला कारण काशीसारख्या पुण्यक्षेत्रांतील त्यांचें वास्तव्य होय. शिवाय त्याकाळीं मुसलमानांच्या राजकीय वर्चस्वाच्या जुलमाला कंटाळून नाखुशीनें धर्मांतर केलेले हिंदु पुष्कळ असत. ते बाटले, तरी त्यांच्या घरांतील आचार-विचार पूर्वापर चालत आले, तसेंच राहत. नीमा आणि नीरू यांचें घराणें

कदाचित् अशा प्रकारचें असावें. आणि त्याच वातावरणांत कबीर वाढल्यामुळे त्यांच्यावर हिंदु संस्कार झाले असावेत.

कबीर हे जन्मतःच धार्मिक वृत्तीचे होते. त्यांना कथा, कीर्तनें, प्रवचनें इत्यादि ऐकण्याची आवड होती. ते भक्त होते. आणि आपल्या आराध्याची साधना करण्यांत ते तासन्तास रमत. त्यांची ही वृत्ति पाहून त्यांना कुणीतरी गुरु करण्याचा आदेश दिला. गुरुच्या कृपेशिवाय भक्तीचें साफल्य होणार नाहीं असें कळतांच कबीर गुरुच्या शोधांत लागले.

यावेळीं काशींत व काशीबाहेर विशाल धर्मदृष्टि, अक्षुण्ण सदाचरण, अगाध ज्ञान आणि व्यापक सहानुभाव यांच्यामुळें स्वामी रामानन्द यांच्या पवित्र नांवाचा बोलबाला होता. रामानन्द हे रामानुजांच्या शिष्यशाखेंतले होते. रामानुज वैष्णव होते. त्यांनीं अखिल ब्राह्मणांना आपल्या संप्रदायांत संमिलित केलें होतें. परंतु त्यांच्या संप्रदायांत ब्राह्मणेतरांना प्रवेश नव्हता. रामानुजीय संप्रदायांत रामानन्दी शाखेची संस्थापना करून आणि शूद्रादिकांना शिष्यत्वाची दीक्षा देऊन स्वामी रामानन्दांनीं ती उणीव भरून काढली. सुप्रसिद्ध संत रोहिदास चांभार हे याच शिष्यशाखेंत प्रविष्ट झाले होते. स्वामीजींनीं आपल्याला शिष्य करून घ्यावे अशी कबीरांची आकांक्षा होती. परंतु आरंभीं आरंभीं एका मुसलमानास शिष्य म्हणून स्वीकारण्यास स्वामीजी तयार नव्हते. तेव्हां त्यांच्या ठिकाणीं निष्ठा असणाऱ्या कबीरांनीं एक अद्‌भुत युक्ति शोधून काढली. सूर्योदयापूर्वी जागे होऊन मणिकर्णिका घाटावर नित्य गंगास्नान करण्याची स्वामीजींची परिपाठि होती. एकदां कबीर मध्यरात्रीं उठले. आणि स्वामीजी ज्या वाटेनें गंगेंत उतरत त्या वाटेंत घाटाच्या एका पायरीवर अंगाचें मुटकुळें करून पडून राहिले. स्वामीजी आपल्या नियमानुसार जागे झाले. आणि घाटाच्या पायऱ्या उतरूं लागले. तोंच त्यांचे पुण्यपाद कबीरांना लागले. त्याबरोबर स्वामीजींच्या मुखावाटे 'राम-राम' असे उद्‌गार बाहेर पडले. तेव्हां 'राम-राम' हाच गुरुमन्त्र मानून कबीर स्वामीजींच्या पायां पडले आणि म्हणाले—"आपण मला रामनामाचा मत्र दिला. आजपासून मी आपला शिष्य झालों. आतां मला आपल्या पायांपासून दूर लोटूं नका." या गुरुभक्तीनें स्वामीजींचें नवनीत–कोमल अंतःकरण विरघळलें. त्यांनीं कबीरांना उचलून आपल्या पोटाशी

धरलें. आणि शिष्य म्हणून मान्य केलें. अशा रीतीनें कबीर हे रामानन्दांचे शिष्य झाले.

मुसलमानांमधील सूफीमताचे कांहीं अनुयायी कबीरांना झांशीच्या शैख तकीचे शिष्य समजतात. कबीर मुसलमान असल्यामुळे त्यांना सूफी-संप्रदायाचें ज्ञान होतें आणि त्या मताची परिभाषा त्यांच्या काव्यांत आली आहे याबद्दल वाद नाहीं. परंतु त्यांनीं 'सुनहु तकी तुम सेख' असा तकींच्या नांवाचा बरोबरीच्या नात्यानें उल्लेख केला असून 'कासीमें हम प्रकट भये हैं, रामानन्द चेताए' असा स्वामीजींच्या नांवाचा विनयपूर्वक उल्लेख केला आहे. तेव्हां ते शैख तकीचे शिष्य नसून स्वामीजींचेच शिष्य होते याबद्दल संशय राहत नाहीं.

कबीर विवाहित होते. एका वनवासी बैराग्यानें मायेनें लालन-पालन केलेल्या 'लोई' नांवाच्या एका मुलीशीं त्यांचा विवाह झाला होता. लोई जशी सुंदर तशीच सद्‌गुणी होती. एकदां कबीरांकडे कांहीं संत अगदी अनपेक्षित अतिथि म्हणून आले. त्यावेळीं त्यांच्या सत्कारार्थ कबीरांच्या घरांत कांहींहि नव्हतें. लोईच्या सौंदर्यावर वाण्याचा एक मुलगा भाळलेला होता. लोई कबीरांना म्हणाली,—"तुमची संमति असेल तर मी त्या वाण्याच्या मुलाकडून कांहीं पैसा आणते." कबीरांच्या संमतीनें तिनें पैसा आणला आणि अतिथि परतले म्हणजे आपण भेटूं असा त्या मुलाशीं वायदा केला. सत्कारानंतर अतिथि परतले. यावेळीं तुफान पाऊस पडत होता. तरी कबीरांनीं लोईला आपल्या खांद्यावर घेतलें आणि त्या मुलाकडे नेलें. कबीरांची ही सत्यप्रियता पाहतांच त्या मुलाला अनुताप झाला आणि त्यानें 'लोई' चें 'आई' म्हणून पाय धरले.

लोईपासून कबीरांना कमाल आणि कमाली या नांवांचीं दोन मुलें होतीं. कमालने आपल्याप्रमाणेंच भक्त व्हावें व साधुसंतांची सेवा करावी अशी कबीरांची इच्छा होती. पण कमाल व्यापार करूं लागला व त्यांत बुडाला. अर्थातच तें कबीरांना आवडलें नाहीं.

कबीर भक्त असले, तरी निष्कर्म नव्हते. कापड विणण्याचा आपला परंपरागत व्यवसाय त्यांनीं कधीं सोडला नाहीं. नित्य कर्मांत मग्न राहून ते भक्ति करीत. स्वभावानें ते अतिशय उदार होते. ते विणलेलें कापड

बाजारांत विकायास नेत आणि कित्येकदां एकाद्या साधूला तें दान म्हणून देत व परत येत. पैशाच्या बाबतींत ते निरिच्छ होते.

कबीरांनीं प्रवास बराच केला होता. भारताबाहेर ते बल्खपर्यंत गेले होते. अशा रीतीनें पुष्कळ ठिकाणीं पुष्कळ दिवसपर्यंत परिभ्रमण केल्यामुळें त्यांच्या अनुभवांत आणि ज्ञानांत विलक्षण भर पडली होती. प्रदीर्घ अनुभव आणि अगाध ज्ञान यांमुळें त्यांच्या वाणीला एक प्रकारची धार आली आहे. घागरींत जणूं सागर सामावा त्याप्रमाणें ती थोड्या शब्दांत पुष्कळ अर्थ व्यक्त करते. तिची अभिव्यक्ति अतिशय प्रत्ययकारी व प्रभावी आहे.

## साहित्य

कबीरांचें शिक्षण झालें नव्हतें. लौकिक दृष्ट्या ते निरक्षर होते. त्यांनीं जें साहित्य निर्मिलें आहे तें सारें मौखिक आहे. 'आपण लेखणी हातांत धरली नाहीं किंवा कागद व शाई यांना स्पर्श केला नाहीं. आपण जें कांहीं सांगितलें तें मुखानें' असा एका आत्मपर दोह्यांत त्यांनीं स्वत: निर्देश केला आहे.

कबीर संतसमागम करीत, त्या समागमांत चर्चा करीत, एकांतांत चिंतन करीत, शिष्यांना आणि जन साधारणांना उपदेश देत व भजन करीत. हे सर्व करीत असतांना त्यांच्या मुखानें भक्ति, ज्ञान व वैराग्य यांनीं युक्त असलेली वाणी एकाद्या अस्खलित स्रोताप्रमाणें वाहूं लागे. त्यांत त्यांचें हार्द असे. प्रसंगानुरूप तें आर्त अथवा प्रसन्न असें. प्रसंगविशेषीं तें अत्यंत तीव्रहि होई. हें हार्द पद्यमय असें. एकतारीच्या एकेरी स्वरांत आणि डफडीच्या तालांत त्यांच्या अटपट वाणीच्या जेवढ्या मात्रा बसूं शकतील, तेवढ्या बसत. सहजता ही त्यांची सुंदरता असे. नंतरची झिलई अथवा साफसफाई त्यांना ठाऊक नसे !

अशा रीतीनें कबीरांकडून सहजगत्या जें साहित्य निर्माण झालें आहे, तें विपुल आहे. त्या सर्वांचा येथें निर्देश करण्याचें कारण नाहीं. आणि त्यासाठीं येथें स्थळ व अवसरहि नाहीं. 'बीजक' हा त्यांचा सर्वमान्य ग्रंथ आहे. आणि 'शब्द', 'रमैनी', 'साखी' इत्यादि त्यांचें साहित्य विशेष लोकप्रिय आहे. 'साखीं'त त्यांच्या पांच हजार दोह्यांचा समावेश झाला आहे.

## अंतकाळ

कबीर जन्मभर काशीस होते. परंतु अंतकाळ समीप आला तसे ते मगहरला निघून गेले. काशींत ज्याला मरण येतें त्याला स्वर्ग प्राप्त होतो. कबीरांना स्वर्ग नको होता. पुनर्जन्म घेऊन जन-सेवा करण्याची त्यांची आकांक्षा होती. यासाठीं ते मगहरला गेले. आणि तेथें त्यांचा अंत झाला. पवनांत पवन मिसळला आणि सारें संपलें.

कबीरांचा मृत्यु होतांच और्ध्वदेहिकासाठीं त्यांच्या हिंदु व मुसलमान शिष्यांत झगडा सुरू झाला. परंतु त्यांच्या मृत देहावरून ज्यावेळीं शववस्त्र हटवण्यांत आलें, त्यावेळीं त्याखालीं लोकांना पुष्पराशीचें दर्शन घडलें. तिच्यांतील कांहीं फुलें हिंदूनीं घेतलीं व काशीस त्यांच्या निर्माल्यावर 'कबीर चौरा' बांधला, तो आजमितीला कायम आहे. मुसलमानांनीं कांहीं फुलें नेलीं आणि त्यांच्या निर्माल्यावर मगहरला थडगें बांधलें. तें अजून तेथें तसेंच आहे. या अद्‌भुत कथेचा अर्थ येवढाच कीं कबीरांच्या देहान्तानंतर हिंदु व मुसलमान या दोन्ही जमातींनीं दिलजमाई केली व त्यांच्या स्मरणार्थ निरनिराळीं स्मारकें बांधलीं. त्यांनीं व्यर्थ भांडण केलें नाहीं.

## कबीरपंथ

कबीर विद्यमान असतांनाच अनेकांनीं त्यांचें शिष्यत्व पत्करलें होतें. त्यांच्या पश्चात् 'कबीरपंथ' अस्तित्वांत आला. आणि तो आजमितीला चालू आहे. या पंथाच्या अनुयायांची संख्या नऊ लक्षांहून कमी नाहीं. या पैकीं बहुतेक हिंदू असून कांहीं मुसलमान आहेत. उत्तर प्रदेश व मध्यप्रदेश येथें या पंथाचा जोर विशेष असून बिहार, गुजरात व पंजाब येथें थोडा कमी आहे. मात्र महाराष्ट्र, मद्रास व कर्नाटक या दक्षिण प्रदेशांतून ते फारसे आढळत नाहींत. या पंथाच्या एकूण बारा शाखा आहेत. या सर्वांची माहिती येथें आवश्यक नाहीं. यांपैकीं श्रुतगोपालदास यांची शाखा परंपरागत व प्रमुख असून काशी येथील कबीर चौरा, महगर येथील समाधि, आणि द्वारका व जगन्नाथपुरी येथील मठ—यांवर तिचा ताबा आहे. इतर शाखांपेक्षा या शाखेची प्रतिष्ठा विशेष आहे.

कबीर पंथाच्या अनुयायांत संसारी आणि संन्यासी या दोघांचाहि समावेश आहे. यांचा स्वतंत्र असा धर्म नाहीं. हिंदू अनुयायी हिंदू धर्माचे असून मुसलमान अनुयायी इस्लाम धर्माचे आहेत. केवळ कबीर हें त्यांच्या दृढ श्रद्धेचें स्थान आहे. हिंदु कबीरपंथी बहुधा हलक्या मानलेल्या जातीचे असून त्यांच्या गादीवरील गुरुदेखील बहुतेक तसेच आहेत. वस्तुतः सर्व हिंदू समान असून जातीजातींतील उच्चनीच भाव हा रूढीनें आला आहे. परंतु दुर्दैवानें त्याला वैमनस्य आणि द्वेष यांचें स्वरूप आलें आहे. वास्तविक तें तसें यावयास नको.

## कबीरपंथाचे धर्मसिद्धांत

कबीरांनीं स्वतः ग्रंथलेखन केलें नाहीं. परंतु त्यांच्या मुखानें जी अमृतवाणी बाहेर प्रकट झाली, ती त्यांच्या शिष्यांनीं लिपिनिविष्ट केली आहे. बीजक ग्रंथांत त्यांच्या बहुतेक वाणीचा समावेश झाला आहे. त्यांचे एक प्रमुख शिष्य भगवानदास 'बीजक' ग्रंथ घेऊन पळाले होते. म्हणून त्यांना थट्टेनें 'भग्गूदास' हें नांव मिळालें होतें. तेंच नांव पुढें प्रचलित झालें. भग्गूदास ज्या अर्थी ग्रंथ घेऊन पळाले त्या अर्थी त्यांनीं त्या ग्रंथांत मूळ मजकुराची फिरवाफिरव करून कांहीं भाग कमी ज्यास्ती केले असावेत असा कांहीं संशोधकांचा तर्क आहे. कबीर जन्मानें मुसलमान असून त्यांच्या ग्रंथांत हिंदू देवदेवतांचीं नांवें येतात व हिंदूंच्या धार्मिक समजुतीचें समर्थन असतें याचें कारण बहुधा ही भग्गूदासकृत फिरवाफिरव असावी असा 'कबीर ऍंड दी कबीरपंथ' या ग्रंथाचे कर्ते रेव्हरंड जी. एच्. वेस्कट यांचा कयास आहे. परन्तु 'हिंदी नवरत्नां'चे संपादक मिश्रबन्धु यांचें यावर असें म्हणणें आहे कीं अशा रीतीनें फेरफार करूनसुद्धां संत महात्म्यांच्या मूळ उपदेशांत फरक उत्पन्न करणें अशक्य असतें. कबीरांनीं एकच विचार शंभर प्रकारांनीं सांगितला आहे, आणि त्या सर्व प्रकारांमागें प्रतिध्वनित होणारा भाग एकच आहे. कबीरांना नाममाहात्म्य मान्य होतें, ते एकेश्वरी पंथाचे अनुयायी होते. ते कर्मकांडाचे कट्टर विरोधक होते आणि सख्य भक्तीच्या ठिकाणीं त्यांची निष्ठा अविचल होती. त्यांना अवतारवाद, उपासतापास, मूर्तिपूजा, मन्दिर-मशीद इत्यादि गोष्टी अमान्य होत्या. जीवमात्राविषयीं अहिंसा, मनुष्य-

मात्रासंबंधीं समता आणि संसाराची नि:सारता हे विषय त्यांच्या वाणीनें वारंवार आळविले आहेत. त्यांना उपनिषद्‌प्रणीत ईश्वराविषयींची कल्पना मान्य होती. एक शुद्ध ईश्वर तोच आहे, मग त्यास राम म्हणा कीं रहीम म्हणा असें त्यांचें मत होतें. अशा परिस्थितींत त्यांच्या मूळ उपदेशांत फेरबदल करून त्यांचा प्रभाव उलटवणें अशक्य होतें. त्यासाठी त्यांचे संपूर्ण ग्रंथ नष्ट करून त्या जागी पुन्हां नवीन ग्रंथ निर्माण करणें आवश्यक होतें. परंतु वस्तुस्थिति तशी नाही.

मूळ ग्रंथांत फेरबदल केल्यानें फार तर येवढाच फरक झाला असेल कीं रामनामाऐवजी सत्यनाम अधिक आलें असेल. परतु कबीर दोन्ही नामांचा प्रयोग करीत हें सत्य लक्षांत घेतल्यास नाममहात्म्याच्या मूळ उपदेशास यत्किंचित् ढळ पोंचत नाहीं. याप्रमाणें कांहीं स्थळीं प्रतिकूल बदल दाखवितां येणें शक्य आहे. परंतु त्यांमुळें कबीरांच्या मूळ हेतूकडे सहसा दुर्लक्ष होणें असंभवनीय आहे. कबीरांनीं मूर्तिपूजा व अवतारवाद यांना सदैव त्याज्य लेखिलें आहे. कांहीं स्थळीं कांहीं शब्दांवरून त्यांनीं त्यांचें समर्थन केलें आहे असेंहि वाटेल. परंतु अशीं स्थळें प्रक्षिप्त समजलीं पाहिजेत. कबीरांच्या ग्रंथांत त्यांचीं मुख्य तत्त्वें सूर्याच्या प्रखरतेनें तळपत आहेत. त्यांचें परिवर्तन अशक्य आहे. तेव्हां कबीरांच्या ग्रंथांतील फेरफारांस फारसें महत्त्व देण्याचें कारण नाहीं. त्यांच्या ग्रंथांत जर कोणत्या तत्त्वासंबंधीं शंका उत्पन्न होत असेल, तर ती पुनर्जन्मवादाविषयीं. या तत्त्वाचा विचार करतांना ते हिंदूमताचे होते कीं मुसलमानी मताचे होते याविषयीं मात्र निश्चयात्मक विधान करतां येत नाहीं.

कबीरांच्या नांवावर जवळ जवळ पाउणशे लहान मोठे ग्रंथ आहेत. त्या सर्वांचा विचार या लहानशा प्रास्ताविकांत करण्याचें प्रयोजन नाहीं. येथें फक्त त्यांच्या ‘दोह्यां’चा व पदांचा विचार प्रस्तुत आहे. पुन्हां त्यांच्या नांवावरील सर्वच ग्रंथ प्रमाणित आहेत असें नाहीं. कांहीं नांवें तर ग्रंथांचीं नसून त्यांतील कांहीं भागांची आहेत. ‘बीजक’ आणि ‘आदिग्रंथ’ हे त्यांचे मुख्य ग्रंथ असून ते सर्वत्र प्रसिद्ध आहेत. कबीरांच्या बहुतेक ग्रंथांतील विषय एकच आहे. त्यांचा कोणताहि ग्रंथ कथात्मक नाहीं. बहुतेक सर्व ग्रंथांतून सिद्धान्त सांगितलेले असून ते सूक्तींच्या स्वरूपांत आहेत. त्यांच्या सूक्ति ‘दोहा’

या छंदांत चपखल रीतीनें बसलेल्या असून त्या विशेष प्रसिद्ध आहेत आणि त्यांचा प्रसार सर्वत्र आहे. केवळ त्यांच्या अभ्यासानें व मननानें कवीरांच्या तत्त्वज्ञानाचा वोध होऊं शकतो. त्याच दृष्टीनें हा अल्प प्रयत्न आहे.

कवीर हे स्वत:च्या अनुभवाचें प्रामाण्य मानणारे होते. हें सत्य समोर ठेवल्यास त्यांचा हिंदू आणि मुसलमानांच्या धर्मग्रंथावरील कटाक्ष आणि धर्म-प्रणेत्यांसंवंधींचा कट्टर प्रतिवाद यांचा उलगडा सहज होईल. त्यांनी अवतार-वाद, मूर्तिपूजा, कर्मकांड, उपासतपास इत्यादिकांप्रमाणें मायावाद, वहुदेववाद, हिंसावाद, व्रतवैकल्यें, तीर्थयात्रा, वर्णाश्रम इत्यादिकांवरहि आपल्या टीकेचें शस्त्र उगारलें आहे. कुठें कुठें तर त्यांनीं शिष्टाचार व मानमर्यादा यांचा अतिक्रम केला असून वाणीला विटाळण्यापर्यंत मजल गांठली आहे.

तेव्हां कवीरांच्या वाणीचा विचार करतांना जीं मतें व्यापक भावनेनें वारंवार व्यक्त झालीं असतील व ज्यांचें विवेचन पुन्हांपुन्हां आलें असेल, तींच मतें मुख्य आणि त्यांच्या विषयींचे अन्य विचार गौण मानणें युक्तिसंगत ठरेल. विचारांतसुद्धां वाढत्या वयानें, चढत्या अनुभवानें आणि नवनवोन्मेषशाली प्रज्ञेनें परिवर्तन घडत असतें. या व्यापक नियमास कबीरहि अपवाद नाहींत. तेव्हां कबीरांच्या मतांचा निष्कर्ष काढतांना ह्या एकंदर वस्तुस्थितीचा विचार केला आहे.

## कबीरांचा एकेश्वरवाद

कवीरांचा एकेश्वरवाद सर्वसामान्य एकेश्वरवादापेक्षां थोडासा निराळा आहे. त्यांचा ईश्वर हा प्रभु, ब्रह्म, परब्रह्म, निर्गुण व सगुण या सर्वांच्या पलिकडला असून 'सत्य लोक' हें त्याचें निवासस्थान आहे. तो गुणातीत आहे. परंतु त्याचीं लक्षणें मात्र वैष्णव ग्रंथांतील सगुण ब्रह्माच्या लक्षणां-सारखींच आहेत. त्याची प्राप्ति गुरुप्रसादानें केवळ भक्तीच्या द्वारें होऊं शकते असें त्यांचें मत आहे. या आपल्या ईश्वराला कवीरांनीं राम, समरथ, कर्त्ता, करतार, ब्रह्म इत्यादि अनेक नांवें दिलीं आहेत. परंतु या साऱ्या नांवाहून त्याचें '**साहब**' हें नांव त्यांना अतिशय प्रिय आहे.

## त्यांच्या निर्गुणवादाचें महत्त्व

कबीरांचा हा ईश्वर निर्गुण आहे किंबहुना गुणातीत आहे. कांहीं विवेचकांच्या मतें त्यांनीं ही कल्पना मुसलमानी धर्मग्रंथांतून उचलली असावी. परंतु उपनिषद्प्रणित ब्रह्महि निर्गुणच आहे. तेव्हां कबीर या कल्पनेकरितां मुसलमानी धर्ममताकडे वळले असावेत असा तर्क करण्याचें कारण नाहीं.

कबीरांच्या निर्गुणवादानें भारतीय साहित्याचें––विशेषतः हिन्दी साहित्याचें एक विशेष अंग परिपुष्ट झालें आहे. भक्तियुगाच्या प्रारंभीं दक्षिणात्य आचार्यांचे सिद्धांत उत्तरेकडे प्रसार पावत होते आणि ते हळुहळू हिंदी साहित्यांत आविष्कृत होत होते. वेगवेगळ्या धार्मिक विचारांच्या, विमर्शांच्या व संघर्षांच्या त्या संक्रमणकाळांत हिंदी साहित्यांत नव्यानें आविष्कृत्त झालेल्या कबीरांच्या निर्गुणवादास अतिशय महत्त्व आहे. हिंदु धर्माची तत्कालीन अनिश्चित परिस्थिति आणि मुस्लिम धर्माचा व्यापक परंतु अदृष्ट प्रभाव या दोन्ही गोष्टी त्या काळीं निर्गुणवादाचा प्रसार होण्यास अनुकूल होत्या. हिंदी साहित्यांत तो वाद ताज्या जोमानें व नव्या दमानें अभिव्यक्त होण्यास कबीरांची अटपट वाणी कारणीभूत झाली. भक्तियुगाच्या सुरुवातीचें वातावरण सगुणोपासनेस अनुकूल नव्हते. तेव्हां कबीरांनीं निर्गुणाच्या उपासनेनें भक्तीचें बीजारोपण केलें. त्याच बीजाचा वेल पुढें राम आणि कृष्ण या वीरांच्या सगुणोपासनेच्या द्वारें अखिल भारतांत पसरला.

## या दोन्ही वादांची कबीरकृत विवेचनपद्धति

उपर्युक्त दोन्ही वादांचें विवेचन करतांना कबीरांनीं कमल, तिरपुटी, अनहतनाद, प्रतिबिंब ( जीव ), पिंड ( शरीर ), पार ( परब्रह्म ), सूक्ष्म, स्थूल, अगोचर, अक्षर इत्यादि योगशास्त्रांतील शब्दांचा प्रयोग केला आहे. कबीरांच्या विवेचनांत अ-भावात्मक ( Negative ) विचारांची संख्या अधिक आहे. ते विचार विशद व्हावे यासाठीं त्यांनीं अनुकूल प्रतिकूल भावात्मक शब्दांचा प्रयोग केला आहे. विवेचनाची हीच पद्धति उपनिषदांत आढळते. या शब्दप्रयोगांवरून व विवेचनपद्धतीवरून कबीरांची बहुश्रुतता व्यक्त होते.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 32823 ११ दि: ...
क्रमांक 9445 नों दि ...

कबीरांनीं आपल्या विवेचनांत सत्य व ज्ञान या दोन गोष्टींवर विशेष भर व जोर दिला आहे. सत्यासंबंधीं कबीरांची निष्ठा दृढ होती. कर्मात असत्याचा प्रवेश होऊं नये यासाठीं सत्य सांगतांना कित्येकदां त्यांची वाणी अभद्र व अमंगल झाली आहे. भक्तीचा उपदेश करतांना सुद्धां कबीरांनीं ईश्वरांतील तार्किक सत्यता स्थिर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. सत्याच्या या काटेकोरपणामुळें कबीरांच्या वाणींत अनेक ठिकाणीं शुष्कता व रुक्षता आली आहे.

कबीरांच्या वाणींत संशयाला कुठेंहि जागा नाहीं. त्यांचा आत्मविश्वास दांडगा होता. आणि त्यामुळ त्यांच्या वाणींत अनुभवाची प्रखरता उतरली आहे. कबीरांचे विचार बुद्धिग्राह्य असून आत्मप्रत्ययाशिवाय कुणीहि आपल्यावर अंधविश्वास ठेवूं नये असा त्यांनीं सडेतोड उपदेश केला आहे. कबीरांच्या ठिकाणची ही आत्मश्रद्धा ध्यानांत घेऊन त्यांची गणना जगांतील प्रेपितांत (Prophets) अथवा महापुरुषांत (Mystics) करण्यास हरकत नाहीं.

'कबीर ऍंड दी कबीरपंथ' या ग्रंथाचे कर्ते रेव्हरंड वेस्कट हे असें मानतात कीं कबीरांनीं एक अगदीं नवा व निराळा असा स्वतंत्र पंथ शोधून काढला. परंतु त्यांची ही कल्पना बरोबर नाहीं. कबीर ज्या काळीं होऊन गेले, त्या काळीं हिंदू व मुसलमान यांच्यांत संघर्ष चालू होता. तेव्हां त्या काळाला उचित असे जे हितकर विचार दोन्ही समाजांत होते, ते कबीरांनीं हिंदू समाजांतील पंडित व मुसलमान समाजांतील मौलवी यांच्या विरोधाची पर्वा न करतां जनतेसमोर मांडण्याचें साहस केलें व त्यासाठीं जो त्रास व जे कष्ट झाले, ते निमूटपणें व निर्भीडपणें सहन केले. या इतिहासावरून त्यांना फार तर स्वतंत्र विचारसरणीचे समाजसुधारक असें म्हणतां येईल.

## पुनर्जन्मवाद

पुनर्जन्माच्या सिद्धांतासंबंधी हिंदु व मुसलमान यांच्या मनांत भिन्नता आहे. हिंदूंच्या मतानुसार जन्माला आलेला प्रत्येक प्राणी आयुष्यांत जशीं कर्में करतो तशा अन्य योनी त्याला भविष्यकाळीं प्राप्त होऊन प्रापंचिक कर्में करावीं लागतात. उलट मुसलमानांच्या मतानुसार प्रत्येक प्राणी एकदांच मनुष्याच्या जन्मास येतो. पुन्हां मग त्याच्यामागें जन्ममरणाचा फेरा राहात

नाहीं. कबीरांच्या वाणींत अनेक ठिकाणीं या दोन परस्परविरुद्ध सिद्धांतांचें समर्थन आढळतें. त्यामुळे या सिद्धांतासंबंधीं त्यांचें निश्चित मत कळत नाहीं ! कदाचित् या सिद्धांतासंबंधींच्या त्यांच्या वचनांत प्रक्षिप्त भागांची भेसळ झाली असावी किंवा पुढें पुढें या सिद्धांतासंबंधींच्या त्यांच्या मतांत परिवर्तन झालें असावें !

## कबीरांचा भक्तिवाद

कबीरांनीं आपल्या उपदेशांत भक्तीवर विशेष जोर दिला आहे. आपल्या कांहीं वचनांत त्यांनीं भक्तीचा उल्लेख 'प्रेम' या शब्दानें केला आहे. अर्थात् तेथे त्यांना त्याचा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. भक्तीच्या बाबतींत कबीरांनीं सख्य भक्तीचा अवलंब केला आहे. हा भक्तिमार्ग हिंदूंच्या मधुरा भावनेशीं व मुसलमानांच्या सूफी मताशीं मिळता जुळता असल्यामुळें त्या दोन्ही समाजांत तो लवकर प्रिय होऊन प्रसार पावला. कबीरांच्या भक्तिविषयक वचनांत श्रृंगारपूर्ण वर्णन वैपुल्यानें आलें आहे. परंतु त्या वर्णनांतील श्रृंगार केवळ आभासात्मक आहे. वस्तुतः तें वर्णन जीवात्मा व परमात्मा यांच्यांतील संबंधाचें आहे. या वचनांचें तुकारामांच्या 'विराण्यां'शीं साम्य आहे.

## कबीरांचा उपदेश

कबीरांच्या ठोकळ ठोकळ सिद्धांतांपेक्षां त्यांनीं खोटें ज्ञान, खरें ज्ञान, दुर्बुद्धि, प्रतिभा, सत्संग, कुसंग, गुरु, असद्गुरु, समदृष्टि, अहिंसा, दया, क्षमा, काम, क्रोध, मद, लोभ, इत्यादि फुटकळ विषयासंबंधीं जो उपदेश केला आहे, तो दैनिक जीवनांत मोलाचा व महत्त्वाचा असल्यामुळें जनसाधारणांत प्रिय झाला असून त्यांच्या तोंडीं म्हणींसारखा बसला आहे. 'चेतावनी' या शीर्षकाखालीं त्यांचा जो उपदेश आहे, तो जनसाधारणांच्या उद्बोधनासाठीं आहे. "उठा, जागे व्हा, आणि ज्ञान प्राप्त करा" हाच सनातन आदेश त्यांत देण्यांत आला आहे. परंतु तो देतांना कबीरांनीं जे अमोघ दृष्टान्त दिले आहेत, ते सहज पटणारे आहेत. आणि ते व्यक्त करणारी कबीरांची वाणी प्रभावशाली असून तिच्यामागील त्यांचें विभूतिमत्त्व महनीय व वंदनीय आहे.

'मृत्यू' वरील आपल्या वचनांत कबीरांनीं जनसाधारणांचें लक्ष्य संसाराच्या निःसारतेकडे वळविलें आहे. या विषयावरील त्यांचीं कांहीं वचनें सूचक, संयत व काव्यमय असल्यामुळें समाजांत सुभाषितांप्रमाणें आज अनेक शतकें उपयोगिलीं जात आहेत.

## कबीरांचें दुर्मतध्वंसन

कर्मकांड, अवतारवाद, हिंसा, प्रतिमापूजन, व्रतेंवैकल्यें, वर्णाश्रमधर्म इत्यादिकांविषयीं कबीरांचीं जीं वचनें आहेत, तीं अत्यंत तीव्र असून त्यांत त्यांनीं मिथ्याचारांवर झोड उठविली आहे. ही झोड हिंदू व मुसलमान या दोन्ही समाजांवर सारखींच आहे. कबीरांचा आविर्भाव झाला, त्या काळीं, या दोन्ही समाजांत अशांति वाढती होती. कबीरांवर वैष्णवमताचे संस्कार असले, तरी हिंदू व मुसलमान यांच्या एकतेकडे त्यांचें लक्ष अधिक होतें. तेव्हां त्यांनीं या दोन्ही समाजांना जागृत करण्यासाठीं त्यांच्या मिथ्याचारांवर हल्ले चढविले आणि त्यांना सदाचारांचे पाठ पढविले. अर्थात् हे हल्ले चढवितांना त्यांनीं या दोन्ही समाजांतील धर्मग्रंथांवर व त्यांच्या कर्त्यांवर व नेत्यांवरहि टीकेची जळजळित फैर उडविली. त्यामुळें साहजिक त्यांच्या विचारांत मर्यादशीलता व समाहितता यांची तितकीशी बूज राहिली नाहीं. कबीरांच्या पश्चात् दोन समाजांतील ऐक्याचें त्यांचें कार्य तडीला गेलें असेंहि म्हणतां येत नाहीं. कारण त्यांच्या कलेवराकरितां हे दोन्ही समाज झगडले अशी ऐतिहासिक कथा आहे. आणि आज देखील हे दोन्ही समाज पूर्वीप्रमाणें दूर आहेत.

कबीरांच्या काव्यांत नूर, खुदा, गैब, दीदार, मुरीद इत्यादि शब्द आले आहेत. त्यांवरून त्यांच्यावर इस्लामचा थोडा फार पगडा होता यांत शंका नाहीं. ईश्वराचें वास्तव्य पश्चिमेकडे आहे ही त्यांची कल्पनाहि इस्लामी विचाराचें द्योतक आहे. परंतु त्यांनीं दोन भावांच्या संततीचा विवाह व सुंता या गोष्टी निषिद्ध मानल्या आहेत. पुन्हां त्यांचे बहुतेक विचार हिंदु कल्पनांशीं जुळणारे आहेत. तेव्हां त्यांना 'मुसलमानी हिंदु' म्हणजे नाममात्र मुसलमान परंतु वस्तुतः हिंदु म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु ते मात्र स्वतःला फक्त 'जुलहा' येवढेंच म्हणवत.

## उपसहार

साहित्य हें कबीरांचें 'साध्य' नव्हतें, 'साधन' होतें. त्यांच्या साहित्यांत मधून मधून उपमा, अन्योक्ति, रूपक, उत्प्रेक्षा इत्यादि अलंकारांचा उचित उपयोग आढळतो. आणि त्यामुळें त्यांचें गर्भित कथन आकर्षकहि झालें आहे. परंतु साहित्यानंदप्रदान हा त्यांचा उद्देश नसल्यामुळें आणि ते स्वत: लौकिक अर्थानें शिक्षित नसल्यामुळें त्याविषयीं विचार अप्रस्तुत आहे.

कबीरांच्या 'साहित्या' चा विचार 'वैचारिक दृष्टचा' करतां येईल. कबीर ही 'व्यक्ति' नसून 'विभूति' होती. तिचे विचार, आचार व उच्चार यांत सुसंगति होती. तिचा उपयोग तिनें समाजकल्याणार्थ केला. येवढें लक्षांत घेतलें म्हणजे मग कबीरांच्या 'साहित्या'चा वेगळा विचार करण्याचें कारण उरत नाहीं.

कबीरांनीं 'सत्या'ला ध्येय मानलें होतें. त्या बाबतींत ते स्पष्टवक्ते होते. हा स्पष्टवक्तेपणा कांहीं शिष्टांना फटकळपणा वाटतो याचें कारण त्यांच्या चालण्यांत आणि बोलण्यांत एकवाक्यता नसते. कबीरांचा अनुभव जसा गाढ तसाच गूढ होता आणि अवलोकन अतिशय सूक्ष्म होतें. त्यांच्या-समोर समाजांतील खालचा थर होता. तेव्हां त्याला कळेल व वळेल अशा रीतीनें त्यांनीं साध्या व सोप्या शब्दांत सरळ 'ज्ञान' सांगितलें आहे. क्वचित् मनोरंजनार्थ एकनाथ महाराजांप्रमाणें 'उलटवासी' आणि 'सांकेतिक पदें' रचलीं आहेत. परंतु आजतागायत समाजांत त्यांच्या सरळ उपदेशाचा प्रचार अधिक आहे. हा उपदेश दिसावयास साधा व सोपा असला, तरी त्यांत गुप्त असा गूढ आशय असतो. तो लक्षांत आला म्हणजे कबीरांच्या विभूतिमत्त्वाची व अलौकिक वाणीची साक्ष पटते.

कबीरांची वाणी ही केवळ हिंदी साहित्यांत व हिंदी प्रदेशांतच पसरलेली नाहीं. अखिल भारतांत तिचा प्रचार आहे. आपल्या सामर्थ्यानें तिने वेदांचें महत्त्व आणि उपनिषदांचा मान प्राप्त करून घेतला आहे. त्याचें प्रत्यंतर पुढें प्रस्तुत केलेल्या त्यांच्या निवडक दोहयांवरून आणि वेंचक पदांवरून येईल.

• • •

# श्रीकबीरवचनावलि

32823
944C 6/3/52

## विभाग पहिला

## दोहावलि

का मांगूं ? कुछ थिर न रहाई !
देखत नैन, चल्या जग जाई
इक लप पूत, सवा लष नाती
ता रावन घरिं दिवा न बाती

काय मागुं ? स्थिर कांहिं न राही !
दृष्टीदेखत जग हें जाई
लक्ष पुत्र, लक्षावधि नातीं,
त्या रावणघरिं दिवा न वाती.

दा. क्र.

# प्रार्थना

१. साहब तुम जनि बीसरो जो लाख लोग लगि जाहिं
हमसे तुमको बहुत है तुमसम हमको नाहिं.

२. मोमें इतनी सक्ति कहं गाओ गला पसार ?
बंदेको इतनी घनी पडा रहै दरबार.

३. सुरति करौ मेरे सांइया ! हम हैं भवजलमाहिं
आपेही बहि जायेंगे, जौ नहिं पकरौ बाहिं.

४. मेरा मन जो तोहिंसो, तेरा मन कहिं और
कह कबीर कैसे निभै एकचित्त, दुइ ठौर ?

५. मेरा मुझमें कुछ नहीं, जो कुछ है सो तोर
तेरा तुझको सौंपते क्या लागत है मोर ?

६. तुम तो समरथ सांइया दृढ-करि पकरो बाहि
धूरहि लै पहुंचाइयो, जनि छांड़ौ, मग माहिं.

७. अंतरजामी एक तुम, आतमके आधार
जो तुम छोड़ौ हाथ तो कौन उतारै पार ?

८. मैं अपराधी जनमका नखशिख भरा विकार
तुम दाता, दुखभंजना मेरी करौ सम्हार.

९. क्या मुख लै बिनती करौं, लाज अवत है मोहिं ?
तुम देखत अवगुन करौं, कैसे भावों तोहिं ?

१०. अवगुन मेरे बापजी बकस गरीब निवाज,
जो मैं पूत कपूत हौं तऊ पिताको लाज.

# प्रार्थना

१. नकोस विसरूं तूं विभो ! जरि तुज भक्त अनेक
अनेक तुज आम्हांपरी परि तूं आम्हां एक

२. शक्ति मला इतुकी कुठे गाइन ‘ आ ’ वासून ?
सेवकास इतुकें पुरें ! राहिल सदरिं बसून !
सदर–दरबार.

३. हे स्वामी ! संमुख असां, आहों भवजलिं आम्हि–
वाहुन जाऊं आपसुख, नच धराल जर बाहि

४. मन माझें ठायीं तुझ्या परि तव दुसऱ्या ठायिं
निभेल कैसें एक मन, दोन ठायिं जर राहि ?

५. माझें कांहि न मजमधीं, तुझेंच सगळें कांहि
तुझेंच तुजशीं सोपतां माझें जाई काइ ?

६. समर्थ हे स्वामी ! तुम्ही पकडा वळकट दंड
ध्रुवापावतों पोंचवा, मार्गि न पाडा खंड.

७. अंतर्यामीं एक तूं आत्म्याचा आधार !
सोडशील तूं हात तर, उतरि कोण पर-पार ?

८. जन्माचा अपराधि मी नखिशिखि भरे विकार
दुःखघ्ना ! सांभाळ मज, दाता तूंच उदार.

९. विनवूं तुज कोण्या मुखें, वाटे लाज मनास ?
रुचेल कां तुज ? रचि तुझ्या देखत अवगुणरास !

१०. अगण्य आणि अवाच्य बा ! मम अवगुण प्रभुराज !
कुपुत्र मी, तुम्ही पिते, तुम्हांस माझी लाज.

११. औगुन किये तो बहु किये, करतन मानी हार
भावैं बंदा बकसिये, भावैं गरदन मार.

१२. भुक्ति, मुक्ति मांगौ नहीं, भक्तिदान दे मोहिं
और कोइ याचौ नहीं, निसदिन याचौ तोहिं

१३. जा घटमें सांई वसै सो क्यों छाना होय ?
जतन जतन कर दाबियै तौं उजियाला सोय.

१४. सब घट मेरा सांइया सूनी सेज न कोय
बलिहारी वा दासकी जा घट परगट होय !

१५. चलते-चलते पग थका, नगर रहा नउ कोस
बीचहिमां डेरा परा, कह हुँ कौन को दोस ?

१६. ऊँचे गांव पहाड़पर औ मोटेकी बांह
ऐसो ठाकुर सेइये उबरिय जाकी छांह.

१७. हे कबीर, तैं उतरि रहु संवल, परोहन साथ
सवल घटैं औ पग थकैं, जीव विराने हाथ

१८. हंसा ! तूं सुबरन बरन-का वरनौ मैं तोहिं ?
तव वरनन कौ पाइ हौं तबै-सराहौं त्तोहिं

१९. कबिर साइ-तौं मिलहिंगे, पूछहिंगे कुसलात,
आदिअंतकी काहुंगा उर-अंतर की बात.

२०. ज्यूं मन मेरा तुज्झ सौं, यौं जे तेरा होइ,
ताता, लोहा यौं मिलै, संधि न लखई कोइ.

२१. काजरकेरी कोठरी ऐसा यह संसार
वलिहारी वा दासकी पैठके निकसन हार.

११. अवगुण केले बहुत मी, करतां मानलि न हार,
रुचेल तर बक्षीस दे, रुचेल,–गर्दन मार.

१२. भुक्ति, मुक्ति मागे न हा, भक्तिदान दे यास
याचि न इतरां; याचि तुज निशिवासरिं हा दास

१३. ज्या देहीं स्वामी वसे, क्षीण नसे तो लेश
यत्नें तो दाबा-तसा उज्ज्वल होय विशेष.

१४. शून्य शेज नच, स्वामि मम राहि सकल घटिं स्नेहिं
त्या दासाची धन्य तो प्रकटे ज्याच्या देहिं !

१५. शिणलि पाउलें चालतां, नगर उरे नउ कोस
मधेंच तळ पडला, वदा, हा कोणाचा दोष ?

१६. गांव उंच शैलावरी, गांठोडें काखेंत,
सेवावा प्रभु यापरी थांबुन तच्छायेंत !

१७. आतर, वाहन हातिं; तों उतर सहाय्याबीण
थकति पाय, आतर सरे, मग न जीव स्वाधीन

आतर–वाटखर्च.

१८. वर्ण सुवर्णाचा, तुझें हंसा ! वर्णन हो न
वर्ण तुझा पावेल, तर तुज-ना वर्णिल कोण ?

१९. होईलच प्रभु-भेटि ते पुसतिल कुशलक्षेम
कथीन अंतर्यामिचें मी साद्यन्त प्रेम.

२०. तुझ्यांत मन माझें, तुझें राहिल जर माझ्यांत
लोहखंड जुळतील, नच दिसेल सांधा आंत.

२१. काळी काजळकोठडी तैसा हा संसार
त्या दासाची धन्य ! जो हिच्यांतून निघणार !

निघणार–बाहेर पडणार.

२२. अनराते सुख सोवना, राते नींद न आय,
ज्यों जल छूटे माछरी तलफत रैन बिहाय !

२३. द्वारधनीके पड़ि रहै, धका धनीका खाय,
कबहुं न धनी नवाजई, जो तब छांडित जाय.

२४. दासा-तन, हिरदे नही; 'नामा' धरावे दास
पानीके पीये बिना कैसे मिटे पियास ?

२५. कबीर केसौकी दया ! संसा घाल्या खोहि
जे दिन गये भगतिबिन, ते दिन सालै मोहि

———

२२. निजे सुखें दिवसां, न जो रात्रीं झोपीं जात;
जशी जलाविण मासळी तडफे, विरतां रात !

२३. द्वारि धन्याच्या पहुडुनी, धका धन्याचा खाय,
धनी न नावाजी, तरी द्वार न सोडुन जाय.

२४. तनू, हृदय दासासना; फक्त 'नाम' धरि दास,
पाणी प्याल्यावांचुनी शमेल कैशी प्यास ?

२५. कशी केशवाची दया ! केला संशय-नाश
गेले दिन भक्तीविना सोलति ते हृदयास

———

## २. विश्वकर्त्ता

२६. अच्छै पुरुष इक पेड है, निरंजन वाकी डार,
तिर देवा साखा भये, पात भया संसार.
२७. साहेब मेरा एक है, दूजा कहा न जाय,
दूजा साहब जो कहूं, साहब खरा रिसाय.
२८. देहीमाहिं विदेह है साहब सुरति सरूप !
अनंत लोकमें रमि रहा जाके रंग न रूप
२९. जनन-मरनसे रहित है मेरा साहिब सोय !
बलिहारी वह पीव की ! जिन सिरजा सब कोय !
३०. रेख, रूप जेहि है नहीं, अधर धरो नहिं देह,
गगन मंडलके मध्यमें रहता पुरुष विदेह,
३१. सोई मेरा एक तूं और न दूजा कोय
जो साहब दूजा कहै, दूजा कुलको होय
३२. सर्गुण की सेवा करौ, निर्गुणका करूं ज्ञान,
निर्गुण-सर्गुणके परे तहै हमारा ध्यान !
३३. चार भुजाके भजनमें भूलि परै सब संत
कबिरा सुमरै तासुको जाके भुजा अनंत
३४. एक कहौं तो है नहीं, दोय कहौं तो गारि
है जैसा तैसा रहै कहै कबीर विचारि !
३५. पानी हूं तें पातला, धूंआ हूं तें झीन,
पवनहुं ते अति ऊतला, दोस्त कबीरा कीन।

३६. घटि-बढि कहीं न देखिये, ब्रह्म रह्या भरपूर,
जिन जान्यां तिनि निकट है, दूरि कहै तै दूर

---

## ३. विश्वकर्ता

२६. अक्षय पूरुष–एक तरु, डांग–निरंजन त्याशि,
त्रिदेव–शाखा जाहले, प्रपंच–पल्लवराशि.
२७. ईश्वर आहे एक मम, दुजा कसा म्हणवेल ?
ईश्वर दुसरा जर म्हणूं, ईश्वर खरा रुसेल.
२८. देहिंच राहि विदेहि तो सच्चित् ईश स्वरूप !
अनंत लोकीं तो रमे ज्यास न रंग, न रूप
२९. जनन-मरण-निर्मुक्त जो माझा ईश्वर तोच !
धन्य धन्य त्याची ! असे सकल-मुकुट-मणि तोच !
३०. रेखा-रूप न ज्यास, जो अ-धर, न धरिला देहिं
गगनमंडलामध्यि तो राहे पुरुष विदेहि.
३१. माझा एकच-तूंच तो आणि कुणि आणखी-न
म्हणेन, 'ईश दुजा' तरी, ठरेन अन्य कुलीन !
३२. सगुणाची सेवा करूं ? अ-गुणाचें वरूं ज्ञान ?
सगुण-निर्गुणातीत जो तेथे माझें ध्यान !
३३. भजनीं चार भुजाचिया भुलले सारे संत
कबीर त्यालागीं स्मरी ज्याच्या भुजा अनंत.
३४. 'एक' म्हणूं-तर तो नसे, 'दोन' म्हणूं-तर थाप
असे जसा राहो तसा हाच विचार अपाप !
३५. पातळ पाण्याहूनही, धूराहूनहि क्षीण,
पवनाहून उताविळा कबीर करि संगीन.
संगीन–मित्र (संग+ईन्).
३६. बघा न न्यूनाधिक कुठें–'ब्रह्म' सदा भरपूर
त्यास निकट-जे जाणती; 'दूर' म्हणति त्या दूर.

## ३. शक्तिशालित्व

३७. सांई मेरा बानिया सहज करै ब्योपार
बिन डांडी, बिन पालरे तोलै सब संसार

३८. वहन, बहंता-थल करै, थल-करि बहन बहोय
साहब हाथ बडाइया जस भावै तस होय

३९. साहबसो समरथ नही गुरु आ, गहिर, गंभीर
औगुन छोडै, गुन गहै, छिनक उतारै तीर

४०. जो कुछ किया सो तुम किया ! मैं कछु कीया नाहिं !
कहो कही जो मैं किया तुमही ये मुझमाहिं !

४१. जाको राखे सांइया मारिन सकै कोय
बालन बांका करि सकै जो जग बैरी होय !

४२. सांई तुझसे बाहिरा कौडी नाहिं बिकाय
जाके सिरपर तूं धनी लाखों मोल कराय

४३. साहबसों सब होत है, बंदे ते कछु नाहिं
राईते पर्वत करे, पर्वत राईमाहिं

## ३. शक्तिशालित्व

३७. प्रभु माझा वाणी असे सहज करी व्यापार
दांडि-पारड्यांवाचुनी तोलि सकल संसार.

३८. चलित, प्रवाहित-स्थिर करी; स्थिर-करि प्रचलित, वाहि;
ईश उचलितां स्वीय-कर, हो जैसे तो चाहि !
चाहि–इच्छा करतो.

३९. समर्थ ईशासम नसे गुरू, गहन, गंभीर
अवगुण त्यजि, गुण घे तया दावि क्षणीं परतीर.

४०. जें केलें-केलेंस तूं ! मी केलें कांही न !
जें 'केलें' म्हणतों, तुझ्या तें अवघें आधीन !

४१. त्यास न कुणि मारूं शके रक्षी ज्यास परेश
जग झाले वैरी तरी हो न वाकुडा केश !

४२. देवा ! जें तुज वेगळें विके न कवडीमोल
परि ज्याच्या शिरिं तूं धनी लाख तयाचें मोल.

४३. ईश सर्व कांही करी, भक्त करी ना कांहि,
राईतें पर्वत करी, पर्वतास करि राइ.
राई–मोहरी.

---

## ४. सर्व व्यापकत्व

४४. कस्तूरी कुंडल वसै मृग ढूंढै वनमाहिं
ऐसे घटमें पीव है दुनिया जानै नाहिं

४५. तेरा साई तुज्झमें ज्यों पुहुपनमें बास
कस्तूरीका मिरग ज्यों फिर फिर ढूंढै घास

४६. ज्यों तिलमाही तेल है, ज्यों चकमकमें आगि,
तेरा सांई तुज्झमें जागि सके तो जागि

४७. जाकारन जग ढूंढिया सो तो घटही माहिं
पडदा दिया भरमका तांते सूझै नाहिं

४८. समझै तो घरमें रहै, परदा परक लगाय
तेरा साहब तुज्झमें अनत कहूं मत जाय

४९. जेता घट, तेता मता; बहु बानी, बहु भेख
सब घट व्यापक व्है रहा सोई आप अलेख

५०. भूला भूला क्या फिरै? सिरपर बधि गइ बेल!
तेरा सांई तुज्झमें ज्यों तिल माहीं तेल!

५१. जों नयननमें पूतरी यों खालिक घटमाहिं
मूरख लोग न जानहीं बाहर ढूंढन जाहि

५२. पावकरूपी सांइया सब घट रहा समाय
चित चकमक लागै नहीं तांतें बुझि बुझि जाय

---

## ४. सर्व व्यापकत्व

४४. कस्तुरिका नाभीमधें मृग धुंडी विजनांत
नच जाणे जग की वसे अंतर्यामी 'नाथ'!

४५. तुझ्यांत आहे प्रभु तुझा जैसा पुष्पि सुवास
कस्तुरिमृग वण वण फिरे उगाच धुंडित घास.

४६. तेल जसें तीळांमधें, गारगोटि मधि आग,
तुझ्यांत आहे प्रभु तुझा, जाग! शक्य तर जाग!

४७. ज्यास्तव जग धुंडाळलें तो या देहिंच राहि
पटल भ्रमाचें आडवें, तेणें गवसत नाहिं!

४८. जाणसि? तर गेहीं रहा! पटें-पापण्या लाव!
तुझा तुझ्यांतच ईश! तूं पहा न परका ठाव!

४९. जितुके घट, तितुकीं मतें; वहु वाणी, बहु वेष
अ-लक्ष आपण तो स्वयें! सर्व व्यापुन शेष!
घट—शरीरें.

५०. वणवण भ्रमसी कां भ्रमें? लिहिलि ललाटीं वेळ!
तुझा तुझ्यांतच ईश रे! तिळांत जैसें तेल!

५१. नयनीं पुतळी त्यापरी शरीरांत परमेश
मूर्ख नेणती, धुंडिती बाहेरील प्रदेश.

५२. पावकरूपानें प्रभू सर्व घटांत समाय
लगे न चकमक-चित्त हें म्हणून विझुनी जाय.

---

## ५. शब्द

५३. ऐसी वानी बोलिये मनका आपा खोय
औरन को सीतल करै आपहुं सीतल होय

५४. गगन मंडलके बीचमें जहां सोहंगम डोरि
सबद अनाहत होत है सुरत लगी तहं मोरि

५५. बोली एक अमोल है जो कोइ बोलै जानि
हिये तराजू तोलिकै तब मुख बाहर आनि

५६. कबिरा शब्द सरीरमें बिनगुन बाजै तांत
बाहर भीतर रमि रहा तातें छूटि भ्रांत

५७. सब्द-सब्द बहु अंतरा, सार सब्द चित देय
जा सब्दै साहब मिलै सोइ सब्द गहिलेय

५८. एक शब्द सुखरास है, एक शब्द दुखरास
एक सब्द बंधन कटै, एक सब्द गलफास

५९. 'सब्द-सब्द' सब कोइ कहै, सब्दके हाथ न पाव
एक सब्द औषधि करै, एक सब्द करै घाव

६०. सब्द बराबर धन नहीं जो कोइ जानै बोल
हीरा तो दामों मिलै, सब्दहि मोल न तोल

६१. मता हमारा मंत्र है हमसा होय सो लेय
सब्द हमारा कल्पतरु जो चाहै सो देय।

६२. सीतल शब्द उचारिये 'अहम्' आनिये नाहिं
तेरा प्रीतम तुज्झमें शत्रूही तुझमाहिं

## ५. शब्द

५३. वाणी बोलावी अशी जिच्यांत ना अभिमान
आपणांस-इतरांसही जी करि शांति प्रदान.

५४. गगनमंडलाच्या मध्यें 'सोऽहं' डोले जेथ
शब्द अनाहत होत मी ध्यान-मग्न त्या तेथ !

५५. बोली बोले जो कुणी तिचें जाणुनी मोल
हृदय-तराजुंत तोलुनी तो आणी मुखिं बोल.

५६. शब्द शरीरीं वाजतो गुणविहीन कीं तांत !
रमत राहि बाह्यांतरीं फिटे त्यामुळे भ्रांत.
तांत—तार.

५७. शब्दीं-शब्दीं भिन्नता, 'विचार' शब्दीं सार
ज्या शब्दें ईश्वर मिळे तोच शब्द स्वीकार.

५८. एक शब्द सुखराशि, तर दुःखराशिही एक;
बंधन तोडी एक, तर दे गळफासहि एक.

५९. 'शब्द-शब्द' म्हणती सकल त्यास न हात, न पाय
एक शब्द दे औषधी, एक शब्द करि घाय.

६०. समजुन उमजुन बोलतां शब्दासम धन नाहिं
तोलमोल त्याला नसे,—हिऱ्यास किंमत राहि.

६१. आम्हांसम जो आमुचें तोच मंत्र-मत घेइ
शब्द आमुचा कल्पतरु इच्छावें तें देइ.

६२. बोलावी शीतल गिरा 'अहम्' नसावा आंत
तुझा तुझ्यांतच प्रिय सखा आणि अरीहि तुझ्यांत.

६३. वह मोती मत जानियो पुहै पोतके साथ
यह तो मोती सव्दका वेधि रहा सब गात

६४. जंत्र-मंत्र सब झूठ है मत भरमो जग कोय
सार शब्द जानैबिना कागा हंस न होय

६५. तन-संदुक, मन-रतन है, चुपके दे हट ताल
गाहकबिना न खोलिये पूंजी-शब्द रसाल

६६. 'सव्द-सब्द' सब कोउ कहै, वो तो सव्द विदेह
जिभ्यापर आवै नहीं, निरखि-परखि कर लेह

६७. ज्यूं ज्यूं हरिगुण सांभलौ, त्यूं त्यूं लागै तीर,
लागै थै भागा नहीं, साहणहार कबीर

६८. सोई अषिर, सोई बैयन, जन जूजू बाचवंत,
कोइ एक मेलै लवणि, अमी रसाइण हंत

———

६३. पोत्तेसह जें ओंविलें तें मोतीं जाणा न
वेधि सकल गात्रांस तें शब्द मोतिं हें छान !

६४. मंत्र-यंत्र खोटें ! नका भुलूं त्यांस कोणीहि
सारशब्द ज्ञानाविना--वायस हंस न होइ.

६५. तनु-पेटी, मन-रत्न, घे कुलूप गुपचुप घाल
ग्राहक ना तर उघड ना, पूंजी-शब्द रसाळ.

६६. 'शब्द-शब्द' म्हणती सकल, 'शब्द' परंतु विदेहि
तो जिव्हेवरि येइ ना, निरखुन-परखुन घेइ.

६७. जों जों हरिगुण वागवा, तों तों रूतती तीर
रुतती तरि पळ काढि ना सोशिक थोर कबीर.

६८. तीच वाणि, तीं अक्षरें, जीं बहुजन वदतात
करी रसामृत एक कुणि लवण मिसळुनी त्यांत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम 32823 वि: [illegible]
क्रमांक [illegible] नों दि [illegible]

## ६. नाम

६९. सुपनुहुमें बर्डाइके जिन मुख निकरै 'नाम'
बाके पगकी पैंतरी म्हारे तनको चाम.

७०. सुखके माथे सिलि परे 'नाम' हृदयसे जाय,
बलिहारी वा दुःखकी पल-पल नाम रटाय !
७१. ऐसा कोई ना मिला सत्तनामका मीत
तन, मन सौंपे मिरग ज्यौं सुनै वधिक का गीत !
७२. लेनेको सतनाम है, देनेको अनदान,
तरनेको आधीनता, बुडनेको अभिमान.
७३. कबीर कहता जात हूँ सुणता है सब कोई
भला 'नाम' से होइगा नहि तर भला न होइ
७४. 'नाम' भजो तो अब भजो बहुरि भजोगे कब्ब ?
हरियर हरियर रूखडे ईंधन हो गये सब्ब !
७५. आदिनाम पारस अहै, मन है मैला लोह
परसतही कंचन भया छूटा बंधन मोह
७६. आदिनाम निज सार है बूझि लेहु सो हंस
जिन जान्यो निज नामको अमर भयो–सो बंस

७७. आदिनाम निज मूल है और मंत्र सब डार
कह कबीर निज नामबिनु बूडि मुआ संसार.
७८. नामरतन धन पाइके, गांठी बांध, न खोल
नाहीं पत, नहिं पारखू, नहिं गाहक, नहिं मोल

## ६. नाम

६९. स्वप्नींही वरणावतां ज्याच्या मुखि ये 'नाम'
पैजारा त्याच्या पदीं माझ्या तनुचें चाम
चाम–चामडें.

७०. शिला सुखाच्या शिरि पडो 'नाम' हृदांतुन जाइ
दुःखाचा जय चिर असो नामच घोकत राहि !

७१. तनु, मन अर्पी मृग जसा व्याधगीत ऐकोनि
सन्नामाचा भेटला मित्र तसा नच कोणि !

७२. 'नाम' असे कीं घ्यावया; अन्न-द्यावया 'दान';
तरावया–'स्वाधीनता'; बुडावया–'अभिमान'.

७३. ऐकतात सारींजणें कबीर सांगत सोय
'नाम' वदा होईल भले, ना तर भलें न होय.

७४. स्मरशि 'नाम'तर स्मर अतां,स्मरशिल कधीं पुनश्च
हिरवळ हिरवळ वाळली, हो इंधन भरगच्च !

७५. आदिनाम जर परिस तर, मन–किटलेंलें लोह
स्पर्शतांच सोनें बने, झडुनी बंधन–मोह.

७६. आदिनाम निज सार,–जो जाणुन घे तो हंस
'स्व-नाम' ज्यानें जाणलें अमर तयाचा वंश.
स्वनाम–अर्थात् निज नाम, स्व-स्वरूप.

७७. आदिनाम-निजमूळ, तर फांद्या–मंत्र अपार,
निजनामाच्यावाचुनी बुडे-मरे संसार.

७८. नामरत्नधन पावल्या, पदरीं बांध, न खोल
नाहीं पत, ना पारखी, ना ग्राहक, ना–मोल.

७९. सभी रसायन हम करी नहीं नामसम कोय
रंचक घटमें संचरै सब–तन कंचन होय.

८०. जबहि 'नाम' हिरदे धरा भया पापका नास
मानो चिनगी आगकी परी पुरानी घास.

८१. ज्ञानदीप परकास करि, भीतर भवन जराय
तहां सुमिर 'सतनाम' को सहज समाधि लगाय

८२. जैसो माया मन रम्यो तैसो 'नाम' रमाय
तारामंडल वेधिकै तब अमरापुर जाय.

८३. 'नाम' विना बेकाम है छप्पन कोटि विलास
का इन्द्रासन बैठिबो ! का बैकुंठ निवास !!

८४. लूटि सके तो लूट ले 'सत्तनाम' की लूटि
पाछे फिर पछताहुगे प्रान जाहि जब छूटि

८५. शून्य मरै, अजपा मरै, अनहदहू मरि जाय,
रामसनेही ना मरै कह कबीर समुझाय.

८६. बासर सुख ना रैन सुख, ना सुख सपनैं माहिं
जो नर बिछुडे 'नाम' से तिनको धूप न छाहिं

८७. मोर-तोर की जेवरी बटि बांधा संसार
दास कबीरा क्यों बंधै जाके नाम अधार ?

८८. सबैं हमारे एक है जो सुमिरै 'सतनाम'
वस्तु लही पहिचानिकै बासनासुं–क्या काम ?

७९. नामासम न रसायनीं एकहि गुण गंभीर.
लेशहि संचरतांच हो कांचन सर्व शरीर.

८०. हृदयिं 'नाम' धरितांच झणिं झालें पाप विनाश
ठिणगि पडलि जणुं जाउनी जिथे वाळका घास
घास—चारा, गवत.

८१. गृह-गाभा उजळावया ज्ञान-दीपिका लाव,
'सत्यनाम' स्मरूनी तिथे सहज समाधी लाव.

८२. रमलें मन मायीं तसे तें रमवी 'नामां' त
तारामंडळ भेदुनी शिरशिल अमर-पुरांत.

८३. कुचकामी—'नामा'विना छप्पन कोटि विलास
नको वासवासन ! नको वा वैकुंठ निवास ! !

८४. शक्य तुम्हां तर करून घ्या 'सन्नामा'ची लूट
पुढे व्हाल अनुतप्त मग प्राण मागतां 'सूट'

८५. शून्य मरे, अजपा मरे, अनहतही मृत होइ
रामस्नेही ना मरे कबीर वदतां होइ.

८६. ना दिवसां, ना रात्रि सुख; स्वप्नीं न सुखाभास
जे नर त्यजिती 'नाम', ना ऊन-साउली त्यांस

८७. बद्ध असे माझें-तुझें-शृंखलेंत संसार
तो न बद्ध—दासास ज्या 'नामा' चा आधार !

८८. असती सारे आमुचे जे स्मरती 'सन्नाम'
वस्तु वळखली, लाभली, वासनेंशि ना काम !

———

## ७. ओलख

८९. पाणीही ते हिम भया, हिम ह्वै गया बिलाइ
जो कुछ था सोई भया अब कुछ कहा–न जाइ !

९०. कहना था सो कह दिया अब कछु कहा न जाय
एक रहा, दूजा गया दरिया लहर समाय !

९१. जिन पांवन भुइं वहु फिरै, घूमे देस-बिदेस
पियामिलन जब होइया अंगन भया बिदेस

९२. लाली मेरे लालकी जित देखूं तित लाल
लाली देखन मैं गई मैं भी हो गइ लाल

९३. गगन गरजि, वरसै अमी, बादल गहिर गंभीर,
चहुं दिसि दमकै दामिनी, भीजैं दास कबीर

९४. मैं लागा उस एक से, एक भया सब माहिं
सब मेरा, मैं सबनका तहाँ दूसरा नाहिं.

९५. उलट समाना आपमें प्रगटी जोति अनंत
साहब-सेवक एकसंग खेलै सदा वसंत

९६. जोगी हुआ, झलक लगी, मिट गइ ऐंचा तान,
उलटि समाना आपमें, हूआ ब्रह्म समान !

९७. नौन-गला, पानी मिला, बहुरिन भरि है गौंन
सुरतशब्द मेला भया, काल रहा गहि मौन.

९८. पारब्रह्मके तेजका कैसा है उनमान
कहिवेकी शोभा नहीं देखेही परमान.

## ७. ओळख

८९. जळाचेंच हिम होय, तें हिम मग वितळुन जाय
झाले होतें जें जसें ! अधिक वदावें काय ?

९०. कथिलें जें कथणें असे, अधिक कथावें काय !
एक उठे, दुसरी फुटे-लाट समुद्रीं माय !
माय–सामावे.

९१. ज्या पायांनीं भटकल्यें वणवण देश-विदेश
प्रियकर जेव्हां भेटला-अंगणही परदेश !

९२. मम 'लाला'ची लालिमा जिथ बघत्यें तिथ लाल
बघूं निघें मी लालिमा मीही झाल्यें लाल

९३. गर्जे नभ, वरसे सुधा, मेघ गहन गंभीर
चहुंदिशि चमके दामिनी, भिजले दास कबीर.

९४. 'एका'शीं संलग्न मी, 'एक'च हो सर्वत्र
मी सकलांचा, सर्व मम, नाहीं दुसरें तत्र.

९५. उलट मावणें ! प्रकटली 'स्वतां'त ज्योति अनंत
सदा परस्पर खेळती ईश्वर-भक्त 'वसंत'

९६. जोगि जाहला, धवळला मिटली ओढाताण,
स्वयें 'स्वयीं' सामावला, झाला ब्रह्मसमान !

९७. लवण विरे-मिसळे जळीं, पुन्हा बने ना 'लौण'
रूप-शब्द मिळती; बसे 'काळ' धरोनी मौन

९८. परब्रह्म तेजें कशी दशा उन्मनी होत,
सांगण्यांत शोभा नसे, साक्षि हवा उद्योत.
उद्योत–स्वयंप्रकाशी; तेजस्वी.

९९. कबिरा देखा एक अंग महिमा कही न जाय
तेजपुंज; परसा धनी, नैनो रहा समाय.

१००. उनमनिसों मन लागिया, गगनहिं पहुंचा जाय
चांद विहूना चांदना अलख निरंजन राय.

१०१. 'मेरि' मिटी, मुक्ता भया, पाया अगमनिवास
अब मेरे दूजा नहीं, एक तुम्हारी आस!

१०२. कबिरा भरमन भाजिया बहुविधि धरिया भेस
साईंके परिचय बिना अंतर रहियो रेस.

१०३. सुरति समानी निरतिमें, अजपामाहीं जाप,
लेख समाना अलखमें, आपामाहीं आप.

१०४. पिंजर प्रेम प्रकासिया, अंतर भया उजास,
सुखकरि सूती महलमें, बानी फूटी बास.

१०५. आया था संसारमें देखनको बहुरूप
कहै कबिरा संत हो परिगया नजर अनूप.

१०६. पाया था सो गहि रहा, रसना लागी स्वाद,
रतन निराला पाइया, जगत टटोला बाद.

१०७. दीपक जोया ज्ञानका देखा अपरंदेव
चार वेदकी गमनही जहां कबीरा सेव.

९९. अंग असे आलोकिलें महिमा कथितां ये–न
तेजस्वी; ध्वनि ऐकिला; लोचन भरले तेन
तेन–त्याने, त्या तेजस्वी 'अंगा'च्या दर्शनाने.

१००. मन लागियलें उन्मनीं, पोंहचलें गगनांत,
चंद्रावाचुन चांदणे, अलख निरंजन नाथ.
अलख–अलक्ष.

१०१. 'अहम्' नुरे मुक्ती मिळे, पावे अगम-निवास,
आतां मज दुसरें नसे, तुझी एकली आस!

१०२. भ्रमभाजन होऊं नको, बहुविध बहुकृतवेष
प्रभुपरिचय झाल्याविना राही मन निःशेष.
निःशेष–रिकामें; कोरडें.

१०३. निरंतित सुरति समावली, अजपामाजी जाप,
लेख अलक्षीं मावला, 'आपणा'मधी आप.

१०४. प्रेम प्रकाशे पंजरीं, मनीं भरे उल्हास,
सुखें निजे अंतःपुरीं, वाणी-पिचला बांस!
बांस–वेळू.

१०५. बघावया आला जगीं होता रूपें खूप
संत जाहला, दृष्टीला पडतां अनुपम रूप.

१०६. पावे-तें दृढ ठेवलें, लागे चव रसनेस,
रत्न 'निराळें' पावलें, मग केला अन्वेष.
निराळें–अमूल्य; अनर्घ्य, अन्वेष–शोध;

१०७. ज्ञानदीपिका उजळली दिसला अपरंदेव
चतुर्वेद कुठले! जिथें कबीर म्हणतो; "सेव!"

१०८. मानसरोवर सुगम जब हंसी केलि कराय
मुकताहल मोती चुगै अब उडि अंत न जाय.

१०९. सुन्नमंडलमें घर किया, बाजै शब्द रसाल,
रोम-रोम दीपक भया, प्रकटै दीनदयाल.

११०. सुरत उडानी गगनकी, चरन विलंबी जाय,
सुख पाया, साहब मिला, आनंद उर न समाय.

१११. सुन्न सरोवर, मीनमन, नीरतीर-सबदेव,
सुधासिंधु, सुखविलसही बिरला जानै भेव!

११२. कबीर तेज अनंतका, ऊगी सूरज श्रेणि
पतिसंग जागी सुंदरी, कौतिग दीठा तेणि.

११३. भली भई तो भै पड्या, गई दसा सब भूलि
पाला गलि, पानी भया, ढुलि मिलिया उस कूलि.

---

१०८. मानस सुगम-यदा करी हंस केलि भरपूर,
मुक्ताफळ चघळी अतां, उडुनी जाय न दूर.

१०९. शून्यमंडलीं गृह वसे, उमटे शब्द रसाळ
रोम-रोम दीपक बने, प्रकटे दीनदयाळ.

११०. जाय 'सुरति' उडुनी नभीं, दृढ अवलंबी 'पाय'
प्रभु भेटे, सुख प्राप्त हो, उरिं आनंद न माय.

'सुरति'–एक विशिष्ट प्रकारची समाधि.
'पाय'–(अर्थात्) प्रभूचे पाय.

१११. शून्य सरोवरिं मीन-मन, नीरतीर-सुर–साच
सुधासिंधु, सुखविलसनें हीं जाणे विरलाच !

११२. तेज अनंताचें जणों उगवें सूर्यश्रेणि
पतिसह जागे ती बघे कौतुक सुंदरि कोणि.

११३. जें घडलें, झालें भलें, स्थितिची पडली भूलि,
हिम बिरलें, जळ मिसळलें वाहुनिया त्या कूलिं.

## ८. अनुभव

११४. हम वासी वह देस जह बारह मास बिलास
प्रेम झरै, बिकसै कमल, तेजपुंज परकास!

११५. जरा मीच व्यापै नहीं, मुआ न सुनिये कोय
चलु कबीर वादे–सको, बैद साइयां होय.

११६. सपने में सांई मिलै सोवत लिया जगाय
आंखि न खोलूं डरपता मति सुपना है जाय

११७. आतम अनुभव ज्ञान की जो कोइ पुछै बात
सौ गुंगा गुड खाइकै कहै कौन मुख स्वाद?

११८. ज्यौं गुंगेके सैन को गूंगा ही पहिचान
त्यौं ज्ञानीके सुक्खको ज्ञानी होइ सो जान

११९. लिखा लिखी की है नहीं, देखा देखी बात
दुलहा दुलहिन मिल गए फीकी पडी बरात.

१२०. भरो होय-सो–रीतई, रीतो होय-भराय
रीतो-भरो न पाइये अनुभव सोइ कहाय.

१२१. देखनकीही बात है, कहनेकी कछु नाहिं,
आदि-अंतको मिलि रहा हरिजन हरिहीमाहीं.

१२२. कहना था सो कह चले, अब कछु कहा न जाय
एक रहा, दूजा गया, दरिया लहर समाय.

## ८. अनुभव

११४. त्या तिथले आम्ही जिथे बारामास विलास
प्रेम–झरे, विकसे कमल, तेज:पुंज प्रकाश !

११५. जरा, मरण नच व्यापि वा नाहिं मृताचें नाम
चल ! कबीर, देशास त्या वैद्य जिथें श्रीराम

११६. जागें करि झोपेंतुनी स्वप्नीं भेटुनि ईश
नुघडी डोळे मी भयें–: स्वप्न–गमो न–मतीस :–

११७. ज्ञान आणि आत्मानुभव यांची पुसा–न मात
कशी गुळाची चव बरें वदेल मूक यथार्थ ?

११८. मूकाच्या खाणाखुणा वळखे मूकच जेंवि
ज्ञान्याचें सुख काय तें ज्ञानिच जाणे तेंवि

११९. लेखा-लेखीची नसे देखा-देखी मात
नवरा नवरी भेटली फिक्कि पडलि वरात.
देखादेखी मात–प्रत्यक्षानुवाची गोष्ट.

१२०. भरतें-तें होतें रितें, रिता भरे अवकाश
भरे-रितेंच्या पैल जें म्हणती 'अनुभव' त्यास.

१२१. प्रत्यक्षाची मात ही-ही न सांगतां येत !
आद्यंतीं मिसळे-मिळे हरिजन हरिसमवेत.

१२२. वदलों जें वदणें असे अतां न वदलें जाय
एक आलि, गेली दुजी लहर सागरीं माय !

## ९. सारग्रहण

१२३. साधू ऐसा चाहिये जैसा सूप सुभाय
सार-सारको गहि रहै थोथा देइ उडाय !

१२४. हंसा पयको काढि–लै छीर-नीर निरवार
ऐसे गहै जो सारको, सो जन उतरै पार.

१२५. छीररूप सत नाम है, नीररूप व्यवहार,
हंसरूप कोइ साध है ततका छाननहार

१२६. औगुनको तो ना गहै, गुनहीको लै बीन,
घट-घट मंहके मधुप–ज्यों परमातम लै चीन

## ९. सारग्रहण

१२३. साधु–हवा ज्याचें असे सुपासारखें शील
सार-सार निवडोनि जो फोलकटें उडवील.

१२४. हंस दूध काढून, करि पाणी-दूध-निवाड
'सार' ग्रहण करि यापरी, उतरे तोच पल्याड.

१२५. क्षीररूप सन्नाम नी नीररूप व्यवहार,
हंसरूप कुणि साधु तो तत्त्व निवडकरणार

१२६. अवगुण घेई ना परी गुण घेई गुंफून,
अलिसा घे प्रतिव्यक्तितुन परमात्मा निवडून.

---

## १०. समदृष्टि

१२७. समदृष्टी सतगुरु किया, मेटा भरम विकार
जहं देखौ वहं एक ही साहिबका दीदार

१२८. समदृष्टी सतगुरु किया, दीया अविचल ज्ञान,
जहं देखो तहं एक ही दूजा नाहीं आन.

१२९. समदृष्टी तब जानिये सीतल समता होय
सब जीवन की आतमा लखै एकसी सोय.

———

# १०. समदृष्टि

१२७. सद्‌गुरुने समदृष्टि दिलि नाशुन भ्रांति-विकार
जिकडे तिकडे पाहतो प्रभुचें हृदय उदार.

१२८. सद्‌गुरुने समदृष्टि दिलि, दिधलें अविचल ज्ञान,
बघतों जेथे त्यां तिथे एकच, नाहीं आन.

१२९. समदृष्टि तया ओळखा, समत्व जेव्हां राहि
'सर्वजीव एकात्म हे–' जो कोणी हें पाहि.

------

## ११. भक्ति

१३०. अर्व खर्व लौं दर्व हैं, उदय अस्त लौं राज
भक्ति महातम ना तुलै ये सब कोनै काज ?

१३१. भक्तिभाव भादों नदीं सबै चली घहराय
सरिता सोइ सराहियें—जेठ मास ठहराय.

१३२. घरिं परमेसुर पाहुणा सुनौ सनेही दास
षटरस-भोजन-भक्ति कर, चुक है न छांडे पास

१३३. जबलग भक्ति सकाम है तबलग निष्फल सेव
कह कबीर वह क्यों मिलै नि: कामी निज देव ?

१३४. जबलग नाता जगतका तबलग भक्ति न होय
ताता तोडै हरिभजै 'भक्त' कहावै सोय !

१३५. देखादेखी भक्तिका कबहुं न चढ़सी रंग
बिपति पडे यों छांडसी ज्यों केंचुली भुजंग

१३६. ज्ञान संपूरन ना भिदा, हिरदा नाहिं जुडाय,
देखादेखी भक्तिका रंग नहीं ठहराय !

१३७. जल ज्यों प्यारा माछरी, लोभी प्यारा दाम,
माता प्यारा बालका, भक्त पियारा 'नाम'

१३८. अंध भया गब डोलई यह नहिं करै विचार
हरि-भक्ती जाने बिना बूड़ि मुआ संसार.

१३९. खेत बिगार्‍यो खरतुरा, सभा बिगारी कूर,
भक्ति बिगारी लालची ज्यों केसरमें धूर.

## ११. भक्ति

११९९४

१३०. अर्व, खर्व धन; राज्यही—अस्तोदयपर्यन्त,—
भक्तिमहतिशीं ना तुले; हें सारेंच निरर्थ !

१३१. भक्तिभावनदि भादवीं वाहे येउन पूर
स्तुत्य तीच जी वाहते ज्येष्ठांतहि भरपूर

१३२. घरिं परमेश्वर पाहुणा ऐक, स्नेहीदास !
षड्रस-भोजन-भक्ति कर, सोडुं नको सहवास

१३३. निष्फळ सेवा तोंवरी जोंवरि भक्ति सकाम
कबीर कैसा तो बरें मिळेल प्रभु निष्काम ?

१३४. नातें जों जगतासवें तोंवर भक्ति न होच
नातें तोडुन हरि भजे 'भक्त' खरोखर तोच !

१३५. बाह्य दिखाऊ भक्तिचा कधीं चढेना रंग
विपत्तींत उतरे, जसा टाकी कात भुजंग

१३६. ज्ञान न भिनलें, हृदयही तन्मय झालें नाहिं
बाह्य दिखाऊ भक्तिचा रंग उडोनी जाइ !

१३७. पाणि प्रिय मासोळिला, लोभ्याला प्रिय दाम,
बाळाला प्रिय माउली, भक्ताला प्रिय 'नाम'

१३८. सकल अंधपणि डोलती हा करती न विचार
हरिभक्ति न जाणे तरी बुडे, मरे संसार.

१३९. शेत नाशिलें मूषकें, संसद नाशी श्वान,
भक्तिस नाशी लालची, केशरास रज, जाण,

१४०. लव लागी तब जानिये छूटि कभु नहिं जाय
जीव तलग लागी रहै, मूए तहंहि समाय;

१४१. लगी लगन छूटै नहीं, जीभ, चोंच जरि जाय
मीठा कहां अंगारमें जाहि चकोर चबाय ?

१४२. 'तूं-तूं' करता तूं भया तुझमें रहा समाय !
तुझमाहीं मन मिलि रहा अब कहुं अनत–न जाय !

१४३. और कर्म सब्र कर्म है भक्ति कर्म निष्कर्म
कहै कबीर पुकारकै, "भक्ति करो, तजि धर्म"

१४४. भक्ति गेंद चौकानकी भावे कोइ लै जाय
कहै कबीर, कछु भेद नहि कहा रंक, कह राय

———

१४०. जाणा, लागणि लागली, पुन्हा सुटे न कधींच
लागुन राहे, जीव जों ! मेलों तरिही तीच !!

१४१. लागलि लागणि ना–सुटे, जळो जीभ–नी चोंच
कुठे विस्तवीं गोडवा ? चकोर चघळी तोच !

१४२. 'तूं-तूं' करतां होय 'तूं' तुझ्यांत 'मी' मावून !
तुझ्यांत मिसळुन राहि मन कुठे न जाय निघून !

१४३. कर्मे-कर्मे इतर, परि भक्ति कर्म, निष्कर्म
कबीर ओरडुनी म्हणे, "कर भक्ती, त्यज धर्म"

१४४. भक्तीची चेंडू-फळी घ्या, खेळां कोणीहि
इथें राव हा, रंक तो, भेद-भाव हा नाहिं

———————

## १२. प्रेम

१४५. नैनोकी करि कोठरी, पुतली-पलंग बिछाय,
पलकोंकी चिक डारिके पियको लिया रिझाय.

१४६. अगिनिआंच सहना सुगम, सुगम खडगकी धार
नेह निभावन एकरस महा कठिन व्यवहार !

१४७. जहां प्रेम तहां नेम नहिं, तहां न बुद्धि, ब्यौहार
प्रेममगन जब मन भया कौन गिने तिथि, वार ?

१४८. दीपक, पावक आणियां, तेल भी आण्या संग
तीन्हूं मिलि करि जोइया उडि उडि पडे पतंग

१४९. सीस उतारै, भुइं धरै, तापर राखै पांव,
दास कबीरा–यों कहै, "ऐसा हो तो आव."

१५०. प्रेम न बाडी उपजै, प्रेम न हाट बिकाय,
राजा, परजा जेहिं रूचै, सीस देइ, लै जाय.

१५१. छिनहिं चढै, छिन उतरै सो तो प्रेम न होय
अघट प्रेम पिंजर बसै, प्रेम कहावै सोय.

१५२. 'प्रेम,' 'प्रेम' सब कोइ कहै प्रेम न चिन्है कोय
आठ प्रहर भीना रहै प्रेम कहावै सोय.

१५३. जब 'मैं' था तब गुरु नहीं, अब गुरू है 'हम' नाहिं
प्रेमगली अति सांकरी तामें दो न समाहिं

१५४. ज्या घट प्रेम न संचरै सो घट जान मसान
जैसे खाल लुहारकी सांस लेत बिन प्रान

## १२. प्रेम

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 32823 दि. 
9558

१४५. नयनांच्या अंत:पुरीं बिछवुन कौतुक-पलंग,
सोडुन चिकपट-पापण्या, केला प्रिय प्रिय-संग.

१४६. सुगम अग्नि-धग सोसवे, सुगम असीची धार !
स्नेह एकरसिं निभवणें, महा कठिण व्यवहार !

१४७. प्रेम, तिथें ना नेम, ना बुद्धी, ना व्यवहार
प्रेममग्न मन झालिया कोण गणी तिथि, वार ?

१४८. दीपक, पावक आणिलें, तेल आणिलें संग,
पाजळिलें मिसळुन तिन्ही झड घालीत पतंग.

१४९. 'तुडवी पायांखालती भूवर उतरुन शीर,-
असा असे कुणि तर पुढें येवो' म्हणति कबीर.

१५०. प्रेम न उगवे उपवनीं, हाटीं न विके प्रेम,
'द्या शिर-घ्या' राजा, प्रजा-सान्यांना हा नेम.

१५१. क्षणिं बसतें क्षणिं उतरतें, प्रेम न तें; भलतेंच !
वसतें अघटित पंजरीं प्रेम खरोखर तेंच !!

१५२. 'प्रेम,' 'प्रेम' म्हणती परी कुणि न जाणती चिन्ह
आठ प्रहर भिनुनी असे प्रेम तेंच अ-च्छिन्न
अ-च्छिन्न—अखंड.

१५३. 'मी' असतां—नसती गुरू; गुरु असतां—'मी' नाहिं
अरूंद आळी प्रीतिची तिच्यांत 'एक'च राहि !

१५४. प्रेमाचा संचार ना स्मशान तें वपु खास
लोहारी भाता जसा प्राणाविण घे श्वास.

१५५. प्रेम तो ऐसा कीजिये जैसा चंद-चकोर
घींच टूटि, भुइमां गिरै, चितवै वाही ओर
१५६. प्रेम छिपाया ना छिपै ज्या घट परगट होय
जो पै मुख बोलै नहीं, नैन देत है रोय.
१५७. कबिरा प्याला प्रेमका अंतर लिया लगाय
रोम-रोममें रमि रहा और अमल क्या खाय?
१५८. जलमें बसै कमोदिनी, चंदा बसै अकास
जो है जाकी भावना सो ताहीके पास !
१५९. प्रीतम को पतियां लिखूं जो कहुं होय विदेस
तनमें, मनमें, नैनमें ताको कहां संदेस ?
१६०. जो आवै सो जाय नहिं, जाय तो आवै नाहिं
अ-कथ कहानी प्रेमकी समझ लेहु मनमाहिं !
१६१. यह तत, वह तत एक है; एक प्रान, दुइ गात
अपने जियसे जानिये, मेरे जियकी बात !
१६२. यह तो घर है 'प्रेम' का, खालाका घर नाहिं
सीस उतारै, भुइ धरै तब पेठै घरमाहिं

१६३. जबलगि मरनेसे डरै तबलगि 'प्रेमी' नाहिं
बडा दूर है प्रेमघर समझु लेहु मन माहिं !
१६४. हरिसे तूं जनि हेत कर, कर हरिजनसे हेत
माल-मुलक हरि देत है, हरिजन हरिही देत.
१६५. उठा बगूला प्रेमका, तिनका उडा अकास
तिनका तिनकेसे मिला, तिनका तिनके पास !

१५५. प्रेम करावें तर जसें करिती चंद्र-चकोर
चोंच तुटे, भूवर पडे, तरिही निरखी कोर.

१५६. लिपवावें तरि ना लिपे प्रेम प्रकट परि होय
मुख जरि नाहीं बोललें, तरि ये नयनीं तोय.

१५७. प्यालों प्याला प्रीतिचा मनमुराद सोल्हास
रोमारोमांतुन रमे ती ! मग अमल कशास ?

१५८. कुमुदिनि खालीं जलिं वसे चंद्र वरीं आकाशिं
हृदयीं भावे ज्यास जो तो त्याच्या दृढ पाशिं !

१५९. प्रियतमास लिहुं पत्र कां ?-पण दूर न तद्देश !
तो देहीं, नयनीं, मनीं त्यास नको संदेश !

१६०. ना जाई आल्यावरी, गेल्यावरि ना येइ
अ-कथ कहाणी प्रीतिची मनींच जाणुन घेइ !

१६१. हें–तें एकच तत्त्व रे ! प्राण एक, तनु दोन
मनावरोनी घे तुझ्या मन माझें जाणोन !

१६२. हें गृह आहे 'प्रीति' चें, कृत्तीचें गृह नाहिं,
शिर उतरुनि जो भूवरी ठेवि–तोच गृहिं जाइ.
कृति–कातडें.

१६३. भय मृत्यूचें जोंवरी तोंवरि 'प्रेमी' नाहिं
फार दूरवर प्रेमघर–हें मनिं उमजुन राहि !

१६४. हरिशीं प्रीति न तूं करी, करी हरिजनीं प्रीति
वैभव, धन दे हरि परी हरिजन दे हरि-प्रीति

१६५. उठे वावटळ प्रीतिची तण उडले आकाशिं
तणास तण भेटे परी 'त्या' चें 'त्याच्या'पाशिं !
तण–(तृण), गवत.

१६६. सौ जो जन साजन, बसै माने हृदयमंझार !
कपटसनेही आंगनें जानु समुंदरपार !
१६७. प्रेमपियाला जो पिये–सीस–दच्छिना देय
लोभी सीस न दे सकै नाम प्रेमका लेय.

१६८. हम तुम्हरो सुमिरन करै, तुम मोहिं चितवौ नाहिं
सुमरन मनकी प्रीति है, सो–मन तुमही माहिं !
१६९. प्रीति जो लागी, धुल गई, पैठि गई मन माहिं
रोम-रोम पिउं-पिउं करै, मुखकी सरधा नाहिं.
१७०. जो जागत सो स्वप्नमें, ज्यों घटभीतर स्वांस
जो जन जाको भावता सो जन ताके पास !
१७१. पीया चाहै प्रेम रस, राखा चाहै मान
एक म्यानमें दो खडग देखा, सुना न कान

१७२. कबिरा हम, गुरु रस पिया, बाकी रही न छाक
पाका कलस कुम्हारका बहुरिन चढसी चाक !
१७३. राता माता नामका पीया प्रेम अघाय
मतवाला दीदारका मांगे मुक्ति बलाय ?

१७४. कहा भयो तन बीछुरे दूरि बसे जे वास
नैना ही अंतर परा प्रान तुम्हारे पास
१७५. नेह निभाएही बनै, सोचै बनै न आन,
तन दे, मन दे, सीस दे, नेह–न दीजै जान'
१७६. जोइ मिलै सो प्रीतिमें और मिलै सब कोय
मन सो मनसा ना मिले, देह मिले का होय ?
१७७. कसत कसौटी जो टिकै ताको शब्द सुनाय
"सोई हमरा बंस है" कह कबीर समुझाय

१६६. शत योजनिं साजण,–वसे जणुं हृदयामाझार !
कपटिस्नेही अंगणीं–समजा, सागरपार !

१३७. जो पी प्याला प्रीतिचा–शीर्ष दक्षिणा देइ
लोभी शीर्ष न दे, निरें प्रेमनाम मुखि घेइ
निरें–केवळ.

१३८. मी तुमचें करि स्मरण, तुम्ही मजशीं नाहिं पहात
स्मरण–मनाची प्रीति ! तें मन आहे तुमच्यांत !

१६९. मुरलि, प्रीति जों लागली, गेली खोल मनांत
रोम-रोम ' ' प्रिय-प्रिय ' वदे, राहे वदन निवांत.

१७०. जो जागेपणिं, स्वप्निं तो, जसा शरीरीं श्वास
ज्याला जो जन आवडे त्याला त्याचा पाश !

१७१. हवा प्यावया प्रेमरस आणि हवा अभिमान
नायकिलें, ना देखिलें दोन असींचें म्यान.

१७२. गुरुसह रस अम्हि प्राशिला, तळीं न उरला गाळ,
पक्क्या कुंभाला नको चाकाचें वेटाळ !

१७३. 'नामीं' रतलें, मातलें, प्यालें प्रेम उमाप
मतवालें मन काय हें मागिल मुक्ती–'पाप' ?
'पाप'–त्रास (या अर्थी)

१७४. काय होय तनु विलगतां ? राहे दूर निवास !
नयनिं-नयनिं अंतर पडे ! जिवास तुमचा पाश !

१७५. स्नेह निभवल्यानें निभे, तोकां चिंतनिं येइ ?
दे तनु, दे मन, शीर्ष दे पण तो जाऊं न देइ !

१७६. भेटावें तर प्रीतिनें, भेट–न प्रीतिशिवाय
मनास मन भेटे–न तर, देह भेटुनी काय ?

१७७. टिके कसावर-शब्द मी ऐकवितों त्याचेंच
कबीर सांगे " आमुचें जाणून घे कुल तेंच "

---

## १३. स्मरण

१७८. माला फेरत जुग गया, पाय न मनका फेर
करका मनका डारि दे, मनका मनका फेर !

१७९. दुखमें सुमिरन सब करै, सुखमें करै न कोइ
जो सुखमें सुमिरन करै तो दुख काहे को होय ?

१८०. माला तो करमें फिरै, जीभ फिरै मुखमाहिं,
मनवा तो चहुंदिसि फिरै यह तो सुमिरन नाहिं !

१८१. सुमिरनकी सुधि यों करै ज्यौं घागर पनिहार
हालै डोलै सुरतिमें कहै कबीर विचार.

१८२. ज्यों तिरिया पीहर बसै सुरति रहै पियमाहिं
ऐसे जन जगमें रहै हरिको भुलै नाहिं.

१८३. कबीर माला काठकी कहि समझावै तोहि,–
"मन न फिरावै आपना, कहा फिरावै मोहि ?

१८४. सुमिरन सुरत लगाइके, मुख तें कछू न बोल
बाहरके पट देइके, अन्तरके पट खोल !

१८५. सुमिरनकी सुधि यों करौ जैसे कामी काम
एक पलक बिसरै नहीं निसदिन आठों जाम.

१८६. सुमिरनसों मन लाइये जैसे नाद कुरंग
कहै कबीर बिसरै नहीं, प्रान तजै तेहि संग.

१८७. सुखमें सुमिरन ना किया, दुखमें कीया याद,
कह कबीर ता दासकी कौन सुनै फिरियाद ?

१८८. कबिरा माला मनहिकी और संसारि भेख,
माला फेरे हरि मिलै, गले रहटके देख !

## १३. स्मरण

१७८. काळ जात, जपमाळ करिं, मनिं विषयाची ओढ
माळेचे मणि फेकुनी मणी मनींचे ओढ !

१७९. दुःखीं स्मरती सर्वजण, सुखीं न स्मरती कोणि
सुखांत जर स्मरतील तर होइल दुःख कुठोनि ?

१८०. माळ फिरे हातामधीं, जीभ फिरे तोंडांत,
मन भटके चोंहिकडे नाम-स्मरण न यांत !

१८१. स्मरणीं सावध राहवें जशि पाणवठी–नार–
शिरिं घागर भरली तरी, चाले करित विचार.

१८२. स्त्री माहेरीं तरि सदा पतिस्मरणिं रत राहि
तसे जनीं जनिं राहुनी हरिला विसरूं नाहिं.

१८३. माळेचे मणि लाकडी बोधिति तुज तें हेर,–
"फेर मनाला आपुल्या, नकोत आम्हां फेर !

१८४. ध्यानमग्न स्मरणांत हो ! मुखें न कांही बोल !
सोडुन पट बाहेरले, ये ! आंतिल पट खोल !

१८५. स्मरण-शुद्धि ठेवा, जसा कामुक स्मरतो काम
विसरत नाहीं निमिषही, निशिदिनिं, आठहि याम

१८६. स्मरणीं मन लावा जसें नादीं लावि कुरंग
नच विसरे, त्यजि प्राणही, असा करी तत्संग.

१८७. नाहिं कधीं स्मरलें सुखीं ? दुःखीं काय स्मरोनि ?
गाऱ्हाणें ऐकील कां त्या दासाचें कोणि ?

१८८. माळ मनाची घालि रे ! बाह्य वेष तूं टाळि !
माळेनें हरि प्राप्त तर, रहाटही ती घालि !

१८९. कबिरा माला काठकी बहुत जतनका फेर
माला सांस–उसांसकी जामें गांठ न मेर.

१९०. कबिर छुधा है कूकरी, करत भजनमें भंग
याको टुकड़ा डारिकै सुमिरन करौ निसंग.

१९१. 'तूं–तूं' करता तूं भया, मुझमें रही न 'हूं'
वारी तेरे नामपर जित देखूं तित 'तूं'

१९२. सहजेही धुन होत है हरदम घटके माहिं
सुरत-शब्द मेला भया! मुखकी हाजत नाहिं!

१९३. तन-थिर,मन-थिर, वचनथिर,सुरत निरत थिर होय!
कह कबीर, "इस पलकको कलपन पावै कोय."

१९४. मेरा मन सुमिरै 'नाम'कूं, मेरा मन 'नाम'हिं आहि
अब मन रामहिं ह्वै रह्या! सीस नवावौं कांहि?

१९५. कबीर सूता क्या करै, उठिना रोवै दुक्ख
जाका बासा गौरमें सो क्या सोवै सुक्ख?

१९६. कबीर कह, "मैं कथि गया, कथि गए ब्रह्म, महेस
राम नांव ततसार है, सब काहू उपदेस."

———

१८९. श्वासोच्छ्वासांची तशी नच काष्ठांची माळ
जपुन जपाया ती हवी कारण ती गांठयाळ !

१९०. क्षुधा-सारमेया असे, करि भजनाचा भंग !
तुकडा तिज टाकून मग भजन करा निःसंग.

१९१. माझ्यांत न 'मी'; जाहलों 'तूं' करता 'तूं-तूं'
कुर्वंडी नांवें तुझ्या ! जिथं बघतों तिथं तूं !

१९२. श्वासोच्छ्वासीं होतसे सहज ध्वनि शरिरांत
रूप-शब्द-संमिश्रणीं मुख निःस्तब्ध मुकाट !

१९३. तनु, मन, वचन तशी सुरति स्थिर हीं तंतोतंत
कबीर बोले, "निमिष तो ये न कल्पपर्यंत !

१९४. स्मरि मम मन 'नामा'प्रती, तें 'नामा'स्तव खास
मम मन 'नाम'च जाहलें ! शिर नमवूं कोणास ?

१९५. झोपुन करिसी काय रे ? रड नच दुःखें, ऊठ;
थडग्यांत ज्याचा वास तो सुखें निजे कां ? झूठ !
थडें—थडगें.

१९६. कबीर म्हणती, "मी कथी, कथिती ब्रह्म, महेश,
'तत्त्वसार सन्नाम' हा सर्वांचा उपदेश !

## १४. विश्वास

१९७. सांई इतना दीजिये जामें कुटुंब समाय
मैं भी भूखा ना रहूँ, साधु न भूखा जाय
१९८. कबिरा क्या मै चित हूँ ? मम चिते क्या होय ?
मेरी चिंता हरि करै, चिंता मोहि न कोय !
१९९. साधु गांठि न बांधई, उदरस-माता लेय
आगे-पाछे हरि खडे जब मांगे तब देय !
२००. कर्म करीमा लिखि रहा, अब कछु लिखा न होय
मासा घटै न तिल बढै जो सिर फोडै कोय.
२०१. गाया जिन-पाया नहीं, अनगाये-तें दूरि
जिन गाया बिस्वास गहि ताके सदा हजूरि !
२०२. पौ–फाटी, पगरा भया, जागे जीवा जून
सब काहूको देत है चोंच समाता चून.
२०३. पांडर पिंजर, मन भंवर; अरथ अनुपम बास,
एक 'नाम' सिंचा, अमी फल लागा विश्वास.
२०४. पद गावै, लवलीन ह्वै, कटै न संशयफांस
सबै पछौरे थोथरा एक बिना बिस्वास !
२०५. 'भूखा-भूखा' क्या करै, कहा सुनावै लोग ?
भांडा घडि जिन मुख दिया, सोई पूरणजोग !
२०६. च्यंतामणि मनमें बसै, सोई चित्तमें आणि
बिनच्यंता च्यंता करै, इहै प्रभुकी बाणि !
२०७. जो कौ जेता निरमया, ताकौं तेता होइ
रंति घटै ना तिल बढै, जो सिर कूटै कोइ !
२०८. मीठा खाण मधूकरी, भांति-भांतिकौ नाज
दावा किसहीका नहीं, बिना बिलायत राज !

## १४. विश्वास

१९७. द्या इतकें मज ज्यांत हो कौटुंबिक चरितार्थ
मी न भुका राहीन, ना जाइल साधु क्षुधार्त.
१९८. मी कसची चिंता करूं ? मी चिंतुन हो काइ ?
हरि माझी चिंता हरी ! मला न चिंता कांहि !
१९९. साधु न पदरीं साठवी, पोटा पुरतें घेइ
उभा हरी मागें-पुढें मागे तेव्हा देई !
२००. कर्म-लेख लिहिला, न हो आतां पालट त्यांत
न्यूनाधिक तिळ हो न; जरि झाले शिरिं आघात
२०१. गाती-ते नच पावती, नच गाती-ते दूर
विश्वासें गातात जे-त्यांच्या सेवीं चूर !
२०२. फुटे तांबडें, उजळलें, उठती जीवजिवाणु
सर्वांना तो दे सदा चोंच भरी जल, अन्नु.
२०३. पिंड-पंजरीं भ्रमर मन; अनुपम अर्थ-सुवास,
'नाम' सिंचिलें, लागलें रसाळ फळ 'विश्वास'.
२०४. लीन लयीं, गाई पदें, तुटे न संशयपाश,
पाखडितां कोंडा उडे सर्व विनाविश्वास !
२०५. 'भूक-भूक' कां सांगसी लोकां लागीं व्यर्थ ?
मुख-भांडें ज्यानें दिलें भरण्या तोच समर्थ !
२०६. चिंतामणि निवसे मनीं तो तूं आठव साच
चिंतेविण चिंता करी स्वभाव प्रभुचा हाच !
२०७. ज्याला जितुकें नेमलें पावे तितुकें त्यास
घटे न लव, वाढे न तिळ, फोडो शिर सायास !
२०८. वरी मधुकरी, खावया मिळे अन्न सुग्रास,
निष्कंटक अधिराज्य जणुं विना समुद्र प्रवास !

---

# १५. विराणी (विरहिणी)

२०९. इस तनका दीवा करौं ? वाती मेल्यूं जीव ?
लोही सींचूं तेल ज्यूं ? कब मुख देखौं ? पीव !

२१०. वहुत दिननकी जोवती वाट तुम्हारी राम
जिव तरसै तुझ मिलनकूं मन नाहीं विश्राम

२११. सोओ तों सुपने मिलै, जागौ तो मनमाहिं,
लोचन राता सुधि हरी बिछुरत कबहूँ नाहिं

२१२. मांस गया, पिंजर रहा, ताकन लागे काग
साहब अजहु न आइया मन्द हमारे भाग !

२१३. हबस करै पिय मिलनकी औ सुख चाहै अंग
पीर सहै बिन पद्मिनी पूत न लेत उछंग

२१४. विरहिनि ओदी लाकडी सपचे औ धुंधुआय
छूटि पडौं–या बिरहसे जो सिगरो जरि जाय.

२१५. कबिरा वैद बुलाइया पकरिके देखि वाहि,
बैद न वेदन जानई करक करेजे माहिं !

२१६. जाहु बैद घर आपने तेरा किया न होय
जिन–या बेदन निर्मई भला करैगा सोय !

२१७. यह तन जालौं, मसि करौ, लिखौं रामका नाउ ?
लेखनि करौं करंककी ? लिखी राम पठाउँ ?

२१८. बिरहिन देय संदेसरा सुनो हमारे पीव.
जलबिन मच्छी क्यों जिये पानीमें का जीव ?

# १५. विराणी (विरहिणी)

२०९. शरिराचा करूं दीप कां? जीवाची करूं वात?
रुधिराचें करूं तेल कां? दिसेल केव्हां नाथ?

२१०. किती दिवस पाहूं तरी वाट आपुली राम?
जीव तळमळे भेटिला, मनास ना विश्राम!

२११. झोपावें– स्वप्नांत तों, जागावें– चित्तांत,
जाय न सोडुन, लोचनीं रात्या हरि दिन-रात.
रात्या–लालसर.

२१२. मांस गळे, पंजर उरे, डोकावति हे काग
अजुनि न आले 'नाथ' कां? मंद आमुचें भाग्य!

२१३. प्रिय भेटावा हौस ही! इच्छि सुखाचा संग!
प्रसववेदनेवीण कां सजे मातृ - उत्संग?

२१४. विरहिणि! ओलीं लाकडें सतत धुमसती–हाय!
मुक्त-विरह हो! ज्यामुळे सगळें जळुनी जाय!!

२१५. वैद्याला बोलाविलें हातीं नाडी पाहि,
वैद्य न जाणे वेदना, काळिजांत कळ राहि!

२१६. वैद्या! जा गृहिं, होत तूं केल्यानें न सुधार
जो निर्मी ही वेदना तोच करिल उपचार!

२१७. तनु–ही जाळुन मसि करूं? रामाचें लिहुं नाम?
अस्थींची करूं लेखणी? पत्र धाडुं का? राम!

२१८. ऐक, प्रियतमा! पाठवी विरहिणि तुज संदेश,
जळावीण कां मासळी जगे जिचा जळिं देश?

२१९. अंखियां तो झांई परी पंथ निहार निहार,
जीहडिया छाला परा नाम पुकार पुकार.

२२०. नैनन तो झरि लागिया रहट बहै निसु बास,
पपिहा ज्यों 'पिउ-पिउ' रटै पिया मिलनकी आस.

२२१. विरह भुवंगम तन डसा मंत्र न लागै कोय,–
नामवियोगी ना जिये, जिये तो बाउर होय !

२२२. बिरहभुवंगम पैठि कै किया कलेजे घाव,
बिरही अंगन मोडि हैं, ज्यौं भावें त्यौं खाव !

२२३. कै बिरहिनिको मीच दे, कै आपा दिखलाय,
आठपहरका दाझना मो पै सहा न जाय !

२२४. विरह–कमंडल कर लिये बैरागी दो नैन-
मांगे दरस मधूकरी, छकै रहै दिन रैन !

२२५. 'विरहा-विरहा' मत कहो, विरहा है सुलतान
जा घट विरह न संचरै सो घट जान मसान !

२२६. देखत देखत दिन गया, निस भी देखत जाय,
बिरहिन पिय पावै नहीं, केवल जिय घबराय.

२२७. बिरहिनि उठि उठि भुइं परै दरसनकारन राम !
मूए पीछे देहुगे सो दरसन केहि काम ?

२२८. "मूए पीछे मत मिलौ",–कहै कबीरा, "राम",
लोहा-माटी मिलि गये तब पारस केहि काम ?

२२९. सब रग तांत, रबाब तन, बिरह बजावै नित्त,
और न कोई सुनि सकै कै सांई–के चित्त.

२३०. तूं मति जानै बीसरूं, प्रीति घटै मम चित्त.
मरूं तो तुम सुमिरत मरूं, जिऊं तो सुमिरू नित्त.

२१९. डोळ्यांना पडल्या वळ्या पथ पाहुन पाहून,
आले फोड जिभेवरी तुज वाहुन वाहून.
२२०. डोळ्यांना झड लागली वाहे निशिदिनिं नीर,
'प्रिय-प्रिय' घोके चातकी प्रिय-भेटीस अधीर.
२२१. विरहसर्प शरिरीं डसे मंत्रें येत न गूण,
नामवियोगी नच जगे, जगे वेड लागून !
२२२. विरहभुजंगम धाडुनी केला काळिजि घाय,
विरहीं तनु न चळे-वळे, जें भावें तें खाय !
२२३. दे विरहिणिला मरण या वा दाखव अपुलीक,
आठ प्रहर हा दाह मज सहन न होय बरीक !
२२४. विरह–कमंडलु धरूनि करिं नेत्र विरागी दोन-
दर्शन–मधुकरि मागती, रात्रंदिन भटकोन !
२२५. 'विरह-विरह' बोलूं नका, विरह असे सुलतान
विरह जयांत न संचरे जणु तो देह स्मशान !
२२६. बघतां बघतां दिन ढळे, बघतां निशिही जाय,
विरहिणिला पावे न प्रिय, जीव घाबरे-हाय !
२२७. दर्शनार्थ विरहिणि उठे,-पडे पुन्हा भुइं, राम !
मेल्यावर जर याल तर, काय बरें मग काम ?
२२८. "मेल्यावर भेटूं नका"–कबीर बोले, "राम !"
लोह मिळाल्या मातिला नच परिसाचें काम !
२२९. तनु-रबाब, तांती-शिरा, 'विरह' वाजवी नित्य,
कोणास न ये ऐकुं; पण प्रभुचें सावध चित्त.
२३०. तूं न समज 'विसरेन मी,' उणावेल वा प्रीति,
मरेन अथवा जगेन मी तुज स्मरतांना चित्तिं,

२३१. 'पिय'बिन जिय तरसत रहै, पल-पल बिरह सताय;
रैन-दिवस मोहिं कल नहीं, सिसक-सिसक जिय जाय.

२३२. सांई सेवत जल गई, मांस न रहिया देह,
सांई जब लगि सेइ हों यह तन होय न खेह;

२३३. परबत-परवत मैं फिरी, नैन गंवायो रोय,
सो बूटी पायो नहीं जातें जीवन होय.

२३४. हिरदे भीतर दव बलै, धुआं न परगट होय,
जाके लागी सो लखै की जिन लाई सोय.

२३५. बहुत दिननकी जोवती, रटत तुम्हारो नाम,
जिव तरसै तुव मिलनको, मन नाहीं विश्राम.

२३६. विरहा आया दरसको, कड़ुवा लागा काम,
काया लागी काल हो, मीठा लागा नाम,

२३७. अंखिया प्रेम बसाइया जनि जाने दुखदाय
नामसनेही कारने रो रो रात बिताय.

२३८. विरहबान जेहि लागिया औषध लगत न ताहिं
सुसुकि सुसुकि मरि मरि जियै, उठै कराहि सराहि!

२३९. ज्यों जन विरही 'नाम' के सदा मगन मनमाहिं
ज्यों दरपनकी सुंदरी किनहूं पकडी नाहिं !

२४०. सबहो तरूतर जाइकै सब फल लीन्हो चीख
फिरफिर मांगत कबिर है दर्शन की ही भीख.

२४१. चकई बिछुरी रैनकी आय मिली परभात,
सत्तगुरुसे जो बीछुरे मिले दिवस नहि रात

२३१. जीव झुरे 'ना था' विना, सतत विरह दे त्रास,
निशि-वासरि मज ना गमे, जीव वघे जायास.

२३२. जळल्यें स्वामीसेवनीं, देहीं मांस न राहि,
सेविन जोंवर जाहली, धूळ तयाची नाहिं;

२३३. शैलीं-शैलीं भटकल्यें, रडुन दवडली दीठि,
पण देजी संजीवनी ती न गवसली बूटि.

दीठि–दृष्टि, डोळे; बूटि–औपधी मूळ, जडीवूटी.

२३४. हृदयिं दवाग्नी भडकला, धूर न होई व्यक्त,
आग लागली,-लाविली तेच लक्षिती फक्त.

२३५. वाट पाहत्यें, घोकत्यें बहुत दिवस तव नाम
जीव झुरे तुज भेटण्या, नसे मना विश्राम.

२३६. विरह पातला दर्शना, कडू जाहला काम,
काळ शरीरीं लागला, गोड वाटलें नाम.

२३७. 'दु:खद प्रेम'-न उमगलें, तें वसलें नेत्रांत,
नामस्नेह्याकारणीं रडुन काढली रात्र.

२३८. विरहबाण ज्या लागला औषध नलगे त्यास
मरे उसासे सोडुनी! जिवे, उठे, घे श्वास!

२३९. 'नामा' चे विरही सदा मनीं आपुल्या मग्न
दर्पणांतली सुंदरी हो न कुणासह लग्न!

२४०. सकल तरूतळीं चाखलें सर्व फळांचें सार
दर्शनभिक्षा मागतों कबीर वारंवार.

२४१. चुकली चकवी रातिची भेटे फिरूनि प्रभातिं,
गुरूपासुन दूरावल्या भेटि न दिनिं वा रातिं.

टीप:–दूरावल्या (नरास)

२४२. बिरहअगिन तन, मन जला लागि रहा तत जीव,
कै वा जाने बिरहिनी, कैं वा जाने पींव !

२४३. बिरहकुल्हारी तन बहै घाव न बांधै, रोह
मरनेका संशय नहिं, छूटि गया भ्रम, मोह.

२४४. जबहूं मार्‍या खैंच करि, तब मैं पाई जाणि
लागी चोट मरम्मकी, गई कलेजा छांणि !

२४५. बिरहिन ऊभी पंथसिरि, पंथी बूझै धाइ;–
"एक सबद कथि पीवका, कबरे मिलैंगे आइ ?"

२४६. 'नाम' वियोगी, बिकल तनु–इन दुखवौ मति कोय
छूवतही मरि जायंगे, तालाबेली होय.

———

२४२. विरहाग्निंत तनु, मन जळे; जिवास त्याची आंच
प्रियास ती ठाऊक वा ठावी विरहिणिलाच !

२४३. विरह कुठारीने स्रवे घाव–न रोध, न बंध.
मरणाचा संशय फिटे, सुटे मोह, भ्रम फंद.

२४४. कळल्यें,– मजवर हो यदा खेचुनिया भडिमार
मर्मावर आघात हो, काळिज चिरलें पार !

२४५. वाटसरा पुशि विरहिणी उभि वाटेवर थेट;–
"एक प्रियाचा शब्द कथि, केव्हां देतिल भेट ?"

२४६. नामवियोगी, विकलतनु–दुखवुंनका यांलागिं
स्पर्शतांच मरतील; हो तळमळ तळमळ आगि !

---

## १६. सूक्ष्म मार्ग

२४७. बाट बिचारी क्या करै चलै पथी न सुधार ?
राह आपनी छांडिकै चलै उजार उजार !

२४८. मरिये तो मरि जाइये छूटि परै जंजार
ऐसा मरना को मरै दिनमें सो सो बार ?

२४९. उततें कोइ न बाहुरा जासे बूझूं धाय
इततें सबही जात है भार लदाय लदाय.

२५०. यार बुलावै भावसों मो पै गया न जाय
धन मैली, पिउ ऊजला, लागुं न सक्कूं पाय.

२५१. नांव न जानै गांवका बिन जातै कित जाव ?
चलता चलता जुग भया, पाव कोसपर गांव !

२५२. 'चलन-चलन 'सब कोइ कहै मोहिं अंदेसा और !
साहबसों परिचय नहीं, पहुचेंगे केहि ठौर ?

२५३. जहां न चींटी चढि सकै, राई ना ठहराय,
मनुवा तंह लै राखिये तहईं पहुंचे जाय.

२५४. सुर—नुर थाके मुनिजनां, जहां न कोई जाइ
मोटे भाग कबीरके, तहां रहे घर छाइ !

# १६. सूक्ष्म मार्ग

२४७. दोष काय वाटेकडे ? पथिक न चाले नीट !
पथ सोडुन रानींवनीं भटके तोंये वीट !

२४८. मरण मरावें तर असें झणिं जंजाळ तुटेल
काय बरें मरणें तरी दिवसां शंभर वेळ ?

२४९. तिथें दिसे ना कोणिही जो सांगेल विचार,
येथुन सारे चालले लादुन लादुन भार.

२५०. भावें बोलावी सखा मज ना जाणें होय
प्रिय सोज्ज्वल, मी मलिन अति, पाय धरूं ? ना सोय !

२५१. गांवनांव ठावे न, ना जायाचाही ठाव,
युगें लोटलीं चालतां, पाव कोस जरि गांव !

२५२. 'चला-चला' म्हणती सकल परि मज शंका राहि !
ओळख स्वामीशीं नसे ! पोंचूं कवण्या ठायिं !

२५३. जिथे न मुंगी चढुं शके वा न मोहरी राहि,
जपुन तिथे मनुजास-ने, रक्षी विविधोपायि !

२५४. थकले सुर, नर आणि मुनि जिथें न कोणी जाइ
भाग्य कबीराचें महा तिथें करूनि गृह राहि !

टीप–( निर्विकल्प समाधीची सहज शून्य अवस्था. )

## १७. पारखी

२५५. चंदन गया बिदेसडे सब कोइ कहै पलास
ज्यों ज्यों चुल्हे झोकियाँ त्यों त्यों अधिकी बास.

२५६. हीरा तहा न खोलिए जह खोटी है हाट,
कसकरि बांधो गांठरी, उठकर चालो वाट

२५७. हीरा पाया परखिके घनमें दीया आन
चोट सही, फूटा नहीं तव पाई पहिचान !

२५८. ज्ञानरतनकी कोठरी चुप करि दीन्हों ताल,–
पारखि आगे खोलिये; कुंजी-वचन रसाल !

२५९. 'नगपखान जग सकल है' लखि आवै सब कोइ !
नग–ते उत्तम पारखी जगमें बिरला कोइ !

२६०. जो हंसा मोती चुगै, कांकर क्यों पतियाय ?
कांकर माथा ना नवै, मोती मिलै तो खाय !

२६१. हसा, बगुला एकसा मानसरोवर माहिं
वगा ढंढोरे माछरी, हंसा मोती खाहि.

२६२. एक अचंभो देखियो हीरा हाट बिकाय
परखन हारा बाहिरी, कोडी बदले जाय !

२६३. कलि खोटा, जग आंधरा, शब्द न मानै कोइ
जाहि कहौ हित आपना, सौं उठि बैरी होइ !

२६४. नामरतन धन पाइकै, गाँठि बाँधि, ना खोल
नाहिं पटन, नहिं पारखी, नहिं गाहक, नहिं मोल.

...ली ग्रंथ संग्रहालय, ठाणे. अनुक्रमांक 32823 दि. ... क्रमांक 2446 नों. दि. ...

## १७. पारखी

२५५. 'चंदन' देशांतर करी म्हणती सर्व पलाश
जों जों झोका चुलित तें तों तों अधिक सुवास.

२५६. हिरा न तेथें उलगडा जेथें खोटा हाट
कसून वांधा बोचकें, उठा नि चाला वाट.

२५७. हिरा पारखुन, ऐरणीं नीट दिला ठेवून,
घणाघातिं फुटला न, त्या वेळीं पटली खूण !

२५८. गुपचुप कुलुपीं बंद कर ज्ञान-रत्न-भांडार,
उघड पारख्याच्या पुढें; किल्ली-वचन रसाळ !

२५९. सकल जगत नग-पारखी, सकल पारखुन पाहि
बरा नगाहुन पारखी–पण तो विरला राहि !

२६०. मोत्यें चघळी हंस तो गिळील कंकर काय ?
कंकरांस नमवी न शिर, मोत्यें मिळतां खाय !

कंकर–लहान लहान खडे; उपल.

२६१. एक सारखे हंस, बक मानससरसीं, पाहि,
बक धुंडाळी मासळ्या, हंस मौक्तिकें खाइ.

२६२. एक अचंभा देखिला विके हिरा बाजारिं
वरपंगीचा पारखी, कवडीमोलावारि !

२६३. खोटा कलि, जग आंधळें, शब्द न मानी कोणि,
सांगावें हित ज्यास तो उठे वैरि होवोनि !

२६४. नामरत्नधन पावतां, बांध गांठ, ना खोल,
ना पट्टण, ना पारखी, ना ग्राहक, ना मोल.

ना खोल–उघडूं नकोस.

२६५. अमृत केरी पूरिया बहुबिधि लीन्हे छोरि
आपसरीखा जो मिलै, तांहि पिआऊं घोरि.

२६६. काजरकी ही कोठरी, काजरहीका कोट,
तौ भी कारी ना भई रहि जों ओटहि ओट !

२६७. हरिहीरा, जन जौहरी, सबन पसारी हाट,
जब आये जन जौहरी, तब हीरोंकी सांट.

२६८. हीरा परा बजारमें रहा छार लपटाय,
बहुतक मूरख चलि गये ! पारखि लिया उठाय !

२६९. बलिहारी तिहि पुरूषकी परचित परखनहार
सांई दीन्हो खांडको, खारी बूझ गंवार.

२७०. पारस रूपी जीव है, लोहरूप संसार,
पारस ते पारस भया, परख भया टकसार.

२७१. हीरा वही सराहिये सहै घननकी चोट
कपट कुरंगी मानवा परखत निकसा खोट.

------

२६५. बहुविध अमृताच्या पुड्या वेंचियल्या निवडून
मिळेल जर मजसारखा, तर पाजिन घोळून.

२६६. काळी काजळकोठडी, काळा काजळकोट
तरी न काळी जाहली, जी ओटींत सचोट !
सचोट–खरी; जातिवंत. ‘जी’–‘हिरकणी’.

२६७. जवाहिरे जन, हीर हरि, हाट खुला सर्वांस
जवाहिरे जमतील जन, तदा हिऱ्यांची रास.

२६८. क्षारीं लडबडला पडे खरा हिरा हाटांत
मूर्ख चालले ! पारखी उचलुन ने हातांत !

२६९. परचित्तातें पारखी धन्य पुरूष तो धन्य !
साखर दिधली ईश्वरें, मीठ गणी तिज वन्य.
वन्य–रानवट; गांवढळ.

२७०. परिसरूप हा जीव, हा लोहरुप संसार,
टंकसाळ हा पारखी, परिस–परिस उरणार !

२७१. तोच प्रशंसावा हिरा सोशि घणाचे घाव
खोटा-नाटा करणिचा नको तयाचें नांव !

———

## १८. जिज्ञासु

२७२. जिन खोजा तिन पाइयां गहरे पानी पैठ
मैं बपुरा बूडन ड़रा रहा किनारे बैठ

२७३. सुखिया सब संसार है खावै औ सोवै
दुखिया दास कबीर है जागै औ रोवै

२७४. ऐसा कोऊ ना मिला हमको दे उपदेस
भवसागरमें डूबता कर गहि काढै केस

२७५. एक समाना सकलमें, सकल समाना ताहिं
कबिर समाना बूझमें तहां दूसरा नाहिं.

२७६. हेरत हेरत हेरिया रहा कबीर हिराय
बुंद समानी समुंदमें सो कित हेरी जाय ?

२७७. सर्पहि दूध पिलाइये सोई विष ह्वै, जाय
ऐसा कोई ना मिला आपेही विष खाय.

२७८. जैसा ढूंढत मैं फिरा तैसा मिला न कोय
ततवेता तिरगुनरहित निरगुनसे रत होय.

२७९. ऐसा कोई ना मिला जासे रहिये लाग
सब जग जलता देखिया अपनी-अपनी आग.

---

## १८. जिज्ञासु

२७२. शोधियलें त्या पावलें गहर्नि बुड्या मारुन
मी बुडुं भ्यालों बापुडा बसलों तीरिं अडून

२७३. जेवे आणि निजे, असे सुखी सर्व संसार
जागे आणि रडे, असे कबीर दुःखी फार.

२७४. असा न कोणी भेटला करील जो उपदेश
बुडतांना भवसागरीं काढिल धरुनी केस.

२७५. सकालांतर्गत 'एक' तें आणि 'सकल' एकांत
ज्ञानिं कबिर सामावला, नाहिं दुजा मग त्यांत.

२७६. हेरत हेरत हेरितां कबीर हेरत राहि
सिंधुंत बिंदू मावला दिसेल मग तो काइ ?

२७७. सापाला दुध पाजतां तें विष होउन जाय
असा न कोणी भेटला स्वयेंच जो विष खाय.

२७८. धुंडत मी हिंडे जसा, तसा न भेटे कोणि
त्रिगुणरहित तत्त्वज्ञ जो रत निर्गुणिं होवोनि.
टीप,–जसा (म्ह.) ज्या प्रकारचा मनुष्य.

२७९. असा न कोणी ज्याचिया लागावें मी लागिं,
जळतांना जग देखिलें आपआपुल्या आगिं.

---

## १९. द्विधा स्थिति

२८०. पढ़ा, गुना, सीखा सभी मिटा न संसयसूल
कह कबीर कासों कहूँ यह सब दुखको मूल ?

२८१. सत्तनाम कड़ुवा लगै, मीठा लागै दाम
दुविधामें दोऊ गये माया मिली न राम

२८२. हिरदेमाहीं आरसी मुख देखा नहि जाय
मुख तो तबही देखई दुबिधा दैह बहाय

२८३. चींटी चावल लै चली, बिचमें मिल गइ दार
कह कबीर दोउ ना मिलै, एक ले, दुजी डार

---

## १९. द्विधा स्थिति

२८०. पढे, शिके, वाढे तरी मिटे न संशयशूल
पुशी कबीर कथूं कुणा हें दु:खाचें मूळ ?

२८१. सत्यनाम कडवें गमे, गोड वाटती दाम
उभय द्विधेंतच लोपले माया आणिक राम

२८२. हृदयामाजीं आरसा देखतां न मुख येइ
दिसूं शके तेव्हांच मुख यदा न द्विविधा देहिं

२८३. मुंगी तांदुळ घे, निघे, मधीं मिळाली डाळ
दोन्हि न मिळती, एक घे आणिक दुसरें टाळ.

## २०. उच्चार आणि आचार

२८४. कथनी मीठी खांडसी, करनी विषकी लोय,
कथनी तजि करनी करै, विषसे अमृत होय !

२८५. पानी मिलै न आपको, और न बकसत छीर
आपन मन निश्चल नहीं और बंधावत धीर

२८६. लाया 'साखि' बनाय करि इतउत अच्छर काट
कह कबीर कबलग जिये झूठी पत्तल चाट ?

२८७. कथनी, वदनी छांड़िकै, करनीसौं चित लाय,
नरहि नीर प्याये बिना कबहूँ प्यास न जाय.

२८८. करनीबिन कथनी कथै अज्ञानी दिनरात
कूकर ज्यों भुंकत फिरै; सुनी सुनाई बात.

२८९. कथनी थोथी जगतमें, करनी उत्तम सार,
कह कबीर करनी सबल उतरै भौजल पार.

२९०. पद जोरे, साखी कहै, साधन परि गइ रौस,
काढा जल पिबै नहीं, काढि पिबनकी हौस.

२९१. श्रोता तो घरहीं नहीं, वक्ता वदै सो बाद
श्रोता, वक्ता एक घर तब कथनी को स्वाद.

२९२. साखी कहै, गहै नहीं, चाल चली नहिं जाय,
सलिलमोहनदिया बहै पांव नहीं ठहराय.

२९३. मारग चलते जो गिरे, ताको नाहीं दोस
कह कबीर, बैठा रहै ता सिर करडो कोस.

## २०. उच्चार आणि आचार

२८४. बोल-सुकर खडिसाखरी, करणि कठिण विषधार
बोल त्यजुन, करि करणि तर, विष संजीवनसार!

२८५. पाणि स्वतांला ना मिळे, अर्पी इतरां खीर,
स्वीय चित्त अविचल नसे ! इतरांना दे धीर !

२८६. रचि 'साक्या' करि अक्षरीं इथं तिथं छाटाछाट
जगेल कोठवरी असा चाटुन उष्टें ताट ?

२८७. कथणें, वदणें टाक ! मनिं करणी करणें आण !
नरें नीर प्याल्याविना कधीं न जाय तहान.

२८८. करणिविना कथणें कथी अज्ञानी दिनरात
श्वान जसें भुंकत सुटे; पुन्हा तीच ती मात.

२८९. कथणें खोटें या जगीं, करणें उत्तम 'सार'
कबीर, "करणें सबल तें उतरी भवजलिपार !"

२९०. जुळवि पदें, साकी म्हणे, पण हो साधनरोष
काढलें न पी, काढुनी जल प्यायाचा तोष.

२९१. श्रोता नच ठायीं, वदे वक्ता शत संवाद.
श्रोता, वक्ता एक स्थळि, तरच रसाचा स्वाद.

२९२. साकि म्हणे, करि ग्रहण ना, चालवलें नच जाय,
मोहनदीचें वाहतें पाणी, न ठरे पाय.

२९३. मार्ग चालतां जो पडे नाहीं त्याचा दोष
बसुन राहिल्याच्या पुढे मात्र करोडो कोस

२९४. कहता तो बहुता मिला, गहता मिला न कोइ,
सौ कहता बहि जान दै जो गहता नहिं होइ.

२९५. एक एक निरवारिया जो निरवारी जाय,
दुइ दुइ मुखका बोलना घने तमाचा खाय.

२९६. मुखकी मीठी जो कहै, हृदया है मति आन,
कह कबीर तेहिं लोग सों रामौ बडे सियान.

२९७. जस कथनी, तस करनि यौ; जस चुंबक तस नाम
कह कबीर, चुंबक बिना क्यों छूटे संग्राम ?

२९८. दीठा है तो कस कहूँ ? कहूँ तो को पतियाय ?
सांई जस तैसा रहौ, हरखि हरखि गुन गाय !

२९४. वावदूक बहु, भेटले पण ना ग्राहक कोणी
वावदूक दे वाहुं जो ना ग्राहक आंतोनि
आंतोनि–मन:पूर्वक;

२९५. एक एक जर निवटलें, तरच निवटलें जाय,
जो बोले दोतोंडि तो असंख्य थपडा खाय.

२९६. गोड बोल जे बोलती परि अंतर्मति अन्य,
कबीर त्या लोकाहुनी राम धन्य ! अति धन्य!!

२९७. वाणि जशी करणी तशी; चुंबक तैसें नाम,
कसा चुंबकावाचुनी थांबावा संग्राम ?

२९८. दिसला सांगुं कसें ? कुणी ठेविल कां विश्वास ?
स्वामि जसा राहो तसा, गुण गाइन सोल्हास !

———

## २१. सहज भाव

२९९. सहज मिलै सो दूधसम, मांगा मिलै सो पानि
कह कबीर वह रक्तसम जामें एंचातानि
३००. जो कछु आवै सहजमें सोई मीठा जान,
कड़ुवा लागै नीमसा जामें ऐंचातान.
३०१. सहजै सहजै सब गया सुत, बित, कामिनी, काम,
एकमेक ह्वै मिलि रहा दास कबीरा नाम.
३०२. सहज सहज सब कोउ कहै सहज न चिन्है कोय
जा सहजै साहब मिलै सहज कहावै सोय !

---

## २२. मौन भाव

३०३. भारि कहूँ तो बहु डरूं, हलका कहूं तो झीठ
मैं क्या जानूं पीवको नैना कछू न दीठ.
३०४. बादबिवादे बिष घना, बोले बहुत उपाधि,
मौन गहै, सबकी सहै, सुमिरै नाम अगाधि.

३०५. जो देखे सो कहै नहीं, कहै सो देखे नाहिं,
सुने सो समझावै नहीं, रसना दृग, श्रुति नाहिं.

---

## २१. सहज भाव

२९९. प्राप्त सहज, तें दूधसें ! याचित, वारिसमान !
तें रक्तासम जें मिळे होउन ओढाताण !

३००. सहजासहजीं साध्य जें तेंच गोडसें जाण,
कडु लागे निंबापरी जयांत ओढाताण.

३०१. सहजच गेलें सकल—सुत, वित्त, कामिनी, काम
कबीरदासाला मिळे एकमेव तें 'नाम'.

३०२. 'सहज' म्हणति तच्चिन्ह परि जाणें एकादेंच
सहजपणीं ज्या पावतो प्रभू, सहजपण तेंच !

---

## २२. मौन भाव

३०३. 'भारी' म्हणुं तर भीति अति, म्हणुं 'हलका' नच इष्ट.
प्रियतमास मी नोळखी, तो नयनांस अदृष्ट.

३०४. वादविवादीं विष बहू, वचनीं बहुत बियाद
सगळ्यांचें सहि, मौन धरि, घेई 'नाम' अगाध.
बियाद (व्याद)—त्रास; उपाधि; सहि—सहन करणें;

३०५. देखिलें, न कथवें; न ये बघतां, कथिलें कांहिं;
ऐकिलें, न ये बुझवतां; जिभेस दृग, श्रुति नाहिं!
बुझवणें—समजावून सांगणें.

---

## २३. जीवन्मृत

जीवन्मृत–(म्ह०) उदासीन किंवा तटस्थ.

३०६. मैं मरजीव समुद्रका डुबकी मारी एक
मूठी लाया ज्ञानकी जामें वस्तु अनेक.

३०७. जा मरनेसे जग डरै, मेरे मन आनंद!
कब मरि है? कब पाइ हौ? पूरन परमानंद!

३०८. घर जारै, घर ऊबरै; घर राखै; घर जाय;
एक अचंभा देखिया मुआ कालको खाय!

३०९. मरते मरते जग मुआ औरहि मुआ न कोय
दास कबीरा यों मुआ बहुरिन मरना होय.

३१०. खरी कसौटी 'नाम'की खोटा टिकै न कोय
'नाम'कसौटीसो टिकै 'जीवन मिरतक' होय.

३११. रोडा भया तो क्या भया? पंथीको दुख देय!
साधु ऐसा चाहिये ज्यों पैंडेकी खेह.

३१२. खेह भई तो क्या भया? उडि उडि लागै अंग!
साधू ऐसा चाहिये जैसा नीर निपंग!

३१३. नीर भया तो क्या भया? ताता सीरा जोय!
साधु ऐसा चाहिये जो हरि जैसा होय!

३१४. हरी भया तो क्या भया? करता हरता होय!
साधू ऐसा चाहिये हरिभज निरमल होय!

## २३. जीवन्मृत

३०६. मी जीवन्मृत अब्धिचा बुडी मारली एक
ज्ञानाची भरली मुठी वस्तु तींत अनेक.

३०७. ज्या मरणाला जगत भी, मज त्याचा आनंद!
मरेन कधि? पावे न कधि पूर्णपरमआनंद?

३०८. घर उजळें, घर जाळितां, राखणकरितां, जाय,
नवल देखिलें एक कीं मृत काळाला खाय!

३०९. मरतां मरतां जग मरें. 'मरण' न जाणे कोणि!
'मरण' खरोखर तेंच जें पुन्हां न ये परतोनि!

३१०. 'नाम' कसोटीवर शके टिकूं न खोटा एक
'नाम' कसोटीवर टिके तो 'जीवन्मृत' देख!
टीप:–'जीवन्मृत'–जिवंत असतांना जो संसाराविषयीं मृतकवत् असतो. म्हणजे उदास वृत्तीचा.

३११. धोंड न हो वाटेंत जो वाटसरूचा शूळ!
साधु असावा तर असा जशि पायींची धूळ!

३१२. काय धूळ होऊन हो? उडुनी मळवी अंग!
साधु असावा तर असा नीर जसें निःसंग!

३१३. काय नीर होऊन हो! शीत कधीं, कधि ऊन,
साधु असावा तर असा जैसा हरि संपूर्ण!

३१४. काय 'हरी' होऊन? जो करता, हरता होइ
साधु असावा, जो हरीभजनीं, निर्मल होइ.

३१५. निरमल भया तो क्या भया ? निरमल मांगे ठौर
मलनिरमलसे रहित है ते साधू कुइ और !

३१६. ढारस लखु मरजीवको धंसिकै पैठि पताल
जीव अटक मानै नहीं गहि लै निकस्यो लाल.

३१७. डुबकी मारि समुंदमें निकसा जाय अकास
गगनमंडलमें घर किया, हीरा पाया दास.

३१८. हरिहीरा क्यौं पाइ हैं जिन जीनेकी आस ?
गुरु दरियासौं काढसी कुइ मरजीवा दास !

३१९. कबिरा चेरा संतका, दासनिका परदास
कबीर ऐसे ह्वै रह्या, ज्यूं पाऊंतलि घास.

३२०. वैद मुवा, रोगी मुवा, मुवा सकल संसार,
एक कबीरा ना मुवा, जिनके राम अधार.

३२१. आपा मेल्यां हरि मिलै, हरि मेल्यां सब जाइ
अकथ कहानी प्रेमकी कह्या न को पत्याइ ?

---

## २४. मध्यपथ

३२२. अतिका भला न बोलना, अतिकी भली न चूप,
अतिका भला न बरसना, अतिकी भली न धूप

३२३. भजूं तो को है भजनको ? तजूं तो को है आन ?
भजनतजनके मध्यमें सो कबीर मनमान !

३२४. 'पाया' कहै ते बावरे, 'खोया' कहै ते कूर
पाया, खोया कछु नहीं ज्यों का त्यों भरपूर.

---

३१५. निर्मल होउन काय हो ? निर्मल मागे ठाय !
जो मलनिर्मलरहित तो साधु न दुर्मिळ काय ?

३१६. धाडस जीवन्मृतिं पहा ! जाय धसुनि पातालिं
जीव-अटक तो मानि ना ! तेथुन आणी 'लाल'!
लाल—रत्नविशेष.

३१७. बुडी समुद्रीं मारुनी, जाइ, गांठि आकाश
गगनमंडलीं गृह करी, हीरक पावे 'दास'.

३१८. हरि हीरक पावेल कां ज्यास जिण्याची आस ?
काढि समुद्रांतुन गुरू कुणि जीवन्मृत दास !

३१९. संतांचा चेला असे, मी दासांचा दास,
असा होउनी राहिलों जसा पायदळि घास.

३२०. वैद्य मरे, रोगी मरे, मरे सकल संसार,
कबीर केवल ना मरे राम जया आधार.

३२१. गर्व गळे तर हरि मिळे, हरिवाचुन तोषीस
अकथ कहाणी प्रीतिची हवा प्रत्ययच तीस !

---

## २४. मध्यपथ

३२२. भलें न अतिशय बोलणें, भलें न अतिशय मौन,
भलें न अतिशय वरसणें, भलें न अतिशय ऊन

३२३. भजुं, तर कोणाला भजूं ? त्यजूं कोण तर आन ?
भजन, त्याग यांच्यांत जें, तेंच मनें तूं मान !

३२४. 'पावे' म्हणती बावळे, 'हरपे' म्हणती भ्याड,
नापावे, ना हारपे तसाच तो भर-पाड.
भरपाड—भरून त्या पलिकडे;

---

## ३५. शूर

३२५. सिर राखै, सिर जात है, सिर काटै, सिर सोय
जैसे बाती दीपकी कटि उजियारा होय.

३२६. सूरा नाम धराइके अबका डर पै बीर
मंडि रहना मैदानमें सन्मुख सहना तीर

३२७ कायर बहुत पमावहीं, बहिकत बोलै सूर
काम पडैही जानिये, किसके मुखपर नूर.

३२८. सूरा तबही परखिये, लडै धनीके हेत
पुरिजा पुरिजा कटि पडै, तऊं न छांडै खेत

३२९. सूरा सोइ सराहिये अंग न पहिरै लोह,
जूझै सब बंद खोलिकै, छांडै तनका मोह.

३३०. गगन दमामा बाजिया, पडत निसाने घाव,
खेत पुकारै शूरमा अब लडनेका दाव !

३३१. खेत न छांडै सूरमा, जूझै दो दलमाहिं
आसा जीवनमरनकी मनमें आनै नाहिं.

३३२. अब तो जूझै ही बनै, मुड चाले, घर दूर !
सिर साहबको सौंपते सोच न कीजै शूर !

३३३. जो हारो तों, सेव गुरु; जो जींतो तों दाव
सत्तनामसे खेलता जो सिर जाव तो जाव.

## ३५. शूर

३२५. शिर जातें, शिर राखतां ! शिर देतां, शिर राहि !
वात दिव्याची कापतां उजेड हो दिशि दाहि !

३२६. 'शूर' नाम धरिल्यावरी मग कुठलें भय ? वीर !
उभा रहा रणि ठाकुनी, झेल छातिवर तीर.

३२७. कातर अतिशय वडबडे, बहुकुन न वदे शूर,
काम पडे तेव्हां कळे मुखि कुणाच्या नूर

३२८. शूर पारखावा यदा अर्पि धन्यास्तव प्राण
गात्र गात्र तुटुनी पडे, तरि न सोडि मैदान.

३२९. शूर स्तवावा तोच जो चिलखत घालत नाहिं,
अनिर्बंध घे झुंज जो, तनुच्या मोहिं न राहि.

३३०. गर्गनिं दमामे वाजती, पडे निशाणीं घाव,
पाचारीं शूरास रण 'अजि जुंझाचा डाव!'

३३१. शूर रणांगण सोडिना, जुंझे दोन दळांत
जीवन-मरणाची नसे पर्वा, मन निभ्रांत !

३३२. जुंझच आतां पाहिजे ! –माघारूं ? घर दूर !
शिर सोंपी निज स्वामिला, शोक करीना शूर !

३३३. हारलास तर, सेव गुरु;–जिकलास तर, डाव–
खेळ सत्यनामासवें; गेलें शिर तर, 'जाव'.

'जाव'–( जाऊं दे ).

३३४. खोजीको डर बहुत है पलपल पडे बिजोग
प्रन राखत जो तन गिरै सो तन साहबजोग.

३३५. तीर, तुपकसे जो लडै सो तो सूर न होय
माया तजि, भक्ति करै, सूर कहावै सोय.

३३६. जेते तारे रैणिके, ते ते बैरी मुज्झ
धड़ सूली सिर कंगुरै, तऊं न बिसरों तुज्झ.

३३७. हौं तोहिं पूछौं,–"हे सखी ! जीवित क्यूं न मराइ ?
मूवां पीछै सत करै, जीवत क्यूं न कराइ ?"

३३८. सती जलनको नीकली, पिवका सुमिरि सनेह;
सबद सुनत निकल्या जिया, भूलि गई सब देह !

---

३३४. शोधकास भय बहु असे, पळ पळ होय वियोग
पण राखुन जर तनु पडे तर तनु–प्रभु–संयोग !

शोधक–देवाचा शोध घेणारा भक्त.

३३५. तीर, तोफ यांनीं लढे तो न शूर; (तो क्रूर !)
माया त्यजि, भक्ती करी तोच म्हणवितो शूर !

३३६. जितुके तारे रजनिचे तितुके मज अरि, पाहि,
कंगोरे सुळिच्या शिरीं, विसर तुझा तरि नाहिं.

३३७. पुशि तुज सखि मी, "तो जिता असतां कां मेल्यें न ?
जिवंत असतांनाच तो मी सति कां गेल्यें न ?"

३३८. सती जळाया चालली, स्मरी प्रियाचा स्नेह,
प्राण निघाले, ऐकतां शब्द, विसरली देह !

---

## २६. पतिव्रता

३३९. नैनी अंतर आव तूं नैन झांप तोंहि लेव
ना मैं देखों औरको ना तोंहि देखन देव.

३४०. पपिहाको पन देखि करि, धीरज रहै न रंच
मरतेदम जलमें पडा, तऊ न बांरी चंच.

३४१. सब आये उस एकमें डार, पात, फल, फूल
अब कहो पाछे क्या रहा गहि पकडा जब मूल ?

३४२. पतिवरता पतिको भजै, और न आन सुहाय,
सिंह-बचा जो लंघना तौ भी घास न खाय.

३४३. पतिबरता पतिको भजै, पतिपर धर बिस्वास,
आन दिसा चितवै नहीं, सदा पीवकी आस.

३४४. सेज बिछावै सुंदरी अंतरपरदा होय
तन सौंपे, मन दे नहीं, सदा सुहागिन सोय !

३४५. कबिरा सीप समुद्रकी रटै पियास पियास,
और बुंदको ना गहै, स्वाति बूंदकी आस.

३४६. चढी अखाडे सुंदरी मांडा पिउसों खेल,
दीपक जोया ज्ञानका, काम जरै ज्यों तेल.

३४७. सूराके तो सिर नहीं, दाताके धन नाहि,
पतिबरता के तन नहीं, सुरति बसै पिउमाहि.

३४८. पतिबरता मैली भली, गले कांचकी पोत,
सब सखियनमें यों दिपै ज्यों रविससिकी ज्योत.

मराठी ग्रं संग्रहालय, ठा ...९९
अनुक्रम ...32823... वि: ...a/c4...
क्रमांक ...955 C... नों दि ...8/3/6...

## २६. पातिव्रता

३३९. नयनीं ये तूं, त्यांत मी तुज झाकुन घेईन!
नच बघेन कवणास मी! तुजहि न बघुं देईन!!

३४०. चातक-वाण्यानें गमे धैर्यासहि संकोच
मरतां मरतां जळि पडे तरी न उघडी चोंच!

३४१. सकल येत 'एकां'त त्या डांग, पान, फल, फूल
काय बरें उरलें अतां दृढ धरिल्यावर मूळ?

३४२. पतिव्रता पतिला भजे, तिज न आवडे आन,
राहि उपाशी-सिंह शिशु परि खाई चारा न.

३४३. पतिव्रता पतिला भजे, धरि पतिवर विश्वास,
अन्य दिशेला ढुंकि ना, सदा पतीची आस.

३४४. शेज अंथरी सुंदरी परि अंतरि पट-खंड
तनु सोंपी, मन दे न, पण अहेव तेंच उदंड!

३४५. सागरांतली शिंपली घे तृष्णेचा ध्यास,
बिंदु इतर करि ग्रहण ना, स्वातिबिंदुची आस.

३४६. चढे पलंगीं सुंदरी मांडि प्रियाशी खेळ,
उजळी ज्ञानाचा दिवा, जळे काम जणुं तेल.

३४७. शूरालागीं शिर नसे, दात्याला धन नाहिं,
पतिव्रतेला तनु नसे सु-रति प्रियकरीं राहि.

३४८. पतिव्रता मलिना भली, गळां घातली पोत,
झळके सर्व सख्यांमधीं जणुं रविशशिची ज्योत.

३४९. जो यह एक न जानिया, बहु जाने का होय?
एकतें सबै होत हैं, सबतें एक न होय!

३५०. नाम न रटा तो क्या हुआ जो अंतर है हेत?
पतिबरता पतिको भजै मुखसे नाम न लेत.

३५१. सुंदरि तौं सांई भजै, तजै आनकी आस,
ताहि न कबहूं परि हरै पलकन छांडै पास.

३५२. पतिबरता मैली भली काली कुचल कुरूप,
पतिबरता के रूपपर वारों कोटि सरूप.

३५३. प्रीति बडी है तुज्झसे! बहु गुनियाला कंत!
जो हंस बोले औरसे नील रंगाओ दंत.

३५४. आठ प्रहर, चौंसठ घडी, मेरे और न कोय
नैनामाहीं तूं वसै, निंदको ठौर न होय.

३५५. कबिरा रेख, सिंदूर अरु काजर दिया न जाय
नैनन प्रीतम रमि रहा, दूजा कहाँ समाय?

३५६. सती न पिसै पीसना, जो पिसै सो रांड
साधू भीख न मांगई जो मांगे सो भांड.

३५७. सती बिचारी सत किया कांटो सेज बिछाय!
लै सूतो पिय आपना चहुं दिस अगिन लगाय!!

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
९७९९८

३४९. जर हें 'एक' न जाणिलें, हो 'बहु' जाणुन काइ?
'एका' पासुन 'सर्व'; तें 'सर्वां'पासुन नाहिं!

३५०. मुळीं न धोका, नाम जर असेल आंतर हेत,
पतिव्रता पतिला भजे नाम मुखें ना घेत!

३५१. सुंदरि स्वामीशीं भजे, त्यजि इतरांची आस,
त्यास विसंबे ना कधीं निमिष न सोडी पाश.

३५२. पतिव्रता मलिना भली, काळीबेरि, कुरूप
तिजवरुनी अशि रूपडीं कुर्वंडावी खूप.
रूपडीं–सुंदर रूपें

३५३. 'प्रीति' थोर तुजहुन असे! बहुत असे गुणि 'कांत'!
हसत वदसि इतरांसवें तर मग रंगव दांत.
टीप––दांत रंगवणें हे अकुलीनपणाचें लक्षण आहे.

३५४. आठ प्रहर, चौसष्ट घडि, कुणी न माझें आन,
नयनीं वससी तूंच, ना निजेस ठावठिकाण.

३५५. घालिल काजळ कां कुणीं? वा सिंदुर लावेल?
प्रियतम रमतां लोचनीं कोण दुजा मावेल?

३५६. कांडण-दळण न करि सती, जी करिते ती रांड
साधू मागे भीक ना, जो मागे तो भांड.
रांड–विधवा; भांड–साजिदा.

३५७. कंटकशय्या पसरुनी केलें सतिनें दिव्य!
निजलि प्रियासह, भडकला अग्नि चहुंकडे भव्य!!

३५८. अब तो ऐसी ह्वै परी मन अति निर्मल कीन्ह
मरनेका भय छांडिके, हाथ सिंघोरा लीन्ह.

३५९. कबीर 'एक' न जाणिया, 'बहु' जाण्या क्या होइ ?
'एकै'तै 'सब' होत है, 'सब'तैं 'एक' न होइ !

३६०. उस संम्रथका दास हौं, कदे न होइ अकाज,
पतिव्रता नांगी रहै, तौं पुरुषहिकौं लाज !

३६१. कबीर जे को सुन्दरी, जाणि करै व्यभिचार.
ताहि न कबहूं आदरै, प्रेमपुरिष भरतार.

३६२. जे सुन्दरि सांई भजै, तजै आनकी आस
ताहि न कबहूं परहरै, पलक न छांडै पास.

३६३. मूओंकौ का रोइए, जो अपणे घर जाइ ?
रुइए बंदीवानको, हाटैं हाट बिकाइ !

---

३५८. स्थिती अशी—मन हें अतां निर्मल होउन राहि,
करीं कोयरी घेतली, मरणाचें भय नाहिं !
कोयरी—कुंकुवाचा करंडा.

३५९. कबीर," 'एक' न जाणिलें तर, 'बहु' जाणुन काइ ?
'एकां'तुन हो 'सकल' पण 'तें' 'सकलां'तुन नाहिं !

३६०. दास समर्थाचाच मी, हो केव्हां न अ-काज,
पतिव्रता उघडी तरी, ती पुरुषासच लाज !

३६१. कबीर जी कुणि सुन्दरी जाणुन करि व्यभिचार
कधीं न तिजला आदरी प्रेमीपुरुष भ्रतार.

३६२. जी सुन्दरि स्वामी भजे, त्यजी पराची आस,
तो न तिला टाकी कधीं, निमिष न सोडी पाश.

३६३. रडा मृतास्तव कां वृथा जो निज सदनीं जाय ?
बंदिवान हाटीं विके रडा तयास्तव धाय !

———

## २७. गुरु

३६४. गुरु, गोविंद दोऊ खडे काके लागूं पांव?
बलिहारी गुरु आपकी जिन्ह गोविंद दिया बताय!

३६५. यह तन विषकी बेलरी, गुरु अमृतकी खान
सीस दिये जो गुरु मिलै तो भी सस्ता जान.

३६६. बहे बहाये जात थे लोक बेदके साथ
पैंडामें सत्गुरु मिलै दीपक दीन्हा हाथ.

३६७. सतगुरु साचा सूरमा नखशिख मारा पूर!
बाहर घाव न दीसई, भीतर चकनाचूर!

३६८. सतगुरुकी महिमा अनंत, अनंत किया उपकार
लोचन अनंत उघाडिया, अनंत दिखावणहार.

३६९. सात समंदकी मसि करौं, लेखनि सब बनराइ,
धरती सब कागद करौं, गुरु गुण लिख्या न जाइ.

३७०. उततें सद्गुरु आइया जाकी बुधि है धीर
भवसागरके जीवको खेइ लगावै तीर.

३७१. लंबा मारग, दूर घर, बिकट पंथ, बहुभार
कह कबीर कस पाइए दुर्लभ गुरु दीदार?

३७२. बलिहारी गुरु आपने! घडि घडि सौ सौ बार!!
मानुषसे देवता किया करत न लागी बार!

३७३. सतगुरुसम को है सगा? साधूसम को दात?
हरिसमान को हीतु है? हरिजनसम को जात?

## ३७. गुरु

३६४. गुरु, हरि दोघेही उभे धरूं कुणाचे पाय?
धन्य धन्य आहांत गुरु! दाविलात हरिराय!

३६५. निज तनु हें विषबल्लरी, गुरु अमृताची खाण,
शिर अर्पुन जर गुरु मिळे तर तें सवंग जाण!

३६६. होते जन वेदासवें वाहत वाहत जात
पायठाणिं गुरु भेटलें दीप दिला हातांत
टीप--कबीर काशीविश्वेश्वराच्या पायरीवर झोपले असतांना त्यांना रामानंदांचा पाय लागला. अशा रीतीनें शक्तिसंचार होऊन गुरुकृपा झाली.

३६७. नखशिखांति हाणी पुरें गुरू खरोखर शूर!
घाव न बाहेरीं, तरी अंतरि चक्काचूर!

३६८. अनंत गुरुमहिमा असे, अनंत गुरु-उपकार,
अनंत नयनें उघडिलीं, अनंत दाखविणार.

३६९. सप्ताब्धींची मसि करूं? करूं लेखणि वनराय?
पत्र धरित्रीचें करूं? गुरुगुणलिखितिं नुपाय!

३७०. तिकडुन सद्गुरु पातले बुद्धि ज्यांची धीर
तारिति भवसागरिं जिवा, दाखविती परतीर.

३७१. मार्ग दीर्घ, घर दूर, पथ बिकट, शिरीं बहुभार
सुलभ कसा होईल गुरु हृदयाचा आधार?

३७२. धन्य धन्य गुरु आपली! घडि घडि शत-शतवार!
नारायण केलें नरा आपण सत्वर फार!

३७३. कोण सगा गुरुसारखा? दाता साधुसमान?
हितकर हरिसा? जन्म घे हरिजनसा गुणवान?

३७४. सौ दिन कैसा होयगा गुरू गहेंगे बाहि,
अपनाकरि बैठावही चरनकंवलकी छाहि.

३७५. गुरु झरोखे बैठिके सबका मुजरा लेइ
जैसी जाकी चाकरी तैसा ताकों देइ.

३७६. कबिरा यह तन जात है सके तो ठौर लगाव
कै सेवा कर साधकी, कै गुरुके गुन गाव.

३७७. अब गुरु दिलमें देखिया, गावनको कछु नाहिं,
कबिरा जब हम गावते तब जाना गुरु नाहिं.

३७८. गुन इंद्री सहजै गये, सतगुरु करी सहाय
घटमें नाम प्रकट भया, बकि बकि मरे बलाय.

३७९. तन, मन दिया तो क्या हुआ ? निज मन दिया न जाय !
कह कबीर "ता दाससों कैसे मन पतियाय ?"

३८०. तन, मन ताको दीजिये, जाके विषया नाहिं,
आपा सबही डारिकै, राखै साहिब माहिं

३८१. गुरु सिकलीगर कीजिये, मनहिं मस्कला देय.
मनकी मैल छुडाइकै, चितदरपन करि लेय.

३८२. गुरुधोबी, सिपकापडा, सावुन सिरजनहार,
सुरतिसिलापर धोइये, निकसै जोसि अपार.

३८३. वस्तु कहीं ? ढूंढै कहीं ? केहि विधि आवै हाथ ?
कह कबीर तव पाइये भेदी लीजे साथ.

३८४. कोटिन चंदा ऊगवें, सूरज कोटि हजार,
सतगुरु मिलिया बाहरे दीसत घोर अंधार

३७४. उजाडेल तो दिन कधीं गुरु धरून ही बाहि
वसवतील मज आपुल्या पदपद्मांच्या छायिं.

३७५. सकलांचे सज्जांतुनी गुरु स्वीकरति प्रणाम
देति तसे त्याला असे जैसें ज्याचें काम

३७६. तनु जाई, शकशील तर, तिजला ठायीं आण,
सेवा साधूची करी वा करि गुरुगुणगान.

३७७. हृदयांतरिं 'गुरु' देखिला, आतां न लगे गान,
होतें गायन तेधवां नव्हतें गुरुचें ज्ञान.

६७८. सहज विषयगुण लोपले, सद्‌गुरु दे आधार,
नाम प्रकटलें अंतरीं, मेले विषयविकार.

३७९. काय जाहलें, तनु दिली, दिलें न मन ईशास
कबीर, "त्या दासीं कसें मन ठेविल विश्वास ?"

३८०. तनु, मन अर्पावें तया, विषय जयाला नाहिं,
गर्व सर्व सोडोनि जो ठेला गुरूच्या पायिं.

३८१. करा शिकलगारास गुरु पाहा ! मन परजून,
पुसा किटण, मुकुरापरी लख्ख करा घासून.
शिकलगार–हत्यारांना धार लावणारा.

३८२. शिष्यवसन, गुरुपरिट, प्रभु साबण विमल उदार
सुरति शिलेवरतीं धुतां, निघती दोष अपार.

३८३. वस्तु इथें, धुंडी तिथें, येइल ती कशि हातिं ?
सापडेल तेव्हांच ती इंगितज्ञ जर साथि !
इंगितज्ञ–रहस्य जाणणारा.

३८४. उगोत लाखो चंद्रमे ! उगोत सूर्य हजार !
गुरुच्या भेटीवांचुनी घोर दिसे अंधार !

३८५. सतगुरु पारसके सिला देखो सोच-विचार
आइ पडौसिन लै चली, दीयो दिया संवार.
३८६. चौंसठ दीवा जोयके, चौदह चंदा माहिं
तेहिं घर किसका चांदना, जेहिं घर सतगुरु नाहिं ?
३८७. गुरु कुम्हार, सिष कुंभ है गढ गढ काढै खोट
अंदर हाथ सहार दै, बाहर बाहै चोट

३८८. काचे भांडेसे रहै, ज्यों कुम्हारका नेह
भीतरसे रक्षा करै, बाहर चोटें देह.

३८९. कबिरा, "ते नर अंध है, गुरुको कहते और
हरि रूठे गुरु ठौर है; गुरु रूठे नहिं ठौर."
३९०. गुरु है बड गोविंद तें मनमें देखु विचार
हरि सुमिरै सो बार है, गुरु सुमिरै सो पार.
३९१. गुरु पारस गुरु परस है; चंदन बास सुवास;
सतगुरु पारस जीवको दीन्हो मुक्ति निवास.
३९२. पंडित पढि, गुनि पचि मुए, गुरु बिन मिलै न ज्ञान,
ज्ञानबिना नहिं मुक्ति है, सत्त शब्द परमान.

३९३. तीन लोक नव खंडमें गुरुतें बडा न कोइ
करता करै, न करि सकै, गुरु करै सो होइ.
३९४. कबिरा हरिके रूठने, गुरुके सरने जाय,
कह कबीर गुरु रुठते, हरि नहिं होत सहाय.
३९५. ताकी पूरी क्यौं परै गुरु न लखाई बाट ?
ताको बेडा बूडि है फिरफिर अवघड घाट !

३८५. गुरू परिस किंवा शिळा पहा, करून विचार
आली शेजी, घे, निघे, तेलवात संभाळ !

३८६. दीप्त दीप चौसष्ट, विधु चवदा झळकति; पाहि,
त्या गृहि कुठचें चांदणें ज्या गृहिं सद्गुरु नाहिं ?

३८८. शिष्य–कुंभ, कुंभार–गुरु; काढी उणीं अपार
वरिंवरिं वरवर थापटी, आंतुन दे आधार.
वरिंवरिं–पुन्हा पुन्हा.

३८९. कबीर, "ते नर आंधळे, ठेविति गुरुला नांव
हरी रुसे तर ठाव गुरु; रुसतां गुरु, ना ठाव !"

३९०. गोविंदाहुन थोर गुरु पहा ! करून विचार.
स्मरा 'हरी' शतवार पण, स्मरा गुरू–व्हा पार !

३९१. गुरुस्पर्श, गुरु परिस कीं ! चंदन वास सुवास !
जीवाला गुरु परिससा ! देई मुक्तिनिवास !

३९२. गेले शिकले, सवरले; गुरुविण मिळे न ज्ञान
'ज्ञानाविण मुक्ती नसे'–हें नृत शब्द प्रमाण !
नृत–सत्य.

३९३. तीन लोकिं, नव खंडिही थोर न गुरुहुन कोणि
तो कर्ता, तो करविता, कांहि न त्यावांचोनि !

३९४. कबीर, रुसला देवतर, शरण गुरुला जाय
पण गुरु रुसला मात्र तर, देवहि हो न सहाय्य.

३९५. पुरें कसें, गुरुनें नसे ज्यास दाविली वाट ?
नाव बुडे त्याची तळीं, फिरुनी अवघट घाट !

३९६. दीपक दीया तेल भरि, बाती दिई अघट्ट.
'पूरा कीया बिसा हुंणा, बहुरिन आवौं हट्ट.

३९७. सतगुरु लई कमाण करि, बांहण लागा तीर,
एक ज्युं बाह्या प्रीतिसूं, भीतर रह्या सरीर!

३९८. रामनामकै पटंतरै, देवोको कछु नाहिं
क्यानें गुरु संतोषिये? हौस रही मनमाहिं!

३९९. कबीर सतगुरुना मिल्यां, रही अधूरी सीष,
स्वांग जतीका पहरिकरि, घरिघरि मांगै भीष.

४००. 'पासा' पकड्या प्रेमका, 'सारी' किया सरीर
सद्गुरु 'दाव' बताइया, खेलै दास कबीर.

४०१. कवीर बादल प्रेमका हमपरि बरष्या आइ
अंतरि भीगी आतमा, हरी भई वनराइ.

४०२. गूंगा हूवा बावला, बहरा हूवा कान,
पाऊं थै पंगुल भया, सतगुरु मार्‍या बाण!

४०३. हंसै न, बौले उनमुनीं, चंचल मेल्या मारि,
कह कबीर भीतरि भिद्या, सतगुरुके हथियारि.

४०४. सारासूरा बहु मिलै, घाइल मिलै न कोइ,
प्रेमीको प्रेमी मिलै, तब विष अमृत होइ.

३९६. तेलानें भरला दिवा, उजळलि अक्षयवात,
सौदा पुरता घेतला, पुन्हां न आतां हाट !

३९७. कमान गुरु घेती करीं, सोडुं लागती तीर,
एक प्रीतिनें सोडिला, छिललें आंत शरीर !

३९८. रामाच्या - बदल्यांत ना द्यायासाठीं कांहि
काय तरी अर्पू ? गुरो ! हौस मनांतच राहि !

३९९. सद्गुरु नाहित भेटले, राहिलि अधुरी शीक,
सोंग यतीचें घेउनी मागे घरिंघरिं भीक.

४००. प्रेमाचे 'फासे' करीं, 'चौपट' पुढें शरीर
'डाव' गुरूनें दाविला, खेळे दास कबीर.

४०१. घन आम्हांवर ओसरे प्रेमळ अपरंपार
चिंब अंतरात्मा भिजे, वन हो हिरवेगार.

४०२. मुका जाहला बावरा, फुटले बधिरा कान,
फिरता झाला पांगळा, रुतला गुरुचा बाण !

४०३. हसे न, बोले उन्मनीं, चंचलता हो ठार,
आंत भेदलों, लागलें सद्गुरुचें हत्यार.

४०४. शूर शूर बहु भेटले, भेटला न घायाळ,
प्रेम्याला प्रेमी मिळे, विषहि अमृत तत्काळ !

---

## २८. असत् गुरू

४०५. बंधेको बंधा मिलै, छूटै कौन उपाय?
कर सेवा निर्बंधकी, पलमें लेत झुडाय!

४०६. बात बनाई, जग ठगा, मन परबोधा नाहि,
कह कबीर, मन लै गया लख चौरासीमाहिं.

४०७. नीर पियावत का फिरै, घर घर सायर, बारि?
तृषावंत जो होइगा पीयैगा झख मारि!

४०८. सिषशाखा बहुते किये, सतगुरु किया न मित्त,
चाले थे सतलोकको बीचहि अटका चित्त.

४०९. गुरू मिला ना सिष मिला, लालच खेला दांव
दोऊ बूडे धारमें चढि पाथरकी नाव.

---

## २८. असत् गुरु

४०५. मिळे बद्ध बद्धास हो सुटका कवण उपायिं ?
निर्बंधाला सेव, मग पळांत सुटका, पाहि !

४०६. ठकलें जग, त्या 'बनवलें,' प्रबोधिलें मन नाहिं,
चौऱ्यांशी फेऱ्यांमधीं मन घेवुनिया जाइ.

४०७. पाणी पाजत फिरसि कां घरोघरीं जल, कूप ?
असेल तृष्णावंत तो पिईल तें गुपचूप !

४०८. सद्गुरू सखा न जोडला, शिष्य जोडले फार
सत्यलोकिं मन चाललें, मधें अटकलें पार !

४०९. भेटला न गुरु, शिष्यहि न, लोभिं खेळले डाव
बसुन बुडाले उभयतां ! धोंड्यांची जड नाव !

---

## ३९. साधु-संत

४१०. जाति न पूछो साधुकी पूछि लीजिए ज्ञान
मोल करो तरवारका पडा रहन दो म्यान
४११. तरवर, सरवर, संतजन, चौथे वरसे मेह
परमारथके कारने चारौं धारे देह!
४१२. सिंहोके लहंडे नहीं, हंसोकी नहिं पात,
रत्नोंकी नहिं बोरिया, साधु न चलै जमात
४१३. 'साधु' कहावत कठिन है ज्यों खांडेकी धार
डगमगाय तो गिरि परै, निःश्चल, उतरे पार!
४१४. गांठीं दाम न बांधई, नहिं नारीसे नेह
कह कवीर ता साधुके हम चरननकी खेह
४१५. साधु हमारी आतमा, हम साधुनके जीव,
साधुनमध्यें यों रहौ ज्यों पयमध्यें घीव
४१६. कवीर संगत साधुकी निस्फल कभी न होय
होसी चंदन वासना नीम न कहसी कोय
४१७. साधू ऐसा चाहिये दुखै-दुखावै नाहिं
फल-फूलनि छेडै नहीं, रहै वगीचे माहिं
४१८. संत न बांधै गांठडी, पेटसमाता लेइ
सांईसो सनमुख रहै, जहं मांगै तहं देइ.
४१९. कांच, कथीर, अधीर नर, जतन करत ह्वै भंग;
साधू, कंचन ताइये चढै सवाया रंग.
४२०. वृच्छ कबहुं नहिं फल भखै, नदी न पीबै नीर,
परमारथके कारने साधुन धरा सरीर.

## २९. साधु-संत

४१०. साधूची जात न पुसा, पुसा तयाचें ज्ञान,
मोल करा तलवारिचें तिचें राहुं द्या म्यान

४११. संत, सरोवर, वृक्षवर, चवथा झरता मेह
परमार्थास्तव चार हे धारण करिती देह !

४१२. कळप न सिंहांचा, नसे हंसांचा संघात
रत्नांचीं नच गोणतीं, साधूंची न जमात

४१३. 'साधु' म्हणवणें कठिण अति जशि खड्गाची धार
जो डगमगतो तो पडे, निश्चल, उतरे पार !

४१४. पदरीं पैका बांधि ना, स्नेह नारिशीं नाहिं,
त्या साधूच्या पायिंची धूली होऊं आम्हि

४१५. आत्मे साधू आमुचे, आम्ही त्यांचे प्राण,
त्यांच्या संगत राहतों दुग्धीं तुपासमान.

४१६. कबीर साधूसंगती निष्फल कधींहि हो न
चंदन सुरभित कोण त्या म्हणेल 'निंब' म्हणोन ?

४१७. दुखूं नये-दुखवूं नये असा असावा साधु
वनिं वसुनीहि फुलां-फळां उपसर्ग न दे बाधु

४१८. संत न बांधी बोंचकें, पोटापुरतें घेइ,
संमुख राहि प्रभूस, जें मागे तें तो देइ.

४१९. कथील, कांच, उताविळा जपुनहि पावति भंग;
कनक, साधु तावूनही उज्ज्वल पावति रंग.

४२०. वृक्ष फळें खाई न कधि, नदी न प्राशी नीर,
परमार्थास्तव साधुजन धारण करिति शरीर !

४२१. कबिरा सोई पीर है जो जाने परपीर,
जो परपीर न जानई सो काफिर बेपीर.

४२२. साधू भूखा भावका, धनका भूखा नाहिं,
धनका भूखा जो फिरै सौ तो साधू नाहिं.

४२३. सोना, सज्जन, साधुजन टूटि जुरै सौ बार
दुर्जन कुंभ कुम्हारके एकै धका दरार.

४२४. साध बडे परमारथी घन ज्यों बरसै आय
तपन बुझावें औरकी अपनो पारस लाय.

४२५. सब बन तौ चंदन नहीं, सूरा का दल नाहिं,
सब समुद्र मोती नहीं यों साधू जगमाहि

४२६. 'साध' कहावत कठिन है लंबा पेड खजूर !
चढै तो चाखै प्रेमरस, गिरै तो चकनाचूर.

४२७. निराकारकी आरसी साधौकीही देह
लखा चहै जो अलखको इनमेंही लखि लेह !

४२८. संत न छोडै संतई, कोटिक मिलै असंत
मलय भुवंगहि बेधिया सीतलता न तजंत.

४२९. कोई आवै भाव लै, कोई भाव, अभाव
साधु दोडको पोषते गिनै न भाव, अभाव.

४३०. नहिं शीतल है चंद्रमा, हिम नहिं शीतल होय,
कबिरा शीतल संतजन नामसनेही सोय.

४३१. साधु-सिद्ध बड अंतरा जैसे आम-बबूल
वाकी डारी आमिफल, याकी डारी सूल.

४३२. साधु समुंदर जानिये माहीं रतन भराय
मंदभाग मूठी भरै कर कंकर चढि जाय.

४२१. परपीडा जो जाणतो तोच खरोखर पीर,
परपीडा जाणे न जो तो भोंदू काफीर.
पीर–साधु; काफीर–नास्तिक.

४२२. साधू भावाचा भुका, भुका धनाचा नाहिं,
भुका धनाचा जो फिरे तो मुळि साधु नाहिं.

४२३. सोनें, सज्जन, साधुजन तुटति-जुळति शतवार
जरा ढक्याने कुंभसम दुर्जन फुटती पार!

४२४. परमार्थी साधू महा, घन ये, करि वर्षाव–
स्पर्शें निज शमवी अहा! इतर जनांचा ताव.
ताव–ताप.

४२५. चंदन नच प्रत्येक वनिं, दला-दलांत न क्षत्र,
प्रत्यब्धित नच मौक्तिकें, साधु न जगिं सर्वत्र.
क्षत्र–शूर क्षत्रिय.

४२६. 'साधु' म्हणवणें कठिण अति उंच उभार खजूर
चढेल, तर चाखील 'रस,' पडेल, होइल चूर.

४२७. निराकृतीचा आरसा, साधूचा जो देह
अलक्षास लक्ष्न ध्या तयांत निःसंदेह!

४२८. संत न त्यजिती संतपण, मिळोत कोटि असंत,
मलयगिरिस अहि वेढिती परि शैत्यास न अंत.

४२९. येवो भावानें कुणी, कुणि नसतांना भाव,
साधू उभयां पोषती, बघति न भाव, अभाव.

४३०. शीतल नाहीं चंद्रमा, कीं हिम शीतल नाहिं,
शीतल संतत संतजन नामस्नेही; पाहि,

४३१. साधु, सिद्ध अंतर जसे आम्र आणि बाभूळ
अमृतफळांची ह्याचि तर, त्याचि डहाळी शूळ.

४३२. रत्नें बहुविध सांचली जाणा साधुसमुद्रिं
मुठींत भरूनी उपल घे मंद भाग्य दळभद्रि.
उपल–समुद्रांतले लहान लहान खडे.

४३३. जो चाहै 'आकार' तूं साधू परतछ देव
निराकार निजरूप है प्रेम प्रीतिसे सेव.

४३४. पक्षापक्षी कारणे सब जग रहा भुलान
निरपक्षे ह्वै हरि भजै तेई संत सुजान.

४३५. जीवन्मुक्त ह्वै रहै तजै खलककी आस
आगे पीछे हरि फिरै क्यों दुख पावै दास ?

४३६. समुझिबूझि जड ह्वै रहै, बल तजि निर्बल होय,
कह कबीर ता संतको पला न पकरै कोय,

४३७. साधु साधु सबही बडे अपनी अपनी ठौर
शब्दविवेकी पारखी ते माथेके मौर.

४३८. हरिदरिया सूभर भरा, साधोका घट सीप
तामें मोती नीपजै, चढै देसावर दीप.

४३९. चंदनकी कुटकी भली, नही बबुल लखरांव
साधनकी झुपडी भली, ना साकटको गांव.

४४०. हरिसे ते हरिजन बडे समझि देख मनमाहिं.
कह कबीर जग हरि विखे सो हरि हरिजनमाहिं

४४१. हद्द चलै सो मानवा, बेहद चलै सो साध,
हद-बेहद दोनों तजै ताको मता अगाध.

४४२. राजदुवारे साधुजन तीन वस्तुको जाय
कै मीठा, कै मानको, कै मायाकी चाय.

४४३. कबीर हरिका भावता, दूरै थैं दीसंत
तन पीणां, मन उनमनां, जग रूठडा फिरंत.

४४४. हैवर, गैवर, सघन धन, छत्र, धजा, फरराइ
ता सुख थैं भिष्या भली, हरि सुमिरत दिन जाइ.

४३३. इच्छिसि जर 'आकार' तर, तूं वघ ! साधुंत देव
निराकार प्रभुरूप तें सत्प्रेमानें सेव.

४३४. पक्ष आणि उपपक्ष यांमुळें सकल जग भ्रांत
हरिभजनीं निःपक्ष जे तेच संत निःभ्रांत.

४३५. होती जीवन्मुक्त जे त्यजिति भवाची आस,
पार्श्वीं अग्रीं हरि फिरे, दुःख न त्या दासास !

४३६. ज्ञानि असुन जड राहि जो, निर्बल, बल सांडोनि
त्या संताचें उपरणें ओढुं शके ना कोणि ?

४३७. साधु साध, सारे महा आपआपुल्या ठायिं
शब्दविवेकी, पारखी तेच शिरोमणि, पाहि !

४३८. अथांग हरिसागर भरे, साधूची तनु शिंप,
चढति मौक्तिकें त्यांतली देशांतरिं शतद्वीप.

४३९. चंदन कुटकेंही भलें पण ना बाभुळ-टाल
खोपट साधूचें भलें ! शाक्तग्राम पण टाळ !
टाल—लाकडांची वखार.

४४०. हरिजन थोर हरीहुनी विचार करूनी, पाहि,
जगांत जो हरि विखुरला तो हरि हरिजनिं राहि.

४४१. सीमा मनुजाला असे, सीमा साधुस बाध,
सीमासीमातीत जो त्याचीं मतें अगाध.
बाध—त्रास. ( किंवा 'वाद' असा पाठ मानल्यास 'साधूस सीमा नाही' असा अर्थ होईल. )

४४२. मान, मिठाई आणखी माया वस्तू तीन !
राजद्वारीं साधुजन इच्छिती न यांवीण !

४४३. दुरूनीच दृष्टिस पडे, कबीर, हरिचा भक्त
क्षीण तनू, मन उन्मनीं, हिंडे जगतिं विरक्त.

४४४. हयवर, गजवर, सघनधन, ध्वज, चामर, शिरछत्र
त्यांपेक्षां भिक्षा भली ! हरिभजनाचें सत्र !

---

## ३०. दुर्जन

४४५. संगति भई तो क्या भया हिरदा भया कठोर
नौ नेजा पानी चढै तऊ न भीजे कोर !

४४६. हरियर जानै रूखडा जो पानीका नेह
सूखा काठ न जानही केतहु वूडा मेह

४४७. लाडू, लावर, लापसी पूजा चढै अपार
पूजि पुजारा लै चला, मूरतिके मुख खार

४४८. चाल बगुलकी चलत है, बहुरि कहावै हंस,
ते मुक्ता कैसे चुगै ? परै कालके फंस !

४४९. लोहेकेरी नावरी, पाहन गरुआ भार,
सिरमें विषकी मोटरी, उतरन चाहै पार.

४५०. चंदन सर्प लपेटिया, चंदन काह कराय ?
रोम रोम विष भीनिया अमृत कहां समाय ?

४५१. जानंता बूझा नहीं, बूझि किया नहिं गौन,
अंधेको अंधा मिला, राह बतावे कौन ?

४५२. सज्जन तो दुर्जन भया, सुनि काहूको बोल ?
कांसा, तांबा ह्वै रहा, नहिं हिरण्यका मोल !

४५३. सकलौ दुरमति दूर करौ, अच्छा जनम बनाउ
काग-गवन-वुधि छोडि दे, हंस-गवन–चलि आउ.

४५४. जहर जिमीं दै रोपिया, अमि सींचै सो बार
कबिरा खलकै ना तजै जामें जौन बिकार !

४५५. कबिरा मूढक प्रानियां नखसिखपाखर आदि
बाहनहारा क्या करै ? बान न लागै तांहि !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रति.
अनुक्रमांक ........ वि: ........
कों कि: ........

## ३०. दुर्जन

४४५. संगति लाभुन काय जर राही हृदय कठोर
न भिजे, न शिजे ज्यापरी धान्य नवें नक्कोर !

४४६. तरु जाणे हिरवेपणा, तरु पाण्याचा स्नेहि,
शुष्क काष्ठ जाणे न त्यां; चिंब भिजे जरि मेहिं.

४४७. लाडू, घीवर, लापशी पूजा चढे अपार
पूजा–ने–पूजक सवें, मूर्तिमुखीं दे क्षार.

४४८. चाल बकाचीं चालतो आणि म्हणवतो 'हंस'
तो मोत्यें चघळील कशि ? काळ बघे करूं दंश !

४४९. लोखंडाची नाव, जड पाषाणांचा भार
शिरीं विषाचें बोंचकें, उतरूं इच्छी पार.

४५०. साप लपेटी चंदना, करील चंदन काय ?
विष रोमीं रोमीं भिने, अमृताला नच ठाय !

४५१. समजुन नुमजे, उमजुनी अनुसरिना मार्गास,
दाखवील पथ कोण जर अंध मिळे अंधास ?

४५२. सज्जन दुर्जन जाहला, ऐकुं कुणाचे बोल ?
कांसें, तांबें जाहलें, ना सोन्याचें मोल !

४५३. सार दुर्मती सकल दुरि. कर जन्माचें सार,
काक-गमन दे सोडुनी, हंस-गमन स्वीकार.

४५४. विषवृक्षाला न्हाणिलें जरि अमृतें शतवार
तरि विष दे; खल न त्यजी त्याचा मूळ विकार !

४५५. कबीर, प्राणी मूढ जे श्रृंगि, नखी, पक्ष्यादि;—
यांस बाण ना विंधिती, काय करावें व्याधि?

४५६. कबिरा चंदनके निकट नीमभि चंदन होय
बूडे बांस बडाइया यो जनि बूडो कोय.
४५७. मलयागिरिके बासमें वेधा ढाक पलास
बेना कबहुं न बेधिया जुग जुग रहिया पास.
४५८. हम जान्यों कुलहंस हो ताते कीन्हों संग
जो जनत्यों बकबरन हो छुवन न देत्यो अंग !
४५९. पसुवासों पाला पऱ्यो रहु रहु हिया न खीज
आसरबीज न ऊगसी घालै दूना बीज.

---

## ३१. सत्संग

४६०. कबीर संगत साधुकी हरै औरकी व्याधि
संगत बुरी असाधुकी आठौ पहर उपाधि.
४६१. कबीर संगत साधुकी जौकी भूसी खाय
खीर, खांड भोजन मिलै साकट संग न जाय !
४६२. कबीर संगत साधुकी ज्यों गंधीका बास
जो कछु गंधी दे नहीं तो भी बास सुवास.
४६३. ते दिन गये अकारथी ! संगति भई न संत !
प्रेमबिना पशु जीवना ! भक्तिबिना भगवंत !
४६४. कबिरा मन पंछी भया भावै तहवां जाय,
जो जैसी संगति करै सो तैसा फल खाय.
४६५. कबिरा खाई कोटका पानी पिबै न कोय
जाय मिलै जब गंगसे सब गंगोदक होय.
४६६. मथुरा भावै, द्वारिका भावै वा जगनाथ
साधुसंगती, हरिभजन बिनु कछु अवै न हाथ.

---

४५६. चंदनही कडुनिंब हो तत्सन्निधिं राहून
निर्गंधित 'वंशा'परी पडा न उंचावून.
४५७. चंदनाप्रती वेढिती मलयीं ढाक, पलाश
चंदन त्यांसम हो न जरि युगें युगें सहवास.
४५८. असाल तुम्हि कुलहंस अम्हि केला म्हणुनी संग
कळतें जर 'बकवर्ण' तर, शिवूं न देतो अंग !
४५९. पशूंसवें संबंध ये, पशूंस कुठली लाज?
माळ पिके कां पेरिली जरि बीजांची रास?

---

## ३१. सत्संग

४६०. संगति साधूंची बरी हरि इतरांची व्याधि
संगति भोंदूंची बुरी अष्टौप्रहर उपाधि
४६१. कबीर साधूसंगतीं ज्वारी, भाकर खाय
क्षीरशर्कराजेमनीं शाक्तासह नच जाय !
४६२. कबीर साधूसंगती जणुं गंध्याचा वास
गंधी जरि कांही न दे तरि सहवास सुवास.
४६३. ते दिन गेले व्यर्थ ! ना संगा लागीं संत !
प्रेमाविण पशुचें जिणें ! भक्तिविना भगवंत !
४६४. कबीर, मन पक्षी बने, रुचे जिथें तिथं जाइ
जशी करी जो संगती तशी फळें तो खाइ.
४६५. गांवखळीच्या नालिचें पाणी पी ना कोणि
गंगेला मिळतांच तें हो गंगेच्या वाणि.
४६६. जगन्नाथपुरि, द्वारका, मथुरा, जा जत्रेस
साधुसंग, हरिभजनविण ये न करीं लवलेश,

---

## ३२. कुसंग

४६७. केला तबहि न चेतिया, जब ढिग लागी बेरि
अबके चेते क्या भयो, कांटनि लीन्ही घेरि

४६८. जानि बूझि सांची तजै, करि झूठीसो नेह,
ताकी संगति हे प्रभू सपनेही मति देह.

४६९. दाग न जाहीं नीलका सो मन साबुन धोय,
कोटि जतन परबोधिये कागा हंस न होय.

४७०. तोंहि पीर जो प्रेमकी तों पाकासे खेल
कांची सरसौं पेरिके खली भया ना तेल.

४७१. मारी मरै कुसंगकी केरा साथे बेर!
वै हाले, वै चींधरे, विधिनै संग निबेर!

---

## ३२. कुसंग

४६७. वेढित असतां बोरटी, सावध झालि न केळि,
सावध झाली, वेढिले काटचांनीं ज्या वेळिं !

४६८. जाणुन बुझुनी सत्य त्यजि, हो खोटचाचा स्नेहि,
त्याची संगति हे प्रभो ! स्वप्नींही 'ना देहि !'

४६९. शें मण साबण लावुनी निघे न निळिचा डाग
यत्नें कोटि प्रबोधिला हो न हंससम काग.

४७०. प्रेमसाधना जर तुझी तर 'ब्रह्मा'शीं खेळ
पेरुन कच्चे जवस हो ढेप न अथवा तेल.
पाका–(पक्व) अर्थात् ब्रह्म सनातन.

४७१. संग असंगाशीं घडे, बोरीजवळीं केळ !
ती हाले तशि ही चिरे, विधिवश त्यांचा मेळ !

## ३३. सोंग-ढोंग

४७२. मूंड मुंडाये तीन गुन,—छूटत नाहीं खाज,
लडुआ खानेको मिलै, लोग कहै 'महराज!'

४७३. हंस, बका इक रंग लखि, चरै एकही ताल,
छीर, नीर ते जानिये, बक उघरै तेहि काल.

४७४. नाचै, गावै, पद कहै, नाही गुरुसो हेत
कहै कबीर, "क्यों नीपजै बीजबिहूनो खेत?"

४७५. माला, तिलक लगाइकै, भक्ति न आई हाथ
दाढी, मूंछ मुंडाइके चले दुनीके साथ.

४७६. दाढी मूछ मुंडाइके हूआ घोटम घोट
मनको क्यों नहि मुंडिये जामें भरिया खोट?

४७७. केसन कहाँ बिगारिया जो मुंडो सौ बार?
मनको क्यों नहिं मुंडिये जामें बिषयबिकार?

४७८. साधु भया तो क्या हुवा माला पहिरी चार
बाहर भेष बनाइया भीतर भरी भंगार

४७९. जो विभूति साधुन तजी, तेहि बिभूति लपटाय,
जौन बवन कर डारिया स्वान स्वाद करि खाय.

---

## ३३. सोंग-ढोंग

४७२. मुंड मुंडनीं तीन गुण, सुटे न अगदीं खाज,
लाडू खाया लाभती, म्हणती जन, 'म्हाराज!'

४७३. एकच रंगीं हंस, बक एकच सरीं निवास
क्षीर-नीर या निर्णयीं प्रकटे बक हमखास.

४७४. नाचे, गाई, पद म्हणे, गुरुशीं नाही हेत
म्हणे कबीर, "पिके कसे पेरणिवाचुन शेत?"
हेत–भक्तिप्रेम;

४७५. लावुनिया माळा, टिळे भक्ति न आली हातिं
दाढि, मिशा मुंडोनिया हो दुनियेचा साथि.

४७६. दाढि, मिशा मुंडोनिया झाला घोटम घोट
मुंडाया मन कां नको? खोटें ज्यांत अलोट!

४७७. केशीं काय बिघाडलें? कां मुंडन शतवार?
मनास कां नच मुंडतां जयांत विषयविकार?

४७८. साधु होय तरि काय हो! गळ्यांत माळा चार!
बाह्य वेष, पी भांग! घे भुरका! नाना चार!
भुरका–तंबाखू; चार–वेडे वेडे आचार.

४७९. साधूंनी जी टाकिली विभूति चर्ची तीच
वमन जसें सेवन करी श्वान चवीनें नीच.

## ३४. वेष

४८०. हम तो जोगी मनहिके, तनके है ते और
मनका जोग लगावते दसा भई कछु और !

४८१. चतुराई हरि ना मिलैं, ए बातांकी बात,
इक निसप्रिहि निरधारका गाहक गोपीनाथ.

४८२. जबलग पिवपरचा नहीं, कन्या कुंवरी जाणि
हथलेंवा हौसें लिया, मुसकल पडी पिछाणि.

## ३४. वेष

४८०. मनाचेच जोगी अम्ही, असति तनाचे अन्य,
जोग मनाचा घेतला तेणें दशा अनन्य !

४८१. चातुर्यें हरि ना मिळे, शेंत एक ही मात,
पण निःस्पृह निर्धारिचा ग्राहक गोपीनाथ.
निर्धारी–निश्चय करणारा; विचारक.

४८२. 'प्रिय' परिचय ना तोंवरी कन्या कुमरी जाण
हौसें कर धरिला करीं, ओळख कठिण महान.

---

## ३५. चेतावणी

४८३. काल करै सों आज कर, आज करै सों अब
पलमें परलै होयगी बहुरि करौगे कब ?
४८४. आज कहै काल्ह भजूंगा, काल कहै फिर काल,
आज-कालके करत ही औसर जासी चाल
४८५. ऐसी गति संसारकी ज्यों गाडरकी ठाट
एक पडा जेहि गाडमें सबै जाहि तेहि बाट.
४८६. तनको जोगी सब करै, मनको बिरला कोइ
सबविधि सहजै पाइये, जो मन जोगी होइ.
४८७. दस द्वारेका पिंजरा तामें पंछी पौन
रहिबोको है आचरज ! जाय तो आचरज कौन ?
४८८. कबिरा रसरी पांवमें कह सोवै सुखचैन ?
स्वासन गाडा कूचका बाजत है दिनरैन !

४८९. दवकी दाही लाकडी ठाढी करी पुकार
अब जों जाउं लुहारघर डाहें दूजी बार.
४९०. भाई, बीर, बटाउआ भरिभरि नैनन रोय
जाका था सो ले लिया, दीन्हा था दिन दोय !
४९१. जो जानहुं जिव आपना करहुं जीवको सार
जियरा ऐसा पाहुना मिलै न दूजी बार.
४९२. कबिरा यह तन जात है सकै तो राख बहोर
खाली हाथों वे गये जिनके लाख करोर.
४९३. मैं भंवरा तोहि बरजिया, 'बन बन बास न लेय,'
अटकेगा कहुं बेलसे, तडपि तडपि जिय देय ?

## ३५. चेतावणी

४८३. काज 'उद्यां'चें 'आज' कर आणि 'आज'चें आज,
प्रलय पळीं होईल मग करशिल केव्हां काज?
४८४. आज म्हणे 'पूजिन उद्यां,' उद्या म्हणे, 'उदईक'
आजउद्याच्या योजनीं अवसर जाय वरीक!
४८५. जशी मेंढरांची तशी संसाराची रीत
एक पडे तर इतरही धडपडती खाईंत.
४८६. तनुस जोग प्रत्येक दे, मनास विरला कोणि,
लाभे सर्वच; जर मिळे जोग मनालागोनि!
४८७. दशद्वारांचा पिंजरा पवनपाखरूं त्यांत—
राहे नवलच! नवल ना कीं तें उडुनी जात!
४८८. पायीं गुंते, कोठची सुखनिद्रा लवमात्र?
श्वासनगारा वाजतो कूचाचा दिनरात्र!
कूचाचा—युद्धासाठीं जाण्याचा.
४८९. उभ्या उभ्या वणव्यांतलें लाकुड करी पुकार
जाळिल दुसऱ्यांदा मला गृहिं जातां लोहार.
४९०. भाऊ, नववर, वीरवर रडती नेत्र भरोन
ज्याचें त्यानें घेतलें, दान दिनाचें दोन!
४९१. जीव 'आपुला' मानसी तर तो कर 'कृति' फार
जिवासारखा पाहुणा येत न वारंवार.
४९२. तनु जाई, शकशील तर, राख तिला, घे होड,
रित्या करीं गेले, घरीं ज्यांच्या लाख करोड.
४९३. मी भुंग्यास बजाविलें, "वन वन घे न सुवास"
फसशिल वेलिंत, तडपुनी मुकशिल तूं प्राणांस.
फसशिल—अटकशील.

४९४. तेरा संगी कोउ नहिं, सबै स्वारथी लोय,
मन परतीति न ऊपजै, जिव विस्वास न होय.

४९५. 'मैं'में बडी बलाय है सको तो निकसो भाग
कह कबीर, कबलग रहै रुईलपेटी आग ?

४९६. भयसे 'भक्ति' करै सबै, भयसे 'पूजा' होय
भय 'पारस' है जीवको, 'निर्भय' होय न कोय

४९७. अपने पहरे जागिये ना पडि रहिये सोय
ना जानौ छिन एकमें किसका पहरा होय ?

४९८. दीन गंवायो संग दुनि, दुनी न चाली साथ,
पांव कुल्हाडी मारिया मूरख अपने हाथ.

४९९. आज, काल, दिन एकमें, इस्थिर नाहिं सरीर
कह कबीर, "कस राखि हौं कांचे वासन नीर

५००. कबीर नौका जरजरी, भरी बिरागै भारि
खेंवटसों परचा नहीं, क्यों करि उतरै पारि ?

५०१. कबीर नौका जरजरी, कूडे खेवणहार
हलके हलके तिरि गये, बूडे जिनि सिर भार

५०२. आहेडी दौं लाइया, मृगा पुकारे रोइ,
जा बनमें क्रीडा करी, दाझत है बन सोइ.

५०३. कहा कियौ हम आइ करि ? कहा कहैंगे जाइ ?
इतके भये न ऊतके, चाले मूल गंवाइ !

५०४. कबीर काहां गरबियौ, चाम लपेटे हड्ड ?
हैंवर ऊपरि, छत्रसिरि, ते भी देखा खड्ड !

५०५. कबीर हरिकी भक्तिबिन, धिग जीमण संमार;
धूंवाकेरा धौलहर, जात न लागै बार !

---

४९४. संगि कुणि न तव, आवघे जन स्वार्थाचे दास
प्रतीति न उपजे मनीं, जिवास ना विश्वास.

४९५. 'अहंकृती'— कैदाशिणी ! घ्या तिजपासुन धाव
राहिल आग लपेटुनी कुठवर रुइपासाव ?
रुइपासाव—कापसापासून

४९६. सकल 'भक्ति' करिती भयें, भयेंच 'पूजा' होइ
'परिस' जिवाचा भय असे ! 'निर्भय' काहि न होइ.

४९७. जागा निज 'प्रहरा' वरी, नका निजूं ताणोन,
ना ठावें, एक्या क्षणीं ये 'प्रहरा' वर कोण ?

४९८. घालविले जगतासवें दिन, जन ना ये साथि
कुऱ्हाड पायीं मारिली मूर्खानें निज हाति.

४९९. आज, काल, दिनि एकही, स्थिर हें नाहि शरीर
कबीर, "राखावें कसें जीर्ण बासनीं नीर ?"

५००. जुनें पुराणें होडगें, भरला परका भार,
अनोळखा तांडेल तो उतरिल कां परपार ?

५०१. उनाड नवखे नाखवे जुनें पुराणें तारुं
तिरले जे हळुवार ते, बुडले ज्यांशिरिं भारु

५०२. वणवा व्याधें लाविला, क्रंदे मृगसमुदाय,
क्रीडावन जें, तें अतां जाळी पोळी हाय !

५०३. येउन केलें काय अम्हि ? करूं जावोनी काय ?
ना इथलें ! ना तेथलें ! मूळ गमविलें, हाय !

५०४. गर्व कशाचा ? बांधल्या चामड्यामधीं अस्थि !
स्वार हयावरि छत्र शिरिं, थड्यांत अंतीं वस्ति !
थडें—थडगें.

५०५. हरिच्या भक्तीवाचुनी धिक् जीवन संसार !
धवळारें धूरापरी लोपतील क्षणिं पार !

---

## ३६. उपदेश

५०६. अनमांग्या मोती मिले मांगी मिले न भीक
भिक तुम ना मांगो कभी यह सत्गुरुकी सीख.
५०७. जो तोकू कांटा बुवै ताहिं बोइ तूं फूल
तोको फुलके फूल हैं वाकों है तिरसूल.
५०८. या दुनियामें आयके छांडि देइ तूं ऐंट
लेना है सो लेइ ले उठी जात है पेंठ.

५०९. जूआ, चोरी, मुखबिरी, ब्याज, घूस, परनार
जो चाहै दीदारको एती वस्तु निवार.
५१०. बहु बंधन ते बांधिया एक बिचारा जीव
का बल छुटै आपने जो न छुडावै पीव ?

५११. न्हाये धोये क्या भया, जो मन मैल न जाय ?
मीन सदा जलमें रहै धोये बास न जाय !
५१२. करता था, तो क्यों रहा ? अब करि क्यों पछिताय ?
बोवे पेड बबूलका आम कहां ते खाय ?
५१३. पूजा, सेवा, नेम, व्रत गुडियनकासा खेल
जबलग 'पिउ' परसै नहीं तबलग संशयमेल.
५१४. हस्ती चढिये ज्ञानका सहज दुलीचा डारि
स्वानरूप संसार है भूखन दे झक मारि.
५१५. आवत गारी एक है, उलटत होत अनेक
कह कबीर नहिं उलटिये वही एकही एक.

## ३६. उपदेश

५०६. मागतां न मोतीं मिळे; न मिळे मागुन भीक
भीक कधीं मागूं नये हीच गुरूची शीक.

५०७. त्वदर्थ कांटे पेरि, तूं तदर्थ लावी फूल
फूल तुझें लखलाभ तुज, त्याला मात्र त्रिशूळ.

५०८. जन्मुन या जगतांत तूं सोड ऐट ही थेट
घे जें घ्यायाचें तुला, जात उठोनी पेठ.

थेट–सरळ.

५०९. जुगार, चोरी, मुखबिडी, कपट, लांच, परनार
जर परमेश्वर पाहिजे, या व्यसनांना वार !

५१०. बहुत बंधनीं बांधिला जीव बिचारा एक
सुटेल कां स्वबलें, न जर करिल हरि दयासेक ?

दयासेक–दयेचा वर्षाव.

५११. न्हाउन धुवुनी काय हो, जर मनमळ नच जाय ?
मीन सदा जळिं राहतो धुवुनि वास न जाय !

५१२. करतांना हटलास कां ? केल्या कां अनुताप ?
बाभुळ पेरुन आम्र कां येतिल आपोआप ?

५१३. पूजा, सेवा, नेम, व्रत भातुकलीचा खेळ
प्रियस्पर्श जों नाहि तों संशय हा चालेल !

५१४. ज्ञानाच्या हत्तीवरी हो सहजीं आरूढ
श्वानरूप संसार हा खुशाल भुंको मूढ.

५१५. शिवी एक ये, उलट ती देतां, होति अनेक
देउं नको ती उलट, मग उरेल एकच एक.

५१६. दुर्बलको न सताइये जाकी मोटी हाय !
बिना जीवकी श्वाससे लोह भसम हो जाय.

५१७. कहतेको कहि जान दे गुरुकी तूं सिख लेइ
साकट जन औ स्वानको फिर जबाव मत देइ.

५१८. बहतेको मत बहन दे, कर गहि ऐंचहुं ठौर,
कहा, सुना मानै नहीं, बचन कहौ दुइ और.

५१९. नाम भजो, मन बसि करो, यही बात है तंत,
काहेको पढि, पचि मरो कोटिन ज्ञान, गरंथ ?

५२०. पढि पढिके पत्थर भये, लिखि लिखि भये जों ईट,
कबिरा अंतर प्रेमकी लागी नेक न छींट !

५२१. कबिरा दुनिया देहरे सीस नवावन जाय
हिरदेमाहीं हरि वसै, तूं ताही लौ लाय.

५२२. मन मथुरा, दिल द्वारका, काया कासी जान
दस द्वारेका देहरा तामें जोति पिछान.

५२३. पंडित और मसालची दोनों बूझे नाहिं
औरनको करि चांदना, आप अंधेरेमाहिं.

५२४. अपा तजो औ हरि भजो, नखसिख तजो बिकार.
सब जिउ ते निरवैर रहु साधु मता है सार.

५२५. गारीहीसों ऊपजै, कलह, कष्ट औ मीच
हारि चलै सो साधु है, लागि मरे सौ नीच.

५२६. बोलतही पहिचानिये साहु चोरको घाट
अंतरकी करनी सबै निकसै मुखकी बाट.

५१६. दुबळ्याला नच त्रासवा, त्याचा मोठा धाक !
निर्जिव भाता श्वासिं निज करि लोहाची राख.

५१७. म्हणुं दे म्हणणाऱ्यास, तूं शीक गुरुची घेइ
शाक्त आणि श्वानास तूं उत्तर उलट न देइ.

५१८. वाहत्यास वाहूं न दे, धर करिं, थांबव ठायिं,
नैके, न मने त्यास तूं पुन्हा सांगुनी पाहिं.

५१९. नाम भजा, मन वश करा, पटतें तंतोतंत !
व्यर्थ लिहा, वाचा, मरा, घोकुन कोटि ग्रंथ ?

५२०. लिहुन लिहुन बनले विटा, पढुनी गोटे ग़ोल—
त्यांच्या अंतरिं लागली नच प्रेमाची ओल !

५२१. जाई जग देवालयीं, नमवी शिर नतभाव;
हरि हृदयामाजी वसे तेथें तूं लय लाव.

५२२. मन मथुरा, हृद द्वारका, काया काशी जाण;
देव्हारीं दश द्वारिच्या, ओळख, ज्योति महान !

५२३. पंडित आणि मशालची उमग नसे दोघांस
परांस करिती चांदणें, तमीं स्वतांचा वास.

५२४. गर्व त्यजा, हरिला भजा, त्यजा समूळ विकार,
सर्व जीविं निर्वैर व्हा, हेंच साधुमतसार !

५२५. शिवीनेंच उत्पन्नती कलह, कष्ट, आतंक
ज्या न लगे ती साधु तो ! ज्यास लगे तो खंक.
खंक—हलका, सामान्य.

५२६. बोलीवरूनिच ओळखा सावकार वा चोर
निघे मुखांतुन आंत जी कळकळ वा जो जोर.

५२७. वोहू तो वैसहि भया, तूं मति होइ अयान
तूं गुणवंत, वे निरगुणी, मति एकै में सान.

५२८. पूरा साहब सेइये, सब बिधि पूरा होइ
ओछे नेह लगाइये, मूलो आवै खोइ.

५२९. पहिले बुरा कमाइकै, बांधी विषकै मोट,
कोटि कर्म मिट पलकमें आवै हरिकी ओट.

५३०. बैरागी, बिरकत भला, गिरही चित्त अुदार,
दुहुं चूका रीता पडे, ताकूं वार न पार!

५३१. कबीर हरिके नांवसूं, प्रीति रहै इकतारि
तौ मुख तैं मोती झडै, हीरे अंत न पारि.

५३२. जगमें बैरी कोइ नहीं जो मन सीतल होय
या आपाको डारि दै, दया करै सब कोय.

५२७. तसाच तो झाला, तरी तूं नच होइ अजाण
तूं सगुणी, तो निर्गुणी, व्हा नच एकसमान.

५२८. सर्व प्रकारें पूर्ण व्हा, सेवा प्रभु संपूर्ण,
स्नेह वोखटा जोडतां, मूळ हारपे तूर्ण.

५२९. बांधि विषाचें बोचकें, करि व्यवहार लबाड,
कोटि कर्म क्षणि लोपुनी, हो हरि दृष्टीआड.

५३०. विरक्त, बैरागी भला, गृहस्थ चित्ति उदार,
दोहिंकडे चुकतां जिणें वृथा इहीं, त्या पार!
त्या पार–(म्हणजे) परलोकीं.

५३१. जर हरिच्या नामासवें राहिल प्रीति अखंड
तर झडतिल वदनांतुनी मुक्ता, हीर उदंड.

५३२. जगीं कुणी वैरी नसे, असेल जर मन शीत,
करिती दया सारींजणीं, टाक दर्प, अपरीत.

---

## ३७. काम

५३३. काम, क्रोध, मद, लोभकी जबलग मनमें खान
कह मूरख, कह पंडिता दोनो एक समान.
५३४. जहां 'काम'तहां 'नाम' नहि, जहां 'नाम', नहिं 'काम'
दोनो कबहूं ना मिलै दिन, रजनी इक ठाम !
५३५. काची काया, मन अथिर, थिर थिर काम करन्त
ज्यों ज्यों नर निधरक फिरै त्यों त्यों काल हसन्त
५३६. कामी, क्रोधी, लालची इनसे भक्ति न होय
भक्ति करै कोइ सूरमा जाति, बरन, कुल खोय.
५३७. सह कामी दीपकदशा, सोखै तेलनिवास
कविरा, 'हीरा, संतजन सहजै सदा प्रकास.'
५३८. भक्ति बिगारी कामियां इंद्रीकेरे स्वाद
हीरा खोया हाथसे जनम गंवाया बाद.

५३९. 'काम-काम' सब कोइ कहै, 'काम' न चिन्हे कोय
जेती मनकी कल्पना 'काम' कहावै सोय !
५४०. परनारी राता फिरैं, चोरीं बिठतां खाइ,
दिवस चारि सरसा रहै, अंति समूला जाहिं.
५४१. नरनारी सब नरक है, जबलग देह सकाम !
कह कबीर ते रामके जै सुमिरे निहकाम !
५४२. कबीर कहता जात हूं, चेतै नहीं गंवार,
बैरागी, गिरही कहा कामी वार न पार !
५४३. ग्यानी मूल गंवाइया, आपन भये करता,
ताथैं संमारी भला, मनमैं रहै डरता.

---

## ३७. काम

५३३. काम, क्रोध, मद, लोभ जों मनांत यांची खाण
पंडित आणि मूर्ख तों दोघे एक समान !
५३४. 'काम' तिथें नच 'नाम' वा 'नाम' तिथें नच 'काम'
एकवटति दोन्ही न कधि दिन, रजनी हें ठाम !
५३५. अस्थिर मन, भंगूर तनु थेर थेर करि काम
ज़ों जों नर निर्भय, हसे तों तों यम सविराम
५३६. कामी, क्रोधी, लालची भक्ति न साधे यांस
शूर भक्ति करि, हो जरी जाति, वर्ण, कुल, नाश.
५३७ सोशि कामि, दीपकदशा, शोषी तेलनिवास,
कबीर, 'हीरक, संतजन सदैव सहज प्रकाश'
५३८. कर्मेन्द्रीय सुखाय हो भक्तिमाजि बिघाड
हिरा हातिचा हारपे ! जन्महि जाई वाद !
वाद–व्यर्थ;
५३९. 'काम-काम' म्हणतात पण कुणि न वळखती 'काम'
मनःकल्पना जेवढ्या 'काम' तयांना नाम !
५४०. परनारीं रत राहि, करि चोरिवरी चरितार्थ
प्रसन्न तो दिन चार तरि, समूळ अंतीं जात !
५४१. नरक नारिनर सर्व, हा जोंवर देह सकाम !
ते रामाचे, त्यास जे आठवती निष्काम !
५४२. कबीर उपदेशी, न हो सावध विषयासक्त,
इह, पर ठाव न, तो असो विरक्त कीं अनुरक्त !
५४३. घालविलें करूनी स्वयें ज्ञानिजनानें मूळ
त्याहुन संसारी भला मनीं भयें आकूल.

---

## ३८. क्रोध

५४४. कुबुधि कमानी चढ़ि रही, कुटिल वचनका तीर,
भरि भरि मारै कानमें, सालै सकल सरीर.
५४५. मधुर वचन है औषधी, कटुक वचन है तीर
श्रवणद्वार ह्वै संचरै, सालैं सकल सरीर.
५४६. दसो दिसासे क्रोधकी उठी अपरबल आगि
सीतल संगति साधुकी तहां उबरिये भागि.
५४७. करक करेजे गडि रही वचन वक्षकी फांस
निकसाये निकसै नहीं, रहीसो काहू ग्रास ?
५४८. कुटिल वचन सबसे बुरा जारि करै तन छार
साधबचन जलरूप है बरसै अमृतधार !

५४९. कोटि परम लागे रहै एक क्रोधकी लार
किया कराया सब गया जब आया हंकार !

---

## ३९. लोभ

५५०. माखी गुडमें गडि रही पंख रह्यो लिपटाय
हाथ मलै औ सिर धुनै लालच बुरी बलाय !
५५१. कबिरा त्रिस्ना पापिनी तासौं प्रीति न जोरि
पेंड पेंड पाछे परै, लागै मोटी खोरि !
५५२. कबिरा औंधी खोपडी कबहूं धापै नाहिं
तीन लोककी संपदा कब आवै घरमाहिं ?
५५३. आब गई, आदर गया, नैनन गया सनेह
ये तीनों तबही गये जबहिं कहा कछु देह.
५५४. बहुत जतन कर कीजिये वो फल जो न नसाय
कबिरा संचय सूमधन अंत चोर लै जाय.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम 32823 दि:

## ३८. क्रोध

क्रमांक ... नों दि ...

५४४. कमान कुमतीची चढे, कुटिल वचाचा तीर !
विंधी कानीं वेधुनी सोली सकल शरीर !

५४५. असे मधुरवच औषधी, असति कटुवचें तीर
श्रवणद्वारीं संचरुनि सोलति सकल शरीर.

५४६. उठे भडकुनी दशदिशीं झणिं क्रोधाची आगि
शीतल संगति साधुची घ्या आश्रय त्या जागि.

५४७. काळिजास कोरुन बसे वचनाचा दृढ फांस
निघतांही न निघे मुळीं ! करिल कुणाचा ग्रास ?

५४८. वाइट कटुवचसें नसे तनु जाळी, करि क्षार.
साधु वचन जलरूप जें वर्षि रसामृतधार !
क्षार–( मृत्तिका )

५४९. क्रोधाच्या लहरींवरी लहरि न त्यांस प्रमाण
गेलें, केलें, करवलें ये जेव्हां अभिमान !

---

## ३९. लोभ

५५०. गुळांत माशी अटकली, चिकटुन वसले पंख
पद घाशी, शिर हापटी; लोभ, पाप निःशंक !

५५१. कबिरा तृष्णा पापिणी तिजशिं न प्रीती जोड
पदोपदीं पिच्छा तिचा, तिज ही वाइट खोड !

५५२. कबीर अर्धे टाळकें थकत कधींही नाहि,
त्रैलोक्याची संपदा घरिं ये कधि हें पाहि.

५५३. गेला आदर, आबरू, लोचनांतला स्नेह,
गेले हे तीन्ही यदा वदला 'दे' हा देह.

५५४. जें निष्फल ना होय तें करा जतन निर्घोर
धनसंचय करि कृपण परि अंतीं तो ने चोर.
निर्घोर–निर्भयपणे.

---

## ३८. क्रोध

५४४. कुबुधि कमानी चढ़ि रही, कुटिल वचनका तीर,
भरि भरि मारै कानमें, सालै सकल सरीर.
५४५. मधुर वचन है औषधी, कटुक वचन है तीर
श्रवणद्वार ह्वै संचरै, सालैं सकल सरीर.
५४६. दसो दिसासे क्रोधकी उठी अपरबल आगि
सीतल संगति साधुकी तहां उवरिये भागि.
५४७. करक करेजे गडि रही वचन वक्षकी फांस
निकसाये निकसै नहीं, रहीसो काहू ग्रास ?
५४८. कुटिल वचन सबसे बुरा जारि करै तन छार
साधबचन जलरूप है बरसै अमृतधार !

५४९. कोटि परम लागे रहै एक क्रोधकी लार
किया कराया सब गया जब आया हंकार !

---

## ३९. लोभ

५५०. माखी गुडमें गडि रही पंख रह्यो लिपटाय
हाथ मलै औ सिर धुनै लालच बुरी बलाय !
५५१. कबिरा त्रिस्ना पापिनी तासौं प्रीति न जोरि
पैंड पैंड पाछे परै, लागै मोटी खोरि !
५५२. कबिरा औंधी खोपडी कबहूं धापै नाहिं
तीन लोककी संपदा कब आवै घरमाहिं ?
५५३. आब गई, आदर गया, नैनन गया सनेह
ये तीनों तबही गये जबहिं कहा कछु देह.
५५४. बहुत जतन कर कीजिये वो फल जो न नसाय
कबिरा संचय सूमधन अंत चोर लै जाय.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थापना
अनुक्रम 32823 वि: ...
क्रमांक 9442 नों दि 8/3/62

## ३८. क्रोध

५४४. कमान कुमतीची चढे, कुटिल वचाचा तीर!
विंधी कानीं वेधुनी सोली सकल शरीर!
५४५. असे मधुरवच औषधी, असति कटुवचें तीर
श्रवणद्वारी संचरुनि सोलति सकल शरीर.
५४६. उठे भडकुनी दशदिशीं झंणि क्रोधाची आगि
शीतल संगति साधुची घ्या आश्रय त्या जागि.
५४७. काळिजास कोरुन बसे वचनाचा दृढ फांस
निघतांही न निघे मुळीं! करिल कुणाचा ग्रास?
५४८. वाइट कटुवचसें नसे तनु जाळी, करि क्षार.
साधु वचन जलरूप जें वर्षि रसामृतधार!
क्षार–( मृत्तिका )
५४९. क्रोधाच्या लहरींवरी लहरि न त्यांस प्रमाण
गेलें, केलें, करवलें ये जेव्हां अभिमान!

---

## ३९. लोभ

५५०. गुळांत माशी अटकली, चिकटुन बसले पंख
पद घाशी, शिर हापटी; लोभ, पाप निःशंक!
५५१. कबिरा तृष्णा पापिणी तिजशिं न प्रीती जोड
पदोपदीं पिच्छा तिचा, तिज ही वाइट खोड!
५५२. कबीर अर्धें टाळकें थकत कधींही नाहि,
त्रैलोक्याची संपदा घरि ये कधि हें पाहि.
५५३. गेला आदर, आबरू, लोचनांतला स्नेह,
गेले हे तीन्ही यदा वदला 'दे' हा देह.
५५४. जें निष्फल ना होय तें करा जतन निर्घोर
धनसंचय करि कृपण परि अंतीं तो ने चोर.
निर्घोर–निर्भयपणें.

---

## ४०. मोह

५५५. दर्पणकेरी बावडी सुनहा पैठोधाय
देखत प्रतिमा आपनी भुंक भुंक मरि जाय.
५५६. मोह फंद सब फांदिया कोन सके निरवार
कोउ साधू जनपारखी विरला तत्त्वविचार.
५५७. भर्म परा तिहुं लोकमें, भर्म बसा सब ठाउं
कहहि कबीर पुकारके, "बसे भर्मके गाउं."
५५८. रतन अडाइन रेतमें, कंकर चुनि चुनि खाय
कहहि कबीर पुकारिकै, "बहुरि चलै, पछिताय."

---

## ४१. अहंकार

५५९. बडा हुआ तो क्या हुआ जैसा पेड खजूर?
पंछीको छाया नहीं, फल लागै अति दूर!
५६०. कबीर गर्व न कीजिये काल गहे कर केस
ना जानौ कित मारि है क्या घर, क्या परदेस!
५६१. माया त्यागे क्या भया? मान तजा नहिं जाय!
जेहि मानै मुनिवर ठगै मान सबनको खाय!
५६२. कबिरा गर्व न कीजिये ऊँचा देख निवास
काल्ह परो भुइ लेटना, ऊपर जमसी घास.

५६३. प्रभुताको सब कोउ भजै, प्रभुको भजै न कोय,
कह कबीर, प्रभुको भजै, प्रभुता चेरी होय.
५६४. जहं 'आपा' तहं 'आपदा,' जहं 'संशय, तह 'सोग'
कह कबीर कैसे मिटै चारों दीरघ रोग?
५६५. मान बडाई जगतमें कूकरकी पहिचानि
मीत किये मुख चाटही, बैर किये तनहानि!
५६६. 'मैं,' 'मैं,' 'मेरी' जिनि करै, 'मेरी' मूल विनास
मेरी पगका पैषंडा, मेरी गलकी पास.

---

## ४०. मोह

५५५. दर्पणसें सर देखुनी श्वान जाय धावून
पडछाया बघुनी, मरे तें भुंकुन भुंकून.
५५६. मोहपाश पडला, तया कुणि न निवारी पार
विरळा साधू पारखी करि जो तत्त्वविचार.
५५७. त्रिभुवनांत भ्रम पसरला, भ्रमांत अवघे ठाव,
कबीर ओरडुनी म्हणे,—"भ्रमांत वसला गांव."
५५८. रत्न सैकतीं झाकलें, कण कण वेंचुन खाय,
कबीर ओरडुनी म्हणे,—"मग पस्तावे,—हाय!"

---

## ४१. अहंकार

५५९. मोठा झाला वाढला जैसा वृक्ष खजूर
पक्ष्यांना नच साउली, फळें लागती दूर!
५६०. कबीर गर्व करूं नका काळ धरी करिं केश
न कळे, कोठें वधिल तो, देश काय परदेश!
५६१. माया त्यजुनी काय हो? मान न त्यजिला जाय!
ज्या मानें ठकले मुनी, तो सर्वांना खाय!
५६२. कबिरा, गर्व करूं नये देखुन उंच निवास
उद्यां भुईवरतीं पडूं, उगेल वरती घास.
घास—चारा.
५६३. सर्व भजति प्रभुतेस परि प्रभुस न भजती कोणि
प्रभु भजतां, प्रभुता ठरे घरिं चेली होवोनि.
५६४. 'अहं' जिथें, विपदा तिथें,—'संशय' तेथें 'शोक'
नष्ट कसें होतील हे चार रोग बिनधोक?
५६५. मान, बढाई ओळखा दोघीं कुत्र्यावाणि
सख्य करा—मुखचाटती; वैरकरा—तनुहानि!
५६६. 'माझें, माझें,' ना करी, 'माझें'—मूळ विनाश!
माझ्या पायींची बिडी-माझ्या गळिचा फास!

## ४२. कपट

५६७. कबिरा तहा न जाइये जहां कपटका हेत
जानो कली अनारकी तन राता, मन स्वेत.

५६८. दुर्जन दर्पनसम सदा करि देखो हिय गौर
सन्मुखकी गति और है विमुख भये कछु और.
५६९. चित कपटी सबसों मिलै माहीं कुटिल कठोर
इक दुरजन, इक आरसी आगे पीछे और.
५७०. हेत प्रीतिसे जो मिलै ताको मिलिये धाय
अंतर राखै जो मिलै तासों मिलै बलाय.

५७१. कबीर आप ठगाइये, और न ठगिये कोय,
आप ठगै सुख ऊपजै, और ठगे दुख होय.

---

## ४३. आशा

५७२. आसन मारे क्या भया ? मुई न घरकी आस !
ज्यों तेलीके बैलको घरही कोस पचास !
५७३. आसाका ईंधन करूं ? मनसा करूं भभूत ?
जोगी फिरि फेरी करूं ? यों बनि आवै सूत !
५७४. 'आस' एक जो नामकी, दूजी आस 'निरास'
पानीमाहीं घर करै सौभी मरै पियास.

५७५. कबिरा जोगी जगतगुरु, तजै जगतकी आस,
जो जगकी आसा करै जगत गुरु, वह दास.
५७६. आसा जीवै; जग मरै; लोग मरै; मन जाहि
धन संचै सो भी मरै; उबरै सो धन खाहि.

---

## ४२. कपट

५६७. कबीर तिथं जाऊं नये जिथ कपटाचा हेत
डाळिंबी दाणा जसा तन रातें, मन श्वेत.
तन–('तनु' शुद्ध)

५६८. दुर्जन दर्पणसम सदा पहा! करून विचार
वर्तणुकीचे संमुखीं विमुखीं भिन्न प्रकार!

५६९. वरिवरि भेटे कपटि परि अंतरिं कुटिल कठोर
दुर्जन, दर्पण वेगळे मागें आणि समोर!

५७०. प्रीतीपूर्वक जो मिळे सहर्ष भेटा त्यास
अंतर राखुन जो मिळे, भेट तयाची त्रास!
मिळे–भेटे ('मीलन'पासून)

५७१. परास कधि ठकवूं नये, परी ठकावें आप
आपण ठकतां मोद हो पण पर ठकतां ताप

---

## ४३. आशा

५७२. आसन मारुन काय हो? मरे न मनिंची आस!
घाण्याच्या बैलास घर कोस जसें पन्नास!

५७३. आशेचें ईंधन करूं? करुं मनिषेची राख?
जोगि बनुन फिरुं? सूत हें जुळेल टांकोटांक!

५७४. 'आस' नांव एकीस तर, दुजीस नांव 'निरास'
जळांत घर ज्याचें मरे तोही लागुन प्यास
प्यास–तहान.

५७५. योगी जगताचा गुरू, त्यजी जगाची आस,
जगताची आशा करी, जग तद्गुरु, तो दास.

५७६. आशा जीवे; जग मरे; जन मरती, मन राहि;
धन संग्राहकही मरे, पिशाच्च हो, धन खाइ.

---

## ४४. तृष्णा

५७७. कीं तृस्ना है डाकिनी, कीं जीवनका काल,
और और निसदिन चहै, करै जिवन बेहाल.

## ४५. निद्रा

५७८. कबिरा सोया क्या करे ? उठि न भजै भगवान ?
जम जब घर लै जायंगे, पडा रहैगा म्यान !
५७९. कबिरा सोया क्या करैं जागनकी करुं चौंप
ये दम हीरा, लाल है गिनि गिनि गुरुको सौंप.
५८०. सोता साध जगाइये, करै नामका जाप
यह तीनों सोते भले साकत, सिह औ साप.
५८१. नींद निसानी मीचकी, उठ्ठ, कबीरा जाग,
और रसायन छांडिकै नामरसायन लाग.

## ४६. निंदा

५८२. तिनका कबहुं न निंदिये जो पांवनतर होय
कबहुं उडि आंखिन परै पीर घनेरी होय.
५८३. निंदक नियरे राखियै आंगन कुटी छबाय
बिनपानी, साबुनबिना, निर्मल करै सुभाय.
५८४. निंदक एकहु मति मिलै, पापी मिलौ हजार,
इक निंदकके सीसपर कोटि पापको भार.
५८५. दोष पराया देखिकरि चले हसंत हसंत
अपने याद न आवई जाको आदि न अन्त.
५८६. सातो सायर मैं फिरा, जंबुद्वीप दै पीठ
निंद पराई ना करै, सो कोइ परला दीठ.

## ४४. तृष्णा

५७७. तृष्णा ही डाकिण असे, असे 'जिण्या' चा काळ,
'हवें हवें' निशिदिनि करी, होति जिवाचे हाल.

---

## ४५. निद्रा

५७८. निजसि काय रे उठुनि कां भजसी ना भगवान?
यम जेव्हां नेईल घरिं, पडेल उघडें म्यान!
५७९. निजुनी करिसी काय रे? जाग, टाकुनी झोंप;
लाल, हिरे वेळींच ह्या मोजुन गुरुला सोंप.
५८०. उठवा निद्रित साधु, करि नामाचा जपजाप
तिघे झोपलेले भले सिंह, छाकटे, साप.
५८१. मृत्युचिन्ह निद्रा त्वरें सोड कबीरा! सोड
रसायनें त्यजि अन्य; घे नामरसायन गोड.

---

## ४६. निंदा

५८२. कुसळाला निंदूं नका पायतळीं जरि राहि
तें उडुनी नयनीं शिरे, ठणका थांबत नाहिं!
५८३. निंदक शेजारीं वसो, परसिं करो घरठाव
साबु नको, पाणी नको, तो करि विमल स्वभाव.
५८४. मिळो न निंदक एकही, मिळोत पापि हजार,
एक निंदकाच्या शिरीं कोटी पातकभार.
५८५. दोष पराचे पाहुनी हासत हासत जाइ
दोष आपुले नाठवी सीमा ज्यांना नाहिं.
५८६. सप्त सिंधु मी हिंडलों जंबुद्वीपपासोनि
परनिंदा न करी असा विरळा येइ दिसोनि.

---

## ४७. माया

५८७. आंधी आई ज्ञानकी, उडी भरमकी भीति,
मायाटाटी उडि गई, लगी 'नाम'से प्रीति.
५८८. माया छाया एकसी बिरला जानै कोय
भगताके पीछे फिरै, सनमुख भागै सोय.
५८९. 'माया' तो ठगनी भई, ठगत फिरै सब देस
जा ठग या ठगनी ठगी, ता ठकको आदेस!
५९०. कबिरा माया मोहनी मोहे जान सुजान
भागे हूं छूटै नहीं, भरिभरि मारै बान.
५९१. मन, माया तौ एक है, माया मनहिं समाय
तीन लोक संसै परा कांहि कहौं समुझाय?

५९२. माया तो है रामकी, मोदी सब संसार
जाकी चिठ्ठी ऊतरी सोही खरचनहार.
५९३. माया संचै संग्रहै, 'वह दिन' जानै नांहि
साहस बरसका बरस करै, मरै महूरतमांहि
५९४. कबिरा माया रूखडी दो फलकी दातार
खोवत खरचत मुक्ति भे, संचत नरक दुआर.
५९५. मायाके झक जग जरै कनक कामिनीलागि.
कह कबीर कस बांचि है रूईलपेटी आगि?

५९६. मैं जानूं हरिसे मिलूं, मो मन मोही आस
हरिबिच डारै अंतरा माया बडी पिचास!

## ४७. माया

५८७. 'ज्ञाना'चें ये मळभ तों उडे 'भ्रमा'ची भीति,
'माये'ची ताटी उडे, हो 'नामा'शीं प्रीति.

५८८. पळत्या पाठीं धावती माया, छाया दोन
धीट तोंड दे त्यापुढें पळति; न जाणे कोण ?

५८९. 'माया' तर मोठी ठकी, ठकवित फिरते प्रांत
ठकवी त्या ठकिलाहि जो त्या ठकास प्रणिपात !

५९०. कबीर माया मोहिनी मोही जाण, सुजाण
धावावें तरि सोडिना, वरिर्वरि सोडी बाण.

५९१. मन, माया ना वेगळीं, मनांत माया माय
त्रिलोकास संशय पडे कथूं, बुझावूं काय ?
माय–मावते;

५९२. 'माया' रामाची असे, मोदिं सकल संसार,
ज्याला हुंडी पावली तोच खर्च करणार.

५९३. 'माया'संचय संग्रही, 'तो दिन' जाणत नाहिं
साहस वर्षोवर्षि करि, मरे मुहूर्तीं; पाहि.

५९४. कबीर माया तरु, जणूं दोन फळें देणारि
उधळ खर्च दे मुक्ति; ने संचय नरकद्वारिं

५९५. झुरे जगत मायेमुळें कनक कामिनीसाठिं
कशा वांचतिल आगिनें वेढियल्या रुइगांठि ?
गांठी–गठाणी

५९६. आसमनीं घेईन कीं भेटी हरिची गाढि
पिशाच्चिनी माया परी उभयीं अंतर पाडि !

५९७. माया तरवर त्रिविधिका, साख विषयसंताप,
सीतलता सपने नहीं, फल फीका, तन ताप.

५९८. जिनको सांई रंग दिया, कभी न होइ कुरंग
दिन दिन बानी आगरी, चढै सवाया रंग.

५९९. माया दीपक, नर पतंग, भ्रमि भ्रमि माहि परंत
कोइ एक गुरु ज्ञान तें उबरे साधू सन्त

६००. मीठा सब कोइ खात है, विष व्है लागै धाय,
नीब न कोई पीवसी, सर्व रोग मिट जाय.

६०१. कबीर माया डाकिणी सब किसहूं कूं खाइ
दांत उपाडौ पापिणी जे संतौ नेडि जाइ.

६०२. कबीर माया पापिणी फंध लै बैठी हाटि
सब जग तौ फंधै पडचा ! गया कबीरा काटि !

---

५९७. माया त्रिविधीचा तरू; लता विषयसंताप,
शीतलता स्वप्नीं नसे, फळें फिकीं, तनु ताप.

५९८. रंग ज्यास देवें दिला, हो न कधीं बेरंग
दिनिंदिनिं वाणी प्रस्फुरे, चढे सवाई रंग.

५९९. नर पतंग, माया दिवा, जळती झड घालून
साधु संत पण वांचती कारण गुरुची खूण !

गुरुची खूण—गुरुप्रणीत ज्ञान.

६००. गोड रुचे सर्वांस, विष होतां करिति विलाप
पी न निंब कुणि, लोपती सकल रोग संताप.

६०१. कबीर माया डंकिणी ही सर्वांना खाय,
दांत उपटतिल संतजन म्हणुनी जवळि न जाय.

६०२. हाटीं माया पापिणी बसे, करीं घे पाश,
जग सगळें फांशीं पडे ! कबीर तोडी त्यास !

---

## ४८. कनक आणि कामिनी

६०३. परनारी पैनी छुरी मत कोइ लावो अंग
रावनके दस सिर गये परनारीके संग.

६०४. नारीकी झांई परत अंधा होत भुजंग
कबिरा तिनकी कौन गति नित नारीको संग ?

६०५. 'चलों चलों' सब कोइ कहै, पहुंचे बिरला कोय
एक कनक औ कामिनी दुरगम घाटी दोय

६०६. परनारी पैनी छुरी, बिरला बांचै कोय,
ना वहि पेट संचारिये सब सोनेकी होय.

६०७. दीपक सुन्दरि देखिकै जरि जरि मरै पतंग
बडी लहर जो विषयकी जरत न मोडै अंग.

६०८. सांप बीछिको मन्त्र है, माहुर झारे जात
विकट नारि पाले परी काटि करेजा खात !

६०९. कनक, कामिनी देखिकै तूं मति भूल सुरंग
बिछुरन मिलन दुहेलरा केंचुकि तजै भुजंग.

६१०. कामी लज्या ना करै, मनमांहे अहिलाद;
नींद न मांगै सांथरा, भूष न मांगै स्वाद.

६११. एक कनक अरु कामिनी, दोउ अगिनिकी झाल,
देखेंही तन प्रज्वलै, परस्यां व्है पैमाल.

६१२. एक कनक अरु कामनी, विषफल कं य उपाइ
देखैंही थै विष चढै, खायें सूं मरि जाइ.

# ४८. कनक आणि कामिनी

६०३. धारदार परनार सुरि कुणी न लावा अंगि
दशमुख गमवी दशशिरें परनारीच्या संगि.
६०४. छाया नारीची पडे होई अंध भुजंग
गति तयांची कोणती नित्य नारिचा संग ?
६०५. 'चला-चला' म्हणती सकल, पोंचे विरला कोणि
कनक आणखी कामिनी दुर्गम घाटचा दोन्हि.
६०६. धारदार परनार सुरि विरला वांचे कोणि
सोन्याची म्हणुनी उरीं घ्यावी कां खुपसोनि ?
६०७. सुन्दर दीपक देखुनी जळुनी मरे पतंग
विषयलहर हेलावतां वळे न जळतां अंग !
६०८. वृश्चिक, सर्पावरि असे मंत्र झडुन विष जाय,
विकट नार पदरीं पडे काळिज तोडुन खाय !
६०९. भुलुं नकोस तूं देखुनी कनक, कामिनी रंग
भेटि तुटी दोहरि जसा त्यजितां कात भुजंग !
६१०. कामुकास लज्जा नसे, मनिं मानी आल्हाद;
निजेस न लगे हातरी, भुकेस न लगे स्वाद.
६११. कनक आणखी कामिनी दोन अग्निचे लोळ
देखतांच तनु प्रज्ज्वळे, ऐकतांच हो कोळ.
कोळ होणें—वाळून कोळ कोळसा होणें.
६१२. कनक आणखी कामिनी फळें विषारी दोन,
देखतांच हीं विष चढे, खातां न मरे कोण ?

———

## ४९. कुल-शील

६१३. चात्रिक सुतहि पढावही आन नीर मति लेय
मम कुल यही स्वभाव है स्वातिबूंद चित देय.

६१४. सीलवंत सबतें बडा, सर्व रतनकी खानि
तीन लोककी संपदा, रही सीलमें आनि

६१५. ज्ञानी, ध्यानी, संजमी, दाता, शूर अनेक,
जपिया, तपिया बहुत है सीलवंत कोइ एक !

६१६. सुखका सागर सील है कोइ न पावै थाह
सब्दविना साधू नहीं, द्रव्यविना नहिं साह.

६१७. ऊंची जाति पपीहरा, पियै न नीचा नीर,
कै सुरपतिको जांचई, कै दुख सहै सरीर.

६१८. तरुवर तासु विलंबिये बारह मास फलंत,
सीतल छाया, सघन फल, पंछी केल करंत.

६१९. सील, छिमा जब ऊपजै, अलख दृष्टि तब होय.
बिना सील पहुंचे नहीं लाख कथै जो कोय !

६२०. कबिरा सीप समुद्रकी, खारा जल नहिं लेय,
पानी पावै स्वातिका, सोभा सागर देय.

६२१. ऊंचा कुलके कारणै बंस बध्या अधिकार.
चंदनबास बिध्या नहीं, जाल्या सब परिवार !

## ४९. कुल-शील

६१३. पिलास चातक बोध करि,–" पिऊं नको जल आन
कुल स्वभावरीत्या करी स्वातिजलाचें पान.

६१४. रत्नांची खनि शीलधर, सर्वांहुन तो श्रेष्ठ
तीन जगांची संपदा राहे शीलिं यथेष्ट.

६१५. ज्ञानी, ध्यानी, संयमी, दाते, शूर अनेक,
जपी, तपी असती बहू, शीलवंत पण एक !

६१६. शील सुखाचा जलनिधी, कुणा न लागे ठाव;
शब्दाविण साधू नसे, द्रव्याविण नच साव.

६१७. जातिवंत चातक कधीं पी न खालचें नीर,
सुरपतिची करि याचना वा पीडी स्वशरीर.

६१८. अवलंबी तरु तोच जो फळतो बारा मास,–
जो दे घन छाया, फळें, खग क्रीडेस निवास.

६१९. शील, क्षमा उपजति तदा अलक्ष्य दृष्टी राहि
पोंच नसे शीलाविना, म्हणो लाख कुणि कांहि !

६२०. सागरांतला शिपला खारें पाणि न घेइ
पावे पाणी स्वातिचें, अब्धिस शोभा देइ.

६२१. उच्च वंश म्हणुनी दिला 'वंशाला अधिकार !
चंदन गंध न लोपला, जाळला स्वपरिवार !

———

## ५०. क्षमा

६२२. छमा बडनको चाहिए, छोटोंको उत्पात
विष्णूको बिगडो कहाँ जो भृगु मारी लात ?
६२३. खूंदन तो धरती सहै, बाढ सहै बनराइ,
संत सहै दुर्जनबचन, दुजै सहा न जाइ.

६२४. करगससम दुरजनबचन रहैं संतजन टारि
बिजुरी परै समुद्रमें कहा सकेगी जारि.
६२५. जहां 'दया' तहं 'धर्म' है; जहां 'लोभ' तह 'पाप'
जहां 'क्रोध' तह 'काल' है, जहां 'छिमा' तहं 'आप'

---

## ५१. औदार्य

६२६. जो जल बाढै नावमें, घरमें बाढै दाम,
दोऊ हाथ उलीचिये यह सज्जनको काम.
६२७. रितु बसंत जाचक भया, हरखि दिया द्रुम पात
तातें नवपल्लव भया, दिया दूर नहिं जात !
६२८. हाडबडा हरिभजन कर, द्रव्य बडा कछु देय,
अकल बडी उपकार कर, जीनवका फल येह.
६२९. देहधरे का गुन यही 'देहु देहु कछु देहु'
बहुरि न देही पाइये अबकि देहु सो देहु.

---

## ५०. क्षमा

६२२. थोरांना साजे क्षमा, क्षुद्रांना उत्पात
काय हरीचें बिघडलें भृगुची खातां लाथ ?

६२३. सहन करी उत्खनन भू, कृंतनकर्तन रान
संत सोशि दुर्जनवचें तीं न सोशि कुणि आन !

कृंतनकर्तन—तोडणें व कापणें.

६२४. दुष्टशब्दशर टाळिती संत सहिष्णु उदार
आग न लागे सागरीं जरि हो वज्रप्रहार !

६२५. 'धर्म' तिथें जेथें 'दया'; 'लोभ' त्या तिथें 'पाप'
'क्रोध' त्या तिथें 'काळ'ही, 'क्षमा' तिथें 'प्रभु' आप.

---

## ५१. औदार्य

६२६. जळ नौकेमधि वाढतां, गृहीं वाढतां दाम,
ओंजळ ओंजळ ओतणें हें सुजनांचें काम !

६२७. वसंत याचक जाहला द्रुम हर्षें दे पान,
नवोन्मेष त्यांचे; दिलें वृथा न जाई दान !

६२८. हाडपेर दृढ देव भज, द्रव्य बहुत दे दान,
बुद्धि तीव्र उपकार कर, हें जीवनफल जाण

६२९. चिह्न देहिचें हेंच कीं 'देहिं कांहितरि देइ'
देह पुन्हा ना यायचा द्यायाचें तें 'देहि !'

---

## ५२. संतोष

६३०. चाह गई, चिन्ता मिटी, मनुजा बेपरवाह,
जिनको कछु ना चाहिये सोई साहंसाह.

६३१. गोधन, गजधन, वाजिधन और रतनधन, खान,
जब आवै सन्तोषधन, सबधन धूलि समान !

६३२. मरि जाऊं, मांगूं नहीं, अपने तनके काज
परमारथके कारने मोहिं न आवै लाज.

६३३. 'मैं', 'मेरी' सब जायगी, तब आवैगी और
जब यह निश्चल होयगा तब पावैगा ठौर.

---

## ५३. धैर्य

६३४. धीरे धीरे रे ! मना, धीरे सब कुछ होय
माली सींचै सौ घड़ा ऋतु आये, फल होय.

६३५. कबिरा धीरजके धरे हाथी मनभर खाय,
टूक एकके कारने स्वान घरै घर जाय.

६३६. करताकी गति अगम है, तूं चलि निज उनमान
धीरै धीरै पांव दै, पहुंचेंगे परबान !

---

## ५२. संतोष

६३०. गेलि चहा, चिंता निमे, मानव बेपरवाह
ज्यालागीं कांही नको तोच शहांचा शाह.

६३१. गोधन, गजधन, वाजिधन आणि रत्नधन, खाण
येत यदा संतोषधन अवघे धूळिसमान !

६३२. मरेन, नच मागेन मी, असेल जर मम काज,
परमार्थास्तव मागतां मला न कसली लाज !

६३३. 'गेलों मी, मम सकल' तरि होइल आणखि आय
हें निश्चित होइल तदा मिळेल निश्चल ठाय.

---

## ५३. धैर्य

६३४. धीरे धीरे ! रे मना, धीरे सारें होय
शत घट सिंची माळि; ये ऋतू, फलागम होय.

६३५. धीर धरी म्हणुनी बघा ! हत्ति मणभर खाय,
एका तुकड्यास्तव परी श्वान घरोघर जाय.

६३६. कर्त्याची गति अगम रे ! निजोन्मनीं तूं चाल
टाक हळुहळू पाउलें पोंचूं खास खुशाल !

---

## ५४. दीनता

६३७. लघुतासे प्रभुता मिलै, प्रभुतासे प्रभु दूरि
चींटी शक्कर लै चली, हाथीके सिर धूरि.

६३८. दीन लखै मुख सबनको, दीनहि लखै न कोय
भली बिचारी दीनता नरहु देवता होय!

६३९. उंचे पानी ना टिकै, नीचेही ठहराय,
नीचा हो सौ भरि पिवै, उंचा प्यासा जाय.

६४०. दीन, गरीबी, बंदगी साधन सो आधीन
ताके संगमें यों रहूं ज्यो पानीसंग मीन.

६४१. दीन, गरीबी, बंदगी सबसे आदरभाव
कह कबीर तेई बडा जामें बडा सुभाव!

६४२. सबतें लघुताई भली, लघुतातें सब होय
जस दुतियाको चंद्रमा सीस नवै सब कोय.

६४३. नीचे नीचे सब तरै जे थै बहुत अधीन
चढ वोहित अभिमानकी बूडे उंच कुलीन.

६४४. कबिरा नवै सो आपको, परको नवै न कोय?
घालि तराजू तौलिये नवै सो भारी होय!

६४५. बुरा जो देखन को चला, बुरा न मिलिया कोय,
जो दिल खो जो आपना मुझसा बुरा न होय.

---

## ५५. दया

६४६. दया कौनपर कीजिये? कापर निर्दय होय?
सांईके सब जीव है कीरी, कुंजर दोय!

६४७. दयाभाव हिरदै नहीं, ज्ञान कहै बेहद्द
ते नर नरकहि जाहिंगे सुनि सुनि साखी शब्द.

६४८. जिव जनि मारहु बापुरा! सबका एकै प्रान!
हत्या कबहुं न छूटि है, कोटिन सुनहु पुरान.

---

## ५४. लीनता

६३७. लघुतेनें प्रभुता मिळे, प्रभुतेनें प्रभु दूर
मुंगी साखर ने, करीशिरीं धूळ भरपूर.
६३८. लीन पाहि सर्वांकडे, लीनास न कुणि पाहि,
भली बिचारी लीनता सुर होउन नर राहि!
६३९. पाणि न उंचावर टिके, पण वाहे खोलांत,
तें ज़ो वाके तोच पी, राही ताठ तृषार्त.
६४०. नमन, दीनता, लीनता, साधनशत आधीन
राही त्यांच्या संगि मी जसा जलासह मीन.
६४१. नमन, दीनता, लीनता सकलीं आदरभाव,
थोर खरोखर तोच कीं ज्याचा थोर स्वभाव!
६४२. लहान पण बरवें, घडे त्यानें सारें कांहि
चंद्र द्वितीयेचा वदा, वंद्य कुणाला नाहिं?
६४३. सान सान तरले सकल होते जे आधीन
अभिमानाच्या होडगीं बुडले उच्च कुलीन.
६४४. नमी स्वतांसच जो नमे; नमे पराला कोण?
लवे पारडें तें असे भारि; बघा, तोलोन!
६४५. निघे बघाया नीच, ना भेटे कोणी नीच,
हृदय चांचपुन पाहतां नीच मजपरी मीच.

---

## ५५. दया

६४६. राग कुणाचा कां करा? कां कोणाची कींव?
मुंगी, हत्ती उभयतां परमेशाचे जीव!
६४७. दया भाव हृदयीं नसे, ज्ञान कथी बेहद्द
नरकीं नर पडतील ते ऐकुन साकीशब्द.
६४८. जीव न मारा बापुडा! सकलीं एकच प्राण!
पातक धुतलें जाइना! ऐका, पोथिपुराण!

---

## ५६. सत्य

६४९. साँचे कोइ न पतिजई, झूटे जग पतियाय
गली गली गोरस फिरै, मदिरा बैठि बिकाय !
६५०. सांच बराबर तप नहिं, झूठ बराबर पाप,
जाके हिरदे सांच है ता हिरदे गुरु आप.

६५१. सांचे श्राप न लागई, सांचे काल न खाय,
सांचेको सांचा मिलै, सांचेमाहिं समाय.

६५२. सांचबिना 'सुमिरन' नहीं, भयबिन 'भक्ति' न होय,
पारसमें परदा रहै कंचन केहि बिधि होय ?
६५३. सांच कहूं तो मारि है, झूठे जग पतियाय
ये जग काली कूकरी जो छेडै ता खाय.
६५४. सांईमें 'साचा' रहै, सांई 'साच' सुहाय,
भावै लंबे केस रख, भावै घोट मुंडाय.
६५५. कबिर प्रीत इक पिउ किए, आन दुबीधा जाइ
भावै लंबे केस करु, भावै धरहि मुंडाइ.
६५६. पहिर प्रीतिका चोलना भक्त कबीरा नाच
तन, मन तोपर वारूं जो कोइ बोले साच
६५७. सब तें सांचा है भला, जो दिल सांचा होइ
सांचबिना सुख होय ना कोटि करै जो कोई.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्वामित्व.
अनुक्रम 32823 वि: ...
क्रमांक 9440 नों. दि. 6/3/62

## ५६. सत्य

६४९. खऱ्यास पातेजें न जग, पातेजें खोटयास,
ओळ ओळ गोरस फिरे, बैठा मदिरा-वास !

६५०. तप नाहीं सत्यापरी, असत्यापरी पाप,
सत्य हृदीं ज्याच्या असे त्याच्या हृदिं गुरु आप.
आप–स्वयें;

६५१. सत्या शाप न बाधतो, सत्या काळ न खाइ,
सत्याला सत्यच मिळे, तें सत्यांतच माइ.
मिळे–भेटतें; माइ–मावतें.

६५२. 'स्मरण' न हो सत्याविना, 'भक्ति' भयाविण हो न,
परिसिं आडपडदा असे होइल कनक कुठोन ?

६५३. 'साच' कथा तर मारि, धरि 'खोटया'वरि विश्वास
ही दुनिया काळी शुनी चावे, छेडी त्यास.

६५४. 'सत्य' स्वामिला आवडे, 'सत्य' तयासह राख,
वाढव केस हवे तरी किंवा काढुन टाक.

६५५. निष्ठा स्वामीला रुचे, निष्ठा त्याशीं राख,
वाढव केस हवे तरी किंवा घोटुन टाक.

६५६. प्रीतिचोळणा घालुनी कबीर नाचे नाच
ओवाळी त्यावरुनि तनु, मन जो बोले साच

६५७. सर्वांहुन 'सच्चा' भला, हृदयिं असे जर साच
यत्न करा कोटयावधी सत्याविन सुख ना च !
ना च–नाहींच.

## ५७. पाठिक ज्ञान

६५८. ज्यों अंधरेकौ हाथिया सब काहूको ज्ञान
अपनी अपनी कहत है काको धरिये ध्यान ?
६५९. ज्ञानीसे कहिये कहा ! कहत कबीर लजाय !
अंधे आगे नाचने कला अकारथ जाय !
६६०. 'ज्ञानी' भूले ज्ञान कथि, निकट रह्यो निज रूप
बाहर खोजें बापुरे, भीतर वस्तु अनूप
६६१. भीतर तो भेद्यो नहीं, बाहर कथै अनेक
जो पै भीतर लखि परै, भीतर बाहर एक

---

## ५८. विचार

६६२. एक शब्दमें सब कहा, सबही अर्थ, विचार
भजियो निर्गुन 'नाम'को, तजिये विषैविकार
६६३. आचारी सब जग मिला, मिला बिचारि न कोय
कोटि अचारी वारिये एक बिचारि जु होय.
६६४. मन दीया कहिं और ही, तन साधनके संग,
कह कबीर कोरी गजी कैसे लागे रंग ?
६६५. लोग भरौसे कौनके ? बैरि रहै अरगाय
ऐसे जियरे जम लुटै, मेंढे लुटै कसाय.
६६६. पानीकेरा पूतला राखा पवन संचार,
नाना बानी बोलतां जोति धरी करतार.

## ५७. पढिक ज्ञान

६५८. अंधांना करिचें जसें वेगवेगळे ज्ञान
आप आपुलें सांगती, कुणास द्यावें ध्यान ?

६५९. काय कथावें ज्ञानिया ! कथितां वाटे लाज !
अंधा देखत नाचणे ! कला जाय वे-काज !

६६०. 'स्वरूप सन्निधि'–विसरले, ज्ञानी कथुनी ज्ञान
शोधिति वाहिर बापुडे, अनुपम आंत निधान.

६६१. अंतरांत नच भेदला, कथि बाहेर अनेक
अंतरिचें ज्याला दिसे, तो बाह्यांतर एक !

------

## ५८. विचार

६६२. एकि शब्दि सांगीतला सारा अर्थ, विचार
निर्गुण 'नामा'ला भजा ! टाका विषयविकार !

६६३. आचारक जग सकल परी नसे विचारक, देख,
बरा, कोटि आचारकाहून, विचारक एक.

६६४. मन लागे कोठेंतरी, तनु करि साधनसंग,
करकरीत खादीवरी चढेल कोठुन रंग ?

६६५. विसंबतां कोणावरी ? वैरी टपले, पाहि,
लुटि जीवांना यम जसा मेंढे मारि कसाइ.

६६६. जणुं पाण्याचा बुडबुडा, राखि पवन संचार,
नाना भाषा बोलता, ज्योती-जगदाधार !

बोलता–बोलणारा.

६६७. ‘समझा’ ‘समझा’ एक है, ‘अनसमझा’–सब एक
समझा सोई जानिये जाके हृदय विवेक !
६६८. सहज तराजू आनिकरि सब रस देखा तोल
सब रसमाहीं जीभरस जो कुइ जानै बोल.

६६९. आगि कह्या दाझै नहीं, जे नहिं चंपे पाइ,
जबलग भेद न जाणिये, राम कह्या तो काइ ?

६७०. कबीर सोचि विचारिया, दूजा कोई नाहिं,
आपा पर जब चीन्हिया, उलटि समाना माहिं.

---

## ५९. विवेक

६७१. फूटी आंखि विवेककी, लखै न संत, असंत
जाकेसंग दस बीस है, ताका नाम महंत.
६७२. संसै सब जग खंधिया, संसै खंघै न कोय ?
संसै खंघै सो जना शब्दविवेकी होय !
६७३. जहं गाहक तह ‘हौं’ नहीं; ‘हौं’ जहं गाहक नाहिं
बिनबिवेक भटकत फिरै पकरि शब्दकी छांहि
६७४. भंवरजाल, बगुजाल है बूडे जीव अनेक
कह कबीर ते बांचि है जिनके हृदय विवेक !
६७५. मन सायर, मनसा लहरी, बुडे बहे अनेक
कह कबीर ते बांचि है जाके हृदय विवेक !

६६७. समजे, उमजे एक तें, नुमजे–सारें एक,
जाणा, समजे तोच कीं ज्याच्या हृदयिं विवेक !

६६८. सहज सकल रस पाहिलें तुलेंत करुनी तोल
रसनारस सर्वात 'वर', जाणे जर कुणि 'बोल'
वर–श्रेष्ठ; उत्तम; बोल-शब्द.

६६९. 'अग्नि' म्हणुन कां दाह हो ? हो न दिला जों पाय !
रहस्य जों ना जाणिलें 'राम' म्हणुन तों काय ?
टीप–केवळ 'अग्नि' असें म्हटल्यानें.

६७०. नीट विचारूनि पाहतां, 'दुसरें' कोणी नाहिं
आणि आप पर चिन्हितां 'आत्मीं' मावुन जाइ.
टीप–'आत्मीं' म्हणजे 'आपणां'त.

------

## ५९. विवेक

६७१. दृष्टि विवेकाची फुटे, बघे न संत, असंत
दहा वीस जन ज्यासवें त्याचें नाम महंत.

६७२. जगत खंडिलें संशयें, कोणि न खंडी त्यास
जो जन संशय खंडितो 'शब्दविवेकी' खास !

६७३. ग्राहक, तेथें 'मी' नसे; 'मी', ना ग्राहक तेथ;
विनविवेक भटकत फिरे, धरुनि शब्द संकेत !

६७४. जाळीं बहु 'बक,' 'भोंवरें'; बुडती जीव अनेक
वांचति केवळ तेच कीं ज्यांच्या हृदयिं विवेक !

६७५. लहरिमनीषा, अब्धिमन, वाहति बुडति अनेक
तेच कबीरा ! वांचती ज्यांच्या हृदयिं विवेक.

------

## ६०. बुद्धि आणि कुबुद्धि

६७६. मूरखको समझावते ज्ञान गांठिको जाय,
उजरो होय न कोयला सो मन साबुन लाय.

६७७. पलमें परलय बीतिया, लोगन लगी तमारि
आगिल सोच निवारिकै पाछे करो गोहारि

६७८. समझाका घर और है, अनसमझाका और
जा घरमें साहब वसै विरला जाने ठौर.

६७९. बिना वसीले चाकरी, बिना बुद्धिकी देह,
बिना ज्ञानका जोग ना फिरै लगाये खेह.

६८०. अकिल अरससों ऊतरी, बिधना दीन्ही बांटि
एक अभागा रह गया एक न लीन्ही छांटि

६८१. मूरख सों क्या बोलिये ? सठसों कहा बसाय ?
पाहनमें क्या मारिये ? चोखा तीर न साय !

---

## ६०. बुद्धि आणि कुबुद्धि

६७६. मूर्खाला समजावतां ज्ञान पदरचें जाय,
कोळसा न उजळे जरी नउ मण साबण खाय.

६७७. होइल प्रलय पलांतरीं, पडेल जनिं अंधार
पुढलें आधिं निवारुनी मग करि विगत विचार.

६७८. समजे त्याचें वेगळें, नुमजे त्याचें आन,
ज्या गृहिं प्रभु; विरळयास तें ठावें ठावठिकाण.

६७९. वशिल्यावाचुन चाकरी, बुद्धीवाचुन काय,
जोग तसा ज्ञानाविना फिरे वस्त्रि काषाय.
काय–शरीर; काषाय–भगवी.

६८०. बुद्धि वरतुनी अवतरे, ती दे विधि वाटून
एक अभागी राहि! घे एक नीट निवटून!

६८१. काय वदा मूर्खासवें! वश व्हावा शठ केंवि!
बाण मारिला प्रस्तरीं झाला बोथट तेंवि!

---

# ६१. आहार

६८२. आधी अरु सूखी भली सारीसों संताप
जो चाहैगा चूपडी बहुत करेगा पाप.

६८३. कबिरा सांई मुझको रूखी रोटी देय
चुपडी मांगत में डरूं, रूखी छिनि ना लेय.

६८४. रूखा सूखा खाइकै, ठंढा पानी पींव,
देखि बिरानी चूपडी मत ललचावै जीव

६८५. खुस खाना है खीचरी, माहिं परा टुक नौन
मांस पराया खायकर गरा कटावै कौन ?

६८६. दिनको रोजा रहत है, रात हनत है गाय,
यह तो खुत, वह वंदगी, कहुं क्यों खुसी खुदाय ?

६८७. बकरी पाती खात है, ताकी काढी खाल,
जो बकरीको खात है ताको कौन हवाल ?

६८८. खट्टा, मीठा देखिकै, रसना मेलै नीर
जबलग मन पाको नहीं, कांचो निपट कथीर !

६८९. खट्टा, मीठा, चरपरा, जिव्हा सब रस लेय
चोरों कुतिया मिल गई, पहरा किसका देय ?

---

## ६१. आहार

६८२. बरवी अर्धी कोरडीं, पुरतीनें संताप !
जो इच्छिल अरुवार तो करील पुष्कळ पाप.

६८३. शिळी कोरडी भाकरी स्वामी मजशीं देउं
मागाया अरुवार भी मी, शिळि कुठें न नेउं !

६८४. रूखें सूकें खाउनी, प्राशी प्राणी गार,
जीव न लोभो पाहुनी इतरांची अरुवार

६८५. खुशाल खाणें खिचडिचें, तिच्यांत थोडें लोण,
मांस पराचें खाउनी मान चिरुन घे कोण ?

६८६. उपास दिवसां पाळशी, रात्रीं वधिशी गाय,
भक्ति तशी ती, वध असा रुचेल हरिला काय ?
टीप–'हरि'ला बद्दल 'अलि'ला असा पाठ घेतां येईल.

६८७. शेळी पानें खातसे तिचें सोललें साल
शेळीला जो खातसे काय तयाचे हाल ?

६८८. गोडें, खारें देखुनी सुटे मुखाला लाळ
पक्व नसे मन तोंवरी कच्चा सर्व फराळ !

६८९. गोडें, खारें सकल रस घे रसनेची शूनि,
ती वश मनचोरास हो, घालिल गस्त कुठनि ?

## ६१. भ्रमनिरास

६९०. पाथरहीका देहुरा, पाथरहीका देव,
पूजणहारा आंधला लागा खोटी सेव.

६९१. रात गंवाई सोय करि, दिवस गंवायो खाय,
हीरा जनम अमोल था कौडीबदले जाय.

६९२. आछे दिन पाछे गये गुरुसे किया न हेत,
अब पछतावा क्या करें? चिडिया चुग गइ खेत!

६९३. तूं मत जानै बावरै मेरा है सब कोय,
पिंड प्रानसे बंधि रहा सो अपना नहिं होय.

६९४. जिहिं घर साध न पूजिये, हरिको सेवा नाहिं,
तें घर मरघटसारखे भूत बसै तिनमाहिं.

६९५. एक दिन ऐसा होइगा कोउ काहुका नाहिं,
घरकी नारी को कहै तनकी नारी जाहि

६९६. सेवी सालिगरामकूं, मनकी भ्रांति न जाइ.
सीतलता सुपिनै नहीं, दिन दिन अधिकी लाइ!

६९७. जेती देषौं आतमा, तें ता सालिगराम,
साधू प्रतषि देव है, नहिं पाथरसूं काम.

## ६३. भ्रमनिरास

६९०. पाषाणाच्या देउळीं, पाषाणाचा देव
आणि पुजारी आंधळा, सेवा खोटी एव !
एव—अशी.

६९१. निजेंत घालविल्या निशा, जेवणांत दिन फोल,
जन्म अमोलिक हीर तो झाला कवडीमोल !

६९२. दिवस बरें गेले त्वरें गुरुशिं न केला बेत,
काय रडुन उडल्यावरी चिमण्या टिपुनी शेत ?

६९३. समजुं नको रे बावळ्या ! माझें सारें कांहि,
पिंड वसे प्राणांसवें तोहि आपुला नाहि !

६९४. ज्या घरिं नच साधूपुजा, नच हरिसेवा ज्यांत,
तें घर मसणासारखें भूत संचरे त्यांत !

६९५. एके दिनिं होइल असें, कुणी कुणाचे नाहिं,
सांगावें कुणि नारिचें ? नाडि स्फुरणें जाइ !

६९६. शालिग्राम पुजी मनःभ्रांती जाई ना च !
शीतलता स्वप्नीं नसें दिनिदिनिं अधिकच आंच !

६९७. आत्मे दिसती जेवढे तितुके शालिग्राम.
साधु देव प्रत्यक्ष कीं ! नच दगडाचें काम !

———

## ६३. रस

६९८. हरिरस पीया जानिए कबहुं न जाय खुमार
मैमंता घूमत रहै नाहीं तनको सार.

६९९. मन प्रतीति न प्रेमरस, ना इस तनमें ढंग,
क्या जाणूं उस पीवसूं कैसे रहसी रंग !
७००. भयबिनु भाव न उपजै, भयबिनु होय न प्रीति,
जब हिरदेसे भय गया मिटी सकल रसरीति !

७०१. राम रसाइन प्रेमरस, पीबत अधिक रसाल,
कबीर पीबन दुलभ है, मांगत सीस कलाल.

७०२. कबीर भाठि कलालकी, बहुतक बैठे आइ.
सिर सौंपे सोई पिवै, नहिं तो पिया न जाइ !

## ६४. विरक्ति

७०३. मेरै मनमें पड गई, ऐसी एक दरार
फाटा फटकपषाण ज्यूं, मिल्या न दूजी बार.
७०४. सत गंठी कोपीन है, साधन मानै संक,
रामअमलि माता रहै, गनै इंद्रकौ रंक.
७०५. दावै दाझण होत है, निरदावै निःसंक
जे नर निरदावै रहै ते गिनि इंद्रकु रंक.
७०६. जो काटौं तौ डहडही, सीचौं तौ कुमिलाइ
इस गुणवंती बेलिका कुछ गन कह्या न जाइ !
७०७. हम घर जाल्या आपणां, लिया मुराडा हाथि
अब घर जालौं तासका, चलै हमारे साथि.
७०८. कबिरा खडा बजारमें लिये लकूटी हाथ
जो घर जालै आपना चलै हमारे साथ.

## ६३. रस

६९८. हरिरस, जाणा, प्यालिया कधीं न जाइ खुमार
भ्रमत राहतों गुंगला ! शुद्धि न तनुची पार !
खुमार-नशेनंतरची अवस्था.
६९९. मनीं प्रतीति न प्रेमरस, तनूंत या नच ढंग,
प्रियास त्या कशि ओळखूं ? कैसा राहिल रंग !
७००. भीरुत्वाविण भाव ना अथवा नाहीं प्रीति
हृदयीं जर भीरुत्व ना नुरे सकल रसरीति !
भीरुत्व—सादर संकोच
७०१. रामरसायन प्रेमरस, पी तों अधिक रसाळ
पान असे दुर्लभ महा, मागे शीर कलाल.
कलाल–(येथें) गुरु.
७०२. भट्टि कलालाची, बहू बसले जाउन तेथ,
जो शिर सोंपी तोच पी, ना तर पितां न येत !

## ६४. विरक्ति

७०३. मनांत पडली माझिया ऐशी एक कपार
स्फटिकप्रस्तर भंगल्यावर सांधे न दुबार.
७०४. शतगांठी लंगोटिला साधु तरी नि:शंक
नामनशेनें मातला गणि इंद्रातें रंक.
७०५. होती दाहक बंधनें, अनिर्बंध नि:शंक,
अनिर्बंध नर राहि तो गणि इंद्रातें रंक.
७०६. कापा तरिही पालवे; सिचा तर कोमाय;
या गुणवंती वेलिचा गुण न वर्णिला जाय !
७०७. निज गृह आम्ही जाळिलें पोत घेतला हातिं
त्याचें गृह जाळूं अतां जो अमुचा सांगाति.
७०८. कबीर बाजारीं उभा धरूनी दंड करांत
जो घर जाळी आपुलें तो येवो सांगात.

## ६५. चातुरी

७०९. चतुराई सुवै पढी, सोई पंजरमाहिं
फेरि प्रबोधै आनकूं, आपण समझै नाहिं.

७१०. तारामंडळ बैसि करि, चंद बडाई खाइ,
उदै भया जब सूरका, स्यूं तारा छिपि जाइ.

७११. कासीकाठीं घर करै, पीवै निरमल नीर
मुकति नहीं हरि नांवबिन, यूं कहै दास कबीर.

७१२. स्वामी हूंणा सोहरा, दोघ्या हूंणा दास,
गाडर आणी ऊनकूं, बांधी चरै कपास.

---

## ६६. संजीवनी

७१३. जरा, मरण व्यापै नहीं, 'मुवा' न सुणिये कोइ,
चल कबीर तिहि देसडे, वैद विधाता होइ.

७१४. कबीर हरिचरनौं चल्या, मायामोह थैं टूटि
गगनमंडल आसन किया, काल गया सिरकूटि.

७१५. यहु मन पटकि पछाडिलै, सब आपा मिटि जाइ,
पंगुल ह्वै 'पिव-पिव' करै, पीछै काल न खाइ.

---

## ६५. चातुरी

७०९. चतुराई राघू शिके, स्वयें पंजरीं राहि,
करी प्रबोधन आणिकां, स्वतांस समजत नाहिं.

७१०. तारामंडलि बैसुनि चंद्र बढाई गाइ,
सूर्योदय होतांच पण तो ताऱ्यांसह जाइ.

७११. काशीकाठीं घर करी, प्राशी निर्मल नीर,
'मुक्ति न हरिनामाविना' म्हणती दास कबीर.

७१२. कठिण दासपण त्याहुनी सुलभ स्वामिपण राहि
ऊर्णाकिरितां आणिला मेंढा कापुस खाइ.
टीप–'ऊर्ण' म्ह० 'लोंकर'.

---

## ६६. संजीवनी

७१३. जिथें जरा नाहीं, जिथें मृतवार्ता ना येत;
त्या देशीं जाऊं चला! वैद्य विधाता तेथ.

७१४. कबीर हरिचरणीं रिघे, तुटे मोहजंजाळ,
गगन मंडलामधि वसे, फोडी 'काळ' कपाळ.

७१५. पछाड मन पाडून हें, गळेल गर्व कराल
'प्रिय-प्रिय' वद, निश्चित हो, गिळील नच मग काळ.

---

## ६७. क्षणभंगुरता

७१६. यह तन कांचा कुंभ है लिये फिरै वह साथ
टपका लागा फूटिया कछु नहिं आया हाथ !
७१७. सांझ पडै, दिस बितवै, चकवी दीन्हा रोय-
"चल, चकवा ! वा देसको जहां रैन ना होय."
७१८. सेमर सुअना सेइया दुइ ढेंढीकी आस
ढेंढी फूटि चटाक दै, सुअना चला, निरास !
७१९. कहा चुनावै मेडियां, लांबी भीत उतारि,
घर तो साढे तीन हथ, घना तो पौने चारि.
७२०. जंत्र बजावत हौं सुना, टूटि गये सब तार !
जंत्र बिचारा क्या करै ? गयो बजावन हार !
७२१. ऊजड खेडे ठीकरी गढि गढि गये कुम्हार
रावनसरिखा चल गया लंकाका सरदार.
७२२. बाडीके विच भंवर था, कलियां लेता वास
सों तो भंवरा उडि गया, तजि बाडीकी आस.
७२३. भंवर विलंबे बागमें बहु फूलनकी आस,
जीव विलंबे विषयमें अंतहु चले निरास.
७२४. चलती चक्की देखिके दिया कबीरा रोय,
दुइ पटभीतर आइके साबित गया न कोय !
७२५. साथी हमरे चलि गये, हम भी चालनहार,
कागजमें बाकी रही तातें लागी बार.
७२६. दुर्लभ मानुष जनम है, देह न बारंबार,
तरवर ज्यों पत्ता झडै बहुरि न लागै डार !

## ६७. क्षणभंगुरता

७१६. देह न, कच्चा कुंभ हा, ढका न लागो यास
फुटतां मग लागेल कां कांहि तुझ्या हातांस ?
७१७. सांज पडे, दिन मावळे, करि चकवी चित्कार,
म्हणे, "चाल, चकव्या ! जिथें कधि न रात्रअंधार !
७१८. शाल्मलिच्या पुष्पांतुनी फळेल फळ ही आस;
बोंड लाल फुटतांच शुक जाय उडून निराश !
७१९. उठवशील माड्या किती ! भिंती उंच उभार !
औट हात घर, फार तर, फार पावणे चार !
७२०. यंत्र वाजतां ऐकिलें, तुटले सारे तार
काय करिल जड यंत्र तरि ? गेला वाजविणार !
७२१. उजाड खेडीं, गढ, गढ्या उत्खनती कुंभार,
गेला रावणसा महा लंकेचा सरदार.
७२२. अलि होता वाडीमधीं घेत कळ्यांचा वास,
तो अलि गेला उडुनिया, त्यजुनि वाडिची आस.
७२३. भ्रमर विलंबे उपवनीं, बहु पुष्पांची आस,
जीव विलंबे विषयिं,–पण अंतीं जाय निराश.
७२४. फिरतें जातें देखुनी मी रडलों स्फुंदोनि
दो पाळ्यांच्या भीतरीं धड ना टिकलें कोणि !
७२५. संगी गेले आमुचे, आम्हीही जाणार,
थकली बाकी त्यामुळे उशीर झाला फार.
७२६. दुर्लभ मानव जन्म हा, देह न वारंवार,
पान गळालें तें पुन्हा तरुस ना फुटणार !

७२७. कबीर मंदीर लाखका, जडिया हीरै, लालि,
दिवस चारिका पेषणा, बिनस जाइगा काल्हि.

७२८. कबिरा, गर्व न कीजिये अस जोबनकी आस
'टेसू' फूला दिवस दस, खंखर भया 'पलास'.

७२९. ऐसा यह संसार है जैसा 'सेमर' फूल,
दिन दसके ब्यौहारमें झूठे रंग न भूल.

७३०. 'तन' सराय, 'मन' पाहरू, 'मनसा' उतरी आय,
कोउ काहुका है नहीं; देखा; ठोक बजाय.

७३१. जो ऊग्या सो आंथिबै, फूल्या सो कुमिलाइ,
जो चिणियां सो ढहि पडै, जो आया सो जाइ.

७२७. लाखांचे मंदिर, तया जडले हीरक, लाल
चार दिवस पाहून घे, 'उद्या' तयाचा 'काळ'.
मन्दिर–प्रासाद, वाडा.

७२८. कबीर, गर्व करूं नये, धरून यौवनआस
दहा दिवस 'टेसू' फुले, होई खंक 'पलाश'
टेसू–शाल्मलीचे फूल.

७२९. असा असे संसार हा जसें 'शाल्मली' फूल,
व्यवहारीं दश दिवशिच्या नृत रंगास न भूल.
नृत रंग–खोटा रंग.

७३०. सराइ 'तनु', दरवान 'मन', अतिथि 'मनीषा' आलि,
कुणि न कुणाचें ! वाजती ठोके ठीक घड्याळि !
सराइ–धर्मशाळा; दरवान–पहारेकरी; अतिथि–उतारू;
घड्याळ–घांट.

७३१. जें उगवें तें मावळें; विकसे तें कोमाय;
जें चिणिलें तें ढासळें; जें आलें तें जाय.

---

## ६८. काळ

७३२. माली आवत देखिकै कलियां करी पुकार.
फूली फूली चुनि लिये कालि हमारी बार.

७३३. पानीकेरा बुदबुदा अस मानुषकी जात
देखतहि छिपि जायगी ज्यों तारा परभात!

७३४. हाड जरै ज्यों लाकडी, केस जरै ज्यों घास
सब जग जरता देखिकर भये कबीर उदास.

७३५. सूलीऊपर घर करै, विषको करै अहार,
ताको काल कहा करै आठपहर हुसियार.

७३६. पान पडंता यो कहै,–"सुनि तरुवर! बणराइ!
अबके बिछुरे ना मिलै, दूर पडेंगे जाइ."

७३७. रुखडा बोला पानसे,–"सुन पत्ते! मेरि बात,
इस घरकी यहि रीति है; इक आवत, इक जात."

७३८. पांचो नौबत बाजती, होत छतीसों राग
सो मंदर खाली पडा, बैठन लागे काग.

७३९. झूठे सुखको सुख कहै मानत है मन मोद
जगत चबेना कालका कुछ मुखमें, कुछ गोद.

७४०. कबीर नौबत आपनी दिन दस लेहु बजाय
यह पुर, पट्टन, यह गली बहुरि न देखौ आय.

७४१. आसपास जोधा खडे सभी बजावै गाल.
मंझ महलसे ले चला ऐसा काल कराल.

## ६८. काळ

७३२. माळी येतां देखुनी करिती कळचा पुकार
फुलत्या फुलत्या वेचल्या ‘ उद्या ’ आमुचा ‘ वार ’.

७३३. पाण्याचे जणु बुडबुडे तैशी मानवजात
तारे अवघे लोपती कीं होतांच प्रभात !

७३४. हाडें जळती लाकडें, केस जसा कीं घास,
जळे सर्व जग देखुनी कबीरदास उदास.

७३५. घर ज्याचें सूळावरी, विष ज्याचा आहार,
‘ काळ ’ काय करि त्यास जो अष्टौप्रहर हुशार ?

७३६. पडतां पानें बोलती,–“ हे तरु ! हे वनराइ !
जाउन दूर पडूं पुन्हा भेटगांठ कशि काइ ?

७३७. वृक्ष वदे पर्णास,–“ घे ऐकुन माझी मात,
या घरची ही रीति कीं, ये हा तर, तो जात ! ”

७३८. सप्तस्वर आलापिती, गाति घरोघर राग
तें मंदिर पडलें रितें, बसती त्यावर काग.

७३९. सुखास खोटचा ‘ सुख ’ म्हणे, मानी मोद मनांत
काळकवलजग कांहि मुखि आणिक कांहि पुढ्यांत !

७४०. वाजवुनी घे आपुली नौबत दिन दो चार
हें पुर, पट्टण, ओळ ही नाहिं पुन्हा दिसणार !

७४१. आसपास योद्धे उभे जो तो वाजवि गाल
उचली प्रासादांतुनी त्यांना काळ कराल.

गाल वाजवणें–बढाई मारणें.

७४२. हम जाने थे खाहिंगे बहुत जमी, बहु माल
ज्योंका त्योंही रहि गया पकरि लै गया काल

७४३. माटी कहै कुम्हारको,–"तूं क्या रूंदै मोहिं
इक दिन ऐसा होइगा मैं रूंदूंगी तोहिं.

७४४. आये है सों जाहि है राजा, रंक, फकीर
एक सिंघासन चढि चलै, एक बंधे जंजीर

७४५. पाव पलककी सुध नहीं करै कालहका साज,
काल अचानक मारसी ज्यों तीतरको बाज.

७४६. धरती करते एक पग, समुंदर करते फाल,
हाथन परबत तौलते, तिनहूं खाया काल !

७४७. जरनेहारा भी मुआ, मुआ जरावनहार,
'है–है' करते भी मुए, कासौं करौं पुकार ?

७४८. मच्छ होय नहिं बांचि हौं, धीमर तेरा काल
जेहि जेहि डाबर तुम फिरौ, तहं तहं फैले जाल.

७४९. पानी भीतर घर किया, सेज किया पाताल,
पासा परा करीमका, ताते पहिरा जाल.

७५०. मच्छ बिकाने सब चले धीमरके दरबार
अंखिया रतनारी तेरि, क्यों करि पहिरा जाल ?

७५१. मारग तो अति कठिन है, वहां कोइ मति जाय,
गये तेहि बहुरे नहीं, कुसल कहौ को आय ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय.
अनुक्रम 32823 वि: 4164
क्रमांक 9545 नों. दि. 6/3/52



७४२. वाटत होतें भोगुं कीं बहुमत्ता, बहुमाल
स्थळिचें स्थळींच राहिलें ! घेउन गेला काळ !

७४३. माती कुंभारा पुसे,–"तूं मज मळशिल काय ?
माझ्यांतच मिळशील तूं माती होउन काय !
काय–शरीर.

७४४. आले जे जातील ते राजा, रंक, फकीर
सिंहासन कोणा, कुणा बेड्यांची न फिकीर.

७४५. निमिषाचा ना भंरवसा ! करिसि उद्यांचा साज !
वधिल काळ, वधि तीतरा जसा अचानक बाज !
बाज–बहिरी ससाणा.

७४६. आक्रमिती भू एक पदिं, करिति अब्धिचा फाळ,
हातीं पर्वत तोलती, त्यांनाही गिळि काळ !

७४७. जाळणार मेला, तसा मेला जो जळणार,
मेले 'हा ! –हा !' करिति ते; करुं कोणास पुकार ?
पुकार करणें–हाका मारणें.

७४८. मासळि बनुनि न वांचसी, हो कोळी तव काळ
फिरशिल तूं तेथे तिथें तो पसरिल निज जाल.

७४९. घर केलें पाण्यामधीं, शय्येस्तव पाताळ,
कर्मपाश सुटला न हा ! वा ना तुटलें जाल !

७५०. मीन विकाया गांठती धीवर राजमहाल
डोळे तव रातोत्पलें तुजहि न सुटलें जाल ?

७५१. वाट बिकट आहे महा, तिजवर कुणि जावो न,
गेले ते नच परतले, खुशाल येईल कोण ?

७५२. सूकण लागा केवडा, तूटी अरहट माल,
पाणीकी कल जाणतां, गया जु सींचणहार !

७५३. काल सिहांणै यौं खडा, जागि पियारे म्यंत,
रामसनेही बाहिरा, तूं क्यूं सोवै नच्यंत.

७५४. फागुण आवत देखि करि बन रूना मनमांहि
उंची डाली पात है, दिने दिने पीले थांहि.

७५५. जो पहर्‍या, सो फाटसी; नांव धर्‍या, सो जाइ;
कबीर सोई तंत गहि, जो गुर दिया बताइ

७५६. कबीर, 'यह जग कुछ नहीं; षिन खारा,षिन मीठ,
काल्हि जु बैठा माडिया, आज मसाणां दीठ.'

७५७. बरिया बीती, बल गया अरु बुरा कमाय
हरि जिन छाडै हाथ थैं, दिन भी नेडा आय.

७५८. कबीर हरिसूं हेत करि, कुडै चित्त न लाव,
बंध्या द्वार षटीक कै, ता पसु किति एक आव ?

---

७५२. सुकूं लागले केवडे, तुटली राहटमाळ,
पाण्याची कळ जाणता गेला मालाकार !

७५३. काळ उशापाशीं उभा जाग सख्या ! गुणवंत
रामस्नेही दूर; तूं कां निजसी निश्चिंत ?

७५४. फाल्गुन येतां देखुनी करि कानन आक्रांत
पानें जीं उंचावरी तीं दिन दिन पिकतात.

७५५. जें घाला, तें फाटतें; नांव दिलें, तें जाइ;
तोच तंतु धरि जो तुला गुरुनें म्हटलें, 'पाहि !'

७५६. कबीर, 'जग कांही न हें ! क्षणि खारें, क्षणि गोड,
काल माडिवर, आज तो मसणवटीं घे दौड़'

७५७. गेलें वय, बल, वोखटा केला कर्माचार;
हात हरीनें सोडिला, दिन आतां ढळणार !

७५८. कुढेपणा टाकून दे, कर हरिशीं संधान,
खाटिकद्वारीं बांधला पशू न आयुष्मान !

---

## ६९. मन

७५९. मनके मते ना चालिए मनके मते अनेक,
जो मनपर असवार है, सो साधू कोइ एक!

७६०. मनको मारूं पटकिके? टूक टूक होइ जाय!
विषकी बेली बोइके लुनता क्यों पछिताय?

७६१. मन पांचोंके बसि परा, मनके बस नहिं पांच,
जित देखूं तित दौ लगी, जित भागूं तित आंच.

७६२. पहले यह मन काग था करता जीवन घात,
अब तो मन हंसा भया मोती चुंगि चुंगि खात.

७६३. कबिरा बैरी सबल है जीव एक, रिपु पांच,
अपने अपने स्वादको बहुत नचावैं नाच

७६४. मनुवा तो पंछी भया उडिके चला अकास,
ऊपरही तें गिरि पडा या मायाके पास!

७६५. कबिरा मन तो एक है भावै तहां लगाय,
भावै गुरूकी भक्ति कर, भावै विषय कमाय.

७६६. मनके हारे, हार है, मनके जीते जीत
कह कबीर पिउ पाइए मनकीही परतीत.

७६७. मन गयंद मानै नहीं, चलै सुरतिके साथ,
दीन महावत क्या करै अंकुश नाहीं हाथ?

७६८. बाजीगरका बंदरा ऐसा जिउ मन साथ
नाना नाच नचायकै राखै आपने हाथ

## ६९. मन

७५९. मतें मनाच्या चलुं नका, त्याचीं मतें अनेक,
स्वार मनावर हो असा साधु क्वचितच एक !

७६०. मना मारितों पटकुनी चूर चूर हो आप !
विषवल्ली पेरून कां करूं वृथा अनुताप ?

७६१. मन पांचांच्या वश असे, मनास वश नच पांच,
बघतों मी, वणवा तिथें, पळतों तेथें आंच.

७६२. पूर्वी होतें काकमन, करित जिवांचा घात,
हंस बनुन मुक्ता अतां चघळुन चघळुन खात.

७६३. वैरि सबल असती महा जीव एक, रिपु पांच,
स्वादास्तव आपापुल्या नाचविती बहु नाच.

७६४. पक्षि बने मन चाललें उडोनियां आकाशि,
पडलें वरूनी खालतें या मायेच्या पाशि !

७६५. कबीर मन एकच असे, भावे तेथें लाव,
भावे, गुरूची भक्ति कर, भावे, विषय कमाव.

७६६. हरलें मन तर हार ती, जितलें तें तर जीत,
मनानेंच प्रिय प्राप्तिचीं कबीर येत प्रचीत.
प्रचीत—प्रतीति.

७६७. मनमतंग माने न मुळि, चले सुरतिच्या साथिं
करिल काय माहुत तरी नाहीं अंकुश हातिं ?

७६८. जीव मनाला वश जसें मर्कट दरवेशास
नाच नाचवुन त्यास मन करी आपुला दास.
दास—गुलाम.

७६९. नैनन आगे मन बसै, रलपिल करै जो दौर
तीनलोकमनभूप है, मन पूजा सब ठौर !
७७०. मन करि सुर, मुनि जहंडिया, मनके लक्ष दुवार
ये मन चंचल चोरई, ई मन शुद्ध ठगार.
७७१. मन, मुरीद संसार है, गुरु, मुरीद कोइ साध,
जो मानै गुरुवचनको ताको मता अगाध
७७२. मनके मारे बन गये, बन तजि बस्तीमाहि
कह कबीर क्या कीजिये यह मन ठहरै नाहिं ?
७७३. जेती लहर समुद्रकी, तेती मनकी दौर,
सहजै हीरा नीपजै जो मन आवै ठौर.
७७४. मन मोटा, मन पातरा, मन पानी, मन लाय
मनकी जैसी ऊपजै तैसीही ह्वै जाय.
७७५. अगम पंथ, मन थिर करै, बुद्धि करै परबेस
तन, मन सबही छांडिकै तब पहुंचै वा देस.
७७६. कबिरा मन परबत हता, अब मैं पाया कानि
टांकी लागी शब्दकी निकसी कचंन खानि.

७७७. मनके बहुतक रंग है, छिन छिन बदलै सोय,
एक रंगमें जो रहै ऐसा बिरला कोय.
७७८. अपने अपने चोरको सब कोइ डारै मार
मेरा चोर मुझे मिलै सरबस डारूं वार !
७७९. मन कुंजर महमंत था फिरता गहन गंभीर
दोहरि, तेहरि, चौहरी परि गइ प्रेमजंजीर.

७६९. मन राहे नयनांपुढे धूम ठोकिते धांव
त्रिलोकनृप, मन, पूजिती मनास अवघे ठाव !
७७०. सुर, मुनि हे ठकले मनें, मनास द्वारें लाख,
हें मन चंचल, चोरटें; हें मन ठक, चलाख !
७७१. शिष्य मनाचे जगत हें ! शिष्य गुरुचा साधु !
गुरुवचनांना मानि जो त्यांचीं मतें अगाधु !
७७२. मनामुळें गेलों वनीं, तिथुन पुन्हा वसतींत,
ठरे न मन हें ! कोणती अवलंबावी रीत !
७७३. तरंग जितुके सागरीं, मनांत तितुके रंग
आलें मन जर ठायिं, तर निघे हिरा अव्यंग.
७७४. मन पातळ, मन जाडही, मन पाणी, मन पाप
जसें मनीं उपजे तसें होई आपोआप !
७७५. अगमपंथ, मन स्थिर करी, मग करि बुद्धि प्रवेश
तनु, मन सारें सोडल्यावर; तो पावे देश !
७७६. मन पर्वत होतें, मला पावे आतां 'कानि'
शब्दटांकि लागे, निघे घावीं कांचनखाणि;
'कानि'—खणणारी लोखंडी छिन्नी.
७७७. क्षणा-क्षणाला बदलती बहुत मनाचे रंग
एका रंगिच रंगला क्वचित असा 'निःसंग.'
७७८. चोराला आपापुल्या जो तो दावी जोर.
ओंवाळिन सर्वस्व मी मिळतां माझा चोर !
७७९. मनगज मदमाता वनीं विहरे शांत निवांत
दु, ति, चौ, पदरी प्रीतिचा अंदु पडे पायांत !
अंदु—साखळदंड.

७८०. मनमनसाको मारिकरि, नन्हा करिके पीस
तब सुख पावै सुंदरी, पदुम झलक्के सीस.
७८१. कबिरा मनहि गयंद है, अंकुस दै दै राखु
बिषकी बेली परिहरी अमृतका फल चाखु !
७८२. मनमनसाको मारि दे, घटही माहीं घेर
जबही चालै पीठ दे, आंकुस दै दै फेर.

७८३. कुंभे बांधा जल रहै, जल बिनु कुंभ न होय,
ज्ञानै बांधा मन रहै, मनबिनु ज्ञान न होय.
७८४. तन बोहित, मन काग है लख जोजन उडि जाय
कबहीं दरिया अगम बही, कबहीं गगन समाय.

७८५. यह मन तो शीतल भया, जब उपजा ब्रह्मज्ञान !
जेहि बैसंदर जग जरै सो पुनि उदकसमान !
७८६. तीनि लोक टींडी भई, उडिया मनके साथ
हरिजन हरि जाने बिना, परे कालके हाथ.
७८७. मनमतंग गैयर हनै, मनसा भई शचान,
जंत्र मंत्र मानै नहीं, लागी उडि उडि कान.
७८८. देस बिदेसन हौं फिरा, मनही भरा सुकाल
जाकों ढूंढन हौं फिरौं, ताको परा दुकाल !
७८९. मन स्वारथ, आपहि रसिक, विषय लहरि फहराय
मनके चलतै तन चलत, ताते सरबस जाय.
७९०. मनह मनोरथ छांडि दे, तेरा किया न होइ,
घी पाणीमें निकसै, रूखा खाइ न कोइ,

७९१. कवीर तुरगि पलांणियां, चाबक लीया हाथि,
दिवस थकां सांई मिलौं, पीछै पडि है राति !
७९२. मन जाणें सब बात, जाणतही औगुण करै !
काहेकी कुसलात ! कर दीपक कूवै पडै !

७८०. मारुनि मनमनिषेस करि वाटुन वाटुन पीठ
सुंदरि ! सुख लाभेल तइं, शिरिं झळकेल किरीट.
७८१. मदोन्मत्त मनगज महा, अंकुश टोंचुन राख,
विषवल्लीतें टाकुनी, अमृत फळातें चाख !
७८२. मनमनिषागज मारुनी आंतिल आंतच घेर
पाठ दाखवुन परततां अंकुश टोंचुन फेर.
घेर—वेढून टाक; फेर—माघारीं फिरव.
७८३. घटें राहि जळ बांधिलें, जळाविना घट नाहिं,
ज्ञानानें मन बांधिलें, ज्ञानाविण मन नाहिं.
७८४. तनु नौका, मन काउळें उडे योजनें लक्ष
अगमाब्धित वाहे कधीं, कधीं गगनगत, लक्ष !
लक्ष—पहा.
७८५. मन झालें शीतल तदा झालें ब्रह्मज्ञान !
वैश्वानर जग जाळि जो तोही उदकसमान !
७८६. त्रिलोक बनुनी टोळकें उडत मनासह जाय
हरिजन पडती काळमुखि हरिच्या वळखिशिवाय.
७८७. सीध्या मदमात्या गजा हाणि मनीषाश्येन
उडुन उडुन कानीं लगे, यंत्र मंत्र माने न !
७८८. फिरलों देश विदेश मी, मनांत राहि सुकाळ
धुंडत ज्यातें हिंडलों त्याचा पण दुष्काळ !
७८९. स्वयें विलासी, स्वार्थि मन, उठवी विषय तरंग
चळतां मन, तनुही चळे, हो सर्वस्वच भंग !
७९०. सोड मनोरथ आपुले, तूं केलें तें हो न !
निघतां घृत पाण्यांतुनी भक्षिल बांसें कोण ?
बांसे—शिळेंपाकें; कोरडें.
७९१. तुरंगमा पालाणिली, धरिला चाबुक हातिं,
दमलों दिनिं भेटा, प्रभो ! पडेल ना मग राति
७९२. मन जाणे सारें, परी करि अवगुण जाणून
कुशल कुठें ! करि दीप परि कूपिं पडे जाऊन !

## ७०. विविध

७९३. एकहि साधै सब सधे, सब साधै सब जाय
ज्यों तूं सिंचै मूलको फुलै, फलै आघाय

७९४. पोथी पढि पढि जग मुआ, पंडित हुआ न कोय
ढाई अच्छर प्रेमका पढै सो पंडित होय !

७९५. करुं बहियां बल आपनी, छांडि बिरानी आस,
जाके आंगन है नदी, सो कस मरै पियास ?

७९६. जों लौं तारा जगमगै तो लौं उगे न सूर
तों लौं जिय जग कर्म बस जों लौं ज्ञानन पूर

७९७. देह धरेका दंड है, सब काहूको होय
ज्ञानी भुगतै ज्ञान करि, मूरख भुगतै रोय.

७९८. सुर, नर, मुनि औ देवता, सात द्वीप, नव खंड
कह कबीर सब भोगिया देहधरेका दंड.

७९९. चांद,सुरज निज किरनको त्यागि कब न विधि कीन ?
जाकी किरने ताहिंमें उपजि होत, पुनि लीन !

८००. कबिरा साथी सोइ किया दुख, सुख जाहि न कोय
हिलिमिलिके संग खेलई, कभी बिछोह न होय.

८०१. आगे सीढी सांकरी, पाछे चकनाचूर
परदांतरकी सुन्दरी रही धका दे दूर.

८०२. केते दिन ऐसे गये अनरूचेको नेह !
बोए उसरन उपजै जो घन बरसै मेह.

## ७०. विविध

७९३. एकें साधे सकलही; सकलें सगळें जाय;
सिंचशील तूं मूळ तर फुलें फळें अधिकाय !
अधिक + आय = अधिक + लाभ.

७९४. वाचुन जग वांचे न वा कोणी पंडित होच
अडिच अक्षरें प्रीतिचीं पढला 'पंडित' तोच !

७९५. शक्ति तुझ्या बाहूंत तर परावलंबन टाक
अंगणांत नदि त्यास कां कधीं तृषेचा धाक ?

७९६. तोंवर तारे झळकती जोंवर उदे न भानु
तंवर जगे जग कर्म-वश जोंवर पूर्ण न ज्ञानु.

७९७. धरिला देह म्हणोनिया हो सर्वांना दंड
ज्ञानें ज्ञानी भोगती, मूर्ख रडून उदंड.

७९८. देव, देवता, नर, मुनी, सात द्वीप, नव खंड
धरिला देह म्हणून हे सर्व भोगिती दंड.

७९९. त्यजतिल निज किरणें कशी चंद्र, सूर्य स्वाधीन ?
ज्यांचीं किरणें त्यांतची उपजति, होती लीन !
स्वाधीन—स्वतंत्र.

८००. त्याशिंच केली सोबती जो सुखदु:खातीत,
खेळीमेळीं खेळतो, हो न फुटुन विपरीत.

८०१. शिडी संकुचित ही पुढें, मागें चकनाचूर,
अवगुंठित स्त्री लोपली धक्का देउन दूर.

८०२. गेले वासर कितितरी, नावडत्याशीं स्नेह !
नुगे उजाडित पेरलें जरि बरसे घन मेह !

८०३. पपिहा परको ना तजै, तजै तो तन बेकाज
तनु छूटे तो कछु नहीं ! पर छूटै है लाज !

८०४. हे गुणवंती बेलरी ! तव गुण बरणि न जाय,
जर काटे ते हरियरी, सींचे ते कुम्हिलाय.

८०५. आगे आगे दव बरै, पीछे हरियर होइ,
बलिहारी वा बृच्छकी जर काटै फल होइ.

८०६. 'कंचन' भो पारस परसि बहुरि न 'लोहा' होइ
'चंदन' बास 'पलास' बिधि 'ढाक' कहै ना कोइ

८०७. मानुष तेरा गुन बडा, मांस न आवै काज,
हाड न होते आभरण, त्वचा न बाजै बाज.

८०८. घर कबीरका सिखरपर, जहां सिलिहिली गैल,
पांव न टीकै पिपिलिका, खलक न लादै बैल,

८०९. खुलि खेली संसारमें बांधि न सक्के कोय
घाट जगाती क्या करै जो सिर बोझ न होय ?

८१०. सांईकेरे बहुत गुन लिखि जो हिरदेमाहिं
पिऊं न पानी डरपता मत वै धोए जाहिं

८११. जब दिल मिला दयालसो तब कछु अंतर नाहिं
पाला गलि पानी भया यों हरिजन हरिमाहिं

८१२. बैठा है घरभीतरे, वैठा है साचेत,
जब जैसी गति चाहता, तब तैसी मति देत.

८१३. वस्तु अहै, गाहक नहीं; वस्तुसो गरुवा मोल
बिना दामको मानवा फिरै सो डामाडोल !

८०३. चातक पंख न त्यजि कधीं, त्यजि तर तनु बेकाज
जाते तनु जावो तरी ! पंख जाति तर लाज !

८०४. हे गुणवंती वल्लरी ! तव गुण वर्णन हो न,
हिरवळशी जड कापतां, कोमजशी सिंचोन.

८०५. पुढें दवानल आणखी मागें हिरवें गार
धन्य वृक्ष जड कांपतां ज्याला ये फलभार !

८०६. परिसस्पर्शानें पुन्हा 'कनक' न हो 'लोखंड'
'पलाश' गंधित, बोलती जन, 'ढाक' न 'श्रीखंड !'
श्रीखंड—चंदन.

८०७. तुझे मानवा ! गुण महा, मांस न तव आस्वाद्य,
नच हाडांचीं भूषणें ! वा न त्वचेचें वाद्य !

८०८. कबीरगृह शिखरावरी जेथें घसरण फार
पाय मुंगिचा ना ठरे ! बलिवर्दन घे भार !

८०९. खुल्या मोकळ्या या जगीं बांधुं शकेना कोणि
शिरिं ओझें नच; मग कसें ने कुणि घाटिं लुटोनि ?

८१०. हृदयीं लिहुनी ठेविलें हरिगुण अमित महान
धुतले जातिल या भये मी न करी जलपान.

८११. दयाळांत मन मीनलें आतां अंतर नाहिं
ओस गळे जळ हो तसा हरिजन हरींत राहि.

८१२. घरामधीं बसला असे, बसला सावधचेत
जशि जेव्हां गति इच्छितो, तशि तेव्हां मति देत.

८१३. वस्तु असे, ग्राहक नसे; वस्तूचें बहुमोल
मनुज फिरे मोलाविना तो चंचल बेतोल !

८१४. औरनको समुझावते मुखमें परिगो रेत
रासि बिरानी राखते खाये घरको खेत.

८१५. गुनिया तो गुनही गहै, निर्गुन गुनहिं घिनाय,
बैलहिं दीजै जायफर, का बूझै ? का खाय ?

८१६. देखनको सब कोइ भला, जस सीतनका कोट
देखतही ढहि जायगा बांधि सकै नहिं पोट.

८१७. 'ब्रह्महि ते जग ऊपजा' कहत सयाने लोग
ताहि ब्रह्मके त्यागु बिनु, जगत न त्यागन जोग.

८१८. ब्रह्म जगतका बीज है, जो नहिं ताको त्याग
जगत ब्रह्ममें लीन है, कहहूं कौन बिराग ?

८१९. एक कर्म है बोवना, उपजै बीज बहूत
एक कर्म है भुंजना, उदय न अंकुर सूत.

८२०. बिन देखे वह देसकी बात कहै सो कूर
आपै खारी खात हौ, बेचत फिरत कपूर !

८२१. मलयगिरीके बासमें वृक्ष रहा सब गोय
कहिबेको चंदन भया, मलयगिरी ना होय.

८२२. विषकै बिरवै घर किया, रह सरप लपटाय,
तातें जियरहि डर भया, जागत रैनि बिहाय.

८२३. तकत तकावत तकि रहै, सके न बेझा मारि
सबै तीर खाली परै, चलै कमानी डारि.

८२४. भौसागर जलविष भरा, मन नहिं बांधै धीर,
शब्दसनेही पिउ मिला, उतरा दास कबीर !

८२५. जेहिबन सिंघ न संचरै, पंछी ना उडि जाय,
सो बन कबिर न हींडिया, सुन्न समाधि लगाय.

८१४. परोपदेशें शेवटीं मुखांत पडली रेति
परान्नराशी राखतां घालविली निज शेति.

८१५. घृणा गुणांची निर्गुणी करि; गुणि घेइ गुणांस;
काय जायफळ ! आवडे बैलालागीं घास !

८१६. बघावयाला चांगला जसा हिमाचा कोट
ढळेल सहसा पाहतां, पडेल उघडें पोट !

८१७. 'ब्रह्मापासुन जग निघे' वदती लोक सुयोग्य;
त्या ब्रह्मत्यागाविना जग त्याग ना योग्य.

८१८. ब्रह्म जगाचें बीं असे, नाहीं त्याचा त्याग,
जग विलीन ब्रह्मीं असे, सांगा, कुठुन विराग ?

८१९. 'कर्म' एक पेरा, पहा, बीजें उगति बहूत
'कर्म' एक भाजा, नुगे एकहि अंकुर सूत !

८२०. प्रत्यक्षाविण वर्णि तो प्रदेश मूर्ख, गव्हार
विकत फिरे कापूर पण आपण चाटी खार.

८२१. मलयगिरीवर जाहला एकट तरुसमुदाय
जो तो चंदन म्हणविला, कुणी 'मलयगिरि' नाय.

८२२. घर केलें विषवृक्षतळिं सर्प लपेटुनि राहि,
भय जीवाला त्यामुळें, नीज निशेला नाहिं.

८२३. टकमक टकमक निरखिलें, साधलें न संधान,
चाप टाकिला, चालला व्याध, गळाले बाण.

८२४. भवसागरिं जलविष भरे, न धरी हें मन धीर,
शब्दस्नेही 'प्रिय' मिळे, उतरे पार कबीर !

८२५. ज्या वनिं सिंह न संचरे, पक्षि उडे निरुपाधि,
कबीर फिरला त्या वनीं लावुन शुन्य समाधि.

८२६. खेत भला, बीजौ भला, बोय मुठीका फेर,
काहे बिरवा रूखरा, ये गुन खेतहि केर !

८२७. जीवबिना बांचै नहीं, जिवका जीव अधार
जीव दयाकरि पालिये, पंडित करहु बिचार.

८२८. यती, सती, सब खोजहीं, मनै न मानी हारि
'बड़बड़ बीर बचै नहीं' कहहि कबीर पुकारि.

८२९. यार बुलावै भावसे मोपै गया न जाय !
मन मैली, पिउ ऊजला, लागुं न सक्कूं पाय !

८३०. बेरा बांधि न सर्पको भवसागरके माहिं
छोडो तो बूडत अहै, गहै तो डसिहै वाहि.

८३१. कर खोरा खोवा भरा, मग जोहत दिन जाय,
कबिरा उतरा चित्तसौं छांछ दियो नहि जाय.

८३२. देस देस हम बागिया, ग्रामग्रामकी खोरि
ऐसा जियरा ना मिला जो ले फटकि पछोरि !

८३३. ऊपरकी दोऊ गई, हियकी गई हिराय,
कह कबीर चारउ गई, तासों कहा बसाय ?

८३४. सब काहूका लीजिये साचा शब्द निहार
पच्छपात ना कीजिये कहै कबीर विचार.

८३५. रचनहार को चिह्निलै, खानेको क्यों रोय ?
दिलमंदिरमें पैठिकरि तानि पिछौरा सोय !

८२६. शेत भलें, बींही भलें, पेर मुठीचा फेर,
वृक्ष कशाचा रूक्ष ! रे ! शेताचे गुण हेर !
हेर–पहा.

८२७. जीवावाचुन जीव ना वांचे, करा विचार
पाळा, पोसा जीव; हो जीव जिवा आधार !

८२८. यति, सति, सारे शोधती मनीं न मनती हार
'थोर थोर नच वांचती' करी कबीर पुकार.

८२९. भावें जिवलग बोलवी पण माझा निरुपाय !
मलीन मी, तेजाळ तो, धरूं शके ना पाय !

८३०. अहिसांगड भवसागरीं कामाची लव नाहिं
सोडा तर खाली बुडा; पकडा तर अहि खाइ.

८३१. वाटीभर भरला खवा, प्रतीक्षेंत दिन जाति,
चित्त उतरलें कीं न ये ताकहि देतां हाति.

८३२. देश देश फिरलों अम्ही, गांव गांविचे कूस
असा न जिवलग भेटला जो दे उडवुन भूस !

८३३. गेले वरले दोनही, हृदयांतीलहि दोन,
गेल्यावरतीं चारही नेइल निभवुन कोण ?
टीप:–'चार' म्ह० दोन चर्मचक्षु व दोन ज्ञानचक्षु.

८३४. सकलांचा घ्यावा सदा 'सत्य शब्द' साचार.
'पक्षपात नाहीं करूं' कथि हा कबिर विचार.

८३५. कर्त्यालागीं चिह्न ! कां अशनास्तव संकोप ?
मनोमंदिरीं जाउनी चादर पसरुन झोप.
चिह्न (क्रि.)–ओळख.

८३६. अपनि कहै, मेरी सुनै, सुनि मिलि एकै दोय,
मेरे देखत जग गया ऐसा मिला न कोय.

८३७. लिखा पढीमें सब परै, यह गुन तजै न कोइ,
सबै परै भ्रम जालमें, डारा यह जिय खोइ.

८३८. कबिरा मैं तों तब डरौं, जो मुझहीमें होय--
मीच, बुढापा, आपदा सब काहूमें सोय!

८३९. कबीर सुपिनै हरि मिल्या, सूतां लिया जगाइ,
आंखि न मिचौ डरपतां, मति सुपना ह्वै जाइ!

---

## ७१. आत्मनिवेदन

८४०. बूडा बंसु 'कबीर'का उपजियो पूत 'कमालु'
'हरि' का सिमरनु छांडिकै, घरि लै आया मालु.

८४१. कबीर, "मेरे जातिकू सभुको हसनेहारू
बलिहारी इस जातिकू, जपिहौं सिरजनहारू."

८४२. नारी तो हमभी करी, जाना नांहि बिचार.
जब जाना तब परिहरी, नारी बडा विकार.

८४३. मसि, कागद छूयो नहीं, कलम गही नहिं हाथ,
चारिहु जुग महात्म्य तेही, कहिकै जनायो नाथ.

---

८३६. ऐके मम, कथि आपुलें, ऐकुन दोघे एक !
'गेलें जग देखत' म्हणे असा न भेटे नेक.

नेक–प्रामाणिक; माननीय.

८३७. मग्न लेखनीं वाचनीं, त्यजिति कुणि न तो गूण,
'पडलों भ्रमजालांत' हें जाति सकल विसरून.

८३८. जरा, आपदा, मृत्यु हीं जीं असती सर्वांत–
तीं असती माझ्यांत तर, मजही भीति मनांत !

८३९. स्वप्नि भेट दे, जागवी, प्रभु मज निद्रेंतून
डोळे मी नुघडीं भयें 'स्वप्न' ठरो न म्हणून !

---

## ७१. आत्मनिवेदन

८४०. वंश 'कबीरा'चा बुडे उपजे पुत्र 'कमाल'
स्मरण 'हरी'चें सोडुनी, ये घरिं घेउन माल.

८४१. कबीर, "माझ्या जातिचा करिति सकल उपहास
धन्य जाति मम ! जीमुळें जपि मी जगन्निवास !"

८४२. आम्हीही स्त्री परिणली, केला नाहिं विचार.
विचारल्यावर टाकिली, स्त्री मोठाच विकार !

८४३. मसि, कागद, कलमेस ना लावियला कधिं हात
युगमहतीला वर्णिलें, आराधुन श्रीनाथ.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........................ वि. ........................
क्रमांक ........................ नों. दि. ........................

# विभाग दुसरा

# पदावलि

१.

तलफै बिन बालम मोर जिया
दिन नहिं चैन, रात नहिं निदिया, तलफ तलफके भोर किया
तन, मन मोर रहटअस डोले, सून सेजपर जनम छिया
नैन थकित भये पंथ न सूझै, सांइ बेदरदी सुध न लिया
कहत कबीर सुनौ भाइ साधो, हरो पीर, दुख जोर किया

---

२.

ये अंखियां अलसानी, पिय हो, सेज चलो
खंभा पकरि पतंगअस डोलै, बोलै मधुरा बानी
फूलन सेज बिछाइ जो राख्यौ, पियाबिना कुम्हलानी
धीरे पांव धरो पलंगापर, जागत ननद जिठानी,
कहत कबीर सुनो भाइ साधो, लोकलाज बिछलानी.

---

## १. विरहनिवेदन

तुजविण सखया ! जीव तडफडे
चैन न दिवसां,
निजेविण निशा
तडफडतांना फुटे तांबडें !
भ्रमे चक्रिसम–
तनु, मानस मम
सुन्या शेजि हें जिणें बापुडें !
थकती लोचन
गवसे मार्ग न,
नसे तुझें लव लक्ष यांकडे !
कबीर म्हणती
साधुबंधुप्रति
हरा दुःख ! ही पीडा वाढे !

---

## २. उत्कंठिता

आळसले हे डोळे माझे
चाल, प्रियतमा, आतां शेजे !
खांब धरुन मी पतंग डोले,
मी मधुमधुरा वाणी बोले,
शयन फुलांचें जें अंथरलें––
तुझ्यावाचुनी तें कोमेजें !
हळूच पाउल ठेव पलंगीं
घरांत होतिल जागीं अवघीं;
कबीर म्हणती साधूलागीं–
लोकलाज झटकली पाहिजे !

---

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम
क्रमांक

३.

जाग बिरानी अबका सोवे ? रैन गई दिन काहेको खोवे ?
जिन जागा तिन मानिक पाया । तैं बोरी सब सोय गंवाया
पिय तेरे चतुर, तूं मूरख नारी । कबहुं न पियकी सेज संवारी
तैं बौरी बौरापन कीन्हो । भर जोबन पिय अपन न चीन्हो
जाग, देख पिय सेज न तेरे । तोहि छांडि उठ गये सबेरे
कह कबीर सोई धुन जागे । शब्दबान उर अंतर लागे

## ३. प्रबोधन

जाग, विरहिणी ! निजसि कां अतां ?
राञ सरे ! दिन घालव न वृथा !
आली ज्यांना जाग बावळे !
माणिक मोतीं त्यांस पावलें
दवडिलेंस तें सर्व तूं स्वतां !
खरोखरीं गे ! चतुर तुझा प्रिय
परी मूर्ख तूं नारी अतिशय
शेज सजवलिस नच त्याकरितां !
भरलें असतां अंगीं यौवन
खुळे ! तूंच केलेंस खुळेंपण
ओळखलेंस न निज प्रियनाथा
जाग, पहा, प्रिय नच शेजेवर
कधींच गेला उठून तो तर !
टाकून तुजला; पहाट फुटतां.
कबीर म्हणती तोच जागतो
आरपार उर करुन लागतो—
शब्दबाण हा ज्याच्या चित्ता !

———

४.

प्रथमे गगन कि पुहुपे प्रथमे
प्रथमे पवन कि पाणी।
प्रथमे चन्द कि सूर प्रथम प्रभु
प्रथमे कौन विनाणी।
प्रथमे प्राण प्यंड प्रथम प्रभु,
प्रथमे रकत कि रेत।
प्रथमे पुरुष कि नारि प्रथमे प्रभु
प्रथमे बीज कि खेत।
प्रथमे दिवस कि रैणि प्रथमे प्रभु
प्रथमे पाप कि पुन्य।
कहे कबीर जहा बसहु निरंजन
तहा कछु आहि कि सुन्य।

---

५.

घटमें जल है, जलमें घट है
बाहर भीतर पानी।
फूटा घट, जल जलहि समाना
यह तत कथहु गियानी।
अदि गगना, अन्तै गगना,
मध्ये गगना भाई।
कह कबीर करम किस लागै
झूठी एक उपाई।

---

## ४. ?

प्रथम गगन कीं पुष्प प्रथम प्रभु ?
प्रथम पवन कीं पाणी ?
प्रथम चंद्र कीं सूर्य प्रथम प्रभु ?
प्रथम कोण विज्ञानी ?
प्रथम प्राण कीं पिंड प्रथम प्रभु ?
प्रथम रक्त कीं रेत ?
प्रथम पुरुष कीं नारि प्रथम प्रभु ?
प्रथम बीज कीं शेत ?
प्रथम दिवस कीं रात्र प्रथम प्रभु ?
प्रथम पाप कीं पुण्य ?
कबिर् पुसे, जिथ वसे निरंजन
तिथ कांहीं कीं शून्य ?

---

## ५. पूर्ण

घटीं असें जल, जलीं असें घट
आंत बाहिरीं पाणी
फुटला घट, जल जलांत मिळलें
तत्त्व कथीं हें ज्ञानी
गगन अगोदर, गगन शेवटीं,
मध्यें गगनच, देख,
कबिर म्हणे, लिंपे न कर्म, तो–
उपाय खोटा एक !

---

अन्तः शून्यो बहिः शून्यः शून्य कुंभ इवांबरे ।
अन्तः पूर्णो बहिः पूर्णो पूर्णः कुंभ इवार्णवे ।।

—हठ० ५।५५

६.

ना मैं धर्मी, नाहि अधर्मी, ना मैं जती न कामी हो।
ना मैं कहता, ना मैं सुनता, ना मैं सेवक स्वामी हो।
ना मैं बंधा, ना मैं मुक्ता, ना मैं बिरत, न रंगी हो।
ना काहूसे न्यारा हुआ, ना काहूके संगी हो।
ना हम नरकलोकको जाते, ना हम सर्ग सिधारे हो।
सबही कर्म हमारा कीया, हम कर्मनतें न्यारे हो।
या मतको कोइ बिरलै बूझै, सो अटर हो बैठे हो।
मत कबीर काहूको थापै, मत काहूको मेटे हो।

---

७.

काहे रे नलिनी! तूं कुमिलानी
तेरे हि नालि सरोवर पानी।
जलमें उतपति, जलमें वास,
जलमें नलिनी! तोर निवास।
ना तलि तपती, न ऊपर आगि,
तोर हेतु कहु कासनि लागि।
कह कबीर जे उदकसमान
ते नहिं मुए हमारे जान।

---

## ६. अढळ पदस्थ

मी ना धर्मी, मी न अधर्मी, मी ना यती, न कामी हो
न मी सांगता, न मी ऐकता, मी ना सेवक स्वामी हो
नसे बद्ध मी, नसे मुक्त मी, नच विरक्त, नच रंगी हो
कुणापासुनी नसे वेगळा, नसे कुणाचा संगी हो
पडूं न आम्ही नरकीं किंवा स्वर्गी आम्ही जाउं न हो
केलीं सारीं कर्में आम्ही, अलिप्त कर्मापासुन हो
हें मत उमजे विरळा कुणि तो अढळ होउनी बसेल हो
कबीर, मत स्थापील कशाला ? कशास वा मत नाशिल हो.

---

## ७. अमृतत्त्व

कां गे ! नलिनी, कोमेजसी ?
नाळ तुझी तर जळि सरसीं
जळि उत्पत्ती, जळींच वास,
जळींच नलिनी ! तुझा निवास
तपे न तळ वा वर ना आग
हेत कुणाशीं लागे ? सांग !
कबिर म्हणे जें उदकसमान–
तें न मरे; हें अमुचें ज्ञान !

---

हेत लागणें – प्रेम असणें.

८.

माया महा ठगिनि हम जानी।
तिरगुन फास लिये कर डोलै बोलै मधुरी बानी।
केशवके कमला ह्वै बैठी, शिवके भवन भवानी।
पंडाके मूरत ह्वै बैठी, तीरथमें भइ पानी।
योगीके योगिन ह्वै बैठी, राजाके घर रानी।
काहूके हीरा ह्वै बैठी, काहूके कौडी कानी।
भक्तनके भक्तिनि ह्वै बैठी, ब्रह्माके ब्रह्मानी।
कहै कबीर सुनो हो सन्तो यह सब अकथ कहानी।

---

९.

पीले प्याला हो मतवाला
प्याला नाम अमीरसका रे।
कहै कबीर सुनो साधो
नखसिख पूर रहा विषका रे।

---

## ८. माया

कळलें माया महान ठकिणी
त्रिगुणपाश करिं घेउन डोले, बोले मधुरा वाणी,
झाली कमला केशवाकडे, शिवभवनांत भवानी;
मूर्ति जाह्ली पंड्यासाठीं, झाली तीर्थीं पाणी,
बनली योग्याकारण जोगिण, राजाच्या घरिं राणी;
हिरा कुणास्तव झालि, कुणाची कवडि राहिलि बनुनी,
भक्ताची भक्तीण जाह्ली, ब्रह्म्याची ब्रह्माणी,
कबिर म्हणे, 'संतांनो ! ऐका, सगळी अकथ कहाणी.'

---

## ९. नामरसायन

पी रे ! प्याला हो मतवाला
प्याला नामामृतरसिं भरला,
म्हणे कबीर, ऐक रे ! साधो,
नखि शिखिं पूर विषाचा शिरला.

---

मनुष्याचें शरीर नखशिखान्त विषयरूपी विषानें भरलें आहे. नामामृत रसपान हाच त्याच्या रक्षणाचा एकमेव उपाय आहे.

१०.

पानीबिच मीन पियासी ।
मोंहि सुन सुन आवे हांसी
घरमें वस्तु नजर नहिं आवत
बनबन फिरत उदासी ।
आतमज्ञानबिना जग झूठा
क्या मथुरा क्या कासी ।

---

११.

साधो, यह तन ठाठ तंबूरेका
ऐंचत तार, मरोरत खूंटी, निकसत राग हजूरेका
टूटे तार, बिखर गई खूंटी, हो गया धूरम धूरेका
कहै कबीर, सनो भाइ साधो, अगम पंथ कोइ सूरेका.

---

## १०. अज्ञान

पाण्यामाजी मीन पिपाशी
ऐकुन ऐकुन हसुं ये मजशीं
घरांत वस्तू दृष्टिस ये ना
वन वन वणवण फिरे उदासी
आत्मज्ञानाविण जग खोटें
काय मधुपुरी किंवा काशी !

परमेश्वर प्रत्येकाच्या अंतर्यामीं आहे. परन्तु मूर्ख त्याचा शोध घेत बाहेर भटकतात. तो तीर्थयात्रा करून प्राप्त होत नाहीं. त्याच्या प्राप्तीसाठीं आत्मज्ञान हवें.

भुकेला जसा उपाशी तसा तहानलेला तो पिपाशी.

## ११. नश्वर शरीर

साधो, ही तनु थाट तंबूऱ्याचा
तार ताणली, खुंटी पिळली, राग निघे मधु सूरांचा
तुटल्या तारा, तुटली खुंटी, चूर चूर स्वर माधुरिचा
ऐक कबीर म्हणे हे साधो, अगम पंथ कुणि शूराचा

शरीर तंबोऱ्याची तार आहे. तंबोऱ्याची खुंटी पिळली व तार ताणली म्हणजे जसा मंजुळ ध्वनि निघतो, तसाच शरिरांतून मन:संयमाने व इंद्रिय-दमनानें परमेश्वराचा मधुर राग कानीं पडतो. इंद्रिय, मन, बुद्धि इत्यादिकांचा समवाय नाहींसा झाला म्हणजे या स्थूल आणि सूक्ष्म शरीराचा नाश होतो. आणि मग जीव आत्मस्वरूपांत स्थिर होतो. परंतु हा अगम पंथ चोखाळणारा शूर एखादाच असतो.

'राग' शब्द श्लिष्ट आहे. त्याचा एक अर्थ 'संगीत' व दुसरा अर्थ 'प्रेम' असा आहे.

**१२.**

परमातम गुरु निकट विराजैं
जाग जाग मन मेरे।
धायके पीतम चरनन लागै
सांई खडा सिर तेरे।
जुगन जुगन तोंहि सोवत बीता
अजहुन जाग सवेरे।

---

**१३.**

या तरिबरमें एक पखेरु, भोग सरस वह डोलै रे।
वाकी संघ लखैं नहिं कोई, कौन भावसों बोलै रे।
दुर्म्म डार तह अति घन छाया, पंछि बसेरा लेई रे।
आवै सांझ, उडि जाय सबेरा, मरम न काहू देई रे।
सो पंछी मोंहि कोइ न बतावै, जो बोले घटमांही रे।
अबरन बरन रुप नाहिं रेखा, बैठा प्रेमके छांही रे।
अगम, अपार, निरन्तर बासा, आवत जात न दीसारे।
कहै कबीर,सुनो भाइ साधो,यह कुछ अगम कहानी रे।
या पंछीके कौन ठौर है, बूझो पंडित ज्ञानी रे।

---

## १२. गुरु

गुरुपरमात्मा निकट विराजे
जाग जाग रे ! मना माझिया
लाग धावुनी प्रियतम चरणीं
स्वामि उभे बघ, उशास तुझिया
निजुन लोटलीं युगें युगें तुज
आज जागना पहाटेस या.

---

परमात्मस्वरुप गुरु

---

## १३. जीवात्मा

या तरुवरती एक पाखरूं, रससंभोगीं डोले रे !
कुणि न पाहि संधान तयाचें, कवण्या भावें बोले रे !
जिथ द्रुमशाखा अति घन छाया तिथें पाखरूं राही रे !
परते सांजे, उडे सकाळीं, मर्म कळों ना देई रे !
मज न दावि तें कुणि पाखरूं म्हणति वसे जें कायीं रे !
वर्ण अवर्ण्य, रूप रेषा नच, बसे प्रीतिच्या छायीं रे !
अगम, अपार,निरन्तर वसती, येतां जातां दिसे न रे !
ऐक कबीर म्हणे हे साधो ! कांही अगम कहाणी रे !
कुठें ठाव या पाखरुंवाचा वळख पंडिता ज्ञानी रे !

---

'पाखरूं' म्हणजे जीवात्मा, तें सरस संभोगाच्या आनंदांत मग्न होऊन नाचत आहे. छायेशीर द्रुम-शाखा म्हणजे त्याचें शरीर. स्वतःचें मर्म म्हणजे रहस्य तें कुणाला कळूं देत नाहीं.

---

## १४.

नाचु रे मेरे मन मत्त होय ।
प्रेमको राग बजाय रैन दिन शब्द सुनै सब कोइ ।
राहु, केतु नवग्रह नाचै जन्म जन्म आनंद होइ ।
गिरि, समुन्दर, धरती नाचै, लोक नाचै हंस रोइ ।
छापा तिलक लगाइ बांस चढ हो रहा जगसे न्यारा ।
सहस कला कर मन मेरौ नाचै, रीझै सिरजन हारा ।

---

## १५.

बालम, आवो हमारे गेह रे ।
तुमबिन दुखिया देह रे ।
सब कोइ कहे तुमरी नारी, मोको लागत लाज रे ।
दिलसे नहीं दिल लगाया, तबलग कैसा सनेह रे ।
अन्न न भावै, नींद न आवै, गृह बन धरै न धीर रे ।
कामिनको है बालम प्यारा, ज्यों प्यासेको नीर रे ।
है कोइ ऐसा पर उपकारी, पिबसों कहै सुनाय रे ।
अब तो बेहाल कबीर भयो है, बिन देखे जिव जाय रे ।

---

## १४. ब्रह्मानन्द

नाच मम मना ! मत्त होउनी
राग प्रीतिचा वाजव निशिदिनि, शब्द पडूं दे सकल श्रवणीं
राहु, केतु, नवग्रह हे नाचति जन्मोजन्मीं आनंदोनी
पर्वत, सागर, धरा नाचती, लोक नाचती हसुनी रडुनी
जगावेगळे चढति वेळुवर मुद्रा तिलकांकित हे कोणी
कला सहस्त्रा नाच रे मना ! स्रष्ट्यालाही रिझव नर्तनीं.

---

सृष्टीच्या आनन्दानें चराचर ब्रह्माण्ड नाचत आहे. हसून किंवा रडून सारा लोक नाचत आहे. तेव्हां हे मना ! तूं प्रसन्नतेनें नृत्य कर. मुद्रा टिळा लावणारे स्वतःला या आनन्दापासून अलिप्त मानतात. जमिनींत वेळू गाडून त्यावर बसणारे जसे स्वतःला या नृत्यापासून अलग मानतात तसाच तो प्रकार आहे. मना ! तुझ्या नर्तनानें सृष्टिकर्त्याचेंहि रंजन होईल. त्याच्या रंजनासाठींच तर ही सृष्टि आहे.

---

## १५. दर्शनोत्कण्ठा

प्रियतम, येई माझ्या गेहिं रे !
दुःख तुझ्याविण देहिं रे !
सारे म्हणती, मी तव नारी, वाटे मजला लाज रे !
हृदयाशीं नच हृदय मिळालें तोंवर कुठला स्नेह रे ?
अन्न नावडे, नीज न लागे, गृहिंवनिं राहि न धीर रे !
कामिनीस प्रिय कान्त, ज्यापरी तहान त्याला नीर रे !
परोपकारि असे कुणि कां जो निरोपील कान्तास रे !
कबीर विव्हळे दर्शनाविणें जीव जाय अन्तासरे !

---

१६.

तोर हीरा हिराइल बा किचडेमें ।
कोई ढूंढै पूरब, कोई ढूंढै पच्छिम
कोई ढूंढै पानी पथरेमें ।
दास कबीर ये हीराको परखैं
बांधलिहले जीयराके अंचरेमें ।

---

१७.

गगनघटा घहरानी साधो, गगन घटा घहरानी ।
पूरब दिससे उठि है बदरिया, रिमझिम बरसता पानी ।
आपन आपन मेंड सम्हारो, बह्यौ जात यह पानी ।
सुरत निरतके बैल नहायन, करै खेत निर्वानी ।
धान काट मार घर आवै, सोई कुसल किसानी ।
दोनों थार बराबर परसैं, जेवैं मुनि और ज्ञानी ।

---

## १६. प्राप्ति

तुझा हरवला हीरक चिखलीं
पूर्वेला कुणि, पश्चिमेस कुणि
कुणी धुंडि तो प्रस्तरीं, जलीं;
कबिरदास तो हिरा परिक्षी
त्यास जिवाच्या बांधि अंचलीं.

पूर्वेला हिंदू आणि पश्चिमेला मुसलमान मान देतात त्यावर कटाक्ष आहे. 'प्रस्तरीं' म्हणजे मूर्तींत आणि 'जलीं' म्हणजे निसर्गांत. 'जिवाच्या अंचलांत बांधणें' म्हणजे 'परमात्मा हा जीवात्म्यांत वास करीत असतो.'

## १७. समाधिसमय

गगनघटा घनगहनी, साधो, गगनघटा घनगहनी
पूर्वदिशेनें उठलें वादळ, झिम झिम बरसे पाणी
आप आपुले बांध सावरा, वाहुन जातें पाणी
सुरति निरतिचे बैल नाहती, करा शेति निर्वाणीं
कृपक कुशल अति तोच जो पिकें कापुन वेचुन आणी
दोन्हीं ताटें समान वाढी, जेवतात मुनि, ज्ञानी.

गगनघटा म्हणजे समाधीच्या वेळेची धर्ममेघाची वृष्टि, पूर्वदिशेनें म्हणजे पूर्व जन्मांतील दशेच्या पुण्याईनें, बांध सावरणें किंवा संभाळणें म्हणजे संयमाच्या नियमाचें पालन करणें. पिकें कापणें म्हणजे पुरुषार्थ प्राप्ति. 'सुरति' व 'निरति' हे शब्द कबीर पंथांत साधारणतः 'प्रवृत्ति' व 'निवृत्ति' या अर्थी योजतात. दोन्हीं ताटें म्हणजे सुरति व निरति यांचीं.

## १८.

कोइ प्रेमकीं पेंग झुलावै ।
भुजके खंभ और प्रेमके रससे,
तन मन आजु झुलाव रे !
नैनन बादरकी झर लाओ,
श्याम घटा उर छाव रे ।
आवत आवत श्रुतकी राहपर,
फिकर पियाको सुनाव रे !
कहत कबीर, सुनो भाई साधो,
पियाको ध्यान चित लाव रे ।

---

## १९.

मुखड़ा क्या देखै दरपनमें,
तेरे दया धरम नहिं मनमें ।
आमकि डार कोईलिया बोलै, सुवना बोलै बनमें ।
घरबारी तो घरमें राजी, फक्कड राजी बनमें ।
ऐंठी धोती, पाग लपेटी, तेल चुआ जुलफनमें !
गली गलीकी सखी रिझाईं दाग लगाया तनमें ।
पाथरकी इक नाव बनाई उतरा चाहै छनमें ।
कहत कबीर सुनो भाई साधो वे क्या चढि हैं रनमें ।

---

## १८. तन्मयता

कुणि प्रेमाची पेंग डोलवा.
स्तंभ भुजांचे; प्रेम रसानें–
ही तनु, हें मन आज डोलवा.
नयनीं आणा वादळझड रे !
श्याम घटा ! निज उरीं पसरवा.
हळुहळु येउन श्रवणांसन्निध
प्रियास माझी व्यथा ऐकवा.
कबिर म्हणे, साधूंनो ऐका
ध्यान प्रियाचें चित्तीं लावा.

---

पेंग म्हणजे झुलकी. तीच प्रेमाचा पाळणा होय. दोन बाहू त्या पाळण्याचे खांब आहेत. अंतरंगांतील प्रेमाच्या रसानें शरीराला आणि मनाला त्यांत डोलवा.

---

## १९. चेतावणी

मुखडा दर्पणांत कां बघसी
नच दया, धर्म तव मनसीं ?
आम्रलताग्रीं कोकिळ बोले, वनांत पोपट पक्षी
गृहस्थाश्रमी घरांत राजी, फक्कड अरण्यवासी,
कसलें धोतर, पगडि बांधली, तेल माखलें केशीं
आळिआळितिल सखी रिझविली डाग लावला तनुशीं,
प्रस्तर-नौका एक करी, क्षणिं उतराया अभिलाषी,
कबिर म्हणे, ऐका साधूंनो ! टिके न तो रणरक्षीं.

---

'अभिलाषी' हें इथें क्रियापद, म्हणजे 'इच्छा करतो.'
'रणरक्षीं' म्हणजे 'रणरक्षण करण्यांत.'

---

## १८. तन्मयता

कुणि प्रेमाची पेंग डोलवा.
स्तंभ भुजांचे; प्रेम रसानें–
ही तनु, हें मन आज डोलवा.
नयनीं आणा वादळझड रे !
श्याम घटा ! निज उरीं पसरवा.
हळुहळु येउन श्रवणांसन्निध
प्रियास माझी व्यथा ऐकवा.
कबिर म्हणे, साधूंनो ऐका
ध्यान प्रियाचें चित्तीं लावा.

---

पेंग म्हणजे डुलकी. तीच प्रेमाचा पाळणा होय. दोन बाहू त्या पाळण्याचे खांब आहेत. अंतरंगांतील प्रेमाच्या रसानें शरीराला आणि मनाला त्यांत डोलवा.

---

## १९. चेतावणी

मुखडा दर्पणांत कां बघसी
नच दया, धर्म तव मनसीं ?
आम्रलताग्रीं कोकिळ बोले, वनांत पोपट पक्षी
गृहस्थाश्रमी घरांत राजी, फक्कड अरण्यवासी,
कसलें धोतर, पगडि बांधली, तेल माखलें केशीं
आळिआळितिल सखी रिझविली डाग लावला तनुशीं,
प्रस्तर-नौका एक करी, क्षणि उतराया अभिलाषी,
कबिर म्हणे, ऐका साधूंनो ! टिके न तो रणरक्षीं.

---

'अभिलाषी' हें इथें क्रियापद, म्हणजे 'इच्छा करतो.'
'रणरक्षीं' म्हणजे 'रणरक्षण करण्यांत.'

---

## २०.

का लै जैबो ससुर घर ऐबो ।
गांवके लोग जब पूछन लगि हैं तब हम का रे बतैबो ।
खोल घुंगट जब देखन लगि हैं तब हम बहुत लजैबो ।
कहत कबीर सुनो भाई साधो फिर सासुर नहिं पैबो ।

---

## २१.

झीनी झीनी बीनि चदरिया ।
काहे कै ताना, काहे कै भरनी, कौन तारसे बीनि चदरिया ।
इंगला पिंगला, ताना भरनी; सुषमन तारसे बीनि चदरिया ।
आठ कंवलदल चरखा डोलै, पांचतत्त, गुन तीनि चदरिया ।
सो चादर सुर,नर, मुनि ओढे ओढिके मैली कीनि चदरिया ।
दास कबीर जतनसे ओढी ज्योंकी त्यों धरदीनि चदरिया ।

---

या पदांत कबीरांच्या आत्मविश्वासाचें आक्रामक स्वरूप आहे. पांच तत्त्वांची व तीन गुणांची शरीरचादर सर्वच मुनींनीं आणि देवांनीं पांघरून मळवली आहे ही गोष्ट पौराणिक कथांवरून उघड आहे. परंतु कबीरांनीं मात्र ती मलीन होऊं दिली नाही.

---

## २०. संकोच

जातां न्यावें काय सासरीं ?
गावांतिल जन पुसतिल तेव्हां काय कथावें त्यांस उत्तरीं ?
सारुन मुखपट बघतिल तेव्हां गमेल मजला लाज अंतरीं
कथि कबीर, हे साधो ! तर मग नकोच येणें पुन्हा सासरीं !

---

परमेश्वराकडे जाण्यास पुण्याई हवी.

---

## २१. अहंभाव

तलम मुलायम विणली चादर
कुठला ताणा, कुठला बाणा, कुण्या पाजणीं विणली चादर ?
इडा पिंगळा, ताणा बाणा; विणलि सुषम्ना पाजणि चादर
अष्टकमलदल माग डोलतो, पंचतत्त्वमय, त्रिगुणी चादर
सुर,नर,मुनि तिज पांघरती–ती झालि पांघरुन मलीन चादर.
पांघरली ती यत्नें कबिरें ठेवियलि जशी तशीच चादर.

---

प्राणवायूचें वहन करणाऱ्या तीन नाड्या आहेत. त्या श्वास घेतांना जाणवतात. डाव्या नाडीस 'इडा' आणि उजवीस 'पिंगला' म्हणतात. कबीरांनी 'इडे'लाच अनुप्रासार्थ 'इंगला' म्हटलें आहे. या दोन्ही एकी नंतर दुसरी अशा क्रमाने चालू असतात. या दोघींच्या मध्यें 'सुषम्ना' नाडी आहे. ही परिभाषा हठयोगांतली आहे. वस्त्रांतील आडव्या उभ्या धाग्यांना 'ताणा' व 'बाणा' म्हणतात. 'पाजणी'नें ताणा घट्ट करतात. वस्त्र 'मागा'वर विणतात.

---

## २२.

कौन ठगवा नगरिया लूटल हो ।
चंदन खाटके बनत खटोलना तापर दुलहिन सूतल हो ।
उठो सखी ! मोर मांग संवारो, दुलहा मोसे रूसल हो ।
आए जमराज पलंग चढि बैठे, नैनन आंसू टूटल हो ।
चारिजने मिलि खाट उटाइन चहुं दिसि धू धू ऊठल हो ।
कहत कबीर सुनो भाइ साधो ! जगसे नाता छूटल हो ।

---

## २३.

मन ना रंगाये, रंगाये जोगी कपरा ।
आसन मारि मंदिरमें बैठे, ब्रह्म छाडि पूजन लागे पथरा ।
कनवा फडाय, जटवा बढौले, दाढी बढाय जोगी होइ गैले बकरा ।
जंगल जाम जोगि धुनिया रमौले, काम जराय जोगी होइ गैले हिजरा ।
मथवा मुंडाय जोगी कपडा रंगौले, गीता बाचके होय गैले लबरा ।
कहहि कबीर, सुनो भाई साधो, जमदर बजवा बांधल जैबे पकरा ।

---

## २२. प्रयाण

ठग कोण लुटी ही नगरी हो !
चंदन काष्ठीं खाट बनविली तीवर निजली नवरी हो,
ऊठ सखे ! मम वेणिफणी करि रुसेल नवरा मजवरि हो
खाटेवर यमराज बैसले, नयनीं माझ्या निर्झरि हो
जुळुन चारजण खाट उचलती चहुंदिशि ये अंधेरी हो
कबिर म्हणे, जगताशीं सुटलीं नातींगोतीं सारीं हो.

'ठग' म्हणजे 'मृत्यु'.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ... 32823 वि: ...8154...
क्रमांक ... 9545 ... नोंदि ... 81318

## २३. मिथ्याचार

ना मन,—रंगवि जोगी कपडा;
आसन ठोकुनि बसे मंदिरीं, ब्रह्म सोडुनी पूजी धोंडा.
कान फाडुनी, जटा वाढवी, दाढी ठेउनि होई बकरा.
जाय जंगलीं, धुनी पेटवी, काम जाळुनी होई हिजडा.
मुंडी माथें, रंगवि कपडे, गीता वाचुन होई लुब्रा.
कबिर म्हणे, साधूंनो ! ऐका पकडुन बांधिल काळ कवाडा.

'लुब्रा' म्हणजे 'खोटा व बडबड करणारा.'
'काळ' म्हणजे 'यम.'
कान फाडुनी = कानफाटे योगी हे कान चिरून त्यांत कुंडलें धारण करतात.

२४.

अरे मन धीरज काहे न धरे।
पसु पंछी जिव कीट पतंगा सबकी सुद्ध करै।
गर्भबासमें खबर लेतु है बाहर क्यों बिसरै।
मन तू हसनसे साहेबके भटकत काहे फिरै।
प्रीतम छांड औरको धारै, कारज इक न सरै।

---

२५.

साईंसे लगन कठिन है भाई।
जैसे पपीहा प्यासा बूंदका, पिया पियां रट लाई।
प्यासे प्राण तडफै दिन राती, और नीर ना भाई।
जैसे मिरगा शब्दसनेही, शब्द सुननको जाई।
शब्द सुनै और प्रानदान दे, तनिको नाहिं डराई।
जैसे सती चढी सतऊपर, पियाकी राह मन भाई।
पावक देख डरे वह नाहीं, हसत बैठे सदा माई।
छोडो तन अपने की आसा, निर्भय ह्वै गुन गाई।
कहत कबीर सुनो भाइ साधो, नाहिं तो जनम नसाई।

---

## २४. प्रतिपालक

अरे ! मन, कांहीं धीर धरी
जीव, पक्षि, पशु, पतंग, कीटक चिंता यांचि करी
गर्भि काळजी, वाहिल बच कां ती तो बाहेरीं ?
कशास तूं हे मना ! भटकसी प्रभुपासून दुरीं ?
प्रभु सोडुन धरशील इतर, हो कार्य न एक तरी !

'इतर धरणें' म्हणजे 'पाखंड करणें'.

---

## २५. हुरहूर

कठिण प्रियाशीं लागण भाई !
तृषार्त चातक थेंबासाठीं, पी पी पी पी घोकत राही,—
तृषित अहर्निशि प्राण तडपती, नीर मिळेना त्याला कांहीं.
जैसें मृग संगीतस्नेही, ऐकायाला गाणें जाई—
शब्द ऐकुनी प्राण दान दे तनुची त्याला भीती नाहीं.
नाथचितेवर चढे जशी सति, मार्ग तयाचा चाले तीही—
पावक पाहुन भीत नाहिं ती, तयांत बसते हासत माई,—
निज देहाची सोडी आशा, निर्भय होउनि ती गुण गाई,
कबिर म्हणे, साधूंनो ! ऐका जन्मनाश हा नातर होई.

'लागण' म्हणजे 'ओढ'.

कबीरांच्या कवितेंत 'सांई,' 'बालम,' 'प्रिय' इत्यादि संबोधनें 'परमात्मा' या अर्थीं योजिलीं आहेत. त्यांचीं पदें समासोक्तीच्या पद्धतीवर आहेत. या पदांतील एखाद्या दुसऱ्या विशेषणानेंच वाच्यार्थाबरोबर अप्रस्तुत अर्थहि लक्षांत येतो. हीं सर्व प्रेमपर पदें भक्तिप्रधान आहेत. 'माई' म्हणजे माता, आई.

---

## ३६.

सखियों, हमहुं भई बलमासी ।
आयो जोबन, बिरह सतायो, अब मैं ज्ञानगली अठिलाती ।
ज्ञानगलीमें खबर मिल गये, हमें मिली पियाकी पाती ।
वा पातीमें अगम संदेसा अब हम मरनेको न डराती ।
कहत कबीर सुनो भाई प्यारे, बर पाये अबिनासी ।

---

## ३७.

सांईबिन दरद करेजे होय ।
दिन नहिं चैन, रात नहिं निंदिया, कासे कहूं दुख होय ।
आधी रतिया, पिछले पहरवा, सांइबिना तरस रहि सोय ।
कहत कबीर, सुनो भाई प्यारे, सांई मिले सुख होय ।

---

## २६. वरप्राप्ति

कृतार्थ मी सखि ! प्रिय अभिलषितीं
आलें यौवन, विरह त्रासवी, मी ज्ञानाच्या आळित मुरकति
आळित मजशीं वार्ता कळली, पत्र प्रियाचें पडलें हातीं.
अगमाचा संदेश त्यामधें, मरणाची मज अतां न भीती.
कबिर म्हणे, भाईनो ! ऐका, प्राप्त जाहला अविनाशी पति.

---

मी प्रियकराच्या प्राप्तीची उत्कट अभिलाषा असणारी झालें. 'मी ज्ञानाच्या आळित मुरकति' म्हणजे 'जीव हा ज्ञानाच्या अहंकाराचें प्रदर्शन करीत आहे'.

---

## २७. विरहव्यथा

स्वामिविणा कळ काळजांत हो.
चैन न दिवसां, निजेविण निशा, कसें कुणाशीं सांगुं दुःख हो ?
अर्ध्या रात्रीं, उत्तर प्रहरीं, विरह व्याकुल मी निजलें हो.
कबिर म्हणे, भाईनो ! ऐका, स्वामि भेटतिल तरीच सुख हो.

---

अर्ध्या रात्रीचा उत्तर प्रहर हा साक्षात्काराचा मानला आहे.

---

२८.

मोकों कहाँ ढूंढे बन्दे, मैं तो तेरे पासमें।
ना मैं देवल, ना मैं मसजिद, ना कावे कैलासमें।
ना तो कौन क्रिया कर्ममें, नहीं योग बैरागमें।
खोजी होय तो तुरतै मिलि हौं, पलभरकी तालासमें।
मैं तो रहौं सहरके बाहर मेरी पुरी मवासमें।
कहैं कबीर सुनो भाई साधो, सब स्वासोंकी स्वांसमें।

———

२९.

जिनके नाम ना है हिये।
क्या होवै गल माला डालै, कहा सुमिरनी लिये।
क्या होवै पुस्तकके बांचै, कहा संखधुनि किये।
क्या होवै कासीमें बसि कै, क्या गंगाजल पिये।
होवै कहा वरतके राखे, कहा तिलक सिर दिये।
कहैं कबीर सुनो भाई साधो जाता है जम लिये।

———

## २८. सर्वव्यापक

मातें कुठें धुंडिसि भक्ता ! मी तर तुझ्या पाशि रे !
मी न देवळीं, मी न मशीदीं, काब्यांत न कैलासि रे !
कीं न क्रिया कर्मीं मी कवण्या, न मी योगि, बैरागिय रे !
शोधी त्याला त्वरित मिळे मी पळांत घेतां शोध रे
मी तर राहे शहराबाहिर, शरण मला जो येत रे !
कबिर म्हणे, साधो, सकलांच्या श्वासांच्या श्वासांत रे !

---

परमेश्वर हा मनुष्याच्या अन्तर्यामीं आहे. त्याची प्राप्ति सहज शक्य आहे. 'शहराबाहेर राहतो' याचा अर्थ इतकाच कीं, 'जगाच्या गडबडींत, कामकाजांत मी नसतो.' 'मी' म्हणजे 'परमेश्वर'. 'काबा' हें मुसलमानांचें अरवस्थानांतील धर्मक्षेत्र आहे.

---

## २९. सोंगढोंग

नाम प्रभूचें ज्यांच्या न मनीं
काय घालुनी गळयांत माळा ! काय राहुनी करांत स्मरणी !
काय होतसें पुस्तक वाचुनि ! काय काढुनी शंखाचा ध्वनि !
काय करोनी वास काशिचा ! काय होय गंगाजल पानीं !
काय होय तरि व्रत पाळोनी ! काय होय शिरिं टिळे लावुनी !
कबिर म्हणे, साधूंनो ! ऐका, त्यास जातसे यम घेवोनी.

---

३०.

दरियावकी लहर दरियाव है जी
दरियाव और लहरमें भिन्न कोयम् ।
उठे तो नीर है, बैठे तो नीर है
कहो जो दूसरा किस तरह होयम् ।
उसीका फेरके नाम लहर धरा
लहरके कहे क्या नीर खोयम् ।
जक्त ही फेर जब जक्त है ब्रह्ममें
ज्ञान करि देख कब्बीर गोयम् ।

---

सागर व तरग यांत केवळ नाम आणि रूप यांचा भेद आहे. तोच प्रकार जगत् आणि ब्रह्म यांच्या बाबतींत आहे. 'कबीर गोयम्' म्हणजे 'कबीर सांगतात.' भक्तीच्या मार्गांत अद्वैत भावना बाधक नाहीं. येथें 'अभेद-जन्य प्रीती'चें उदाहरण आहे. [ 'कोयम्', 'होयम्', 'खोयम्', 'गोयम्' ही रूपें करण्यांत कदाचित कबीरांचा हेतु एखाद्या संस्कृतज्ञ परंतु ब्रह्मज्ञान नसलेल्या पंडिताची थट्टा करण्याचा असावा. ]

## ३०. ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या

लहर दर्यातली
  तीहि दर्या असे
लहर,दर्या –अशीं
  भिन्न कां हो ?
नीर उठतां असे,
  नीर फुटतां असे–
हेंहि कोण्यापरी
  अन्य कां हो ?
लहर त्याला म्हणा,
  लहर म्हटल्यामुळें–
नीर तें होतसे
  नष्ट कां हो ?
जगत ब्रह्मामधें
  ब्रह्म जगतामधें–
जाणुनी; कबिर तें
  सांगतो हो !

------

## ३१.

रस गगन गुफामें अजर झरै ।
बिन बाजा झनकार उठे जहं समुझि परै जव ध्यान धरै ।
बिना ताल तहं कवल फुलाने तेहि चढि हंसा केलि करै ।
बिन चंदा उजियारी दरसै जहं तहं हंसा नजर परै ।
दसवे द्वारे ताडी लागी अलख पुरुष जाको ध्यान धरै ।
काल कराल निकट नहिं आवै, काम, क्रोध, मद, लोभ जरै ।
जुगुन जुगुनकी तृषा बुझानी, करम, भरम, अध, व्याधि टरै
कहै कबीर, सुनो भाइ साधो, अमर होय कबहूँ न मरै ।

---

## ३२.

नाम अमल उतरै ना भाई ।
औ अमल छिन छिन चढि उतरै, नाम अमल दिन बढै सवाई ।
देखत चढै, सुनत हिय लागै, सुरत किये तन देत घुमाई ।
पियत पियाला भये मतवाला, पायो नाम मिटी दुचिताई ।
जो जन नाम अमल रस चाखा तर गइ गनिका, सदन कसाई ।
कह कबीर, गूंगे गुड खाया बिनरसना का करै बडाई ।

---

## ३१. कर्त्तास्थान

रस गगन गव्हरीं अजर झरे

वाद्याविण झंकार उठे तिथ, उमजे धरितां ध्यान खरें
तळ्यावाचुनी फुलती कमळें हंस त्यामधी केलि करे
चंद्राविण हो उजेड गोचर जिथ तिथ हंसच ये नजरे
दशम द्वारीं ताटी लागे, अलक्ष पुरुषीं ध्यान वळे
काळ कराल निकट ना येई; काम, क्रोध, मद, लोभ जळे
युगायुगांची तृषा तृप्त हो कर्म, भ्रम, अघ, व्याधि टळे
कबिर म्हणे, साधूंनो ! ऐका, अमर होइ केव्हां न मरे.

---

'हंस' म्हणजे 'विशुद्ध चैतन्य', 'जीवाचें वास्तविक सत्य'. हा कबीर पंथांतला एक पारिभाषिक शब्द आहे.

'दशमद्वारें' म्हणजे 'दहा इंद्रियें'.

---

## ३२. नाममाहिमा

नाम अमल ना उतरे भाई !

इतर अमल क्षणि चढति, उतरती; नाम अमल पण चढे सवाई
चढे देखतां, भिने ऐकतां, करितां रति, तनु चक्कर खाई
प्राशन करतां, ये प्रमत्तता, पावे नाम, मिटे दुःश्चित्तहि.
जे जन नाम अमल रस प्याले, तरले गणिका, सदन कसाई
कबिर म्हणे, गुळ खाइ मूक तो जिभेवीण कां करिल बढाई ?

---

'गणिका' म्हणजे 'पिंगला'. 'अमल' म्हणजे 'नशापाणी' किंवा 'निर्मळ'. (श्लेष)

**३३.**

साधो, शब्द साधना कीजै ।
जासु शब्द ते प्रगट भए सब सब्द सोइ गहिलीजै ।
शब्दहि गुरु, शब्द सुनि सिखभे, शब्द सो बिरला बूझै ।
साइं, सिष्य और गुरु, महातम जेहि अंतरगत सूझै ।
शब्दै बेद, पुरान कहत है; शब्दै सब ठहरावै ।
शब्दै सुर, मुनि, संत कहत है, शब्द भेद नहिं पावै ।
शब्दै सुनि सुनि भेख धरत है, शब्द कहै अनुरागी ।
षटदरशन सब शब्द कहत है, शब्द कहै बैरागी ।
शब्दै माया, जग उतपानी, शब्दैकेर पसारा ।
कह कबीर, जहं शब्द होत है, तव न भेद है न्यारा ।

---

**३४.**

सांईके संग सासुर आई ।
संग ना रही, स्वाद ना जान्यो गयो जोबन सुपनेकी नाई ।
सखी सहेली मंगल गावें, सुख दुख माथे हरदी चढाई ।
भयो बिवाह चली बिन दूलह, बाट जात समधी समझाई ।
कहैं कबीर, हम गौने जैबे, तरब कन्त लै तूर बजाई ।

---

## ३३. शब्द

साधो, शब्दसाधना कीजे ।
ज्या शब्दांनी प्रकट जाहलें सकल, –शब्द ते घेजे ।
गुरू शिष्य शब्दींच जाहले, पण ते विरळा उमजे ।
स्वामि, शिष्य, गुरु आणि महात्मा अन्तर्गत ज्यां समजे ।
शब्द सांगती वेद, पुराणें; शब्दीं अवघें गाजे ।
शब्दच सुर, मुनि, संत बोलती, शब्द भेद नच पावे ।
शब्द ऐकतां वेष धरितसे, शब्द वदे अनुरागी ।
शब्द सांगती सहा दर्शनें, शब्द म्हणे बैरागी ।
शब्दीं माया, जगदोत्पत्ती, शब्दांचाच पसारा ।
कबिर म्हणे, जिथ शब्द राहती, तेथिल भेदच न्यारा ।

---

'शब्द-भेद' म्हणजे 'शब्दांचें रहस्य, मर्म.' 'वेष धारण करणें' म्हणजे 'अवतार घेणें.' कबीर पंथांत 'शब्दा'ला फार महत्त्व आहे.

---

## ३४. सासर

स्वामीसह मी येत सासरीं
संगि न वसलें, स्वाद न कळला, गेलें यौवन स्वप्नाच्यापरि
सख्या सोबतिणि मंगल गाती, हळद लाविती सुखदुःखशिरीं
विवाह होतां, निघें वराविण, उपदेशिति मज सगींसोयरीं
कबिर म्हणे, जों पोंचु सासरीं, फुंकिल तोंवर कान्त तुतारी.

---

परमेश्वराच्या भजनपूजनाशिवाय आणि प्राप्तीशिवाय सारा जन्म व्यर्थ गेला. 'कान्त तुतारी फुंकील' म्हणजे 'मृत्यूची पूर्व सूचना'.

---

## ३५.

समुझ, देख, मन! मीत पियरवा,
आसिक होकर सोना क्या रे।
पाया हो तो दे ले प्यारे,
पाय पाय फिर खोना क्या रे।
जब अंखियनमें नींद घनेरी,
तकिया और बिछौना क्यारे।
कहैं कबीर, प्रेमका मारग,
सिर देना तो रोना क्या रे।

---

## ३६.

साहेब हममें, साहब तुममें, जैसे प्राना बीजमें।
मत कर बन्दा गुमान दिलमें, खोज, देखले तनमें।
कोटि सूर जहं करते झिलमिल, नील सिंध सोहै गगनमें।
सब ताप मिट जाय देहिकै, निर्मल होय बैठी जगमें।
अनहद घंटा वजै मृदंगा, तन सुख लेहि पियारमें।
बिन पानी लागी जहं बरषा, मोती देख नदीनमें।
एक प्रेम ब्रह्माण्ड छाय रह्यो है, समझे विरले पूरा।
अंध भेदी कहा समझैंगे, ज्ञानके घरतें दूरा।
बडे भाग अलमस्त रंगमें, कविरा बोलै घटमें।
हंस उबारन, दुःख निवारन; आवागमन मिटै छनमें।

---

## ३५. प्रेममार्ग

समज, बघ, मना ! सख्या, प्रेमळा
रसिक होउनी काय झोपणें ?
प्राप्त जाहलें असेल, तर दे
प्राप्तीनंतर काय हरवणें ?
नीज लोचनीं गाढ जेधवां
गाद्या गिर्द्या काय बिछौने ?
कबीर सांगे, मार्ग प्रीतिचा
शिर देणें तर मग कां रडणें ?

---

'प्रेम' म्हणजे 'भक्ति'. ती करतांना मृत्यु आला, तरी भीतीचें कारण नाहीं.

---

## ३६. प्रेमब्रह्माण्ड

प्राण जसा बीजांत त्यापरी ईश तुझ्यामाझ्यांत वसे
करूं नको अभिमान निज मनीं, तनूंत शोधुन पहा, दिसे;
कोटि सूर्य झळझळती जेथें, नील सिंधु शोभे गगनीं
हो देहीचा ताप नाहिंसा, बसे जगीं निर्मळ बनुनी
अनहत वाजे मृदंग, घंटा; सुखावते तनु प्रेमानें
पाण्यावाचुन होई वर्षा, नदींत मुक्तांचें लेणें;
एक प्रेमब्रह्माण्ड पसरलें, जाणिल विरळा त्यास पुरें
ज्ञानगृहाहुन दूर आंधळे, कळेल त्यांना कसें बरें ?
अहोभाग्य ! रंगांत मत्त हो कबीर बोले, घटांतुनी—
हंसोद्धारण, दुःखनिवारण; जन्म मरण संपेल क्षणीं !

---

'घट' म्हणजे 'शरीर'. 'हंस' म्हणजे 'शुद्ध मुक्त जीवात्मा'. 'जन्म-मरण' यांना 'आवा गमन' अशी परिभाषिक संज्ञा आहे. 'देही'चा म्हणजे 'देह धारण करणाऱ्या मनुष्याचा'.

---

३७.

रितु फागुन नियरानी, कोई पियासे मिलावे।
पियाको रूप कहां लग बरनूं, रूपहि मांहि समानी।
जो रंग रंगे सकल छवि छाके, तन मन सभी भुलानी।
यों मत जाने यहि रे फाग है, यह कुछ अकहकहानी।
कहै कबीर, सुनो भई साधो, यह गत बिरले जानी।

३८.

नारद, प्यार सो अन्तर नाहीं।
प्यार जागै तोही जागूं, प्यार सोवै तब सोऊं।
जो कोइ मेरे प्यार दुखावै जडामूलसों खोऊं।
जहां मेरा प्यार जस गावै तहां करौ मैं बासा।
प्यार चले, आगे उठ धाऊं, मोहि प्यारकी आसा।
बेहद्द तीरथ प्यारके चरननि कोट भक्त समाय।
कहैं कबीर, प्रेमकी महिमा प्यार देत बुझाय।

---

नाहं वसामि वैकुंठे, योगिनां हृदये रवौ।
मद्भक्ता यत्र गायन्ति तत्र तिष्ठामि, नारद ॥

## ३७. साक्षात्कार

ऋतु फागाचा आला सरशीं कुणी भेटवा मला प्रियाशीं
करुं रूपाचें कुठवर वर्णन ? रूपांत गेलें मी सामावुन !
सकल छवीच्या रंगिं रंगला तनुमन अवघें भुललें त्याला !
हाच फाग, हें जाणा न मनीं, असे सर्व ही अकथ कहाणी
कबीर सांगे, हें साधूंला गति ही जाणे विरला कोणी !

---

'फागाचा ऋतु' म्हणजे 'परमेश्वराच्या प्राप्तीचा,उल्हासाचा व आनंदाचा ऋतु'.

## ३८. प्रेम

(पहा,) नारदा ! (माझा बाणा)
मी प्रेमाला अन्तर दे ना;
प्रेम जागतां जागें मीही,
प्रेम झोपतां झोपें मीही;
प्रेम्याला जो दुखवी माझ्या
समूळ उखडुन टाकीं मी त्या !
प्रेमाचें यश जेथें गाती
तेथें तेथें माझी वसती
धावे प्रेमापुढें पुढें मी
प्रेमाशा मज लावि लगामीं
प्रेमापायीं तीर्थें वसती
कोटि भक्तजन त्यांत निवसती
कथि प्रेमाचा कबीर महिमा,
'मला बुझावी' ( देउन प्रेमा. )

---

'प्रेम्याला' म्हणजे 'भक्ताला'. 'पुढे पुढे धावणें' हें सेवानिष्ठेचें द्योतक आहे.
'ईश्वर मला प्रेम देतो व समजावतो' असा प्रेमाचा महिमा कबीर सांगत आहेत.

३९.

मोहि तोहि लागी कैसे छूटे ।
जैसे कमलपत्र जल बासा,
ऐसे तुम साहिब हम दासा ।
जैसे चकोर तकत निस चंदा
ऐसे तुम साहिब हम बंदा ।
मोहि तोहि आदि अंत बन आई,
अब कैसे लगन दुराई ।
कहै कबीर, हमरा मन लागा,
जैसे सरिता सिंध समाई ।

---

४०.

भजु मन, जीवन नाम सबेरा ।
सुंदर देह देख निज भूलो, झपटलेत जस बाज बटेरा ।
यह देहीको गरब न कीजै, उड पंछी जस लेत बसेरा ।
या नगरीमें रहन न पैहो, कोइ रहि जाग न दूख धनेरा ।
कहै कबीर, सुनो भाई साधो, मानुख जनम न पैहो फेरा ।

---

## ३९. लागी

तुझि माझि लागी लागे रे !
सुटेल आता कशी बरें ?
कमल जलाचा सहवास
तसा स्वामी तूं, मी तव दास;
चकोर टकमक विधुस बघे
पुढे स्वामि तूं, मी मागे,
आदि अन्त अपुला ठरला
दूरपणा आतां कुठला ?
तुझ्यांत मम मन मुरे पुरें
सरिता सिधुंत जशी विरे !

---

'लागी' म्हणजे 'ओढ'.

---

## ४०. नामस्मरण

भज मन ! जीवनिं नाम सकाळीं
सुंदर देह बघोन नको भुलुं, झडपिल श्येन अकालीं
गर्व नसावा देहाचा, झणिं उडेल खग आभाळीं
दु:खनगरिं ह्या वास न होई, इथे न जागा खाली
कबिर म्हणे, यो पुन्हा न परतुन नरजन्माची पाळी.

---

'श्येन' म्हणजे 'ससाणा' अर्थात् 'अपमृत्यु'.

'इथे न जागा खाली' म्हणजे कायमचें वास्तव्य करण्यास जागा रिकामी नाही.'

## ४१.

साधो, सो सतगुरु मोहि भावै ।
सत्त प्रेमका भरभर प्याला, आप पिवै, मोहि प्यावै ।
परदा दूर करै आंखिनका, ब्रह्म दरस दिखलावै ।
जिस दरसनमें सब लोक दरसै, अनहद सब्द सुनावै ।
एकहि सब सुख दुख दिखलावै, सब्दमें सूरत समावै ।
कहै कबीर, ताको भय नाहीं, निर्भय पद परसावै.

---

## ४२.

तिबिर सांझका गहिरा आवै, छावै प्रेम मन तनमें ।
पच्छिम दिसकी खिडकी खोलो, डूबहु प्रेमगगनमें ।
चेतकंवलदलरस पीयो रे ! लहर लेहु या तनमें ।
संख, घंट, सहनाई बाजै, सोभासिंध महलमें ।
कहै कबीर, सुनो भाई साधो, अमर साहब लख घटमें ।

---

## ४१. सद्‌गुरु

तोच सद्‌गुरू मला आवडे
सत्प्रेमाचा भरुनी प्याला स्वयें पी, मज प्याया दे
डोळ्यांवरलें पडळ दूर करि, दर्शन ब्रह्माचें करुनी दे.
सकल लोक ज्या दर्शनिं दिसती, श्रवणयुगल भरि अनहतशब्दें
सर्व एक सुख दुःख दाखवी, सुरति समावी शब्दामध्ये.
कबिर म्हणे, त्याला भय नाहीं, सहज स्पर्शवी तो अभय पदें

---

'सत्प्रेम' म्हणजे वास्तविक प्रेम.
'सुरति' अन्तर्मुखी आणि सूक्ष्म आहे. ती 'शब्दां'त विलीन झाली म्हणजेच जीव आपल्या सत्य स्वरूपांत स्थित होतो.

---

## ४२. प्रियसमागम

गहन होत संध्या तम सरके, पसरे प्रेम शरीरिं मनीं
खिडकि पश्चिमेकडली उघडा, डुंबा प्रेमाच्या गगनीं,
चित्तकमलदलरस प्राशा रे ! लहरी लहरूं द्या शरिरीं
सनई, घंटा, शंख वाजती शोभासिंधु प्रासादीं
कबिर म्हणे, हे साधो ! तूं बघ, अमर प्रभुला स्वीय हृदीं.

---

सायंकाल प्रियसमागमाचा आहे. भक्तरूपी प्रेयसी सबाह्यान्तर रोमांचित झाली असून समागमार्थ उत्सुक आहे. 'चित्तरूपी कमलदलाच्या रसाचें पान करा' म्हणजे मनांतल्या मनांत त्या परमसुखाचा साक्षात्कार होऊं द्या. शरीरांत प्रेमाच्या लाटा उठूं द्या. 'शोभेचा समुद्र असणारा प्रासाद' म्हणजेच भक्ताचें 'अंतःकरण.' तेथें समागमसूचक वाद्यें वाजत आहेत.

---

## ४३.

जिससे रहनि अपार जगतमें, सो प्रीतम मुझे पियारा हो।
जैसे पुरइनि रहि जलभीतर, जलहिमें करत पसारा हो।
वाके पानी पत्र न लागै, ढलकि चलै जस पारा हो।
जैसे सती चढे अगिनपर, प्रेमवचन ना टारा हो।
आप जरै औरनिको जारै, राखै प्रेममरजादा हो।
भवसागर इक नदी अगम है, अहद अगाह धारा हो।
कहै कबीर सुनो भाई साधो, बिरलै उतरे पारा हो।

---

## ४४.

तोको पीव मिलैंगे घूंघटको पट खोल रे।
घटघटमें वह सांई रमता, कटुक वचन मत बोल रे।
धन, जोबनको गरब न कीजै, झूठा पंचरंग चोल रे।
सुन्न महलमें दियना बारिले, आसासों मत डोल रे।
जाग जुगुतसों रंग महलमें पिय पायो अनमोल रे।
कहै कबीर, आनंद भयो है, बाजा अनहद ढोल रे।

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३२८२३ दि
क्रमांक ९५५८ नों दि 6/3/82

## ४३. निःसंग

अनन्त कालावरी राहणें जगिं, तो प्रियतम मज प्यारा हो
जसें कमलदल जलांत राहुनि जलांत पसरे अक्षय हो
त्यास न लागे जल बिन्दूही ओघळतो जणुं पारा हो
सती जशि चढे अग्नीवरती प्रेमवचन ना टाळी हो
स्वयें जळे, इतरांना जाळी, कुलमर्यादा पाळी हो
भव सागर वा नदी अगम ही अगाध, आयत धारा हो
कबिर म्हणे, उतरोनी जाई एखादा परपारा हो.

संसारांत राहूनहि जे संसारापासून अलिप्त असतात,त्यांना कमलदलाची उपमा देतात. 'अनन्त कालावरी' म्हणजे 'अनन्त कालपर्यन्त'. 'इतरांना जाळणें' म्हणजे 'अहोभाग्याचा मत्सर वाटावयास लावणें'. 'आयत' म्हणजे 'विस्तृत'.

---

## ४४. भक्तिउद्रेक

तुज भेटतील प्रिय, सार मुखांचल पैल गे !
घटाघटांतुन स्वामी रमती, कटुवचनें नच बोल गे !
धनयौवनमद न करी खोटें पंचरंगि हें चैल गे !
शून्य महालीं दीप पाजळे, आशेने नच डोल गे !
जाग युक्तिने रंगमहालीं पावे प्रिय अनमोल गे !
कबिर म्हणे, आनंद होतसे, वाजे अनहत ढोल गे !

'मुखांचल पैल सार' म्हणजे 'तोंडावरचा पदर दूर कर' अर्थात् मायेचा त्याग कर. 'घटाघटांतुन' म्हणजे 'प्रत्येकाच्या देहांतून'. 'पंचरंगी चैल' म्हणजे 'पंचतत्त्वमय शरीर', हें एखाद्या वस्त्राप्रमाणें आहे. 'शून्य महालीं दीप पाजळे' म्हणजे 'समाधि लागली असून ज्ञानदीप प्रज्ज्वलित झाला आहे'. 'शून्य' हा शब्द पारिभाषिक असून तो 'समाधि' वाचक आहे. 'अनहत नाद' हा हठयोगांतील एक सांकेतिक शब्द आहे. समाधि लागली म्हणजे हा नाद सतत ऐकू येत असतो.

---

४५.

सुगवा पिंजरवा छोरि भागा ।
इस पिंजरेमें दस दरवाजा दस दरवाजे किवरवा लागा ।
अंखियनसेती नीर बहन लाग्यो अब कस नाहि तूं बोलत अभागा ।
कहत कबीर सुनो भाई साधो उडिगो हंस टूटि गयो तागा ।

---

४६.

भूला लोग कहै घर मेरा ।
जा घरवामें फूला डोले सो घर नाहीं तेरा ।
हाथी, घोडा, बैल बाहना संग्रह कियो घनेरा ।
वस्तीमेंसे दियो खदेरा, जंगल कियो बसेरा ।
गांठी बांधी, खरच न पव्यो, बहुरि कियो नहिं फेरा ।
बीबी बाहर हरम महलमें, बीच मियाका डेरा ।
नौ मन सूत अरुझि नहिं सूझै जनम जनम अरु झेरा ।
कहत कबीर सुनो हो सन्तो, यह पद करो निबेरा ।

---

## ४५. अंतिम दृश्य

पोपट पंजर सोडुन निसटे
पंजरास या दश दरवाजे त्यांचीं बंद कपाटें;
डोळ्यांमधुनी वाहे पाणी, आतां न तो पुटपूटे.
कबीर बोले, ऐक साधो ! तो, दूर उडे, बंध तूटे.

---

'दश दरवाजे' म्हणजे 'दहा इंद्रियें'.

---

## ४६. निःसार संसार

भुलले जन 'माझें घर' म्हणती—
तें नाहीं घर तुझें परंतु फुलें घरीं ज्या डुलती,
वाहनसंग्रह केला मोठा घोडे, पुंगव, हत्ती
जंगलांत पण निवास केला, उठतां येथिल वस्ती
द्रव्य सांचलें, नाहिं वेंचलें; इथें न येणें परती
बाइल राहे दूर महालीं, बुवा देइ तळ रस्तीं
निजलें मन, नुमजे, हुरहुर ही जन्मोजन्मीं नसती
कबिर म्हणे, सन्तानो ! योजा, हें पद निर्वाहार्थी.

---

'पुंगव' म्हणजे 'बैल'. 'इथें न येणें परती' म्हणजे 'पुनर्जन्म'.
'नसती' म्हणजे 'उगाच', 'व्यर्थ.'

४७.

हूं बारी मुख फेर पिया रे।
करवट दे मोहिं काहेको मारे।
करवत भला, न करवट तेरी।
लाग गले, सुन बिनती मोरी।
हम तुम बीच भया नहिं कोई।
तुमहिं सो कंत, नारि हम सोई।
कहत कबीर सुनो नर लोई।
अब तुम्हरी परतीत न होई।

---

४८.

तोहिं मोरि लगन लगाये रे फकिरवा।
सोबतही में अपने मन्दिरमें,
सब्दन मारि जगाये रे फकिरवा।
बूडतही भवके सागरमें
बहिया पकरि समुझाये रे फकिरवा।
एकै बचन, बचन नहिं दूजा
तुम मोसें बंद छुडाये रे फकिरवा।
कहै कबीर सुनो भाई साधो,
प्रानन प्रान लगाये रे फकिरवा।

---

## ४७. विरहार्तता

या वेळीं मुख वळव प्रेमळा !
कूस पालटुन, लोट न मजला,
कुशीहून या बरि कर्वत ती
गळयांत पड मम ऐक विनंती.
कोणी माझ्या तुझ्यांत नाहीं
तूंच कान्त, तव कान्ता मीही !
कबीर म्हणतो, 'ऐका जन हो !
प्रीति न आतां तुम्हांवर हो.'

'तुम्हांवर आतां प्रीति नाहीं' म्हणजे ईशप्राप्तीनंतर संसारसुखाची गोडी राहात नाही.

------

## ४८. बन्धमुक्त

तुझि माझि लागण लागे रे विराग्या !
निजलें होतें मी निज मन्दिरिं
शब्दाघातीं जागे रे विराग्या !
बुडतां मी संसारसागरीं
बाहु धरुन मज बोधि रे विराग्या !
एकच वचन, वचन नच दूजें
बन्धमुक्त मज करि रे विराग्या !
म्हणे कबीर, ऐक हे साधो !
प्राण प्राण एक करि रे विराग्या !

'लागण' म्हणजे 'ओढ'. 'शब्द+आघाती' म्हणजे कबीरांच्या सार-वाणीनें किंवा शब्दसंगीतानें. जो गुरु पारखी असतो, तोच बंधमुक्त करूं शकतो. अशा गुरूला कबीरपंथांत 'बंदीछोड' अशी संज्ञा आहे. कबीर हे त्यांच्या संप्रदायांत 'बंदीछोड' म्हणून प्रसिद्ध आहेत. 'विरागी' म्हणजे 'गुरु' अर्थात् लाक्षणिक अर्थानें 'परमेश्वर'.



--------

४९.

(बुढिया) हसि कह, मैं नितही बारि।
मोसों कहु तरुनी कवनि नारि।
दांत गयल मोर गंग न्हात।
बयस गयल परपुरुष लेत।
जान पुरुषवा मोर अहार।
अनजानेका करों सिंगार।
(कहहिं) कबीर, बुढिया आनंद गाय।
पूत, भ्रतारहि बैठी खाय।

———

५०.

साधो ! एक रूप सबमांहीं।
अपने मनहिं बिचारिक देखो और दूसरो नाहीं।
एकै त्वचा, रुधिर पुनि एकै विप्र सूद्रके मांहीं।
कहीं नारि, कहिं नर होइ बोलै, गैब पुरुष वह नाहीं।
सब्द पुकारि सत्त मैं भाखौं अन्तर राखौ नाहीं।
कह कबीर, ज्ञान जेहि निरमल, बिरलै ताहि लखाहीं।

———

## ४९. मोहमोहिनी

(जरति) हसुन म्हणे, मी नित्य बालिका
मजसम तरुणी कुणी अन्य कां ?
दंतहीन मी विडे चघळुनी,
केस गळाले गंगास्नानीं,
गेले डोळे घालुन काजळ,
परपुरुषासह गेलें वय चल,
ज्ञानि पुरुष माझा आहार,
अज्ञातास्तव मम श्रृंगार,
(म्हणे कबीर) मोदें गाई वृद्धा नार
गिळून बसली पुत्र, भ्रतार

'जरति' 'वृध्दा' म्हणजे 'मोहमाया'. 'परपुरुषा'वर श्लेष आहे. त्याचा दुसरा अर्थ 'परमेश्वर'. 'ज्ञानी पुरुष' म्हणजे चतुर नर जे स्वतःला 'ज्ञानी' समजतात. 'अज्ञात' म्हणजे 'ब्रह्म'. 'चल वय' म्हणजे 'अस्थिरवय'.

---

## ५०. एकत्व

साधो ! एक रूप सर्वांत
मनीं आपुल्या बघा विचारुन 'अन्य' कुणी न जगांत
त्वचा एक त्यापरी रुधिरही विप्र आणि शूद्रांत
नारि कोणि नर कोणि बोलती अद्‌भुत नाहिं तयांत
शब्दोच्चारीं कथीं सत्य मी नाहीं भेद कुणांत.
म्हणे कबिर, जो ज्ञानी निर्मळ विरळा दृष्टिपथांत.

'शब्दोच्चारीं कथीं सत्य मी' म्हणजे शब्दांचा उच्चार जोराने करून मी सत्यकथन करीत आहे. कबीर पंथांत 'शब्दां'ना फार महत्त्व आहे.

---

**५१.**

वा दिनकी कछु सध कर मनमां ।
जा दिन लैचलु लैचलु होई ।
ता दिन संग चलै नहिं कोई ।
तात, मात, सुत, नारी रोई ।
माटीके संग दियो समाई ।
सो माटी काटेगी तनमां ।
उलफत नेहा, कुलफत नारी, ।
किसकी बीबी, किसकी बांदी, ।
किसका सोना, किसकी चांदी ।
जा दिन जमले चलि है बांधी ।
डेरा जाय परै वहि बनमां ।
टांडा तुमने लादा भारी ।
बनिक किया पूरा व्योपारी ।
जूआ खेला, पूंजी हारी ।
अब चलनेकी भई तयारी ।
हितचित मत तुम लाओ धनमां ।
जो कोइ गुरुसे नेह लगाई ।
बहुत भांति सोई सुख पाई ।
माटीमें काया मिलि जाई ।
कहे कबीर आगे गोहराई ।
सांच नाम साहेबको संगमां ।

———

## ५१. तो दिवस

त्या दिवसाची शुद्ध ठेव मनिं
ज्या दिनिं येथुन जाणें होइल,
त्या दिनिं संगें कुणी न येइल,
आईबाप, सुत, नारी रडतिल,
मातीमाजी पुरूनि टाकतिल,
टाकिल ती मग काया खाउनि.
स्नेह संपला, नार उदासी
कोण कुणाची पत्नी दासी !
ज्या दिनिं येथुन यम बांधुन ने
कुठली चांदी ! कुठलें सोनें !
उठुनि तळ पडे तिकडे विजनीं !
लादलास तूं तांडा भारी
पुरता बनिया तूं व्यापारी
सरे भांडवल, होसि जुगारी
निघायची कर अतां तयारी
चित्त न दे हितसंबंधि, धनीं !
केला ज्यानें स्नेह गुरूशीं
प्राप्त तयाला हो सुखराशी
मातित मिसळे देह जेधवां
कबिर म्हणे, ये जाग तेधवां
संगि न सत्यनामप्रभुवाचुनि.

---

'संगी' म्हणजे 'सोबती'.

## ५१.

वा दिनकी कछु सुध कर मनमां ।
जा दिन लैचलु लैचलु होई ।
ता दिन संग चलै नहिं कोई ।
तात, मात, सुत, नारी रोई ।
माटीके संग दियो समाई ।
सो माटी काटेगी तनमां ।
उलफत नेहा, कुलफत नारी, ।
किसकी बीबी, किसकी बांदी, ।
किसका सोना, किसकी चांदी ।
जा दिन जमले चलि है बांधी ।
डेरा जाय परै वहि बनमां ।
टांडा तुमने लादा भारी ।
बनिक किया पूरा ब्योपारी ।
जूआ खेला, पूंजी हारी ।
अब चलनेकी भई तयारी ।
हितचित मत तुम लाओ धनमां ।
जो कोइ गुरुसे नेह लगाई ।
बहुत भांति सोई सुख पाई ।
माटीमें काया मिलि जाई ।
कहे कबीर आगे गोहराई ।
सांच नाम साहेबको संगमां ।

## ५१. तो दिवस

त्या दिवसाची शुद्ध ठेव मनिं
ज्या दिनिं येथुन जाणें होइल,
त्या दिनिं संगें कुणी न येइल,
आईबाप, सुत, नारी रडतिल,
मातीमाजी पुरूनि टाकतिल,
टाकिल ती मग काया खाउनि.
स्नेह संपला, नार उदासी
कोण कुणाची पत्नी दासी !
ज्या दिनिं येथुन यम बांधुन ने
कुठली चांदी ! कुठलें सोनें !
उठुनि तळ पडे तिकडे विजनीं !
लादलास तूं तांडा भारी
पुरता बनिया तूं व्यापारी
सरे भांडवल, होसि जुगारी
निघायची कर अतां तयारी
चित्त न दे हितसंबंधि, धनीं !
केला ज्यानें स्नेह गुरूशीं
प्राप्त तयाला हो सुखराशी
मातित मिसळे देह जेधवां
कबिर म्हणे, यें जाग तेधवां
संगि न सत्यनामप्रभुवाचुनि.

---

'संगी' म्हणजे 'सोबती'.

## ५२.

चलन चलन सबको कहत है ।
ना जानौं बैकुंठ कहां है ।
जो जन प्रमिति एक नहिं जानै ।
बातनही बैकुंठ बखानैं ।
जब लग है बैकुंठकि आसा ।
तब लग नहिं हरिचरननिवासा ।
कहें सुनें कैसें पतिअइये ।
जबलग तहां आप नहिं जइये ।
कहै कबीर, यहु कहिये काहि ।
साधुसंगति वैकुंठहिं आहि ।

---

## ५३.

मोरे लगि गये बान सुरंगी हो ।
धन सतगुरु उपदेश दियो है, होइ गयो चित्त भिरंगी हो ।
ध्यान पुरुषकी बनि है तिरिया, घायल पांचो संगी हो ।
घायलकी गति घायल जाने, की जानै जात पतंगी हो ।
कहै कबीर, सुनो भाई साधो, निस दिन प्रेम उमंगी हो ।

---

## ५२. साधुसंग

‘चला,चला’ म्हणती सकलांना
परी कुठें वैकुंठ, कळेना,
प्रमिति एकहि न जाणे जो जन
वानी तो वैकुंठ वर्चनि पण.
वैकुंठाची आशा जोंवर
हरिपदनिवास नाहीं तोंवर.
विश्वासा कां श्रवणीं, कथनीं——
जों न देखिलें आपण नयनीं ?
कबिर म्हणे, ‘सांगावें कां हें ?——
साधुसंग वैकुंठच आहे !’

प्रमिति—निश्चित ज्ञान; प्रमाण.

——————

## ५३. चुटपुट

मज लागे बाण सुरंगी हो
धन्य सद्गुरु मज उपदेशी, चित्त जाहलें भृंगी हो
ध्यानपुरुष जो, स्त्री मी त्याची, जाया पांची संगी हो
जायाची गति जाया जाणें किंवा जात पतंगी हो
कबिर म्हणे, हे साधु श्रवण कर, निशिदिनि प्रेमतरंगीं हो.

‘जाया (होणें)’ म्हणजे ‘जखमी, जायबंद, घायाळ होणें’.
‘जायाची गति’ म्हणजे ‘जायबंद झालेल्याची स्थिति’.
‘पांच संगी’ म्हणजे ‘पांच प्राण’.

——————

५४.

करो जतन सखि सांईमिलनकी ।
गुडिया, गुडवा, सुपलिया,
तजि दे बुधि लरिकैयां खेलनकी ।
देवता, पित्तर, भुइयां, भवानी,
यह मारग चौरसी चलनकी ।
उंचा महल अजब रंग बंगला,
सांईकी सेह् वहा लगी फूलनकी ।
तन, मन, धन सब अपनि कर वहां
सुरत सम्हार, परु पइयां सजनकी ।
कहै कबीर, निर्भय होय हंसा,
कुंजी बता द्यो ताला खुलनकी ।

५५.

पिया मेरा जागे मैं कैसे सोई री ।
पांच सखी मेरे संगकी सहेली,
उन रंग रंगी पिया रंग न मिली री ।
सास सयानी, ननद, देवरानी,
उन डर डरी पियसार न जानी री ।
द्वादस ऊपर सेज बिछानी,
चढ न सकौं मारी लाज लजाती री ।
रात दिवस मोहिं कूका मारे,
मैं न सुनी रचि नहि संग जानी री ।
कहै कबीर सुनु सखी सियानी,
बिन सतगुरु पिया मिले न मिलानी री ।

## ५४. मलिन मार्ग

यत्न सखे ! कर स्वामीमिलनि
बाळबुद्धि त्यज, बाळपणींची
टाक बाहुली, संपलि खेळणि !
देव, पितर, चंडिका, भवानी
हेच मार्ग चौऱ्यांशीचलनीं
अद्भुत, उन्नत रंगमहालीं
शेज स्वामिची सजे प्रसूनीं
तनु, मन, धन सर्वस्व त्यांस दे
सुरति सावरी लागुनि चरणीं
कबिर म्हणे, हो निर्भय हंसा
किल्लि दाविली कुलुपउघडणीं

'सुरति सावरी' म्हणजे 'प्रवृत्तीवर संयम ठेव'. 'हंसा' म्हणजे 'शुद्धमुक्त जीवात्मा'. सर्वस्वसमर्पण ही परमेश्वर प्राप्तीची किल्ली होय. तो मायेच्या कड्याकुलुपांत बंद आहे.

## ५५. अनुताप

प्रिय जागे—पण मी न जागलें
पांच सख्यांच्या संगि रंगलें
प्रियरंगीं पण नाहि रंगलें !
सासु शहाणी, नणंद, जाऊ
त्यां भ्यालें; प्रियसार न कळलें !
द्वादशावरी शेज बिछविली
लज्जित तीवर चढू न शकलें !
निशिदिनि छळि मज विरह; प्रियाला—
मी न ऐकलें मी न जाणलें;
कबिर म्हणे, सखि ऐक शहाणे !
सद्गुरुवाचुनि प्रियकर न मिळे !

'पांचसख्या' म्हणजे 'पंचप्राण'. 'सासू, नणंद, जाऊ' म्हणज 'मोहमाया'. 'द्वादशावरी' म्हणजे 'दहा इंद्रियें आणि मन व बुद्धि अशीं एकूण बारा'.

**५६.**

हम का ओढावे चदरिया, चलती बिरियां ।
प्रानराम जब निकसन लागे, उलट गई दौड नैनपुतरिया ।
भीतरसे जब बाहर लाए, छूट गई सब महल, अटरिया ।
चार जने मिलि खाट उठाइन, रोवत ले चले डगर डगरिया ।
कहत कबीर सुनो भाइ साधो, संग चली वह सूखी लकरिया ।

---

**५७.**

का मांगूं ? कछु थिर न रहाई ।
देखत नैन चल्यां जग जाई ।
इक लख पूत, सवा लख नाती ।
ता रावनघरिं दिया न बाती ।
लंकासी कोट, समुद्रसी खाई ।
तेहि रावनकी खबरि न पाई ।
सोनेके महल, रुपै कै छाजा ।
छोडि चले नगरीके राजा ।
कोइ कर महल, कोइ कर टाटी ।
उडी जाय हंस, पडी रह माटी ।
आवत संग न, जात संगाती ।
कहा भए दल बांधे हाथी ।
कहै कबीर, अंतकी बारी ।
हाथ झारि ज्यों चला जुगारी ।

---

## ५६. अखेर

आतां जातेवेळीं, चादर पांघरविशि कां मजला ?
प्राणराम जंव निघों लागले, पुतळ्या फिरल्या डोळां
आंतुन जंव बाहेर आणलें, सुटला महाल, मजला;
ताटी उचलुन नेति चार, पथि रडत करित कल्लोळा
कबिर म्हणे, साधो, ये संगे लाकुडफाटा सुकला.

---

'महालमजला' म्हणजे 'महाल माड्या'.
'लाकुडफाटा' म्हणजे 'ईंधन'.

---

## ५७. असारता

काय मागुं ? स्थिर कांहिं न राही
बघतां बघतां जग हें जाई
लक्ष पुत्र, लक्षावधि नातीं
त्या रावणगृहिं दिवा न वाती
लंका-कोटच, सागर-खंदक,
रावण वार्ता त्यांस न ठाउक
गृह सोनेरी, सौध रुपेरी,
भूप निघाला सोडुन नगरी !
महाल कुठलें ? कुठलीं दारें ?
हंस उडे मग माती हो रे !
येइ न संगें, जाइ न संगें
कशास हत्ती वा दळ लागे ?
कबीर म्हणतो, जाय अखेरीं—
हात झटकुनी जसा जुगारी !

---

५८.

जहंवासे आयो अमर वह देसवा ।
पानीन, पौनन, धरति, अकसवा ।
चांदन, सूरन, रैन, दिवसवा ।
बाम्हन, छत्रिन, सूद्र बयसवा ।
मुगल, पठान अरु सैय्यद सेखवा ।
आदि जोति नहिं गौर, गनेसवा ।
ब्रह्मा, विष्णु, महेस न सेसवा ।
जोगी, जंगम, मुनि दरवेसवा ।
आदि न, अंत न, काल कलेसवा ।
दास कबीर ले आए संदेसवा ।
सार शब्द गहिं, चलु वोहि देसवा ।

---

५९.

जैसे पंछी रैन बसेरा बसै विरिछपर आई ।
भोर भए सब आपुआपुको जहां तहां उडि जाई ।
सुपनेमें तोहि राज मिल्यो है हाकिम हुकुम दोहाई ।
जागि पर्‍यो तव लाव न लसकर पलक खुले सुधि पाई ।
मात, पिता, बंधु, सुत, तिरिया ना कोइ सगो, सगाई ।
यह तो सब स्वारथके संगी, झूठी लोक बडाई ।
सागरमांही लहर उठत है गनिता गनो न जाई ।
कहत कबीर सुनो भाई साधो, दरिया लहर समाई ।

---

## ५८. अहंभाव

अमर देश तो आलों जिथुनी
तिथें न जल, नभ, वारा, धरणी,
सूर्य, चंद्र ना रात्र, दिवस वा
ब्राह्मण, क्षत्रिय, शूद्र, वेसवा.
मोंगल, सैय्यद, पठाण, शेख न
ज्योति आदि नच गौरि, गजानन,
ब्रह्मा, विष्णु शेष, महेश न
जोगी, जंगम, मुनि दरवेश न
आदि न, अंत न, काळ, क्लेश ना
कबीर हा संदेश दे (मना)
सार शब्द घे, त्या देशा चल.

---

## ५९. भंगुरता

जशीं पाखरें रात्र पसरतां बसती वृक्षावरतीं
सकाळ होतां जिकडे तिकडे उडून जाती परती
स्वप्नीं तुजला राज्य मिळालें हुकूम आज्ञा देशी
सत्ता, लष्कर नच; शुद्धीवर जेव्हां येऊन बघशी.
आइ, बाप, स्त्री, पुत्र बंधु नच सगेसोयरे कोणी
स्वार्थी अवघे, खोटें यांचें मोठेपण जग वानी,
सतत सागरीं लाटा उठती, गणति त्यांची कुठली ?
ऐक कबीर म्हणे, हे साधो, लाट सागरीं फुटली !

---

६०.

पियामिलनकी आस, रहौं कबलौं खरी।
उंचै नहिं चढि जाय, मने लज्जा भरी।
पांव नहिं ठहराय, चढूं गिर गिर परूं।
फिर फिर चढउं सम्हारि, चरन आगे धरूं।
अंग अंग थहराइ, तो बहुविधि डरि रहूं।
करम कपट मग घेरि, तो भ्रममें परि रहूं।
वारि निपट अनारि, ये तो झीनी गैल है।
अटपट चाल तुम्हार, मिलन कस होइ है।
छोरो कुमति विकार, सुमति गहि लीजिये।
सतगुरु शब्द सम्हारि, चरन चित दीजिये।
अन्तरपट दे खोल, शब्द उर लावरी।
दिलबिच दास कबीर, मिलै तोहिकों बावरी।

---

६१.

मैं गुलाम मोंहि बेचि गुसांई।
तनमनधन मेरा रामजीके ताई।
आनि कबीरा हाटि उतारा।
सोई गाहक, सोइ बेचनि हारा।
बेचै राम तो राखै कोन।
राखै राम तो बेचै कोन।
कहै कबीर, मैं तन मन जाऱ्या।
साहब अपना छिन न बिसाऱ्या।

---

## ६०. प्रतीक्षा

प्रियभेटीची आस, उभी राहूं किती ?
उंच न चढवें, लाज मनीं भरली अती !
पाय न ठरती, चढतां चढतां मी पडे,
सांवरुनी पण, पाय टाकितें मी पुढें.
थरथरतें अंगांग, बहुतपरि भय गमे
कर्म कपट मग घेरि, भ्रमांतच मी भ्रमे,
निपट अनाडी गडी, वाट चिंचोळकी
अटपट चाल तुझी, कशि होइल भेट कीं !
सांडा कुमति विकार, सुमति धारण करा,
शब्द सांवरा, चित्त गुरूचरणीं धरा,
अन्तरपट सारून लाव गे ! शब्द उरिं
भेटतील तुज बावळे ! कबिरदास, अभ्यन्तरीं.

---

जीवात्मा विरही आहे. प्रिय परमेश्वराचा निवास उंच आहे.सात्त्विक भाव जागले आहेत. परंतु जीवात्म्याला अजून मधुर मीलनाचा अनुभव नाहीं.मार्ग चिंचोळा आहे. चाल अटपट आहे. त्यावर सद्‌गुरूचा उपदेश हाच एक आधार आहे.

---

## ६१. सर्वस्वं मे

मी गुलाम मज विकि गोस्वामी
तनुमनधन मम अर्पित रामीं
हाटिं हटविलें कबिरें इतरां
तोच गिऱ्हाइक, तो विकणारा.
विकी राम तर राखी कोण ?
राखि राम तर वेंची कोण ?
म्हणे, जाळिलें कबीर तनु मन
विसरलों न क्षण स्वामीला पण.

---

## ६२.

बावा जोगी एक अकेला ।
जाकै तीरथ, व्रत ना मेला ।

झोली, पत्र, विभूति न बटवा, अनहद बेन बजावै ।
मांगिन खाइ, न भूखा सोवै, घर अंगना फिरि आवै ।
पांच जनाकि जमाति चलावै, तास गुरु, मैं चेला ।
कहै कबीर उनि देस सिधाये, बहुरि न इहि जग मेला ।

# ६२. योगी

बाबा जोगी एक एकला
ज्याला तीर्थ, व्रत ना मेळा.

झोळी, पात्र, विभूति न बटवा, वाजवि अनहत बाजा
मागुन खाइ न, भुका निजेहि न, गृहांगणीं करि ये जा.
पांचजणांचा प्रपंच चालवि, तोच गुरू, मी चेला
कबिर म्हणे, त्या देशिंच जाई, परते ना भूमितलां.

---

कबीरांना बाह्यवेषाप्रमाणेंच योग्याचा सर्वविवर्जित आचारहि नापसंत आहे. जो भीक मागत नाहीं, उपाशी निजत नाहीं, झोळी, श्रृंगी इत्यादिकांपासून विरत आहे, पांच जणांचा प्रपंचभार शिरावर घेत नाहीं आणि संसारापासून मुक्त होण्याचें साधन जाणत नाहीं––असा जो आहे, तो अवधूत योगी कबीरांना आदर्श वाटत नाहीं.

## ६३.

रामनिरंजन न्यारा रे ।
अंजन सकल पसारा रे ।
अंजन उत्पतिओ ओंकार ।
अंजन मांड्या सब विस्तार ।
अंजन ब्रह्मा, संकर, इंद्र ।
अंजन गोपीसंगि गोविंद ।
अंजन वाणी, अंजन वेद ।
अंजन कीया नाना भेद ।
अंजन विद्या, पाठ, पुराण ।
अंजन फोकट कथहि गियान ।
अंजन पाती, अंजन देव ।
अंजनकी करै अंजन सेव ।
अंजन नाचै, अंजन गावै ।
अंजन भेष अनंत दिखावें ।
अंजन कहां कहां लग केता, ।
दान, पुनि, तप, तीरथ जेता ।
कहें कबीर, कोई विरला जागै ।
अंजन छांडि, निरंजन लागै ।

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 32823 वि: ८१०४
क्रमांक ९५५९ नों दि: ६/३/९२



## ६३. रामनिरंजन

राम निरंजन न्यारा रे !
अंजन सकल पसारा रे !
अंजन उत्पत्ती, ओंकार
अंजन मांडी हा विस्तार
अंजन ब्रह्मा, शंकर, इंद्र,
अंजन गोपींसह गोविंद
अंजन वाणी, अंजन वेद,
अंजनामुळें नाना भेद,
अंजन विद्या, पाठ, पुराण
अंजन फुकटें सांगे ज्ञान;
अंजन पंक्ती, अंजन देव
अंजन सेवी अंजन एव,
अंजन नाचे, अंजन गात
अंजन दावी वेष अनंत
अंजन न लगे कुणा कुणा ?
दान, पुण्य, तप, तीर्थांना !
कबिर म्हणे, जागे विरळा
त्यजि अंजन, भजि निरंजना.

---

कबीरांचा रामनिरंजन सर्वांहून विलक्षण स्वयंज्योति सत्यस्वरूप सर्वांच्या अतीत आहे.

---

६४.

चली है कुलवोरनी गंगा नहाय।
सतुवा कराइन बहुरि भुजाइन घूंघट ओढे मसकत जाय।
गठरी बांधिन, मोटरि बांधिन, खसमके मूंडे दिहिन धराय।
बिछुवा पहिरिन, औंठा पहिरिन, लात खसमके मारिन जाय।
गंगा न्हाइन, जमुना न्हाइन, नौमन मैल हैं लिहिन चढाय।
पांच पचिसके धक्का खाइन, घरहुंकी पूंजी आई गंवाय।
कहत कबीर हेत करु गुरुसों नहिं तोर मुकती जाइ नसाय।

---

६५.

का सोवो सुमिरन की बेरिया।
जिन सिरजा तिनकी सुधि नाहीं,
झकत फिरो झक झलनि झलरिया।
गुरूउपदेस संदेस कहत है,
भजन करो चढि गगन अटरिया।
नित उठि पांच पचिस कै झगरा,
ब्याकुल मोरी सुरति सुंदरिया।
कहत कबीर सुनो भाइ साधो,
भजनबिना तोरी सूनि नगरिया।

## ६४. मायाविनी

कुळबुडवी गंगेंत न्हाहि ही
सत्तू काढुनि, मग तें भाजुनि, पदर सांवरित ठुमकत जाई
बांधी गठड्या, वर पुरचुंड्या, दादल्यापुढें टाकुनि देई
घालुन पैंजण, नेसुन पैठण, दादल्यावरी लाथ उगारी
गंगेमाजी यमुनेमाजी नाहुनि मनमल चढवुनि घेई
पांच पंचविस धक्के खाउनि, पुंजि गमावुनि परते गेहीं
कबिर म्हणे, कर हेत गुरूसह, मुक्तिनाश तव नातर, पाहि.

---

देवाधर्माच्या नांवावर पाखंड रचणाऱ्यांची कबीर कींव करीत नसत. अशा लोकांचे दोष दाखवण्यांत त्यांना एक प्रकारचा रस मिळत असे. व्यंग उघड करण्यांत त्यांना समाधान वाटे. गंगास्नानाचें अवडंबर माजविणाऱ्यांची या पदांत थट्टा आहे. हें पद मायेवर आहे. 'गुरुशीं हेत करणें' म्हणजे 'गुरुवर प्रेम करणें'.

---

## ६५. स्मरण

कां निजसी स्मरणाच्या वेळीं ?
सजिलें ज्यानें स्मृति न तयाची, झकत फिरसि कां ख्यालि खुशालीं
उपदेशीं संदेश देति गुरु, भजन करी, चढ गगन महालीं
पांच पंचविस झगडे प्रतिदिनिं, व्याकुळ माझी सुरति सुंदरी
ऐक कबीर म्हणे हे साधो ! भजनाविण तव उजाड पल्ली.

---

'सुरति सुंदरी' मध्यें 'प्रवृत्तीवर सुंदरीचें रूपक आहे'. 'पल्ली' म्हणजे 'नगर'. 'गगनांत चढणें' म्हणजे जेथें द्वैताद्वैत, नित्यानित्य, सत्यासत्य आदि प्रतीत होत नाहीं अशा ठिकाणीं समाधीद्वारें जाणें.

**६६.**

अरे मन ! समझके लाद लदनिया ।
काहे क टटुवा, काहेके पाखर, काहे क भरी गौनियां ।
मनके टटुवा, सुरतिकै पाखर, भर पुन पाप गौनियां ।
घरके लोग जगाती लागे, छीन लेय कर धनियां ।
सौदा करू तो यहि करू भाई आगे हाट न बनिया ।
पानी पी तो यहीं पी भाई आगे देस निपनियां ।
कहैं कबीर सुनो भाई साधो सत्त नामका बनिया ।

---

**६७.**

सुमिरनबिन गोता खाओगे ।
मुठ्ठी बांधी गर्भसे आए हाथ पसारे जाओगे ।
जैसे मोती फरत ओसके बेर भए झर जाओगे ।
जैसे हाट लगावै हटवा सौदाबिन पछताओगे ।
कहैं कबीर सुनो भाई साधो, सौदा लेकर जाओगे ।

---

## ६६. व्यापार-व्यवहार

रे मन! ओझें लाद समजुनी
कुठला तट्टू, कुठली पाखर, गोण्या कुठल्या टाकिशि भरूनी
तुट्टु मनाचा; सुरती-पाखर; पाप, पुण्य ह्या गोण्या मानी
मागें घरचे लोक लागले, हातींचें धन नेति लुबाडुनि
सवदा करशिल, हाच कर, पुन्हां लागायाचा हाट न फिरुनी
पाणि प्यायचें इथेंच पी तर कारण पुढला देश निपाणी
ऐक, कबीर म्हणे हे साधो! सन्नामाचा तूं हो वाणी.

---

'निपाणी' म्हणजे 'पाण्याशिवाय'.
'पाखर' म्हणजे 'झूल'.

---

## ६७. विनिमय

स्मरणाविण गोता खाशिल रे!
मिटुन मुठी गर्भातुन येशी, उघडुन त्या मग जाशिल रे!
दंवबिन्दूंचीं जैशीं मोत्यें यथासमय ओसरशिल रे!
हाट लागला, सवद्यावाचुन पस्तावा तूं करशिल रे!
ऐक, कबीर म्हणे हे साधो! सवदा घेउन जाशिल रे!

---

६८.

निर्गुण राम जपहु रे भाई।
अविगतिकी गति लखी न जाई।
चारि वेद जाके सुंमृत पुरांनां।
नौ व्याकरनां मरम न जाना।
सेस नाग जाके गरुड संमांना।
चरनकंवल कमला नहिं जाना।
कहै कबीर, जाके भेदै नाहीं।
निज जन बैठे हरिकी छांहीं।

---

६९.

रसना राम गुन रमि रस पीजै।
गुन अतीत निरमोलिक लीजै।
निरगुन ब्रह्म कथौ रे भाई।
जा सुमिरत सुधि, बुधि, मति पाई।
विष तजि, राम न जपसि अभागे।
का बूड़े लालचके लागे।
ते सब तिरे रामरसस्वादी।
कहै कबीर बूडे बकवादी।

---

## ६८. नेति नेति

निर्गुण रामनाम जप भाई !
अविगतिची गति दिसे न, पाही;
चार वेद, स्मृति आणि पुराणें
मर्म जाणती नच व्याकरणें
शेष, गरुड नच जाणति त्याप्रत
चरणकमल कमलेला अविदित
रहस्य ज्याचें उमगत नाहीं
कबीर बैसे त्याच्या छायीं.

---

## ६९. निर्गुण ब्रह्म

रामगुणीं रम, रसने ! पी रस
गुणातीत बहुमोली घे ( यश )
निर्गुण ब्रह्म कथी रे ! भाई
शुद्धि, बुद्धि, मति स्मरतां देई
त्यजुनि विषय, जप राम अभाग्या !
लोभमोहिं कां बुडसी वाया ?
तरले सकल रामरसस्वादीं
कबिर म्हणे, बुडले बकवादी.

---

' ‘नामस्मरण’ न करतां व्यर्थ बडबड करणारे ते ‘बकवादी’.

७०.

अब कहु रामनाम अविनाशी ।
हरि तजि जियरा कतहुं न जासी ।
उहां जाहु तहां होहु पतंगा ।
अब जनि जरहु समुझि विष संगा ।
राम नाम लौ लाय सुलीन्हा ।
भ्रिंगी कीट समुझि मन दीन्हा ।
भव अति गरुआ दुख करि भारी ।
करि जिय जतन जु देखु विचारी ।
मनकी बात है लहरि विकारा ।
तुहि नहिं सूझै वार न पारा ।
इच्छाके भवसागरे, बोहित राम अधार ।
कहै कबीर हरिसरन गहु, गोबछखुरविस्तार ॥

---

७१.

सतिगुरु हो महाराज मोपै सांई रंग डारा ।
शब्दकी चोट लगी मेरे मनमे, वेध गया तन सारा ।
औषध, मूल कछू नहिं लागै, क्या करै बेद बिचारा ।
सुरनर, मुनिजन, पीर, औलिया कोई न पावै पारा ।
साहेब कबीर सर्व रंग रंगिया रंगसे रंग न्यारा ।

---

## ७०. अविनाशी राम

म्हण, रे ! रामनाम अविनाशी
त्यजुनि हरि, जिवा ! कोठें जाशी ?
तिथें जा न तूं पतंग होशिल
विषयसंगतीं जाळुन घेशिल
कीट भ्रमरिच्या ध्यानिं मग्न हो,
रामनामिं लयलीन तसा हो
पहा, विचारुन नीट अंतरीं
भवसागर गुरुगभीर भारी
( चपल ) मनोरथ, विकारलहरी
सुचे न, जाऊं पैल कुण्यापरि !
इच्छेच्या भवसागरीं राम नाव आधार
कबिर म्हणे, हरिशरण जा, हो गोक्षुरविस्तार.

---

इच्छेचा अपार भवसागर ओलांडण्यास रामाच्या 'नावे'चा एकमेव आधार आहे. त्याला शरण जा म्हणजे तो सागर गाईच्या खुराप्रमाणें लहान होईल; 'नाव' शब्दावर श्लेष; शेवटच्या दोन ओळी 'दोहा' वृत्तामध्यें आहेत.

---

## ७१. सौन्दर्यसंगीत

( सद्गुरु हो महाराज स्वामी )

मजवर रंग टाकला सारा
शब्दघाव मम मनांत लागे, वेधी सकल शरीरा
औषधि, मुळी लागु पडेना, अगतिक वैद्य बिचारा
सुरनर, मुनिजन, पीर, अवलिया पावती न परपारा
सकल रंगिं रंगल्या स्वामिचा, कबीर, रंगच न्यारा

---

जगताच्या विचित्र सौदर्यांत नाना स्वरांचें अनिर्वचनीय संगीत आहे. हें सौंदर्यसंगीत हृदयांतील विरहवेदनेस जागवीत असतें.

**७२.**

संतो, धोखा कासूं कहिये
गुणमें निरगुण, निरगुणमें गुण,
बाट छांडि क्यूं बहिये ?
अजरा अमरा कथै सब कोई,
अलख न कथणां जाई,
नाहि सरूप, बरण नहिं जाकैं,
घटि घटि रह्यौ रमाई
प्यंड ब्रह्मंड छोडि जे कथिये,
कहै कबीर हरि सोई.

## ७३. गुणातीत

संता ! हा भ्रम कसें म्हणावें ?
गुणांत निर्गुण, निर्गुणांत गुण
वाट सोडुनी कसें वहावें ?
'अजर', 'अमर' हें सर्व सांगती
अलक्ष कथितां कुणा न यावें !
सरूप नाहीं, वर्णहि नाहीं
घटीं घटीं पण तयें रमावें !
त्यजुन पिण्ड, ब्रह्माण्ड जो असे
कबिर कथी, हरि त्यास म्हणावें.

---

रूप आणि सीमा हे वस्तुतः जड प्रकृतीचेच विकार आहेत. यांनाच कबीर 'गुण' म्हणतात. जी वस्तु गुणातीत आहे, ती गुणांत नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. हा भ्रम आहे. निर्गुण परमात्मा गुणांत नाहीं काय ? वस्तुतः गुणानें आपण निर्गुणाचें अनुमान करतो. गुण आणि निर्गुण हे केवळ तारतम्य दाखविण्याकरितां आहेत.

## ७३.

कैसी जीवेगी विरहिनी
पियाबिन कीजै कौन उपाय ।
दिवस न भूक रैनि नहिं सुख है,
जैसे कलियुग जाम (?)
खेलति फाग छांडि चलु सुन्दर
तजु चलु धन औ धाम ।
बनखंड जाय नाम लै लावौ
मिलि पियसे सुख पाय ।
तलफत मीन बिना जल जैसे,
दरसन लीजै धाय ।
बिनआकार रूप नहिं रेखा
कौन मिलेगी आय ।
अपना पुरुष समुझिले सुन्दरि
देखो तन निरताप ।
सब्दसरूपी जिवपिव बुझौ
छांडौ भ्रमकी टेक ।
कहै कबीर और नहिं दूजा
जुग जुग हम तुम एक ।।

## ७३. आतुर आर्तता

जगेल विरहिणि कशी प्रियाविण–
यावर काय उपाय ?
दिवसा भूक न, रात्र सुखाविण–
युग युग जैसें याम !
फाग खेळणें टाकुनि, सुन्दरि–
निघे त्यजुनि धन, धाम;
घन वनखंडीं जप, तप साधी
वाट प्रियाची पाहि
मीन जळाविण त्यासम व्याकुळ,
दर्शन त्याचें नाहिं
आकाराविण रेखा, रूप न
मिळेल तो कधि काय ?
पुरुष आपुला ओळख सुन्दरि !
तापरहित बघ ! काय.
शब्दस्वरूपीं वळख प्रिय जिवा
टाकुनि दे भ्रम शेख
कबिर म्हणे कीं, कुणी न दुसरें
युग युग तूं, मी एक !

---

निर्मोही प्रियतमाची प्राप्ति व्हावी अशी इच्छा असेल, तर शरीर, मन आणि बुद्धि यांच्या पलीकडे अगोचर असणारें एक स्थिर शाश्वत चेतन आहे, तेंच प्रियतमाचें वास्तविक आकर्षण आहे. ‘काय’ म्हणजे ‘शरीर’. ‘शेख’ म्हणजे ‘उरलेलें’.

७४.

मिलना कठिन है कैसे, मिलौंगी प्रिय जाय।
समझि सोचि पग धरौं जतनसे, बार बार डिग जाय।
उंची गैल, राह रपटीली, पांव नहीं ठहराय।
लोकलाज, कुलकी मरजादा, देखन मन सकुचाय।
नेहरवास बसौं पीहरमें, लाज तजी नहिं जाय।
अधर भूमि जहं महल पियाका, हमपें चढचौ न जाय।
धन भइ बारी, पुरुष भये भोला, सुरत झकोरा खाय।
दूतीसतगुरु मिले बीचमें, दीन्हों भेद बताय।
साहब कबीर पिया सो भेटचौ, सीतल कंठ लगाय।

---

७५.

जहरवा हमका नहीं भावै।
सांईकी नगरी परम अति सुंदर, जहां कोइ जाइ न आवै।
चांद, सुरुज जहं पवन न पानी, को सन्देस पहुंचावे ?
दरद यह सांई, को सुनावै ?
आगे चलौं पंथ नहिं सूझै, पीछे दोष लगावै।
केहि विधि ससुरे जाव मोरी सजनी, बिरहा जोर जनावै
विषैरस नाच नचावै
बिनसतगुरू अपनो नहिं कोई; जो यह राह बतावै।
कहत कबीर सुनो भाई साधो, सपने न प्रीतम पावै।
तपन यह जियकी बुझावै।

---

## ७४. मध्यस्थी

भेट कठिण, भेटेन कशी मी प्रियतमास जाऊन ?
नीटपणीं मी पाय उचलतें पुन्हा पुन्हा घसरून !
उंच चढणिचा पथ वळणांचा पाय न पडति ठसून
लोकलाज कुळमर्यादेनें मन अर्धें लाजून !
माहिरवाशिण, सासुरवासीं जाइन लाज त्यजून
उंच प्रियाचा महाल चढणें जमे न मजलागून !
धन्य प्रिया, प्रिय भोळा, झोके खाई सुरति बसून,
सद्गुरुदूती मधें भेटली, मर्म दिलें सांगून !
कबीर, स्वामी प्रियतम भेटे गळीं गळा घालून !

---

सद्गुरूच्या मध्यस्थीशिवाय परमेश्वराची भेट होत नाहीं.

---

## ७५. विरहताप

सासर ( अगदीं ) मज न आवडे !
नगर स्वामिचें अतिशय सुन्दर, जाउं शके ना कोणी तिकडे
सूर्य, चंद्र, पाणी न पवन तिथें; निरोप नेइल कोण त्याकडे ?
कथील स्वामिस कोण सांकडें ?
रेंगाळा तर बोल लावती, मार्ग सुचेना जायास पुढें
कशी सासरीं जाऊं सजणे ! विरहाचें बळ असीम वाढे.
नाच नाचवी विषयरस ( गडे ! )
सद्गुरूवाचुन कुणि न आपुलें, दाविल जाया मार्ग जें पुढें
ऐका, कबिर म्हणे हे साधो ! भेट प्रियाची स्वप्निंहि न घडे.
ताप जिवाचा विझवि गुरू ( गडे ! ).



---

७६.

ता साहीबके लागौं साथा ।
दुखसुख मेटी जो रह्यौ अनाथा ।
ना दशरथ घरि औतरि आवा ।
ना लंकाका राव सतावा ।
देवै कूख न औतरि आवा ।
ना जसवै ले गोद खिलावा ।
जावो ग्वालनके संग फिरिया ।
गोवरधन ले ना कर धरिया ।
बांवन होय नहीं बलि छलिया ।
धरनी वेद लेन ऊधरिया ।
गंडक सालिगराम न कोला ।
मच्छ, कच्छ ह्वै जलहि न डोला ।
बद्री बैठा ध्यान नहिं लावा ।
परसराम ह्वै खत्री न सतावा ।
द्वारमती सरीर ना छाडा ।
जगननाथ ले प्यंड न गाडा ।
कहै कबीर विचार करि, ये ऊले व्यवहार ।
याही थें जे अगम है, सो वरति रह्या संसार ।

———————

## ७६. कबीरांचा राम

त्या रामाशीं केली मैत्री
दीनांचें जो दु:ख निवारी
तो न अवतरे दशरथसदनीं,
लंकापतिला वा न तो हनी,
तो न जन्म घे देवकीकुशीं,
वा खेळे ना यशुदेपाशीं,
गवळ्यांसंगें फिरे न वणवण,
कीं उचली ना नखिं गोवर्धन,
बळिला न छळी होउन वामन,
उचलि न पृथ्वी वेदांकारण,
गंडक शालिग्राम, वराह न,
कच्छ, मच्छ करि वेष न धारण,
क्षत्रियघ्न तो परशुरामहि न,
बदरिकास्थ ना नरनारायण,
द्वारकेंत तो देह न सोडी,
जगन्नाथपुरिं पिंड न गाडी,
कबिर विचारान्तीं म्हणे, ' हे वरवर व्यवहार
याहुनि अगमापार तो, जो व्यापी संसार.

---

कबीरांचे राम पुराणप्रतिपादित अवतार नाहींत. बदरिकाश्रमांत नरनारायणाच्या रूपांत ते ध्यान लावून बसले नव्हते. द्वारकेंत त्यांनीं देहत्याग केला नव्हता कीं जगन्नाथपुरींत बुद्धाच्या रूपानें ते अवतीर्ण झाले नव्हते. पुष्कळ विचार केल्यावर कबीरदास म्हणतात कीं, हे सर्व वरपांगी व्यवहार आहेत. सारा संसार ज्यानें व्यापून टाकला आहे तो राम यापेक्षां कितीतरी अधिक अगम आणि अपार आहे.

---

७७.

जब थें आतमतत्त विचारा ।
तब निरबैर भया सबहि नथै काम, क्रोध गहि डारा ।
व्यापक ब्रह्म सबनिमैं एकै, को पंडित, को जोगी ।
राणा राव कवनसूं कहिये, कवन बैद, को रोगी ।
इनमें आप, आप सबहिनमें, आप आपसूं खेलै ।
नाना भांति घडे सब भांडे रूप धरे धरि मेलै ।
सोचि बिचारि सबै जग देखा, निरगुण कोइ न बतावै ।
कहै कबीर गुणी अरु पंडित मिलि लीला जस गावै ।

---

७८.

पषा पषीके पेषेणे सब जगत भुलाना ।
निरपष होइ हरि भजै सो साध सयाना ।
ज्यूं षरसूं षर बांधिया यूं बंधे सब लोई ।
जाकै आतमद्रिष्टि है साचा है जन सोई ।
एक एक जिनि जाणिया तिनही सच पाया ।
प्रेम प्रीति ल्यौ लीन मनते बहुरि न आया ।
पूरेकी पूरी द्रिष्टि पूरा करि देखै ।
कहै कबीर कछु समुझि न परई, या कछु बात अलेखै ।

---

## ७७. आत्मतत्व

आत्मतत्त्व बघ ! नीट विचारुन
सर्वाभ्यन्तरिं तें निर्वैरी काम, क्रोधही टाकी जिरवुन
व्यापक एकच ब्रह्म सकळिकीं पंडित राहो, राहो योगी,
राव रंक कोणास म्हणावें ? वैद्य कोठचा ? कुठचा रोगी ?
तें सर्वांमधिं, सर्व त्यामधीं, स्वतांशींच तें स्वतांच खेळे
नानाविध हीं भांडीकुंडीं अवघे त्याचे हे तोंडवळे !
विचारपूर्वक जगत धुंडिलें परंतु निर्गुण कुणी न दावी
कबिर म्हणे, गुणि, पंडित यांनीं केवळ लीला, कीर्ती गावी.

---

मुसलमानी धर्मांतील एकेश्वरी मतानुसार जीवांहून ईश्वर भिन्न असून तो सर्वत्र आहे, आणि तो परम समर्थ आहे. कबीरांचा एकेश्वरवाद या प्रकारचा नाहीं. त्यांचें ब्रह्म व्यापक असून एकात्म भावानें सर्वांच्या अन्तर्यामांत व्याप्त आहे.

---

## ७८. निःपक्षपातित्व

पक्षा-पक्षांच्या प्रेक्षणीं जगत भुले सारें
हरि निःपक्ष भजे साधु तो समजदार बा रे !
तणास तण तैसें बांधले जन एकामेकां
आत्मदृष्टि ज्याची, बघे तो त्यांस ठीक, देखा;
तें बघणें म्हणजे जाणणें परस्परांना हो !
प्रीतीपूर्ण मनें ईश्वरीं होणें लीन अहो !
पूर्णाच्या पूर्णा दृष्टिनें बघणें पूर्णातें
कबिर म्हणे, ये ना सांगता अलक्ष तें पुरतें !

---

परमेश्वर हा भावाभावविनिर्मुक्त आहे. तो कोणत्याहि पक्षविशेषांच्या द्वारें आकलन होणें शक्य नाहीं.

---

७७.

जब थें आतमतत्त विचारा ।
तब निरबैर भया सबहि नथै काम, क्रोध गहि डारा ।
व्यापक ब्रह्म सबनिमैं एकै, को पंडित, को जोगी ।
राणा राव कवनसूं कहिये, कवन बैद, को रोगी ।
इनमें आप, आप सबहिनमें, आप आपसूं खेलै ।
नाना भांति पडे सब भांडे रूप धरे धरि मेलै ।
सोचि बिचारि सबै जग देखा, निरगुण कोइ न बतावै ।
कहै कबीर गुणी अरु पंडित मिलि लीला जस गावै ।

---

७८.

पषा पषीके पेषेणे सब जगत भुलाना ।
निरपष होइ हरि भजै सो साध सयाना ।
ज्यूं षरसूं षर बांधिया यूं बंधे सब लोई ।
जाकै आतमद्रिष्टि है साचा है जन सोई ।
एक एक जिनि जाणिया तिनही सच पाया ।
प्रेम प्रीति त्यौ लीन मनते बहुरि न आया ।
पूरेकी पूरी द्रिष्टि पूरा करि देखै ।
कहै कबीर कछु समुझि न परई, या कछु बात अलेखै ।

---

## ७७. आत्मतत्व

आत्मतत्त्व बघ ! नीट विचारुन
सर्वाभ्यन्तरिं तें निर्वैरी काम, क्रोधही टाकी जिरवुन
व्यापक एकच ब्रह्म सकळिकीं पंडित राहो, राहो योगी,
राव रंक कोणास म्हणावें ? वैद्य कोठचा ? कुठचा रोगी ?
तें सर्वांमधि, सर्व त्यामधीं, स्वतांशींच तें स्वतांच खेळे
नानाविध हीं भांडीकुंडीं अवघे त्याचे हे तोंडवळे !
विचारपूर्वक जगत धुंडिलें परंतु निर्गुण कुणी न दावी
कबिर म्हणे, गुणि, पंडित यांनीं केवळ लीला, कीर्ती गावी.

मुसलमानी धर्मांतील एकेश्वरी मतानुसार जीवांहून ईश्वर भिन्न असून तो सर्वत्र आहे, आणि तो परम समर्थ आहे. कबीरांचा एकेश्वरवाद या प्रकारचा नाहीं. त्यांचें ब्रह्म व्यापक असून एकात्म भावानें सर्वांच्या अन्तर्यामांत व्याप्त आहे.

---

## ७८. निःपक्षपातित्व

पक्षा-पक्षांच्या प्रेक्षणीं जगत भुले सारें
हरि निःपक्ष भजे साधु तो समजदार बा रे !
तणास तण तैसें बांधले जन एकामेकां
आत्मदृष्टि ज्याची, बघे तो त्यांस ठीक, देखा;
तें बघणें म्हणजे जाणणें परस्परांना हो !
प्रीतीपूर्ण मनें ईश्वरीं होणें लीन अहो !
पूर्णाच्या पूर्णा दृष्टिनें बघणें पूर्णांतें
कबिर म्हणे, ये ना सांगता अलक्ष तें पुरतें !

परमेश्वर हा भावाभावविनिर्मुक्त आहे. तो कोणत्याहि पक्षविशेषांच्या द्वारें आकलन होणें शक्य नाहीं.

---

७९.

दुलहिन गावो मंगलचार।
हमरे घर आये राम भरतार।
तन रति कर मैं, मन रति कर हौं, पांचो तत्त्व बराती।
रामदेव मोहि व्याहन ऐहैं मैं जोबनमदमाती।
सरिरसरोवर बेदी करि हौं ब्रम्हद्या बेद उचारा।
रामदेव संग भांवरि लै हों धनि धनि भाग हमारा।
सुर तैंतीसो कौतुक आये, मुनिवर सहस अठासी।
कह कबीर, हम ब्याहि चलै है पुरुख एक अविनासी।

---

८०.

इब न रहूं माटीके घरमें।
इब मैं जाइ रहूं मिलि हरिमें।
छिनहर घर अरु झिरहर टाटी।
घन गरजन कंपै मेरी छाती।
दसवै दारि लागि गई तारी।
दूरि गवन आवन भयो भारी।
चहुं दिसी बैठे चारि पहरिया।
जागत मूसि गये मोर नगरिया।
कहै कबीर सुनहु रे लोई,
भानड घडण संवारण सोई।

---

## ७९. विवाहमंगल

नववधु, गा गे ! मंगलगान
आले घरीं राम यजमान
तनि रति करि मी, मनि रति करि मी, पांचहि तत्त्व वराती
रामदेव मशि व्याहूं आले, मी यौवनमदमाती
शरिरसरोवरि वेदि करी मी, ब्रह्मा वेदोच्चारी
धन्य धन्य मम भाग्य ! सप्तपदि रामासंगे मी करि !
कौतुकार्थ सुर तेतीस कोटी, येती मुनि वनवासी
कबीर म्हणे, व्याहून निघालों पुरुष एक अविनाशी !

'वराती' म्हणजे 'वऱ्हाडी'.

---

## ८०. मातीचें घर

अतां न राहिन मातीच्या घरि
राहिन आतां हरी बरोबरि
चंद्रमोळि घर, ताटी जर्जर,
मेघ गर्जनीं कांपे मम उर
दशमद्वारीं ताटी लागे
जा ये लांबण मोठी मागें !
वसले चहुंदिशि चार पहारे
मजसह नगरीं करिति जागरें
ऐका जनहो ! कबिर सांगती
घडामोड हो पुन्हा तीच ती !

मातीचें घर–भौतिक शरीर; दशमद्वारीं–दहाव्या मुक्कामावर; 'चार पहारे' म्हणजे 'मन, बुद्धि, चित्त व अहंकार'; 'घडामोड' व 'जा-ये' म्हणजे 'पुनर्जन्म'.

८१.

गुरू बडे भृंगी हमारे गुरू बडे भृंगी।
कीटसों ले भृंग कीन्हा आपसों रंगी।
पांव औरे कोई सब भये भृंगी।
पंख औरे और रंग रंगी।
जाति, कुल ना लखें कोइ सब भये भृंगी।
नदी नाले मिले गंगै कहलावै गंगीं।
दरियाव दरिया जा समाने संगमें संगी।
चलित मनसा अचल कीन्ही मन हुआ पंगी।
तत्तमें निःतत्त दरसा संगमें संगी।
बंधतें निर्बंध; कीन्हा तोड सब तंगी।
कहै कबीर कीया अगम गम, नाम रंग रंगी।

-----

## ८१. आपुल्यासारखें करिती तत्काळ

गुरु महा भृंगी आमूचे गुरू महा भृंगी
कीट मी मला भृंग बनविलें आपुल्याच रंगीं
(अपुल्यासम जोगी.)
पाय अन्य अंगांगें अवघीं झालीं भृंगी
पंखालागी रंग मिळाला नाना रंगीं,
जाती, कुळ कुणि बघे न-सगळे झाले भृंगी,
ओहळ, नाले गंगा बनले मिळुनी गंगीं,
सागरामधें सागर झाले संगमसंगीं,
चपल मनाला केलें अविचल तें हो पंगीं,
तत्त्वामधि निःतत्त्व दाविलें, संगीं संगी;
अनिबंध निर्बंधां केले तोडुन तंगी
क़बिर म्हणे, अगमीं गम केले; नामीं रंगी.

---

'पंगी' म्हणजे 'पंगु, स्थिर'; 'संगीं संगीं' म्हणजे 'संगांत–सोबत असणारे'; 'तंगी' म्हणजे 'बंध'; 'अगमीं गम केले' म्हणजे 'ज्ञानांत गम्य केले'; 'नामीं रंगीं' म्हणजे 'नामांत रंगवले'.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 32823 वि: 5104
क्रमांक 7456 नों दि: 6/3/52

## ८३.

अवधू, भजनभेद है न्यारा ।
क्या गाये, क्या लिखि बतलाये, क्या भर्मे संसारा ।
क्या संध्या तर्पनके कीन्हें, जो नहिं तत्त बिचारा ।
मूंड मुडाये, सिर जटा रखाये, क्या तन लाये छारा ।
क्या पूजा पाहनकी कीन्हें, क्या फल किये अहारा ।
बिनपरिचे साहिब हो बैठे, विषय करैं ब्यौपारा ।
ग्यानध्यानका मर्म न जानैं, बाद करैं अहंकारा ।
अगम, अथाह महा, अति गहिरा, बीज न खेत निवारा ।
महा सोध्यान मगन ह्वै बैठे, काट करमकी छारा ।
जिनके सदा अहार अंतरमें केवल तत्त बिचारा ।
कहैं कबीर सुनो हो गोरख तारौं सहित परिवारा ॥

## ८३. भजनरहस्य

अवधुत ! भजनभेद हा न्यारा
काय गाउनी, लिहुनी, दाउनि ! काय भ्रमुनि संसारां !
संध्यातर्पण करुनि काय ! नच करिता तत्त्वविचारा;
मुंड मुंडुनी, जटा वाढवुनि, राख फासुनी शरिरा,—
काय करुनि दगडाची पूजा ! फलमुळकंदाहारा;
'ओळख' नसतां, स्वामी होसी, करिसि विषयव्यापारा,
ज्ञानध्यानमर्मास न जाणिसि, करिसि वृथाहंकारा !
अगम, अथांग, गभीर बिजाचा हृदयिं न केला पेरा;
मथिलें, झाले ध्यान मग्न ते, झाडुन कर्मी कचरा;
निज हृदयीं आहार मानती जे कुणि तत्त्वविचारा
ऐक, कबीर म्हणे, हे गोरख ! तरति सहितपरिवारा

---

'भेद' म्हणजे 'रहस्य'; 'ओळख' म्हणजे 'आत्मतत्त्वाचें ज्ञान'. ज्या दांभिकांनीं अगम, अथांग आणि गंभीर असें भजनरहस्यरूपी बीज आपल्या हृदयाच्या शेतांत पेरलें नाहीं; (ते तसेच राहिले); परंतु ज्या भक्तांनीं त्याचें मंथन केलें ते कर्माचा कचरा झाडून झटकून ध्यानमग्न होऊन बसले. तत्त्वविचार हाच त्यांचा आहार आहे.

## ८३.

अवधू, कुदरतिकी गति न्यारी ।
रंक निवाज करै वह राजा, भूपति करै भिकारी ।
ये ते लवंगहि फल नहिं लागे, चंदन फूल न फूलै ।
मच्छ शिकारी रमै जंगलमें, सिंह समुद्रहि झूलै ।
रेडा रूख भया मलयागिर, चंहुदिसि फूटी वासा ।
तीन लोक ब्रह्मांड खंडमें देखै अंध तमासा ।
पंगुल मेरु सुमेर उलंधै त्रिभुवन मुक्ता डोलै ।
गूंगा ज्ञानविज्ञान प्रभासै, अनहद वानी बोलै ।
बांधि अकासपताल पठावै, सेस सरगपर राजै ।
कहै कबीर, राम है राजा, जो कछु करैं सो साजै ।

---

## ८४.

बूझहु पंडित, करहु बिचारी, पुरुष अहैकी नारी ।
बाम्हनके घर बाम्हनि होती, योगीके घर चेली ।
कलमा पढि पढि भई तुरुकिनी, कलिमें रही अकेली ।
बर नहि बरै, ब्याह नहिं करई, पुत्रजन्म हो निहारी ।
कारे मूंडे एक नहिं छांडै, अबही आदि कुंवारी ।
रहै न मैके, जाइन ससुरे, सांईके संग सोवै ।
कह कबीर, वह जुग जुग जीवै जातिपांति कुल खोवै ।

---

## ८३. सृष्ट्याचें सामर्थ्य

अवधुत सृष्ट्याची गति न्यारी
गोरगरीवाला करि राजा, करि भूपतिस भिकारी,
लवंगेस फल न लगे,–लावी ! फुले न चंदन,–फुलवी !
मत्स्य शिकारीं रमे जंगलीं, सिंह समुद्रीं झुलवी,
ताल वृक्ष ये मलयगिरीवरि चहुंदिशि सोडि सुवासा,
तीन्हिलोकिं ब्रह्माण्डीं खण्डीं पाही अंध तमाशा,
सहज लंगडा पर्वत लंघी मुक्त त्रिभुवनीं डोले
मूक ज्ञान, विज्ञान प्रकाशी, अनहृत वाणी बोले,
पाताळीं आकाश पाठवी, स्वर्गीं शेष विराजे
कबिर म्हणे, तो राम भूपति, जें करि तें त्या साजे

सृष्ट्याचें सामर्थ्य अगाध आहे. तो आपल्या मायेनें अशक्य तें शक्य करून दाखवतो.

## ८४. आदिकुमारी

सांग पंडिता ! विचार करूनी पुरुष असे कीं नारी ?
ब्राह्मणाकडे होत ब्राह्मणी, चेली योगागारीं,
कलमा पढुनी होइ तुर्किणी, कलित एकली राही,
वरास न वरी, विवाह न करी, पुत्रजन्म पण होई,
काळे, भगवे कुणा न सोडी; अजुनी आदिकुमारी
माहेरीं ना, सासरींहि ना जाइ, स्वामिसह झोपे,
युगें युगें ही जगे, कबीरा, जात, पात, कुळ हरपे !

मायेचें वर्णन आहे. 'योग + आगारीं' म्हणजे 'योग्याच्या घरांत;' 'काळे' म्हणजे 'गृहस्थाश्रमी' आणि 'भगवे' म्हणजे 'संन्यासी,' माया अनादि असल्यामुळे तिच्या माहेराचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. समस्त जगत् तिचें पतिगृह आहे. त्यामुळें सासरीं जाण्याचाहि प्रश्न उद्भवत नाहीं. ती माया अपरब्रह्माला सदा चिकटून आहे.

८५.

मेरा तेरा मनुओं कैसे इक होई रे।
मैं कहता हौं आंखि न देखी, तूं कहता कागदकी देखी।
मैं कहता सुरझावनहारी, तूं राख्यौ उरझाई रे।
मैं कहता तूं जागत रहियो, तूं रहता है सोई रे।
मैं कहता निर्मोही रहियो, तूं जाता है मोहि रे।
जुगन जुगन समुझावत हारा, कहीं न मानत कोइ रे।
तूं तो रंडी फिरै बिहंडी, सब धन डारे खोई रे।
सत्‌गुरू धारा निर्मल बाहै, वामें काया धोई रे।
कहत कबीर सुनो भाइ साधो! तबही वैसा होई रे।

---

८६.

शब्दकी चोट लगी तनमें।
घर नहिं चैन, चैन नहिं वनमें।
ढूंढत फिरौ, पीव नहीं पावौ।
औषध सूल खाय गुजरावौं।
तुमसे बैद न, हमसे रोगी।
बिन दिदार क्यों जिए बियोगी।
एकै रंग रंगी सब नारी।
ना जानों को पियकी प्यारी।
कह कबीर कोइ गुरुमुख पावै।
बिननैनन दीदार दीखावै।

---

## ८५. विरोध

माझीं आणिक तुझीं मनें कशि एकसारखीं होतिल रे ?
मी कथितों प्रत्यक्ष पाहिलें पण तूं पोथींतील रे !
मी कथितों सुस्पष्ट, सुगम पण तूं कथिसी दुर्बोध रे !
मी म्हणतों, तूं जागृत राही, राहसि तूं झोपून रे !
मी म्हणतों, निर्मोहि रहा तूं, पण तूं होसी मोहि रे !
युगें युगें समजावुनि थकलों, कोणि न मानी कांहि रे !
तूं तर फिरसी रंडिबिहंडीं गमावुनि धन सर्व रे !
सद्‌गुरुधारा निर्मल वाहे तिच्यांत धुतली काय रे !
ऐक, कबीर म्हणे हे साधो ! होशिल तेंवि तधींच रे !

---

## ८६. प्रियदर्शन

हो शब्दांचा घाव शरिरीं
 चैन वनीं ना, चैन ना घरीं,
पावे ना प्रिय त्यास धुंडितें
 खात औषधी दिवस काढतें.
तुजसम वैद्य न, मजसम रोगी,
 जिवेन तुजविण कशी वियोगीं ?
एका रंगीं सकल रंगती
 रुचे त्यांत तुज कोण संगतीं ?
कबिर म्हणे, ज्या पावे गुरुमुख
 तो घे अनयन तव दर्शनसुख !

---

८७.

पंडित, सोधि कहहु समुझाई।
जाते आवगवन नसाई।
अरथ, धरम अरु काम, मोक्ष फल, कवन दिसावस भाई।
उतर कि दच्छिन, पुरव कि पच्छिम, सरग, पताल कि मांही।
बिनुगोपाल ठवर नहि कबहूं नरक जात धौंकाही।
अनजानेको सरग, नरक है, हरिजानेको नाहीं।
जेहि डरते भवलोग डरतु है सो डर हमरे नाहीं।
पापपुन्नकी संका नाहीं, सरग, नरक नहिं जाहीं।
कहहिं कबीर, सुनहु हो सन्तो, जहं पद तहां समाहीं।

---

८८.

पंडित, देखहु मनमह जानी।
कहुधौं छूति कहांते उपजी तबहिं छूति तुम मानी।
बादे, बंदे, रुधिरके संगे घटही मह घट सपचै।
अस्ट कंवल होय पुहुमी आया छूति कहाते उपजै।
लख चौरासी नाना बासन सो सभ सरि भौ माटी।
एकै पाट सकल बैठाये छूति लेत धौंकाकी।
छूतिहि जेवन, छूतिहि अंचवन, छूतिहि जगत उपाया।
कहहि कबीर, ते छूति बिबरजित, जाके संग न माया।

---

## ८७. अविद्याविनाश

पंडित ! शोधुन समजव, पाही,
जेणें जननमरण नच येई.
काम, मोक्ष, धमर्थि फलें दिशि कवण्या वसती भाई ?—
दक्षिणोत्तरीं, पूर्व पश्चिमीं कीं स्वर्गीं, पातालिहि ?
गोपाळाविण ठाव न कोठें, जन नरकिं न कां जाई ?
अज्ञान्याला स्वर्ग, नरक पण हरि जाणे त्या काई ?
ज्यास भिती भवलोक भिऊं दे, भय तें मजशीं नाहीं,
पाप, पुण्य हा संशय नाहीं, स्वर्गि, नरकिं ना जाई;
कबिर म्हणे, सन्तानो ! ऐका, पद जेथें तिथं मीही !

---

जो अजाण आहे, त्यासाठीं स्वर्ग, नरक आणि पाप, पुण्य या कल्पना आहेत. जो हरीला जाणतो, त्यासाठी हरिपद आहे.

---

## ८८. स्पर्शास्पर्श

पंडित ! नीट विचारुन, पाही,
स्पर्शास्पर्श कुठून उपजले, मानलेंस मग तूंही ?
पवन, वीर्य, रजसंगें गर्भाशयीं गर्भ जर राहीं.
कमलदलाहुन पृथ्वीवर ये, शिवाशीव कोठुन ही ?
फिरुन लक्ष चौऱ्यांशी योनी, शरीर होई माती,
पाटावर एकाच सर्वजण, शिवाशीव कोठुन ती ?
स्पर्शच जेवण, स्पर्शच अंचवण, स्पर्शिच जग हें झालें,
स्पर्शास्पर्शविवर्जित ते, जे मायाविरहित, बोले. (कबीर)

---

पवन, वीर्य व रज यांचा संबंध येऊन गर्भ हा गर्भाशयांत राहतो. मग तो अष्टकमलदलावरून खाली उतरून पृथ्वीवर येतो. अशा स्थितींत स्पर्शास्पर्श ही कल्पना आली कुठून ? त्या परमपित्यानें सर्वांना एकाच पाटावर बसविलें आहे. कबीर कथन करतात कीं, जे मायारहित आहेत, त्यांना स्पर्शास्पर्श नाहीं.



---

८९.

उनकी पीर हो राजाराम जानै कहूं काहिको मानै।
नैनका दुख वैन जानै, बैनका दुख श्रवनां।
प्यंडका दुख प्रान जानै, प्रानका दुख मरना।
आसका दुख प्यास जानै, प्यास जानै, प्यासका दुख नीर।
भगतिका दुख राम जानै कहै दास कबीर।

---

९०.

मोरि चुनरिमें परि गयो दाग पिया।
पांच तत्तकी बनी चुनरिया, सौरह सैबंद लागे जिया।
यह चुनरी मेरे मैकेतें आई, ससुरामें मनुआं खोय दिया।
मलि मलि धोई दाग न छूटै, ग्यानको साबुन लाय लिया।
कहै कबीर, दाग न छूटि है, जब साहेब अपनाय लिया।

---

## ८९. अनुभूति

जनदुःखाला राम जाणतो, ठावा तोच जनां;
नयनदुःख वाणीस ठाउकें, वाणिदुःख तें श्रवणां,
पिंडदुःख प्राणांस ठाउकें, प्राणदुःख तें मरणा;
आशादुःख तृषेला ठावें, तृपादुःख तें नीरा
भक्तिदुःख रामास ठाउकें, सांगे दास कबीरा.

---

कबीरांचा 'निर्गुण राम' कोणत्याहि दार्शनिक वादाच्या मानदंडाच्या पलीकडचा आहे, तार्किक चर्चेच्या वरचा आहे, पुस्तकी विद्येनें अगम्य आहे; परंतु तो प्रेमानें प्राप्य आहे, अनुभूतीचा विषय आहे, आणि सहज भावनेनें भावित आहे.

---

## ९०. चुनडी

माझ्या चुनडीस लागला डाग प्रिया !
पंचतत्त्वमय चुनडी माझी सोळाशें तिज बंद सया !
माहेराहुन आलि, सासरीं मनें गमविलें चुनडिस या;
डाग निघेना घासुनि पुसुनी बोधनसाबण आण प्रिया !
कबिर म्हणे कीं, डाग निघेना, स्वामीनें अपणावलिया.

---

अशी कोणती व्यक्ति आहे जिला प्रियतमानें सनातनकालतत्त्वाची पंचरंगी चुनडी दिलेली नाही ? त्या चुनडीला सांभाळणारा तोच प्रियतम आहे. त्या श्रृंगारपटाचें मूल्य ज्याला कळलें तो धन्य आहे. ज्या व्यक्ति त्या पटास मळवीत आहेत, छिन्नभिन्न करीत आहेत, हलकें मानीत आहेत, त्यांना खरोखर चुनडी घाणेरडी होत आहे याविषयीं अनुताप वाटला पाहिजे. हे सुहासिनी ! ज्या दिवशीं तुला तो प्रियतम आपलेंसें करील, त्या दिवशीं तुझ्या चुनडीचा डाग निघून जाईल. 'सोळाशें बंद' म्हणजे 'असंख्य बंधनें'; रंगारी कापड रंगवतांना तें जागजागीं बांधून मग निरनिराळे रंग देत असतात.

---

## ९१.

भ्रमका ताला लगा महल रे, प्रेमकी कुंजी लगाव ।
कपटकिवडिया खोलके रे, यहि बिधि प्रियको जगाव ।
कहैं कबीर सुनो भाई साधो, फिर न लगै अस दाव ।

———

## ९२.

मानत नहिं मन मोरा साधो, मानत नहिं मन मोरा रे !
बार बार मैं कहि समुझावौं जगमें जीवन थोरा रे ।
या कायाको गरब न कीजै क्या सांवर क्या गोरा रे ।
बिनाभक्ति तन काम न आवै कोटि सुगंध चभोरा रे ।
या माया लखके मत भूलो क्या हाथी क्या घोरा रे ।
जोरि जोरि धन बहुत बिगूचे लाखन कोटि करोरा रे ।
दुविधा, दुरमति औ चतुराई जनम गयो ना बौरा रे ।
अजहूं आ नि मिला सतसंगति, सतगुरु मान निहोरा रे ।
खेत उठाइ परत भुंइ गिरि गिरि ज्यों बालक बिन कोरा रे ।
कहत कबीर चरन चित राखो ज्यों सूई बिच डोरा रे ।

———

## ९१. मुक्ति

लाव महालीं भ्रमकुलुपाला तूं प्रेमाची किल्ली रे !
प्रियास कर तूं जागे यापरि कपट-कपाटें उघडुनि रे !
ऐक, कबीर म्हणे हे साधो ! नको पुन्हा मग हे फेरे.

'फेरे' म्हणजे 'जन्ममरणाचें चक्र'. तूं निष्कपट हो. कारण निर्व्याज प्रेमाला प्रभूची प्राप्ति होते.

---

## ९२. सारहीन संसार

माने ना मन माझें साधो ! माने ना मन माझें रे !
पुन्हा पुन्हा मी किती वुझावूं जगांत जीवन थोडें रे !
या देहाचा गर्व नसावा काय सांवळा, गोरा रे !
भक्तिविना तो नच कामाचा कोटि सुगंधें चोळा रे !
भुलूं नका ही माया पाहुन कुठचे हत्ती, घोडे रे !
जोडुनि जोडुनि धन बहु मेले श्रेष्ठी लाख करोडो रे !
द्विविधा, दुर्मति, चतुराईमधिं जन्म गमविला वाया रे !
सत्संगति कशि अजुनि न करिशी, गुरुस शरण ना जाशी रे !
गडबड भूवरि लोळे ज्यापरि बाळ राहिना कोरे रे !
कबिर म्हणे, चरणांत चित्त द्या सुईंत जैसा दोरा रे !

---

## ९३.

फूला फूला फिरै जगतमें रे मन कैसा नाता रे ।
माता कहै यह पुत्र हमारा, बहिन कहै बिर मेरा ।
कहै भाइ यह भुजा हमारी, नारि कहै नर मेरा ।
पेर पकरिकै माता रोवै, बांह पकरिकै भाई ।
लपटि झपटिकै तिरिया रोवै, हंस अकेला जाई ।
जबलग जीवं माता रोवै, बहिन रोवै दस मासा ।
तग्ह दिनतक तिरिया रोवै, फेर करै घर बासा ।
चारगजी चरगजी मंगाया, चढा काठकी घोरी ।
चारों कोने आग लगाया फूंक दिया जस होरी ।
हाड जरै जस लाकडी, केस जरै जस घासा ।
सोना ऐसी काया जरि गइ कोइ न आया पासा ।
घरकी तिरिया रोवन लागी ढूंढ फिरी चहुं देसा ।
कहत कबीर, सुनो भाइ साधो ! छांडो जगकी आसा ।

---

## ९४.

जो देखा सो दुखिया देखा, तनुधरि सुखो न देखा ।
उदयअस्तकी बात कहत हौं ताकर करहु बिबेखा ।
बाटे बाटै सब कोइ दुखिया क्या गिरही, बैरागी ।
शुकाचार्य दुखहीके कारन गरभै माया त्यागी ।
जोगी दुखिया, जंगम दुखिया, तापसको दुख दूना ।
आशा, तृष्णा सब घट व्यापै, कोइ महल नहिं सूना ।
साच कहो तो सब जग खिझै, झूठ कह्यो नहिं जाई ।
कह कबीर, तेई भे दुखिया जिन यह राह चलाई ।

---

## ९३. सर्वं क्षणिकम्

खुलुनि फुलुनि जगिं भ्रमसि मना ! तूं कुठलीं रे ! नातीं ?
आइ म्हणे, हा सुपुत्र माझा; बहिण म्हणे, हा भाऊ;
म्हणे भाउ, हा बाहू माझा; नारि म्हणे, मम राऊ;
मिठी मारुनी रडे माउली, बाहु धरोनी भाई,
आवळुनि कवळुनि रडे वायको; हंस एकला जाई !
जिवंत तोंवर रडे माउली, बहिण रडे दश महिने,
तेराव्यापर्यंत स्त्री रडे पुन्हा घरीं करि वसणें;
चार गजी चिरगूट आणिलें, दिली लाकडी घोडी,
चारहि कोनीं आग लाविली जशी फुंकली होळी.
जळती हाडें जशीं लाकडें, केस-तणांच्या राशी !
सोन्याऐशी तनू जळाली, कुणी न आले पाशीं !
रडूं लागली बाइल हिंडत धुंडित अवघ्याहि दिशा
ऐक, कबीर म्हणे हे साधो ! सोड जगाची आशा !

‘राऊ’ म्हणजे ‘राव’ अर्थात् ‘पति’. ‘हंस’ म्हणजे ‘शुद्ध, मुक्त जीवात्मा’.

## ९४. सर्वं दुःखम्

जो दिसला तो दिसला दुःखी, तनुधर सुखी न दिसला,
उदयास्ताच्या गोष्टि सांगशी, विवेक कर तो फार भला,
मार्गोमार्गीं अवघे दुःखी संसारी, बैरागी
शुकाचार्यहि दुःखाकारण गर्भी माया त्यागी.
जोगी दुःखी, जंगम दुःखी, तापस दुप्पट दुःखी,
आशा, तृष्णा व्यापिति सकलां; महाल एक न बाकी !
साच कथा तर चिडे जगत, नच खोटें कथितां येई
कबिर म्हणे कीं, तेही दुःखी ज्यांची परिपाटी ही;

‘संसारी’ म्हणजे ‘गृहस्थाश्रमी’. ‘त्यागी’ म्हणजे ‘टाकून देई’.

९५.

ना जाने तेरा साहब कैसा है ।
मसजिद भीतर मुल्ला पुकारै, क्या साहब तेरा बहिरा है ।
चिउंटीके पग नेवर बाजे, सो भी साहब सुनता है ।
पंडित होयके आसन मारै, लंबी माला जपता है ।
अन्तर तेरे कपटकतरनी, सो भी साहब लखता है ।
ऊंचा नीचा महल बनाया, गहरी नेंव जमाता है ।
चलनेको मनसूबा नाहीं, रहनेको मन करता है ।
कौडी कौडी माया जोडी, गाडि जमीमें धरता है ।
जेहि लहना है सो लै जइ है, पापी बहि बहि मरता है ।
सतवन्तीको गजी मिलै नहिं, वेश्या पहिरै खासा है ।
जेहि घर साधू भीख न पावै, भडुआ खात बतासा है ।
हीरा पाय परख नहिं जाने, कौडी परख न करता है ।
कहत कबीर सुनो भाइ साधो, हरि जैसेको तैसा है ।

# ९५. उपहास

कळे न कांहीं–असा कसा तव स्वामी रे ?
मुल्ला मशिदीमधें पुकारी स्वामि तुझा कां बहिरा रे ?
मुंगीच्या पदिं नूपुर वाजति, तरी ऐकतो स्वामी रे !
पंडित होउनि आसन ठोकिसि, लामणमाळा जपशी रे !
हृदयामध्यें कपटकातरी, स्वामीला ती दिसते रे !
ऊंच ठेंगणे महाल बांधिशि, खोल पायवा घालिशि रे !
चलावयाचा बेत नसे तव, रहाण्यास मन करतें रे !
कवडी कवडी माया जोडुनि, भुईंत गाडुनि ठेविशि रे !
घ्यायाचें तें घे रे ! पापी वाहुनि वाहुनि मरती रे !
सतीस गजभर वस्त्र मिळेना, वेश्या लेई कोशा रे !
ज्या घरिं साधुस भीक मिळेना, भडवा खाइ बतासा रे !
हिरा प्राप्त पण पारख नाहीं, कवडीपारख करिशी रे !
ऐक कबीर म्हणे साधो ! हरि जशास तैसा आहे रे !

------

९६.

पकरि समसेर मैदानमें पैसिये,
देहपरजंत करु जुद्ध भाई !
काट सिर बैरियां दाब जहंका तहां,
आय दरबारमें सीस नाई।
करत मतवाल जहं संतजनसूरमा,
धुरत निस्सान तहं गगन घाई
कहै कबीर अब नामसों सुरखरु,
मौज दरबारकी भक्ति पाई।
एक समसेर इकसार बजती रहै
खेल कोइ सूरमा सन्त झेलै।
कामदल जीति करि, क्रोध पैमाल करि,
परम सुखधाम तहं सुरति मेले।
सीलसे नेह करि, ज्ञानको खड्ग लै
आय चौगानमें खेल खेलै।
कहै कब्बीर सोइ सन्त जन सूरमा
सीसको सौंप करि करम ठेलै।

------

## ९६. ज्ञानखड्ग

धरुनि समशेर करिं, ठाक निर्भय रणीं,
देहपर्यन्त कर युद्ध भाई !
वैरियांचीं शिरें कापुनी, दाप त्यां,
परत दरबारिं ये, नम्र होई,
करिति विक्रम जिथें सन्तजन शूर हे
फडफडे ध्वज तिथें गगनछायीं !
कबिर बोले अतां 'नाम' राखिल सुखी
मौज दरबारिंची भक्ति लाही.
एक समशेर पण सारखी खणखणे
खेळतां शूर कुणि सन्त झेली
कामदल जिंकुनी, क्रोध पदिं चिरडुनी,
परमसुख धामिं मग सुरति मेळी
करुनि शीलासवें स्नेह, मग ज्ञान असि–
घेउनी या रणीं खेळ खेळी
तोच कब्बिर म्हणे, सन्तजन शूर हो !
सोंपुनी शीर्ष करि कर्म अपुलें !

---

कबीरांची साधना ही वीराची होती. 'लाही' म्हणजे 'लाभ करून घे.' 'मेळी' म्हणजे 'मिसळ.'

९७.

साधो, सहज समाधि भली ।
गुरु प्रताप जा दिनसे उपजी, दिन दिन अधिक चली ।
जहं तहं डोलो सोई परिकरमा, जो कछु करों सो सेवा ।
जब सोवों तब करों दण्डवत, पूजों और न देवा ।
कहों सो नाम, सुनों सो सुमिरन, खांव पियो सो पूजा ।
गिरह उजाड एकसम लेखौं, भाव न राखौं दूजा ।
आंख न मूंदों, कान न रुंधों, तनिक कष्ट नहिं धारौं ।
खुले नैन पहिचानौं हंसि हंसि, सुंदर रूप निहारौं ।
सबदनिरन्तरसे मन लागा, मलिन वासना त्यागी ।
ऊठत बैठत कबहुं न छूटै, ऐसी तारी लागी ।
कह कबीर यह उनमुनि रहनी, सो परगट करि भाई ।
दुखसुखसे कोइ परे परम पद, तेहि पद रहा समाई ।

---

९८.

एक निरंजन अलह मेरा, हिंदू, तरुक दहूं नहिं मेरा ।
राखूं व्रत ना, महरम जाना, तिसही सुमिरूं जो रहै निदानां ।
पूजा करूं न निमाज गुजारूं, एक निराकार हिरदै नमसकारूं ।
जाहज जाऊं, न तीरथ पूजा, एक पिछाण्या तो क्या दूजा ।
कहै कबीर, भरम सब भागा, एक निरंजनसूं मन लागा ।

---

## ९७. सहज समाधि

साधो ! सहज समाधि भली
गुरुप्रतापें ज्या दिनिं उपजलि, दिनिं दिनिं वाढिनली
सहज डोलतां, प्रदक्षिणा हो, करितां कांहीं, सेवा,
निजतां, होई सहज दंडवत, न पुजी इतरां देवां !
वदतां, 'नाम', 'स्मरण', ऐकतां, 'खाद्यपेय' हो पूजा,
घर, ओसाडी समान लेखी, भाव न राखी दूजा,
डोळे न मिटी, कान न झाकी, कष्ट न घेई लवही
उघडया नयनें हसतां जाणे, 'सुंदर स्वरूप पाही'
शब्दि निरन्तर लागे मन्मन मलिन वासना टाकी
उठतां बसतां, कधीं सुटेना, लागे तार अशी कीं !
कबिर म्हणे, उन्मनी राहणी प्रकट करी ही भाई !
सुखदु:खाच्या पैल परमपद, त्या पदिं विरुनी जाई.

---

सहज समाधींत माझे डोळे उघडे असले, तरी मी हासत हासत परमेश्वराचें सुन्दर स्वरूप पाहत आहे हें मी जाणतों.

---

## ९८. एक निरंजन

एक निरंजन अल्ला माझा, हिन्दू, तुरक न माझे दोन्ही
नाही व्रत कीं नाहि मुहर्रम, त्यासच स्मरि जो राहि निदानीं
न करी पूजन, पडे निमाज न, नमी निराकारास मी मनीं
जाइ न हाजीं किंवा तीर्थी ओळखला तो, दुजा कशाला ?
कबिर म्हणे, भ्रम सर्व पळाला मन्मन लागे एक निरंजनिं !

---

९९.

संता यह मन है बड़ जालिम ।
जासौं मनसों काम परो है तिसही ह्वै है मालुम ।
मन कारण की इनकी छाया तेहि छायामें अटके ।
निरगुन सरगुन मनकी बाजी खरे सयाने भटके ।
मनही चौदह लोक बनाया, पांच तत्त्वगुण कीन्हे ।
तीनलोकजीवन बस कीन्हे, परै न काहू चीन्हे ।
जो कोउ कह, हम मनको मारा, जाके रूप न देखा ।
छिन छिनमें कितने रंग लावै जे सपनेहुं नहिं रेखा ।
रासातल बक इस ब्रह्मंडा सबपर अदल चलावै ।
षटरसमें भोगा मन राजा सो कैसे के पावै ।
सबके ऊपर नाम निरच्छर तहं लै मनको राखै ।
तब मनकी गति जानि परै यह सत कबीर मुख भाखै ।

------

## ९९. मनमहिमा

सन्ता ! हें मन जालिम भारी
त्यासह ज्याचें काम, तयाला गोष्ट कळे ही सारी !
मन हें कारण, यांची छाया, त्या छायेंत अटकले
निर्गुण, सगुण मनांच्या बाजू, शहाणे खरे भटकले.
मनेंच चौदा लोक निर्मिले, पांच तत्त्वगुण केले,
तीनलोकजीवन वश केले, पैलचें न ओळखलें,
म्हणे जो कुणी, मना मारिलें, रूप न रेखा ज्यातें
क्षणोक्षणीं किति रंग फासि तें, पाहिलें न स्वप्नीं ते;
ब्रह्माण्डें बत्तीस, रसातक्त, सर्वांवर यमसत्ता
षड्रस भोगी मन राजा तो येईल कसा हाता ?
सर्वांवरती 'नाम' निरक्षर तेंच मनाला राखी
तेधवांच गति कळे मनाची, सत्य कबिर मुख भाकी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .. 32823 .. दि: ....
क्रमांक ....9446.... नों. दि. ..6/3/62

१००.

चल चल रे भौंरा कंवल पासा ।
तेरी भौंरी बोलै अति उदासा ।
वह करत चोज बारही बार ।
तनबन फूल्यौ कस डार डार ।
है लियो बनस्पतिकेर भोग ।
कुछ सुख न भयो तन बढ्यो रोग ।
दिवस चारके सुरंग फूल ।
तेहि लखि भारा रह्यो भूल ।
बनस्पति जब लागै आग ।
तब भंवरा कहं जैहो भाग ।
पुहुप पुराने गए सूख ।
लगी भंवरको अधिक भूख ।
उड न सकत बल गयौ छूट ।
तब भंवरा रोवै, सीस कूट ।
चहुं दिसि चितवै मुंह पराय ।
ले चल भंवरी सिर चढाय ।
कहै कवीर ये मनके भाव ।
नामबिना सब जमके दांव ।

## १००. ऊठ ! जागा हो !

चल भ्रमरा ! कमळाजवळीं
उदास भ्रमरी तव बनली !
चोज करी ती वारंवार
तनुवन्न फुलले, येइ बहार !
वनस्पतींचे घेउन भोग
सुख न वाढलें, शरिरीं रोग,
चार दिनांचें रंगित फूल
बघुनि तयाला पडली भूल
वनस्पतींना लागे आग
भ्रमर पळाला, आली जाग
पुष्पें सुकलीं जीर्ण अशेष
भ्रमरा लागे भूक विशेष
उडूं शके ना, शक्ति खचे,
भ्रमर रडे, शिर फोडि, पिचे,
पाहि चहुंकडे मुख वळवून
भ्रमरि निज शिरीं ने वाहून !
कबिर, मनाचे, कथि, हे भाव
नामाविण काळाचे डाव !

---

**१०९.**

चुनरिया हमरी पियाने संवारी,
कोई पहिरै पयकी प्यारी
आठ हाथकी बनी चुनरिया
पंचरंग पटिया प्यारी।
चांद, सुरुज जामे आंचल लागे
जगमग जोति उजारी।
बिनुताने यह बनी चुनरिया
दास कबीर बलिहारी।

---

# १०१. अनन्ताचें गीत

चुनडि आमुची प्रियें बनविली
आवडतीनें ल्यावी कुशलीं ।
आठ हातिं ती बनली चुनडी
पंचरंगि पट्टेओळी !
चंद्र, सूर्य हें अंचल ज्यामधिं
झगमग ज्योति उजळली ।
मागाविण ही बनली चुनडी
दास कबिर ओवाळी !

---

अनादि अनंत काळाचा हा आवरण पट म्हणजे परमेश्वररूपी प्रियकरानें भक्तरूपी प्रियेला दिलेली चुनडी आहे. ही चुनडी सामान्य नाहीं. ती लेण्यास क्षमता हवी. ही चुनडी अष्टप्रहररूपी आठ हातांची असून तिला पंचतत्त्वरूपी पांच रंगांनीं रंगविलें आहे. काल अविभाज्य, अगणनीय व अपरिमेय असल्यामुळें पांच तत्त्वांचे पट्टे ओढून तो व्यक्तक्षम केला आहे. या चुनडीचे पदर सूर्य, चंद्र आणि तारे यांच्या उज्ज्वल दीप्तीनें चित्रमय झाले आहेत. ही अनंत चुनडी कोणत्याहि मागावर विणलेली नाहीं. ही चिरनूतन आहे. ही सनातन आहे.

'कुशली' म्हणजे 'खुशाल' किंवा 'कौशल्यानें'. 'ओवाळी' म्हणजे 'कुरवंडी करतो.'

**समाप्त**

मराठी ... संग्रहालय.
अनु. 32823
क्रमांक 1445 नों. दि. 8/3/...

# वृत्तविवरण

कबीरदासांच्या अटपट वाणीनें क्वचित् कांहीं वृत्तांचा अवलंब केला आहे. अभ्यासकांच्या सोयीसाठीं त्यांपैकीं कांहीं ठळक वृत्तांचें विवरण येथें करीत आहे.

## १ दोहा

या वृत्ताच्या विषम चरणांमध्यें तेरा आणि समचरणांमध्यें अकरा मात्रा असतात. शेवटचें अक्षर लघु असतें.

१३ ११ = २४

एक साधे सब सधे । सब साधे सब जाय
जो तूं सिंचे मूलको । फूले फले अघाय ।।

मराठी भाषेचे महाकवि मोरोपंत हे प्रयाग, काशी, गया इत्यादि ठिकाणीं तीर्थयात्रेस गेले होते. तेथें त्यांचा हिंदी साहित्याशीं संपर्क आला. त्यांचीं 'सद्वर्णन', 'विठ्ठलस्तुति' इत्यादि कांहीं स्फुट काव्यें 'दोहा' वृत्तामध्यें आहेत. 'सद्वर्णनां'त ते म्हणतात :—

सन्तांची ऋजु रीति हे, । जना लाविती वेड
कीं पाहति सम विप्र, गो, । कुंजर, कुतरे, धेड. ।।

आणि दोहा या वृत्तामध्यें आपणच प्रथम मराठींत रचना करीत आहों हें सांगतांना ते 'विठ्ठलस्तुतीं'त लिहितात :—

महाराष्ट्र भाषेंत ही । दोहा रीति नवीच,
रची मयूरेश्वर इला । मनीं धरील कवीच.

## २ साखी

या वृत्ताच्या चरणांत एकूण मात्रा अठ्ठावीस असतात. आणि सोळाव्या व अठ्ठाविसाव्या मात्रांवर यति असतात. शेवटीं दोन गुरू असतात.

१६ १२ = २८

तिरगुन फांस लिये कर डौलै। बोलै मधुरी बानी
केशवके कमला ह्वै बैठी। शिवके भवन भवानी.

हिंदींत 'सार' असें या वृत्तास एक आणखी नांव आहे. कबीरांच्या बहुतेक पदांतील अंतरे या वृत्तामध्यें आहेत. कबीरांची वाणी ही स्वच्छंद व अनिर्बंध असल्यामुळें क्वचित् त्यांच्या पदांतील कांहीं अंतऱ्यांत सत्तावीस मात्रा आढळतात. आणि सोळाव्या व सत्ताविसाव्या मात्रांवर यति येतात. शेवटच्या अक्षरांचा क्रम गुरु-लघु असा असतो. या उपप्रकारास हिंदींत 'सरसी' किंवा 'कबीर' हीं नांवें रूढ आहेत.

१६ ११ = २७

जल उपजी जलही सों नेहा,। रटत पियास पियास
मैं ठाड़ी बिरहिन मग जोऊं,। प्रियतम तुमरी आस ।।

साकीच्या या दोन्ही प्रकारांना कबीर कधीं कधीं सोळा मात्रांचें एक पालुपद जोडतात; तर कधीं कधीं प्रत्येकीं तितक्या मात्रांचीं दोन पालुपदें जोडतात.

१६

माया महा ठगिनि हम जानी
तिरगुन फांस लिये कर डोलै। बोलै मधुरी बानी
केशवके कमल ह्वै बैठी। शिवके भवन भवानी

किंवा,

१६

मुखडा क्या देखै दरपनमें।

१६

तेरे दया धरम नहि मनमें ।।
पाथरकी इक नाव बनाई। उतरा चाहै छनमें
कहत्त कबीर सुनो भइ साधो। वे क्या चढ़िहै रनमें

मोरोपंतांनी दोह्याप्रमाणें साखीहि मराठींत आणली आहे. मात्र त्यांच्या पालुपदांत प्रत्येकीं चवदा मात्रा असतात.

१४
महिमा साध्वीचा परिसा ।
१४
गातां उद्धरितो हरिसा ।।

१६ १२ = २८
'जेणें चाळविलें मज शूळीं, । जो निर्दय बहु पापी
सूर्योदय होतांचि मरो तो', । मुनिपति ऐसे शापी ।।

थोरल्या चिपळूणकरांनीं आपल्या 'मेघदूतां'त पालुपदाला वगळून केवळ अठ्ठावीस मात्रांच्या अंतऱ्याचा उपयोग केला आहे.

## ३ चौपाई

या वृत्ताच्या प्रत्येक चरणांत सोळा मात्रा असतात. मात्र या वृत्तामध्यें शेवटीं गुरु-लघु हा क्रम नसावा असा निर्बंध आहे. या वृत्तालाच 'पाद कु · क' हें संस्कृत नांव आहे.

१६
दरकी बात कहौ दरवेसा
बादशाह है कौने भेसा
कहां कूच ?, कह करे मुकामा ?
कौन सुरतिको करौं सलामा ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम.......................... वि: ......................
क्रमांक .......................... नों दि .....................

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम 32823 वि:
क्रमांक 7545 नों दि 6/3/52

# आधारभूत ग्रंथ


१. कविता कौमुदी भाग १ ला — रामनरेश त्रिपाठी

२. कबीरवचनावलि — अयोध्यासिंह उपाध्याय

३. कबीर दोहावलि — बाबूराम शर्मा

४. संत कबीर
५. कबीरका रहस्यवाद } — रामकुमार वर्मा

६. कबीर बीजक — हंसदासशास्त्री, महावीरप्रसाद

७. संतसुधासार — वियोगी हरि

८. कबीर-साखी-सुधा — प्रो. रामचन्द्र श्रीवास्तव 'चंद्र'

९. हिंदी नवरत्न — मिश्रबंधु

१०. कबीर — डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी

११. कबीर साहित्यकी परख — परशुराम चतुर्वेदी

१२. कबीररत्नावली — शंकरनाथ सुकुल


REFBK 0011994
REFBK-0011994